## सभापतीस्थानी माननीय उप सभापती

**पृ. शी.** :वाघाडी लघु प्रकल्प व रायगड लघु प्रकल्पांच्या कामांमध्ये कटऑफ ट्रेन्चमध्ये कंत्राटदाराने अतिरिक्त पैसे लाटणे

**मु. शी.** :वाघाडी लघु प्रकल्प व रायगड लघु प्रकल्पांच्या कामांमध्ये कटऑफ ट्रेन्चमध्ये कंत्राटदाराने अतिरिक्त पैसे लाटणे

यासंबंधी श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील सिंचनाच्या अनुशेष वाढत असताना अधिकारी व कंत्राटदारांनी संगनमताने मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या किंमती दहापटीने वाढविणे, बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यात जिगाव प्रकल्पाची किंमत सन १९९० मध्ये ३९६ कोटी रुपये असताना सन २०१० मध्ये ती ४,०४४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचणे, त्याचप्रमाणे, उर्ध्व मंडळ प्रकल्पांतर्गत वाघाडी लघु प्रकल्प व रायगड लघु प्रकल्पांच्या कामांमध्ये कटऑफ ट्रेन्चमध्ये कंत्राटदाराने अतिरिक्त पैसे लाटणे, जिगाव प्रकल्पाच्या ६ गटांमध्ये काढण्यात आलेल्या निविदा भरणाऱ्या एकूण ९ कंत्राटदारांपैकी ३ कंत्राटदार डमी असल्याने ६ कंत्राटदारांनीच कामांची रिंग करुन सदर कामे घेणे, जिगाव प्रकल्पामध्ये दिलेले स्टीलचे दर खूप जास्त असल्याचे वडनेरे समितीने देखील त्यांच्या अहवालात नमूद करणे, या दोषी अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, त्याचप्रमाणे, वाघाडी लघु प्रकल्प तसेच, रायगड लघु प्रकल्पाच्या कामांसाठी दिलेल्या अतिरिक्त देयकाची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चौकशी करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळे (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरुन दिसून येईल की, विदर्भावर अन्याय कसा होतो आहे. हे शासन विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढत नाही. अनुशेष भरुन काढावयास गेले तर कंत्राटदार अडथळा आणतात. कंत्राटदार मोठया प्रमाणात लूट करतात. ज्या कंत्राटदारांनी लूट केली आहे, त्यासंबंधी चौकशी करण्यासाठी वडनेरे समिती शासनानेच नेमलेली आहे. त्या समितीने चौकशीमध्ये या कामावरील कंत्राटदारांना दोषी ठरविलेले आहे. संबंधित कंत्राटदार दोषी असताना त्यांच्या विरुध्द शासनाने कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. सिंचन मंत्री हे विदर्भातील असूनही सदर कंत्राटदारांच्या विरुध्द कारवाई करीत नाहीत. त्यामुळे विदर्भातील सर्वसामान्य माणसांच्या मनात शासना विषयी आक्रोश निर्माण झालेला आहे. या ठिकाणी 6 कामे होती. माननीय श्री.जयंतभाई या कामासाठी 6 कंत्राटदार एकत्र आले. त्यात 3 कंत्राटदार खोटे आणले. 6 कंत्राटदारांनी एक रिंग केली. त्यांनी या कामांचे टेंडर भरले.

**उप सभापती** : तुम्ही फक्त श्री.जयंतभाई यांच्याकडे बघूनच बोलणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सकाळी त्यांचा चेहरा प्रसन्न असतो म्हणून त्यांच्याकडे बघून मी बोलतो आहे.

**उप सभापती** : माझा चेहरा प्रसन्न नाही काय ?

श्री.विनोद तावडे : तुमच्या पेक्षा जास्त प्रसन्न चेहरा त्यांचा आहे. तुमचा चेहरा उत्साही आहे. त्यांचा चेहरा प्रसन्न आहे.

**उप सभापती** : मी माझा चेहरा प्रसन्न करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विदर्भात सिंचनाचा अनुशेष वाढतो आहे. प्रति हेक्टरी 80 हजार रुपये खर्च येईल असे गृहीत धरुन सिंचनाचा अनुशेष काढला जातो आहे. बुलढाणा जिल्हयातील नांदुरा तालुक्यातील जिगांव प्रकल्पाची किंमत 1990 मध्ये 396 कोटी रुपये होती. त्या प्रकल्पाची किंमत 2010 मध्ये 4044 कोटी रुपयांवर गेली. या ठिकाणच्या कामाच्या निविदा सहा गटामध्ये काढण्यात आल्या. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे सहा कंत्राटदारांनी रिंग केली. सदर निविदाची प्रक्रिया पाहिली तर जिगाव प्रकल्पाच्या कामात झालेल्या अनियमततेची चौकशी वडनेरे समितीने केली असता तिप्पट दराने स्टील खरेदी केल्याचे आढळून आले आहे. कंत्राटदाराला तिप्पट दर अधिकाऱ्याच्या संगनमताशिवाय देणे शक्य नव्हते. ही बाब सिध्द होऊन आजपर्यंत दोषी अधिकारी आणि कंत्राटदार यांच्या विरुध्द कारवाई का केली नाही ?

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 10:05

श्री.विनोद तावडे...

आपण जनतेच्या पैशाची लूट केल्याप्रकरणी भारतीय दंड संहितेच्या कलम 406, 407 आणि 408 अन्वये गुन्हा दाखल करणार आहात का?

सभापती महोदय, उर्ध्व मंडळ प्रकल्पांतर्गत असलेले वाघाडी लघु प्रकल्प, ता.दर्यापूर, जि.अमरावती आणि रायगड लघु प्रकल्प, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती या प्रकल्पाच्या कामामधील कट ऑफ ट्रेंचमध्ये कंत्राटदाराने अधिका-यांशी संगनमत करुन पैसे लाटल्याच्या तक्रारी माझ्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. शासनाकडे सुध्दा तक्रारी आलेल्या असतील. प्राप्त झाल्या नसतील तर मी आपल्याला तक्रारीची प्रत आणून देतो. सगळी लूट त्या ट्रेंच खणण्यात झालेली आहे हे शासनाला माहिती आहे. लूट झालेली नाही असे शासनाचे म्हणणे असेल तर आपण त्या ठिकाणी जाऊन सिध्द करु. त्यामुळे या सहाही कंत्राटदारांनी जनतेच्या पैशाची लूट केल्या प्रकरणी आपण गुन्हा दाखल करणार का? चुकीच्या पध्दतीचे काम दाखवून अधिकारी आणि कंत्राटदारांनी पैसे उकळले आहेत. सभापती महोदय, वाघाडी लघु प्रकल्प, ता.दर्यापूर, जि.अमरावती आणि रायगड लघु प्रकल्प, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती या प्रकल्पाच्या कामामधील कट ऑफ ट्रेंचमध्ये कंत्राटदाराने हार्ड रॉकचे अतिरिक्त प्रमाण दाखवून जनतेच्या पैशाची लूट अधिकाऱ्यांच्या संमनमताने केली. या दोन्ही प्रकल्पांच्या कामाची एका महिन्यात चौकशी करुन दोषी कंत्राटदारांविरुध्द आपण आयपीसी कलम 406, 407 व 408 अन्वये गुन्हा दाखल करणार आहात का?

सभापती महोदय, जिगाव प्रकल्पाच्या कामामध्ये कंत्राटदार कोण होते याची मी माहिती देऊ इच्छितो. ग्रूप ए मध्ये श्री.रेड्डी यांची हैद्राबादमधील दिपिका इंफ्राटेक या कंपनीला 296 कोटी रुपयांचे काम 19.9 टक्के अबोव्हने दिले. ग्रूप क्रमांक 2 मध्ये मे.बाजोरिया कन्स्ट्रक्शन, यवतमाळ यांना 76 कोटी रुपयांची मूळ निविदा असताना 20.17 टक्के अबोव्हने काम दिले. ग्रूप 3 मध्ये श्री.कोटेचा यांच्या महावीर खरोटे जॉईंट व्हेंचर, जळगाव कंपनीला मूळ 36 कोटी रुपयांचे काम 24.34 टक्के अबोव्हने देण्यात आले. ग्रूप 4 मध्ये श्री.मनिष शहा यांच्या लक्ष्मी सिंजिंग कंपनीला 76 कोटी रुपयांची मूळ निविदा असताना 14.92 टक्के अबोव्हने काम दिले आहे. ग्रूप 5 मध्ये श्री.पवन चोखाणी यांच्या एस.एस.फॅब्रिकेटर्स, नागपूर या कंपनीला 92 कोटी रुपयांचे काम 13.94 टक्के अबोव्हने दिले. ग्रूप 6 मध्ये मुंबईच्या पटेल इंजिनिअरिंग कंपनीला 11.99 टक्के अबोव्हने काम दिले गेले. अशा सर्व सहा कंपन्यांना अबोव्हने निविदा मंजूर केलेल्या आहेत. खडक

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

लागला, खडक लागला सांगून पैसे लूटले आहेत. या संदर्भात वडनेरे समितीने सांगितले आहे. हे लक्षात घेऊन आपण गुन्हे दाखल करणार आहात काय? ट्रेंचबाबत मी जो मुद्दा मांडला त्याची चौकशी करणार आहात काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, जिगाव प्रकल्पाच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. जिगाव प्रकल्पाच्या मूळ संकल्पनेमध्ये वाढ झाली, निर्धारित केलेल्या निधीमध्ये वाढ झाल्याबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही मुद्दे मांडले आहेत.

सभापती महोदय, जिगाव प्रकल्पाला 1990 मध्ये 394 कोटी रुपये किंमतीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. 1996 मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्यामुळे 698 कोटी रुपये किंमतीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार 2005 मध्ये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. ही मान्यता देत असताना निर्धारित किंमत 1220 कोटी रुपये करण्यात आली. संकल्पनेमध्ये काही बदल झाला. त्यानंतर दरसूचीमध्ये वाढ झाली. भूसंपादन आणि पुनर्वसनाचे इश्यू होते. किंमतीमध्ये काही प्रमाणात वाढ झाली. धरणाच्या संकल्पनेमध्ये वाढ झाली.

श्री.विनोद तावडे : ...(जागेवर बसून).... पुनर्वसनाचा खर्च कॉन्ट्रॅक्टर देतो का?

नंतर सी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले आहे की, किंमत कशी वाढली ? किंमत का वाढली याचीच माहिती मी या ठिकाणी देत आहे. किंमत का वाढली याची माहिती आपल्याला नको असेल तर ती माहिती दिली जाणार नाही.

सभापती महोदय, जी कामे देण्यात आली त्यासंदर्भात अनियमितता झाली आहे याबाबत काही प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभाग अशा दोन विभाग मिळून सन 2007-2008 मध्ये सहा गटांची निविदा काढण्यात आली त्यामध्ये दर सूचीच्या आधारावर तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे निविदा काढण्यात आल्या. निविदा स्वीकृती सन 2008-2009 प्रमाणे करण्यात आली. त्यानंतर सन 2008-2009 मधील जी दर सूची होती ती निर्धारित करण्यात आल्यामुळे त्यामध्ये थोडी वाढ झाली. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्याच्या अगोदर निविदामधील ज्या अटी व शर्ती असतात त्यासंदर्भात तसेच दर सूचीच्या संदर्भात त्यावेळेस अस्तित्वात असणारी जी दर सूची असते त्यासंदर्भात चर्चा केली जात असते. यासंदर्भात चर्चा करीत असतांना 4.97 ते 4.98 किंमतीची वाढ करण्यात यावी अशा प्रकारची विनंती करण्यात आली होती व त्या प्रमाणे निविदा स्वीकृत करण्यात आली. निविदा स्वीकृत करण्याची वरील पध्दत होती व त्या पध्दतीने निविदा स्वीकृत करण्यात आल्या होत्या.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे शासनाने सेवानिवृत्त प्रधान सचिव श्री. वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली. या समितीने चौकशी अहवालात काही दोषोरोप सादर केले होते. या चौकशी अहवालामध्ये जे काही दोषारोप होते त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना राज्य शासनाने नोटीसेस दिल्या, तसेच यासंदर्भात संबंधितांची चौकशी सुरु आहे. चौकशी अंती जो काही निकाल येईल त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, वाघाडी लघु प्रकल्प आणि रायगड लघु प्रकल्पाच्या बाबतीतील काही कटऑफ ट्रेन्चमध्ये अनियमितता झाल्याचे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत. काम करीत असतांना जो स्ट्रॅटा लागला त्यामुळे कॉस्ट वाढली गेली. कॉस्ट वाढल्यामुळेच आक्षेप घेण्यात आला. या प्रकरणात चौकशी केली जाईल काय अशी विनंती विरोधी पक्ष नेत्यांनी केलेली आहे. गरज असेल तर गुण नियंत्रण विभागाच्या माध्यमातून याची चौकशी केली जाईल व चौकशीमध्ये काही अढळले तर निश्चित स्वरुपात संबंधितांवर कारवाई केली जाईल. ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात 4 प्रश्न विचारलेले आहेत. या कामामध्ये ज्या स्टीलचा वापर करण्यात आला होता त्या स्टीलच्या भावाचा दर तीनपटीने का वाढविण्ययात आला ? आज 40 रुपये किलो असा स्टीलचा भाव असतांना तीनपटीने दर का लावण्यात आले ? डीएसआर प्रमाणे वाटाघाटी करण्यात आल्या असा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी केलेला आहे. हे डीएसआर कोणी बनवले ? डीएसआर तयार करतांना कोणते तत्व अंगीकारण्यात आले ? पध्दतीप्रमाणे निविदा दिल्या जातात की, नियमा प्रमाणे दिल्या जातात ? प्रचलित पध्दतीप्रमाणे वाटाघाटी करुन ऑर्डर दिली आहे असे माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले आहे.

यानंतर श्री. भारवि....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना आठवण करून देतो की, या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी सभागृहात मागणी केली म्हणून शासनाने वडनेरे समिती नेमली. तेव्हा माझ्या तीन प्रश्नांचे तीन वाक्यात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. आम्हाला विस्तृत उत्तर नको. स्टीलचा दर का वाढला आहे, टेंडरची पद्धती कशी होती, या कामाचे डीएसआर कोणी ठरविले होते, डीएसआर पेक्षा जास्त दर दिले असतील ते देताना वित्त विभागाने काय कार्यवाही केली आहे व त्यास कोणी संमती दिली आहे, या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, दर सूचीमध्ये वाढ झाली आहे. कोणत्या क्वालिटीचे मटेरियल, किती क्वांटीटी मध्ये पाहिजे हे निविदेमध्ये नमूद केले होते. ज्यावेळी निविदा निश्चित झाली त्यावेळीच दरसूचीमध्ये वाढ झाली. त्यामुळे त्या दराची अंमलबजावणी करण्यात आली. डीएसआर निश्चित करण्याचा निर्णय महामंडळाच्या स्तरावर शासनाच्या प्रचलित पद्धतीनुसार झालेला आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये काही प्रमाणात अनियमितता झाली आहे अशी त्या काळात विधि मंडळाच्या सभागृहात चर्चा झाली. त्यामुळे शासनाने वडनेरे समिती नेमली. या समितीने संपूर्ण काभाराची चौकशी केली. या समितीने चौकशीअंती निष्कर्ष काढून आपला अहवाल दिला आहे. त्या निष्कर्षावर शासनाने आता कारवाई केलेली आहे. यात जे अधिकारी दोषी आढळले आहेत त्यांच्या विरूद्ध आता नियमानुसार कारवाई सुरू आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून देखील प्रकल्प पूर्ण झाले नाहीत. हा जो विषय आहे तो याच माध्यमातून निर्माण झालेला आहे. 1990 पासून हा प्रकल्प रखडलेला आहे. प्रकल्प मंजूर करताना तो किती कालावधीमध्ये पूर्ण करावयाचा यासंबंधातील मर्यादा देखील घालून दिली जाते. त्यानंतर मग निधी दिला जातो. असे असताना हा प्रकल्प 23 वर्षे का रखडला आहे ? या प्रकल्पाची किंमत दुप्पट झाली आहे. याला कारण वाढवलेली दरवाढ आहे. यासाठी देखील हरकत आलेली आहे. तेव्हा शासन संबंधितांविरूद्ध केव्हा कारवाई करणार आहे, सदर प्रकल्प केव्हा पूर्ण होणार आहे व या प्रकल्पाची किती किंमत वाढविणार आहात असे माझे प्रश्न आहेत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी देण्यास अनेक वर्षांचा कालावधी गेला आहे. त्यानंतर आपण निधी निश्चित केला. निधी मिळत असताना देखील भूसंपादनाच्या प्रक्रियेमुळे कामाला विलंब झालेला आहे. या सर्व विलंबामुळे प्रकल्पाची किंमत वाढत गेली. भविष्यात हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे काय, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. जसजसा निधी प्राप्त होत होईल तसतसा हा प्रकल्प पूर्ण करण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी मंत्रिमहोदयांनी म्हटले की, गरज पडली तर गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत चौकशी करण्यात येईल. मी येथे आपल्याला ठोसपणे सांगतो आहे. जेव्हा एखादा सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये बाब उपस्थित करतो तेव्हा ती सत्य समजून कारवाई करतो. त्या नुसार शासन कारवाई करणार आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्याप्रमाणे आपण कारवाई करणार काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जीगाव प्रकल्पाच्या दरसूचीचा उल्लेख केला. नियमावलीचे पालन न करता दर वाढविल्याचे स्पेसिफीक म्हटले आहे. डी.एस.आर.चे दर चुकीच्या पध्दतीने वाढविले असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे आणि माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, ही बाब चुकीची आहे. वडनेरे समितीने देखील तसे म्हटले असल्यामुळे आपण ते चुकीचे आहे असे कसे म्हणू शकता ? मग मंत्री महोदयांचे म्हणणे खरे मानायचे की वडनेरे समितीचे म्हणणे खरे मानायचे ? वडनेरे समितीच्या अहवालानंतर शासनाने काही अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली आहे. त्याप्रमाणे संबंधित ठेकेदारावर पोलीस केस करुन त्यांना काळ्या यादीत टाकणार काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे दोन-तीन मुद्दे उपस्थित केले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर देत असताना आवश्कता भासल्यास कारवाई करण्यात येईल असे सांगितले. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, त्या संदर्भात दक्षता पथकामार्फत चौकशी करण्यात येईल. वडनेरे समितीच्या अहवालानुसार काही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्या संदर्भात त्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून उत्तरे येत आहेत. जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कठोर कारवाई केली जाईल. वडनेरे समितीच्या अहवालात ठेकेदारांवर थेटपणे ठपका ठेवण्यात आलेला नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विचारले की, हा प्रकल्प किती कालावधी पूर्ण करणार आहात ? बुलढाणा जिल्ह्यातील हा एक अत्यंत महत्वाचा प्रकल्प आहे. आपण या प्रकल्पाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सिंचनाचे लाभक्षेत्र तयार करीत आहोत. परंतु वन जमीन आणि इतर जमिनी संपादित करण्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या. काही वेळा भूसंपादनासाठी शेतकऱ्यांचा विरोध होतो म्हणून आपण शेतकऱ्यांच्या संमतीने जमिनी घेण्याचा प्रयत्न करीत असतो. जीगाव प्रकल्प कालबध्द कालावधीत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे अहवालानुसार जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

-------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 50 टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांची मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना समायोजनापासून वंचित ठेवणे

**मु. शी.** : 50 टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांची मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना समायोजनापासून वंचित ठेवणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, मितेश भांगडिया, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, नितीन गडकरी, वसंतराव खोटरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक 2 मे, 2012 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील शाळांच्या पटपडताळणीमध्ये 50 टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांची मान्यता काढून घेण्याचा निर्णय शासनाने घेणे, मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे अन्य, शाळांमध्ये समायोजन होणे, 50 टक्क्यांपेक्षा कमी अनुपस्थिती असलेल्या शाळांवर सुद्धा कारवाई होणे, तथापि मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना अतिरिक्त ठरवून त्यांचे अन्य शाळांमध्ये समायोजन करण्याची शासनाने भूमिका घेणे, 50 टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या व मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना समायोजनापासून वंचित ठेवून त्यांच्या सेवा संपुष्टात आणणे, या धोरणामुळे हजारो शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बेरोजगार होणे, त्यांना रोजगार हमीच्या कामावर जावे लागणे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, बंद पडलेल्या शाळांमध्ये शिक्षकांचे समायोजन करताना शासनाने भेदभाव करणे, याबाबत शिक्षक व शिक्षकेतरांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

..3.



AJIT/ KTG/ D/ पूर्वी श्री.भारवि.. 10:20

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील पटपडताळणीच्या अनुषंगाने ज्या शाळांमध्ये 50 टक्केपेक्षा अधिक अनुपस्थिती होती अशा शाळांच्या संदर्भात शासनाने दिनांक 2 मे, 2012 च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्याचा निर्णय घेतला. या शासन निर्णयानुसार राज्यातील जवळपास 2659 शाळा कारवाई पात्र ठरतात असे शासनाने म्हटले आहे. केवळ अनुपस्थितीचे प्रमाण 50 टक्केपेक्षा अधिक आहे अशा शाळांमधील शिक्षकांच्या आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यास माननीय उच्च न्यायालयाने मनाई केलेली आहे. ज्यांनी पटपडताळणीच्या अनुषंगाने शासनाची फसवणूक केली किंवा असत्य माहिती देऊन शासनाची फसवणूक केली त्याचे आम्ही समर्थन करीत नाही. परंतु पटपडताळणीच्या अनुषंगाने संस्थाचालकांनी काही गैरप्रकार केले असतील किंवा संबंधितांनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरप्रकार केले असतील तर त्याची शिक्षा आमच्या शिक्षकांना होऊ नये.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, दोषी नसलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात येत आहे. मुळात हा नियमच आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की,....

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आज लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आहे त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्याच्या कार्यक्रमासाठी आपणा सर्वांना जावयाचे आहे. त्यामुळे मी सभागृहाची बैठक 10.40 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.25 ते 10.40 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : 50 टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांची मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना समायोजनापासून वंचित ठेवणे

**मु. शी.** : 50 टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांची मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना समायोजनापासून वंचित ठेवणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, मितेश भांगडिया, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, नितीन गडकरी, वसंतराव खोटरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( चर्चा पुढे चालू )

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने सुध्दा पटपडताळणीच्या अनुषंगाने कोणाच्याही सेवा समाप्त करण्यास मनाई केलेली आहे. या पटपडताळणीच्या अनुषंगाने किंवा अन्य काही कारणांसाठी जे शिक्षक अतिरिक्त ठरतात किंवा ज्यांच्यावर शासन कारवाई करु इच्छिते त्याला न्यायालयाने मनाई केली आहे अशा शिक्षकांच्या आणि विशेषत: अनुदानित शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतरांचे समायोजन अन्य शाळांमध्ये करणार का आणि ते किती दिवसात करणार ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणावर शाळा वाढलेल्या आहेत. राज्यात शिक्षण हक्क कायदा आला. राज्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासनाने अनेक पावले उचललेली आहेत. त्यामध्ये शाळांची पटपडताळणी हे सुध्दा एक महत्वाचे पाऊल शासनाने गुणवत्तेसाठी उचलले आहे. याच पध्दतीने इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भात सुध्दा पथके पाठवून शाळांची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

माहिती घेणे यामध्ये सुध्दा हाच उद्देच आहे की, या राज्यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे. ज्यावेळी पटपडताळणी झाली त्यावेळी शाळांमध्ये अनुपस्थितीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आढळून आले. त्यामध्ये 50 टक्केपेक्षा जास्त अनुपस्थिती असलेल्या शाळांची एक कॅटेगरी केली आणि 50 टक्केपेक्षा कमी अनुपस्थिती असलेल्या शाळांची दुसरी कॅटेगरी केली. त्यासाठी शासनाने कॉन्शस निर्णय सुध्दा घेतले. कोणत्या शाळांची मान्यता काढावी, कोणत्या शिक्षकांचे समायोजन करावे वगैरे बाबतीत कॉन्शस निर्णय घेतले. मी एवढेच सांगू इच्छिते की, शासनाकडून कोणालाही नैसर्गिक न्यायाची संधी न देता शासनाकडून एकदम अशा प्रकारचे कार्य होणार नाही. सर्व नियम धरुन, कोर्टाच्या आदेशाचे पालन करुन तसेच शासनाचा जो कॉन्शस निर्णय आहे त्याचा विचार करुन तसेच कोठेही गुणवत्तेच्या बाबतीत कॉम्प्रमाईज होणार नाही हे बघूनच शासन निर्णय घेईल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार निव्वळ अनुपस्थितीच्या कारणास्तव शाळेची मान्यता काढून घेतली जाणार नाही. परंतु ही पटपडताळणी झाली असताना यामध्ये अनुपस्थितीच्या ज्या 2600 शाळा दिलेल्या आहेत त्यामध्ये आपण दुसरे मुद्दे सुध्दा घातलेले आहेत. ते मुद्दे जर आपल्या लक्षात आले होते तर ते आधीच त्यामध्ये का घातले नाहीत ? ज्या शाळेची उपस्थिती 50 टक्केपेक्षा कमी आहे अशा काही शाळांना तुमची शाळा बंद करण्यात आलेली आहे अशा नोटिसेस झालेल्या आहेत. त्यांनी त्या संदर्भात अपील केले आहे. आज त्या शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या पुरेशी आहे तसेच सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. अशा वेळी त्या शाळांना मान्यता देऊन तेथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांना लाभ देणार का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, कोर्टाच्या आदेशानुसार निव्वळ अनुपस्थितीच्या कारणामुळे शाळा बंद करता येत नाहीत. शाळांना नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. त्या शाळा अनेक कारणामुळे नियमात बसत नसतील किंवा त्यामध्ये त्रुटी असतील तर अशा शाळांची मान्यता काढण्यात येणार आहे. 50 टक्क्यांपेक्षा जास्त अनुपस्थिती असलेल्या प्राथमिक शाळा 1,404 आहेत. त्यामध्ये 6,290 शिक्षक आहेत. माध्यमिक शाळांची संख्या 248 आहे आणि शिक्षकांची संख्या 2,340 आहे. या शाळांसंबंधी प्रश्न विचारलेला आहे. दुसरी कॅटेगरी प्राथमिक शाळांची संख्या 6,328 आहे, माध्यमिक शाळांची संख्या 2469 आहे. या सर्व शाळांबाबत सर्व परीने न्यायिक भूमिका घेऊन शासन निर्णय घेईल.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

**पृ. शी.** :प्रभादेवी येथील कामगार नगर नं.1 सहकारी गृहनिर्माण सोसायटीच्या धोकादायक इमारतीच्या जागी डी.पी.रोड व आर.जी.दाखवून ती वस्ती इतरत्र हलविण्याचे सुरु असलेले कारस्थान

**मु. शी.** :प्रभादेवी येथील कामगार नगर नं.1 सहकारी गृहनिर्माण सोसायटीच्या धोकादायक इमारतीच्या जागी डी.पी.रोड व आर.जी.दाखवून ती वस्ती इतरत्र हलविण्याचे सुरु असलेले कारस्थान यासंबंधी श्री.रामदास कदम, डॉ.दीपक सावंत ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गेल्या 40 ते 50 वर्षांपूर्वी मुंबई शहरात प्रभादेवी येथे वसविण्यात आलेल्या कामगार नगर नं.1 सहकारी गृहनिर्माण सोसायटीची इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असणे, या इमारतींचा पुनर्विकास त्याच ठिकाणी करण्याचा येथील रहिवासी सोसायटीने केलेला प्रस्ताव, या संदर्भात करण्यात आलेल्या सर्व्हे मध्ये तेथील फक्त 82 कुटुंबांचाच सर्व्हे केला असून 368 कुटुंबांचा सर्व्हे केला नसल्याची माहिती माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीवरून उघड होणे, परंतु या ठिकाणी डी.पी.रोड. व आर.जी. दाखवून ही वस्ती हलविण्याचे सध्या सुरू असलेले कारस्थान, याबाबत या रहिवाश्यांनी मा.मुख्यमंत्र्यांशी केलेल्या पत्रव्यवहारानुसार दिनांक 20 सप्टेंबर, 2011 रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेले चौकशीचे आदेश, या आदेशानुसार अद्यापही कोणतीच चौकशी संबंधित विभागाकडून करण्यात आलेली नसणे, त्यातच जे.एम.स्कायलार्फ बिल्डकॉन प्रा.लि. यांनी सर्व्हे नं.438 लोअर परेल विभाग, या ठिकाणी गोमातानगर गृहनिर्माण सोसायटी, नेहरूनगर गृहनिर्माण सोसायटी सर्व्हे नं.268 व माहिम विभाग एकत्र करून ही योजना राबवित असणे, परंतु नेहरूनगर मधील रहिवाशांचे पुनर्वसन होत नसल्याने तेथील जमिनीवरील आरक्षण

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

प्रभादेवी रोड, येथील कामगार नगर, नं.1 मध्ये दाखविण्यात येणे, त्याचप्रमाणे कामगार नगर नं. 1 वस्तीच्या जवळून जाणाऱ्या नाल्याची रूंदी 120 फुटावरून 60 फुटावर करून नेहरूनगरमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी कामगार नगरमधील रहिवाश्यांना गुंडांच्या सहाय्याने हुसकावून लावण्याचे होत असलेले प्रयत्न, यामुळे परिसरात सध्या भितीचे व दहशतीचे पसरलेले वातावरण, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. प्रभादेवी येथील कामगार नगर-1 ही वसाहत मंत्री महोदय श्री.सचिन अहिर यांच्याच मतदार संघातील आहे. ते आपल्याच मतदार संघातील लोकांवर अन्याय करीत आहेत असे माझे मत आहे. ते लोक 7-7 दिवस उपोषणाला बसले होते. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी याबाबत स्वत: लक्ष घालून माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. ते पत्र मी आपल्याकडे देतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत चौकशीसाठी पत्र लिहिले होते. तरीही आतापर्यंत या लोकांना न्याय मिळालेला नाही. ते पत्रही मी मंत्री महोदयांकडे पाठवित आहे. मुंबई महानगरपालिकेच्या उपायुक्तांनी माझ्या पत्राला दिलेले उत्तर आता मी वाचून दाखवितो. त्यावरुन मला जे उत्तर पाठविले आहे ते चुकीचे आहे ते दिसून येईल. त्यात असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याने दिनांक 6.7.2005 रोजीच्या क्र.टीपीबी/4304/1403/सीआर-205/04/युडी-11, या अधिसूचनेद्वारे मनोरंजनासाठीच्या मैदानाचे आरक्षण रद्द केले आहे." नगरविकास खात्याने आरक्षण रद्द केलेले आहे असे महानगरपालिका म्हणते. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "ना.म.जोशी मार्गापासून डॉ.ॲनी बेझंट रोडकडे जाणाऱ्या प्रस्तावित 39.55 मीटर रुंद डी.पी.रोडची रुंदी कमी करुन 22.80 मीटर करण्यात आली आहे." नाल्याची रुंदी कमी केली नाही, अशा आशयाचे शासनाकडून मला पत्र आले आहे. परंतु ही रुंदी कमी केल्याचे महापालिका म्हणत आहे. शासनाचे म्हणणे आहे की, या जागेवर आरक्षण आहे, पण महानगरपालिका म्हणते की, 2005 साली हे आरक्षण उठविले आहे. या सभागृहाची कशा प्रकारे दिशाभूल केली जात आहे ते यावरुन दिसून येते. मी ही पत्रे मंत्री महोदयांकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, कामगार नगर-1 च्या लोकांनी जी.बी.घेण्यापूर्वी दिनांक 4.3.2011 रोजी निबंधकांना पत्र लिहिले होते की, आम्ही दिनांक 27.3.2011 रोजी जी.बी.घेत असल्यामुळे आपण आपला प्रतिनिधी बैठकीला पाठवावा. परंतु त्यांनी या लोकांना असे कळविले की, तुम्ही बैठक घेतल्यानंतर बैठकीचा अहवाल पाठवून द्यावा. मी माहितीच्या अधिकारात ही माहिती मागविली होती, त्यानुसार दिनांक 25.4.2011 रोजी केवळ 82 कुटुंबाचा सर्व्हे झालेला आहे. मात्र 368 कुटुंबांचा घाईघाईने सर्व्हे केल्याचे वृत्तात नमूद केलेले आहे. त्याची सी.डी.मी मंत्री महोदयांकडे पाठवितो. म्हणजे एसआरएकडून लोकांची दिशाभूल केली जात आहे ते स्पष्ट होईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

कामगार नगर नं. 1 सहकारी गृहनिर्माण सोसायटीने सर्वसाधारण सभा घेतली. त्या सभेला किती सदस्य उपस्थित होते आणि कोणकोणते ठराव त्या सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात आले याची सीडी मी माननीय मंत्री महोदयांकडे देतो, ती त्यांनी तपासून पहावी. त्या सर्वसाधरण सभेला 687 लोक हजर होते आणि जो काही सर्व्हे करण्यात आला तो फक्त 82 लोकांचाच करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणच्या लोकांना विकासक धाकदपटशा दाखवित आहे. त्या बाबतीत लोकांनी तक्रारी देखील केलेल्या आहेत. नाल्याच्यावरती रस्त्याचे बांधकाम करता येऊ शकेल. खाली नाला आणि वरती रस्ता केला तर स्थानिक लोकांना न्याय देता येईल.तेव्हा तेथील लोकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यात येईल काय ? त्या ठिकाणच्या पहिल्या स्कायलॉर्क बिल्डकॉन या विकासकाची हकालपट्टी करुन रहिवाशांनी दुसरा विकासक आणलेला आहे. स्कायलॉर्क बिल्डकॉन या विकासकाची हकालपट्टी झाल्यानंतर कामगार नगर नं 1 सोसायटीच्या लोकांनी एकत्र येऊन जो विकासक नेमेलेला आहे त्याच्या माध्यमातून अनेक्चर 2 आणि 3 च्या सबंधातील प्रोसिजर ताबडतोबीने चालू करयात येईल काय ? चुकीची कागदपत्रे सादर करुन पहिल्या विकासकाला अनेक्चर -2 दिलेला आहे तो रद्द करण्यात येईल काय आणि स्कायलॉर्क बिल्डकॉन या विकासकावर गुन्हे दाखल करण्यात येतील काय ?

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी सविस्तर माहिती सांगितलेली आहे. पुनर्वसन करीत असताना सेम लेआऊटमध्ये एनसी-2 करायला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. अनेक वेळा डेन्सिटी वाढते. हाय डेन्सिटी झाल्यानंतर एमएल कमेट कोणत्या प्रोजेक्टमध्ये असेल तर त्यांना दुसरीकडे पर्यायी घरे देता येतात. या प्रकरणी जसा सन्माननीय सदस्यांचा आग्रह आहे तसा माझाही आग्रह आहे की, या परिसरातील लोक स्वत: जाऊन एमएल कमेट होऊन इतर प्रोजेक्टमध्ये जात असतील तर त्याला हरकत नाही. पण इकडेच राहाण्याचा त्यांचा आग्रह असेल तर त्यांना सेम लेआऊटमध्ये घर देता येईल का या बाबतीत मी स्वत: लक्ष घालीन. सन्माननीय सदस्यांनी जनरल बॉडीमध्ये ठराव करुन दुसरा विकासक नेमला असे सांगितले. ती देखील माहिती घेण्यात येईल. पण सरसकट रहिवाशांनी विकासक आणला आणि आपण तो त्यांना दिला असे होत नाही. योजना सादर झाल्यानंतर त्यावेळच्या सोसायटीची जनरल बॉडी ग्राह्य धरली जाते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

इतरानी सोसायटी करुन परस्पर विकासक आणला तर तो रेकॉर्डवर घेतला जात नाही. परंतु आजही अशी नियमामध्ये तरतूद आहे की, जर रहिवाशांना विकासक नको असेल तर सोसायटीने ठराव करुन 13(2)ची कारवाई करण्यास विनंती करावी. 70 टक्क्यापेक्षा जास्त मताने ठराव सभेमध्ये झाला तर निश्‍चितपणे 13(2) ची कारवाई केली जाईल. अनेक्चर रद्द केले तरी रहिवाशांचा हेतू साध्य होणार नाही. अनेक्चर झाल्यानंतर देखील जेव्हा नवीन जी.बी. घेतली जाईल त्यावेळी अनेक्चर नुसार कोणत्या विकासकाला विकास करण्यास सहमती आहे हेही तपासून पाहिले जाईल आणि त्या रहिवाशांना न्याय दिला जाईल.

श्री. रामदास कदम : या विकासकाने गोमातानगर हा भाग विकसित केलेला आहे. त्या ठिकाणी इमारत बांधून विकासकाने त्यामधील फ्लॅट विकले आहेत आणि तेथील झोपडपट्टीवासीयांना तो विकासक याठिकाणी आणत आहे. म्हणून या एसआरएच्या योजनेची चौकशी केली जाईल काय ? तसेच विकासकाने जी काही दहशत निर्माण केलेली आहे त्याबाबत त्याच्यावर कारवाई केली जाईल काय ?

श्री. सचिन अहिर : मी स्वत: याबाबतीत बैठक घेईन, सीओना देखील त्या बैठकीस बोलवीन आणि या सर्व गोष्टींची चौकशी करीन.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रीयकृत बँका,शेड्युल्ड कमर्शियल बँका यांनी ठेवीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यास दिलेला नकार.

**मु. शी.** : राष्ट्रीयकृत बँका,शेड्युल्ड कमर्शियल बँका यांनी ठेवीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यास दिलेला नकार यासंबंधी श्री.अमरसिंह पंडित,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेडयूल्ड कमर्शियल बँका तसेच आयसीआयसीआय, ॲक्सिस, आयडीबीआय इत्यादि बँकेत जिल्ह्यातील ठेवीदारांच्या ३,७७,८९९ लक्ष रूपयांच्या ठेवी जमा असणे, ठेवीच्या प्रमाणात या बँकानी कर्ज वाटप करण्यास नकार देणे, आयसीआयसीआय बँकेने १७१ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी ६ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, ॲक्सिस बँकेने २९ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी केवळ ४ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, स्टेट बँक ऑफ हैदराबादने १,१९२ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी केवळ ७१० कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक वगळता इतर बँकांनी कर्जाचे ठेवींशी आदर्श प्रमाण (सीडी रेशो) निर्धारित प्रमाणात न पाळणे, शासनाच्या निकषाप्रमाणे, कर्जदारांना अल्पव्याज दर किंवा शुन्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध न करणे, अनेक बँकांनी शासनाकडून सवलतीच्या व्याजदराची रक्कम स्विकारूनही कर्जदार शेतकऱ्यांना व्याजाची सवलत न देणे, खाजगी बँकांना सवलतीच्या दरात पिक कर्ज वाटपाच्या दृष्टीने शासनाने व्याजातील फरक मंजूर करणे, परंतु राज्य शासनाने् त्यांच्या वाट्याचा फरक त्या बँकाना मंजूर न करणे, यामुळे जिल्ह्यातील लाखो शेतकरी शेती कर्जापासून वंचित राहणे, यामुळे ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतकरी त्रस्त होणे, जिल्ह्यातील बँकांनी उद्दिष्टाप्रमाणे व सवलतीच्या व्याजदरात कर्ज वाटप करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने या गंभीर विषयाबाबत करावयाची सत्वर कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला जे उत्तर देण्यात आलेले आहे, त्या उत्तराला माझी हरकत आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये अतिशय स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, आयसीआयसीआय, ॲक्सिस,आयडीबीआय आणि एचडीएफसी अशा ज्या खाजगी बँका आहेत, यांच्याकडे बीड जिल्हयातील साधारणत: 3776 कोटी रुपयांच्या ठेवी जमा आहेत. यात काही फिक्स डिपॉझीट आहेत, काही रक्कम सेव्हींग अकाऊंटमध्ये आहे, काही रक्कम करंट अकाऊंटमध्ये आहे. ही गोळा केलेली रक्कम 4 टक्के व्याज दराने या खाजगी बँकांकडे डिपॉझीट म्हणून आहे. ही रक्कम शेतकऱ्यांची आहे. त्याच शेतकऱ्यांना कर्ज वितरित करीत असताना 12 टक्के व्याज दर आकारले जात आहे. एकीकडे शेतकऱ्यांची रक्कम डिपॉझीट म्हणून घेता, परंतु त्यावर व्याज फक्त 4 टक्के देता. जास्तीत जास्त फिक्स डिपॉझीट केले तर त्या रक्कमेस 6 टक्के व्याज दर दिला जातो. परंतु त्याच शेतकऱ्यांनी सदरहू बँकाकडून पीक कर्ज मागितले तर त्यांना 12 टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. इंट्रेस सबव्हेंशन क्लॉज जो आहे, त्यासंदर्भात केंद्रीय वित्त मंत्री यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, आम्ही या संदर्भात निर्णय करतो आहोत. मराठवाडयातील अतिशय दुर्गम आणि मागासलेला भाग म्हणून बीड जिल्हयाकडे पाहिले जाते. खाजगी बँकांनी तेथील शेतकऱ्यांकडून 3776 कोटी फिक्स डिपॉझीट म्हणून घेतले आहेत, त्या रक्कमेस फक्त रुपये 4 टक्के, 6 टक्के एवढेच व्याज दिले जात आहे. परंतु त्याच शेतकऱ्यांना खाजगी बँका पीक कर्ज देताना 12 टक्के व्याजाची आकारणी करतात. या शेतकऱ्यांसाठी इंट्रेस सबव्हेंशन क्लॉज लागू करण्याचा निर्णय घेतला गेला तर त्या शेतकऱ्यांना 6 टक्के दराने अथवा शुन्य टक्के दराने कर्ज मिळू शकते. म्हणून राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी इंट्रेस सबव्हेंशन क्लॉज लागू करण्याचा निर्णय घेणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या चार राष्ट्रीयकृत खाजगी बँका आहेत त्या बद्दलचा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, त्यामध्ये त्यांचा सीडी रेशो 67 टक्के एवढा आहे आणि त्यांनी आतापर्यंत 74 ते 75कोटी रुपयांचे कर्ज वाटप केलेले आहे. ही गोष्ट खरी आहे की, या राष्ट्रीयकृत बँकांमध्ये बीड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात ठेवी आहेत. सन्माननीय सदस्य हे एके काळी बँकेचे चेअरमन होते. एखाद्या बँकेमध्ये ठेव ठेवल्यानंतर त्या बँकेतील डिपॉझीटरचा संदर्भातील विषय वेगळा असतो. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

बँकांनी कर्ज उपलब्ध देण्याच्या विषय वेगळा असतो. आपण या बँकांना सांगितले की, आपण डिपॉझीट कितीही घ्यावे, परंतु शेतकऱ्यांना कमी टक्क्याने कर्ज द्यावे असे म्हटले तर शेवटी बँकींग रेग्युलेशन ॲक्ट वेगळा आहे आणि डिपॉझीटरचा विषय वेगळा आहे. कर्जदारांचा विषय वेगळा आहे. देशाच्या माननीय वित्तमंत्र्यांनी राष्ट्रीयकृत बँकांसाठी एक परिपत्रक काढलेले आहे. एसएलबीसी मिटींग सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये गेल्या तीन वर्षामध्ये तीन बैठका

झाल्या. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपला 1 लाख कोटीचा क्रेडीट प्लॅन या वर्षी मंजूर झालेला आहे. त्यातील 35 हजार कोटीचा क्रेडीट प्लॅन फक्त पीक कर्जाचा आहे. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांना सुध्दा व्याज सवलत योजनेच्या माध्यमातून पीक कर्ज दिले पाहिजे अशा प्रकारचे आदेश प्राप्त झालेले आहेत. एक गोष्ट खरी आहे की, बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना पाहिजे तेवढया प्रमाणात पीक कर्जाचे वाटप झालेले नाही. पीक कर्ज वाटप न केलेल्या खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांची पुढील आठवडयात एक बैठक आयोजित केली जाईल. त्या बैठकीत लीड बँकेस बोलाविले जाईल. त्या बँकेचे सी.एम.डी.असतील, त्यांना आम्ही निश्चितपणे सूचना देऊ. बीड जिल्हयात ज्या शेतकऱ्यांची पीक कर्जाची अजून मागणी असेल तर त्यांना पीक कर्ज वाटप करण्याकरिता सहकार विभाग पुढाकार निश्चितपणे घेईल.

श्री.अमरसिंह पंडित : मला फक्त एकच माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची आहे. सीडी रेशोच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले. तो सीडी रेशो हा फक्त एसबीएसचा आहे. बाकीच्या आयसीआयसीआय, ॲक्सिस,आयडीबीआय आणि एचडीएफसी या बँकांचे पीक कर्ज वाटप शून्य आहे. या बँकांनी एक नवा पैसा पीक कर्ज म्हणून वितरित केला नाही ही बाब मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित..... लक्षवेधी सूचना क्रमांक-3....

एसीपी जो तयार झाला त्या एसीपीमध्ये याही बँकांचा एसीपी समावेश केला असल्यामुळे तो वाढलेला दिसतो. त्यामुळे ज्या संबंधित बँका कर्ज वितरित करतात त्यांना इष्टांक वाढवून देण्याच्या संदर्भात त्या बैठकीमध्ये निर्देश द्यावेत एवढी अपेक्षा आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : त्या बैठकीमध्ये निश्चितपणे याचाही विचार करण्यात येईल.

---------------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भोंदूबाबा व मांत्रिकांकडून भोळ्याभाबड्या नागरिकांची होत असलेली आर्थिक व मानसिक फसवणूक

**मु. शी.** : भोंदूबाबा व मांत्रिकांकडून भोळ्याभाबड्या नागरिकांची होत असलेली आर्थिक व मानसिक फसवणूक यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबईतील तुर्भे, इंदिरानगर येथील रुम नं. १४५६ येथे मांत्रिकाचे काम करणाऱ्या सुमनकुमार श्रीरामप्रवेश तिवारी यांने दिनांक ३० एप्रिल, २०१३ च्या दरम्यान तेथेच राहणाऱ्या तरुणीवर मंत्रतंत्र करुन तिचा "आकडी" हा आजार बरा करण्याच्या बहाण्याने केलेला बलात्कार, या घटनेमुळे अशा भोंदूबाबांच्या विरोधात येथील नागरिकांकडून कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, भोंदूबाबांकडून भोळ्या-भाबड्या लोकांची आर्थिक व मानसिक फसवणूक होत असणे, अशा मांत्रिकांवर कोणतीही कारवाई हात नसल्यामुळे नागरिकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली चिडीची भावना, भोंदू बलात्कारी मांत्रिकांवर शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 5.....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सुमनकुमार तिवारी या मुलीला आकडी येत होती. तिला भोंदूबाबाकडे नेल्यानंतर त्याने तिला नारळ दिला. त्या नारळामध्ये औषध मिसळले होते. त्या औषधामुळे ती मुलगी बेशुध्द झाली. त्या अवस्थेत तिच्यावर बलात्कार करण्यात आला. स्थानिक लोकांनी या संदर्भात प्रचंड विरोध केला होता.

सभापती महोदय, महाराष्ट्र पुरोगामित्वाची परंपरा लाभलेले राज्य आहे. या पार्श्वभूमीवर भोंदूबाब लोकांची फसवणूक करतात, स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, लैंगिक शोषण केले जात आहे, विवस्त्र धिंड काढली जाते, लहान मुलांचा नरबळी दिला जातो, सर्पदंश झाल्यास वैद्यकीय उपचार न करता भोंदूबाबांकडे जाऊन विष उतरविण्याचा प्रयत्न केला जातो, गुप्त धनाचा शोध घेऊन देणे, नरबळी आदी अमानुष प्रकार कोणत्याही परिस्थितीत थांबविण्यात आले पाहिजेत. महाराष्ट्र राज्याची असे अनैतिक प्रकार मोडून काढण्याची जबाबदारी आहे. भूत उतरविण्याच्या नावाखाली मनोरुग्णांना क्रूर मारहाण केली जाते. भारतीय राज्य घटनेने शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण होईल असे शिक्षण देण्याचे आदेश दिलेले असताना जादूटोणा प्रतिबंध विधेयक कधी मंजूर होणार आहे? 14 वर्षे विधेयक मंजूर होण्याची अपेक्षा करीत आहोत. शासन हे विधेयक का मंजूर करुन घेत नाही? किती महिला, किती स्त्रिया आणि किती मुलांचा बळी दिल्यानंतर शासन जादूटोणा विधेयक मंजूर करणार आहे? या अनैतिक प्रथा बंद करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय? हे विधेयक कधी मंजूर होणार आहे?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, घडलेल्या घटनेमध्ये आरोपीला अटक करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. कलम 376, 328 अंतर्गत अटक करुन पी.सी.आणि एम.सी.आर.झाला असून चार्जशीट फाईल केली आहे. उपरोक्त कलमांतर्गत शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केला जाईल. माननीय सदस्यांनी सांगितलेल्या बिलाच्या संदर्भात राज्य शासनाची सकारात्मक भूमिका आहे. काही आक्षेपार्ह गोष्ट किंवा त्याबद्दलची मतभिन्नता आहे ती बाजूला केल्यानंतर राज्य शासनाची बिल आणण्याची भूमिका निश्चितपणे असणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अंधश्रध्देचा फायदा घेऊन जे अमानुष प्रकार सुरु आहेत त्याकरिता आयपीसी आणि इतर कायद्यांतर्गत संबंधितांना बूक करण्याची तरतूद आहे का? सध्याच्या कायद्यात तशी तरतूद नाही. जादूटोणा विधेयक लवकर मंजूर केले तर हे प्रकार थांबतील. आजच्या कायद्यात संबंधितांना शिक्षा देण्याची रचना नाही का?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 5.........

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, खोटे आमिष दाखवून फसवणूक करणे या संदर्भात कायद्यात शिक्षेची तरतूद आहे, त्या अंतर्गत कारवाई करीत असतो.

----------

नंतर एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य मागासवर्गीय आयोगावरील सदस्यांना तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही बदलण्यात न येणे

**मु. शी.** : राज्य मागासवर्गीय आयोगावरील सदस्यांना तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही बदलण्यात न येणे यासंबंधी श्री.विनायक मेटे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनायेक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य मागासवर्गीय आयोगावरील सदस्यांना तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही सदस्यांना अद्यापही बदलण्यात न येणे, याबाबत सभागृहात कालबाह्य झालेल्या सदस्यांना बदलण्यात येईल असे आश्वासन देवूनही कार्यवाही न होणे, राज्य मागासवर्गीय आयोगाने शासनाकडे केलेल्या विविध सूचना/शिफारसी या मराठा समाजाच्या इतर मागासवर्गीयामध्ये समावेश करण्याबाबतच्या प्रलंबित मागण्यांच्या विरोधात असणे, त्यामुळे मराठा समाजातील लोकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. राज्य मागासवर्गीय आयोगाकडे मराठा समाजाचा इतर मागासवर्गीयांमध्ये समावेश करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती. अशा पध्दतीची मागणी शासनाकडे केल्यानंतर शासनाने राज्य मागासवर्गीय आयोगाकडे ही मागणी रेफर केली आहे व त्यांना सांगितले की, सर्वंकष चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल द्यावा. राज्य मागासवर्गीय आयोगावर जे सदस्य आहेत त्यांचा कार्यकाल हा फक्त 3 वर्षेच राहील अशा प्रकारची स्पष्ट तरतूद आहे. माझ्याकडे महाराष्ट्र शासनाच्या जीआर असून त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "प्रत्येक सदस्याने पद धारण केल्याच्या दिनांकापासून 3 वर्षापर्यंत पद धारण करता येते". दुसरे असे की, त्या सदस्यांनी नि:पक्षपणे काम केले पाहिजे. या दोन्ही गोष्टींना छेद देण्याचे काम राज्य मागासवर्गीय आयोगाने केलेले आहे. यासंदर्भात आम्ही मागणी केली असतांनाही त्यासंदर्भात शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. राज्य मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष श्री. सराफ होते परंतु दुर्दैवाने त्यांचे निधन झाले आहे. त्यांच्यानंतर जे सदस्य नेमण्यात आलेले होते तेच सदस्य आजही या राज्य मागासवर्गीय आयोगावर आहेत. या आयोगावर श्री.हरी नरके,श्री. शौकतभाई तांबोळी, श्री. कुंभार आणि इतर मंडळींना कमीत कमी पाच साडेपाच वर्षे होऊनही ही मंडळी राज्य मागासवर्गीय आयोगावर आहेत. घटनेनुसार या मंडळावरील सदस्यांने जास्तीत जास्त 3 वर्षेच राहीले पाहिजे असे स्पष्टपणे म्हटले आहे. परंतु यासंदर्भात मी जे काही विचारलेले आहे त्या संदर्भातील काहीच माहिती या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये दिलेली नाही. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय सामाजिक न्याय मंत्री सुध्दा या सभागृहात उपस्थित आहेत, त्यामुळे राज्य मागासवर्गीय आयोगामध्ये ज्या सदस्यांनी 3 वर्षापेक्षा जास्त वेळ काम केलेले आहे त्यांना काढून टाकले जाणार आहे काय ?

सभापती महोदय, राज्य मागासवर्गीय आयोगावरील सदस्यांनी मराठा समाजाबद्दल अतिशय नकारात्मक भूमिका घेतलेली आहे. या मंडळींनी टीव्हीवरुन व वर्तमान पत्रामधून मराठा समाजाबद्दल विरोधात्मक भूमिका घेतली असून मराठा समाजाला आरक्षण देऊ नये अशी भूमिका त्यांनी वेळोवेळी मांडलेली आहे. जर एखाद्या न्यायमूर्तीकडे खटला सुरु असेल व न्यायमूर्तीचे मत आरोपीबद्दल वाईट असेल तर खटला चालू कसा शकतो ? त्यामुळे राज्य मागासवर्गीय आयोगावर ही मंडळी राहताच कामा नये. उत्तरामध्ये म्हटले आहे की, या आयागाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

पूर्णपणे विरोधात मत दिलेले आहे. मराठा समाजाबद्दलचा हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. सर्व राज्याच्या क्वॉटीफिकेशर डाटा करण्यात यावा असे या आयोगाला सांगितले होते परंतु आयोगाने यासंदर्भात काहीच माहिती न दिल्यामुळे राज्य शासनाने हा अहवाल परत पाठविला. अहवाल परत का पाठवला असे या आयोगावरील सदस्यांनी म्हटलेले असल्यामुळे मराठा समाजाला न्याय मिळणार कसा ? 20 जिल्हयांमध्ये यासंदर्भात अद्याप सर्व्हेच झालेला नाही. जो सर्व्हे करण्यात आला तो अर्धाच करण्यात आला. काही ठिकाणी तर हे सदस्य गेलेच नाहीत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

तरी देखील म्हणतात की, आम्ही सर्व्हे केला आहे. मराठा समाजाला आरक्षण देता येत नाही. त्यामुळे शासनाने आम्हाला यासंबंधी स्पष्टपणाने सांगू नये. ते म्हणतात की, शासनाने नियम तयार केलेत तर त्याची अंमलबजावणी आयोग करेल. शासनाने अद्याप नियम तयार केलेले नसल्यामुळे आम्ही कार्यवाही करू शकत नाही. म्हणून माझी स्पष्टपणे विनंती आहे की, राज्य मागासवर्गीय आयोगाचे जे सुरुवातीपासून सदस्य आहेत त्यांना शासन काढून टाकणार आहे काय ? त्यांनी जे पत्र पाठविले आहे त्या पत्राला शासनाने ताबडतोब उत्तर देऊन मराठा समाजाचा इतर मागासवर्गीयांमध्ये समावेश करून तो अहवाल राज्य मागासवर्ग आयोगाने ताबडतोब काही महिन्याच्या अवधीत द्यावा याकरिता शासन स्पष्ट निदेश देणार आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा थोडा गैरसमज झालेला आहे. या आयोगावरील सदस्यांसाठी तीन वर्षाची मुदत असते ही बाब खरी आहे. परंतु, या आयोगावर त्यांची पुनर्नेमणूक देखील होऊ शकते. दिनांक 26.11.2008 रोजी शासनाने जी.आर.काढला होता. त्यानंतर शासनाने दिनांक 31.12.2011 ला जी.आर.काढला. त्यात काही सदस्यांची पुनर्नेमणूक करण्यात आली. ते नियमा प्रमाणे कंटीन्यू आहेत. दुसरे असे की, आयोगाने मराठा समाजाचा समावेश करू नये यासंबंधीचा निर्णय दिला होता. त्याबाबत महाराष्ट्र शासनाने पत्र पाठविले होते की, 20 जिल्ह्यांमध्ये आपण सर्व्हे केला आहे तो 50 टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्यांनी प्रश्नावली घेणे आवश्यक होती. ती देखील घेतलेली नाही. एवढेच नव्हे तर आयोगाने 255 जणांचे अर्ज घेतले पण संघटनांना निमंत्रित केले नाही. या कारणामुळे महाराष्ट्र शासनाने पुन्हा विचार करावा असे सांगितले आहे. त्यांनी पुन्हा विचार करून सांगितले आहे की, आम्ही एकदा विचार केला आहे. पुन्हा विचार करीत नाही असे त्यांनी दिनांक 3.6.2013 रोजी सांगितले आहे. त्यांनी अभ्यास बरोबर केला नाही असे आमचे म्हणणे असताना आम्ही अभ्यास बरोबर केला आहे असे आयोगाचे म्हणणे असल्यामुळे माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकषाप्रमाणे क्वांटीफिकेशन डाटा आपण व्यवस्थित करू शकलो तर महाराष्ट्र शासनाला तशा प्रकारच्या सवलती त्या जातीला देता येतील व तशा प्रकारचा प्रयत्न सुरू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी महत्त्वाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडला आहे. आता सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. राज्यामध्ये या विषयाबाबत प्रचंड असंतोष आहे. या विषयासंबंधी शासनाने सकारात्मक पावले उचलून पुढे जात असल्याबद्दल आम्ही त्याचे अभिनंदन करीत आहोत. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असताना हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून ऐकलाच गेला नाही असा संदेश बाहेर जाणे बरोबर नाही. यासंबंधी शासन कोणता विचार करीत आहे हे अधिवेशनाच्या माध्यमातून जनतेला कळले तर ते उपयोगी ठरणार आहे. हे समाजस्वास्थ्याला अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे आपण या लक्षवेधी सूचनेसाठी पाच मिनिटे अधिक वेळ द्यावा. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. या समितीमध्ये जाणीवपूर्वक नकारात्मक दृष्टिकोन ठेवून बसणारे जे सदस्य आहेत त्यांच्या संबंधी शासन कोणती भूमिका घेणार आहे ? आपण क्वांटीफिकेशन डाटा जरून गोळा करावा. त्यात काही आले नाही तर आमचा काहीच आग्रह राहणार नाही. ते चुकीचे आहे असे आम्ही म्हणणार नाही. यात उगाचच कोर्णी तरी खोडा घालत आहे. याबाबत आपण जस्टीफाईड भूमिका घ्यावी. त्यासाठी आपण संधी द्यावी असे आमचे आग्रहाचे म्हणणे आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या आयोगाचे अध्यक्ष माननीय उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आहेत व इतर आठ सदस्य असतात. हा आयोग अभ्यास करून आपला निर्णय देत असतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा संवेदनशील विषय असून त्याबाबत गांभीर्य असणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, त्यांनी चुकीच्या पद्धतीने कार्यवाही केली आहे. आपण त्यांची दहा वेळा नियुक्ती करावी. त्याला आमचा आक्षेप नाही. आपण जेव्हा आयोग नेमतो तेव्हा त्याने नि:पक्षपातीपणे काम करणे आवश्यक असते. त्यांनी सर्व जिल्ह्यांमध्ये काम केले नाही हे आपल्या निदर्शनास आले आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 11:15

श्री.भाई जगताप....

दुसरी गोष्ट अशी निदर्शनास आली आहे की, जी काही प्रश्नावली तयार करायला पाहिजे होती ती केलेली नाही. अशा महत्वाच्या बाबी शासनाच्या लक्षात आल्यानंतर देखील अशा लोकांना कण्टिन्यू कसे करता ? त्यांना अढळपद दिलेले आहे काय ? आमचा कोणाच्या नावाला आक्षेप नाही, व्यक्तीला आक्षेप नाही, फक्त त्यांच्या कार्यपध्दतीला आक्षेप आहे. ही बाब शासनाच्या लक्षात आली म्हणून शासनाने माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केलेली आहे. तो आपला पर्याय असेल. माझा प्रश्न आहे की, आयोगाच्या सदस्यांनी सरकारने घालून दिलेल्या चौकटीत काम केले नाही म्हणून तो आयोग बरखास्त करणार काय ? माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली आहे त्या समितीला एक टाईम बाऊन्ड कालावधी द्यावा. आपणास ज्या त्रुटी आढळून आल्या आहेत त्या त्रुटींचा विचार करुन समितीचा अहवाल शासन स्वीकारुन आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे या समाजाला न्याय देणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी या प्रश्नांची उत्तरे सुरुवातीलाच उत्तरे दिली आहेत. आयोगाने नाही म्हटल्यानंतर शासनाने एक समिती नेमली आहे. आयोगाचे सदस्य नकारात्मक भूमिका घेतात, अशा प्रकारच्या तक्रारी आल्या असतील तर त्याची माहिती घेण्यात येईल...

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण सभागृहात शांतता ठेवावी. माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

(गोंधळ )

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एकेक करुन बोलणार आहात की, एकाचवेळी सर्वजण बोलणार आहात ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, आयोगाने मराठा समाजाबद्दल सकारात्मक भूमिका घेतली नाही, त्यासंदर्भात सर्व डाटा घेतला नाही, सर्व्हे केला नाही या सर्व बाबी लक्षात घेऊन आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येतात. )

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे. सभागृहात असाच गोंधळ सुरु राहिला तर मला सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागेल.

( गोंधळ )

अशा गोंधळाच्या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 6 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.19 ते 11.25 पर्यंत स्थगित झाली. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(सत्ताधारी पक्षातील अनेक सदस्य आपापल्या जागेवर उभे असतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली पाहिजे.

**उप सभापती** : ठीक आहे. आपल्याला नंतर संधी देतो. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आणि गंभीर आहे. या प्रश्नाकडे सर्वांनीच गांभीर्याने पाहिले पाहिजे. हा प्रश्न एकमेकांवर हेत्वारोप करुन सुटणार नाही. या विषयावर विस्तृत चर्चा करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात लवकरच एक बैठक....

श्री.भाई जगताप : महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. कारण आपण निर्णय दिल्यानंतर आम्हाला बोलता येणार नाही.

महोदय, हा विषय आम्हाला भावनिक करायचा नाही. मी माझ्या निवेदनात आयोगाच्या कोणत्याही सदस्याचे नाव घेतले नाही किंवा त्यांच्यावर एकदाही हेत्वारोप केला नाही. मी केवळ माननीय मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरातील त्रुटींबाबत उल्लेख केला. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, त्या आयोगाने योग्य काम केलेले नाही. महोदय, हे मी नव्हे तर माननीय मंत्र्यांनी म्हटलेले आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, त्यांची आयोगावर दोन वेळा नियुक्ती होऊनही ते सरकारने घालून दिलेल्या चौकटीत काम करणार नसतील तर त्या आयोगाला बरखास्त करणार काय ? मी पुनश्च सांगतो की, मी माझ्या निवेदनात कोणाचेही नाव घेतले नाही. शिवी तर अजिबात दिली नाही. मी शिवी दिली असे कोणाला वाटत असेल तर आपण तपासून पहा. हा प्रश्न राज्याच्या आणि सर्व समाजाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री बसलेले आहेत. ज्येष्ठ मंत्री माननीय श्री.शिवाजीराव मोघे यांच्या बद्दल आम्हाला आदर आहे. परंतु या विषयाला धरुन काही तरी उत्तर यावे हे आम्हाला अपेक्षित आहे. आम्हाला हवे तेच उत्तर नको. परंतु माननीय मंत्री महोदयांनी विषयाला धरुन उत्तर दिले पाहिजे एवढाच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

आमचा आग्रह आहे. माननीय मंत्री स्वत: मान्य करीत आहेत की, या आयोगाच्या सदस्यांनी योग्य काम केले नाही. नंतर पुन्हा समिती गठीत केली. मग तो आयोग कशासाठी गठीत केला ? दोन-तीन वेळा संधी देऊनही त्या आयोगाने चौकटीत काम केले नाही म्हणून तो आयोग बरखास्त करणार काय ?

श्री.कपिल पाटील : महोदय, मी मघाशी हरकतीचा मुद्दा उपस्थित करणार होतो. परंतु आपण त्याच दरम्यान सभागृह स्थगित केले.

महोदय, या सभागृहात कोणत्याही सदस्याला हरकत उपस्थित करण्याचा अधिकार आहे. महोदय, सभागृह स्थगित होण्यापूर्वी मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचे नाव घेतले नव्हते. त्यांना प्रश्न विचारण्याचा किंवा आपले म्हणणे मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु या सभागृहात संसदीय भाषा वापरली पाहिजे. सभागृहात किंवा सभागृहाच्या आवारात असंसदीय भाषा वापरली किंवा असंसदीय व्यवहार झाला तर त्या संदर्भात सभागृह संबंधित सदस्यांवर कारवाई करते. अशा घटना याच अधिवेशनात घडलेल्या असताना, माझ्याबद्दल एखाद्या सदस्याकडून अपशब्द वापरले जात असतील तर सभागृह ते सहन करणार काय ?

महोदय, आपण सभागृहाचे कामकाज स्थगित केल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी माझ्याबद्दल दोन वेळा अपशब्द वापरले. त्यांनी ते शब्द मागे घ्यावेत. त्यांच्या बोलण्याबद्दल माझी हरकत नाही. माझी हरकत मांडणे माझा अधिकार आहे. माझ्याबद्दल असंसदीय शब्दात उल्लेख करणे हे त्यांच्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांनी टाळावयास पाहिजे होते. ते काय बोलले याचा मी पुन:उच्चार करीत नाही. जर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप त्यांनी वापरलेले दोन्ही अपशब्द मागे घेत नसतील तर तो त्यांच्या संस्कृतीचा आणि सभ्यतेचा भाग आहे असे मी समजेन.

महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, माननीय मंत्र्यांकडून अपेक्षित उत्तर मिळण्यासाठी आम्ही जरुर आग्रह धरु शकतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

पण आम्हाला पाहिजे तेच उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे असे आम्ही म्हणू शकत नाही. या सभागृहामध्ये आपण किमान सभ्यता ठेवली पाहिजे अशी माझी ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांकडून अपेक्षा आहे. ज्या कोणा सदस्यांबद्दल आग्रह होता त्याबद्दल तक्रार केली हे म्हणणे ठीक आहे परंतु नवे निवृत्त न्यायमूर्ती नेमल्यानंतर आपल्याला न्यायमूर्तींबद्दल ही भूमिका घेता येत नाही कारण ते निवृत्त न्यायमूर्ती होते आणि त्यांनी मंडल आयोगाच्या निकषावर ते बरोबर असेल, चुकीचे असेल, आपल्याला पटेल, न पटेल हा भाग वेगळा आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे वेगळ्या पध्दतीने भांडत असतात. त्याबद्दल मी कधीही आक्षेप घेतलेला नाही. परंतु आपल्याला अशा पध्दतीने संसदीय घटनेच्या चौकटीमध्ये जो आयोग नेमलेला आहे त्या आयोगाला आम्ही म्हणू तसेच काम केले पाहिले असा आग्रह धरता येत नाही ही माझी मूळ हरकत होती. सभापती महोदय, या दोन बाबींबद्दल आपण निर्णय दिला पाहिजे.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतले आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कृपया खाली बसावे. मी आपल्याला भरपूर वेळ दिलेला आहे. हे सभागृह आहे याचे भान आपण ठेवावे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, एक बाब मी स्पष्ट करु इच्छितो की, मी कोणताही अपशब्द वापरलेला नाही हे तेव्हाही सांगितले आणि आताही सांगू इच्छितो. ही गोष्ट खरी आहे की, आपण सभागृह स्थगित केल्यानंतर या ठिकाणी थोडी तापातापीचे वातावरण तयार झाले. सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतले पण मी त्यांचे नाव घेत नाही. संस्कृतीच्या गप्पा मारणाऱ्यांनी आपणच सुसंस्कृत आहोत आणि आपल्याच माध्यमातून सभागृह चालते असे समजण्याचे कारण नाही. मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे तो विषय महत्वाचा आहे. सरकारच्या निदर्शनास आलेल्या गोष्टी सरकारचे मंत्री सभागृहाला सांगत आहेत की ते चुकीच्या पध्दतीने झाले आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये ते झालेले नाही. जी प्रश्नावली तयार केली ती योग्य नाही असे सरकारचे म्हणणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

आहे. ते आम्ही म्हणत नाही. म्हणून आम्हाला हवे तेच उत्तर आम्ही मागत नाही. आमचे असे म्हणणे आहे की, घटनेच्या चौकटीमध्ये त्या आयोगाची नियुक्ती केलेली आहे आणि आम्ही त्याला आव्हान देण्याचे काही कारणच नाही. आमचे असे म्हणणे आहे की, त्या आयोगाला जे काम नेमून दिले ते काम जर ते करीत नसतील तर त्या आयोगाला परत बोलविण्याचा किंवा आयोग बरखास्त करण्याचा शासनाला अधिकार नाही का ? एकदा नव्हे तर दोनदा त्यांची नियुक्ती झाली. त्यांना आपण ज्या गाईडलाईन्स दिलेल्या आहेत त्या पध्दतीने त्यांनी काम केले नाही असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. म्हणून आमचे असे म्हणणे आहे की, तो आयोग बरखास्त करावा. मी वैयक्तिक कोणत्याही सदस्याचे नाव घेतलेले नाही. मी आयोगाच्या प्रमुखाचे नाव घेतलेले नाही. मला त्यामध्ये जावयाचे नाही. मी जनरली सांगितले की, आयोगाच्या कामकाजाच्या संदर्भात मंत्री महोदयांनीच या ठिकाणी नापसंती दर्शविलेली आहे, ते सर्व सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे, मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये ते आलेले आहे. एक तर मी अशा पध्दतीने कोणताही शब्द वापरलेला नाही त्यामुळे तो शब्द मागे घेण्याचा प्रश्न येत नाही. जर एखादी अयोग्य गोष्ट असेल तर मी कधीही वाईट गोष्टीचे समर्थन केलेले नाही. या ठिकाणी वाईट गोष्टी घडलेल्या नाहीत त्यामुळे ते मागे घेण्याचा प्रश्न येत नाही. मात्र माझा प्रश्न कायम राहील की, घटनेच्या आधारावर ज्या आयोगाची नियुक्ती झाली होती, त्यांना जे काम नेमून देण्यात आले होते ते त्यांनी दिलेल्या नियमानुसार न केल्यामुळे आणि ते सरकारच्या निदर्शनास आल्यामुळे तो आयोग आपण रद्द करणार का, तो आयोग बरखास्त करणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, आयोग रद्द करणे म्हणजे पुन्हा शंका कुशंका काढल्या जातील. त्यापेक्षा आपले जे महत्वाचे काम आहे..(अडथळा) सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेबांच्या अध्यक्षतेखाली 2 सभा झाल्या. यामध्ये विरोध असा काही नाही. यामध्ये एकच विरोध आहे की, ओबीसीमध्ये टाकू नका. त्याचा डाटा आवश्यक आहे. आज आपण घाईघाईने निर्णय घेतला तर कोर्टामध्ये टिकणार नाही. या दृष्टीकोनातून या कमिटीची आवश्यकता होती. तो डिटेल सर्व्हे झाला तर न्याय मिळू शकेल असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 11:35

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, याबद्दल फार चर्चा झाली आहे. हा अतिशय संवेदनशील प्रश्न आहे. याबद्दल शंका नाही. शासनाला या प्रश्नाला आणि विषयाला न्याय द्यावयाचा आहे. मूळ मुद्दा असा आहे की, आपल्याकडे मागासवर्गीय आयोग आहे. त्यांना नियमाप्रमाणे क्वॉन्टिफिकेशन डेटा देण्यासाठी शासनाने सूचित केले होते. आयोगाने राज्यातील ठराविक 15-20 जिल्ह्यांचा डेटा घेतला आहे. त्यांनी राज्यभराची माहिती घेणे अपेक्षित होते. याबाबतचा उद्देश असा आहे की, ओबीसीचे आरक्षण संकुचित न करता सर्व आरक्षण ठेवावे, त्याच्या अतिरिक्त मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका आहे. ही भूमिका घेत असताना न्यायालयामध्ये विरोधी निकाल लागू नये यासाठी त्याची व्यवस्थित मांडणी केली पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. सबंध राज्यभराचा क्वॉन्टिफिकेशन डेटा मिळाला पाहिजे असा शासनाचा आग्रह आहे. आयोगाने दिलेल्या पहिल्या अहवालात ठराविक भागामध्येच पाहणी केल्याचे दिसून येते. ती पाहणी संबंध राज्यामध्ये केली पाहिजे अशी शासनाची भूमिका होती. त्या भूमिकेप्रमाणे शासनाने याबाबत पुन्हा सर्व्हे करावा असे आयोगाला मत कळविले आहे आणि त्यांनी ते स्वीकारलेले आहे. त्यामुळे गतिरोध निर्माण झालेला आहे. सबंध राज्यातून क्वॉन्टिफिकेशन डेटा घेतला गेला पाहिजे अशी शासनाची स्पष्ट भूमिका आहे. आपली केस स्ट्राँग झाली पाहिजे. यामुळे कोर्टात आक्षेप येणार नाही. ते अद्याप झालेले नसल्यामुळे गतिरोध निर्माण झालेला आहे, त्यासंबंधी काय केले पाहिजे याबाबत सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे. यासंबंधी माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. त्या समितीला मुदतवाढही दिलेली आहे. त्या समितीने या स्पेसिफिक मुद्याबाबत अभ्यास करुन शासनाला अंतरिम अहवाल द्यावा. त्यासाठी मी याबाबत एक बैठक बोलवितो. संपूर्ण राज्यातील माहिती समोर आली पाहिजे अशी शासनाची स्पष्ट भूमिका आहे. त्या माहितीची व्यवस्थित मांडणी केली पाहिजे. ते आयोग करीत नसल्यामुळे गतिरोध निर्माण झाला आहे. त्यामुळे आयोगाबाबत राणे समितीबरोबर चर्चा करुन पुढील भूमिका घेण्यात येईल, हा अतिसंवेदनशील प्रश्न असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी शासनाला सहकार्य करावे अशी मी सर्वांना विनंती करतो. आयोगामुळे गतिरोध निर्माण झाला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांची सूचना स्वीकारता येणार नाही. एखाद्या व्यक्तीबद्दल आक्षेप घेणे योग्य नाही.

--------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :पुणे शहरातील मेट्रो रेल्वेचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यास होत असलेला विलंब

**मु. शी.** :पुणे शहरातील मेट्रो रेल्वेचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यास होत असलेला विलंब यासंबंधी श्री.मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता तेथील अत्यंत जटील असलेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी पुणे मेट्रोचा वनाज ते रामवाडी हा पहिला व पिंपरी-चिचवड ते स्वारगेट मार्ग कात्रजपर्यन्त वाढवून दुसरा मार्ग असे एकूण रुपये 10,183 कोटींचे दोन्ही प्रस्ताव जानेवारी महिन्यापासून राज्य शासनाच्या वित्त विभागाची मंजुरी व त्यानंतर केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी प्रलंबित असणे, अनेकवेळा सभागृहात आश्वासन देऊनही अद्याप सदर प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आलेला नसणे, तसेच, पुणे शहरातील झोपडपट्टीधारकांसाठी आहे त्याच जागेत घर देण्याची झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एसआरए) सुरू होऊन 8 वर्षे उलटणे, तसेच, या योजनेची नियमावली मंजूर होऊन दीड वर्षे झाल्यांनतर देखील यासंदर्भात राज्य शासनाकडून अध्यादेश काढण्यास झालेली दिरंगाई, नियमावलींची अंमलबजावणी करण्यास होणाऱ्या विलंबामुळे पुणे शहरातील अनेक विकास योजनांचे प्रस्ताव प्रलंबित असणे, पुणे येथे 'एसआरए' अंतर्गत नियमावलीची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, राज्यामध्ये मुंबईच्या पाठोपाठ आज पुणे शहर हे वेगाने मेट्रो सिटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. पुणेकराच्या दृष्टीने वाहतुकीची कोंडी हा सर्वात महत्वाचा विषय आहे. या वाहतुकीच्या कोंडीतून पुणेकराची सुटका करावयाची असेल तर पुणे शहरामध्ये मेट्रो रेल्वे सुरु होणे आवश्यक आहे. मी या संदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. नागपूर येथील मागील हिवाळी अधिवेशनामध्ये मी लक्षवेधी सूचना उपस्थित केल्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी पुण्याच्या मेट्रो रेल्वेचा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्र सरकारकडे पाठविण्याचे आश्वासन दिले होते. केंद्र सरकारने या मेट्रोसाठी तरतूद केलेली आहे. या मेट्रो रेल्वेचे दोन मार्ग आहेत. त्यासंबंधीचा प्रस्ताव राज्याच्या अर्थ विभागामध्ये गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र सरकारच्या नगरविकास खात्याकडे जाणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी शासनाला असे विचारु इच्छितो की, या प्रस्तावाला केंद्र सरकारची मान्यता मिळालेली आहे. केवळ राज्य सरकारने मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठवावयाचा आहे. या प्रस्तावाला दिनांक 15 ऑगस्ट, 2013 पूर्वी मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठविणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ...

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पुणे शहराची 40 टक्के लोकसंख्या ही झोपडपट्टीवासीयांची आहे. झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी झोपडपट्टी विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले. पुण्यातील झोपडपट्टीवासीयांच्या संबंधीचा प्रस्ताव शासनाकडे 2011मध्ये आलेला आहे. तेव्हा एसआरएच्या नियमावलीला एक महिन्याच्या आत अंतिम स्वरुप देण्यात येईल काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी पुणे मेट्रोचा प्रश्न विचारलेला आहे. हा दोन मार्गांचा विषय आहे. वनाज ते रामवाडी हा पहिला व पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट हा दुसरा असे दोन मार्ग आहेत. या मार्गांबद्दल केन्द्र शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. राज्य सरकार हा प्रकल्प निश्चितपणे करणार आहे. पुण्याची वाढती लोकसंख्या, वाहतुकीची समस्या आणि पुण्याचा वेगाने होणार विस्तार यामुळे हे दोन मार्ग करण्याची गरज आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यापूर्वी या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता घेणे गरजेचे आहे. हा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित होता. वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामध्ये दोन-तीन विषय आहेत. या प्रकल्पासाठी राज्य सरकारने 20 टक्के, केन्द्र सरकारने 20 टक्के आणि दोन स्थानिक स्वराज्य संस्थांनी 10 टक्के वाटा द्यावा असा प्रस्ताव होता. परंतु वित्त विभागचा असा प्रस्ताव आहे की, दोन्ही महानगरपालिकांनी 10 टक्क्या ऐवजी 20 टक्के सहभाग द्यावा. त्यामुळे महानगरपालिकांना 20 टक्के पैसे देता येतील का याबाबत चर्चा केली पाहिजे. प्रकल्पाची किंमत 10183 कोटी रुपये आहे. ही नस्ती दिनांक 26 जुलै रोजी शासनाकडे परत आलेली आहे. या मार्गामध्ये पालखी मार्गाचा अडथळा येतो. इतर मेट्रोच्या तुलनेत प्रति कि.मी. दर कसे आहेत, ट्राफिक वितरित करण्यासाठी काय व्यवस्था केलेली आहे, असे प्रश्न आहेत. हे सर्व आक्षेप ओव्हररुल करुन राज्य शासन पुढे जाईल आणि लवकरात लवकर हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणला जाईल. माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी हजर आहेत. महापालिकांना त्यांचा वाटा वाढविता येईल का याबद्दलही लवकरच चर्चा केली जाईल.

सन्माननीय सदस्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संदर्भात दुसरा प्रश्न विचारला.त्याबाबत नियमावली करण्याचे काम ब-याच वर्षापासून प्रलंबित होते. मध्यंतरी त्याबाबतीत शासनाने 154 अन्वये निर्देश दिले होते. कलम 137च्या कारवाईस सुरुवात झालेली आहे. परंतु ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

नस्ती मंत्रालयाला लागलेल्या आगीत नष्ट झाली. तिची पुनर्बांधणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये जे काही मूलभूत दोष आढळून आलेले आहेत त्याची दुरुस्ती केली जाईल. मुंबईच्या एसआरए योजनेच्या सुसंगत अशी योजना करण्याच्या दृष्टीने अभ्यास सुरु आहे. याबाबतीत 31 ऑगस्ट पर्यंत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

**उप सभापती** : सभागृहाची वेळ दुपारी 12.25 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. दुपारी 12.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शासनाचा इरादा स्पष्ट केलेला आहे. विधानपरिषदेत आणि विधानसभेत पुणे जिल्हयातील सर्व आमदारांची मागणी आहे की, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री या दोघांच्या उपस्थितीमध्ये पुणे शहराच्या बाबतीत एक बैठक आयोजित करावी अशी एक ते दीड वर्षापासून मागणी करीत आहेत. आम्हाला माननीय उप मुख्यमंत्री महोदय पुणे येथे भेटतात. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत पुणे शहरातील सर्व आमदारांची बैठक कधी घेतली जाणार आहे ? माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री महोदय हे सेप्रेट भेटतात. परंतु पुणे शहराच्या बाबतीत पुणे शहरातील आमदारा समवेत एकत्रित बैठक होत नाही.

**उप सभापती** : ते दोघे एकत्र असताना तुम्ही त्यांना भेटा.

डॉ.नीलम गोऱ्हे : पुणे शहराच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री हे आज एकत्रितपणे सभागृहात उपस्थित आहेत. पुण्याच्या आमदारा समवेत मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री एकत्रित बैठक येत्या 15 दिवसात घेतील काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पुण्याचा विकासाचा प्रश्न आणि पिंपरी-चिंचवडचा विकासाचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. ही लक्षवेधी सूचना प्रामुख्याने पुणे मेट्रो रेल्वे व एसआरएच्या नियमावली बद्दलची आहे. या बाबतीत मी सविस्तर उत्तर दिलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहे, त्या भावनांचा निश्चितच विचार केला जाईल. पुणे हे दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. ते शहरही वेगाने वाढत आहे. पुणे हे देखील अर्थव्यवस्थेला चालना देणारे शहर झाले आहे. आम्ही दोघे पुण्यातील आमदार महोदयांबरोबर पुणे शहराच्या विकासाच्या व अडचणींच्या बाबतीत निश्चित विचार करु. प्रथम मेट्रोचा निर्णय आम्हाला घ्यावा लागणार आहे. मेट्रोचा निर्णय झाल्यानंतर पुण्यातील आमदारा समवेत निश्चितपणे चर्चा करण्यात येईल.

**उप सभापती** : मेट्रो रेल्वेत सर्व एकत्र बसून जा.

श्री. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुणे शहराच्या विकासा बाबत व अडचणी बाबत पुणे शहरातील आमदारा समवेत चर्चा करण्यात येईल अशा प्रकारचे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी अभिवचन दिलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी झोपडपट्टीच्या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. अलीकडच्या काळात झोपडपट्टी पुनर्वसनाचे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उप सचिव...

काम पूर्णपणे ठप्प झालेले आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाची कामे थांबविण्यात यावीत अशा प्रकारचे निर्देश शासनाने दिलेले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसनाची कामे कोणत्या कारणासाठी थांबविण्यात आली आहेत ? पुणे शहरात एकूण 560 झोपडपट्टया आहेत. त्यापैकी फक्त 12 ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प चालू आहेत. जर या गतीने हे काम चालणार असेल तर पुणे शहरातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यास अनेक वर्षे लागतील. शासकीय व महानगरपालिकेच्या जागांवरील झोपडपट्यांच्या पुनर्वसनाच्या कामास शासनाने स्टे दिलेला आहे, तो स्टे उठविण्यात येईल काय?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पुणे शहरातील एसआरएच्या नियमावली बद्दल स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे. ही कामे वाढली पाहिजेत. त्यामध्ये काही मूलभूत प्रश्न निर्माण झाले होते, ते प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने अनेक बैठका झालेल्या आहेत. यात रिसेलचा आणि रिहॅब कॉम्पोनंटचा इश्यू आहे, त्या बाबतीत काही मूलभूत मुद्दे आहेत. त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची, इन्सेटिव्ह रिहॅबिलेटेशन करण्याची केंद्रीय शासनाची भूमिका आहे. त्याच्याशी सुसंगत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुण्याच्या एसआरएमध्ये त्या बाबीचा समावेश नाही. मुंबई प्रमाणे कसे करता येईल याबद्दलही विचार चालू आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या बाबतीत येत्या महिन्याभरात अंतिम निर्णय घेण्यात येईल.

------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जलसंपदा विभागाकडून थेट कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला 116 एम.एल.डी.पाणी पुरवठा करण्याची होत असलेली मागणी

**मु. शी.** : जलसंपदा विभागाकडून थेट कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला 116 एम.एल.डी.पाणी पुरवठा करण्याची होत असलेली मागणी यासंबंधी श्री.संजय दत्त, श्रीमती अलका देसाई, श्री.भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खारे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर शहराची आजमितीस लोकसंख्या १५ लाखांवर असताना जेमतेम १० लाख लोकसंख्येला पुरेल इतकाच पाणीपुरवठा स्टेम प्राधिकरण आणि एम.आय.डी.सी. कडून होत असणे, नवी मुंबई महानगरपालिकेला मोरबे धरणातून पाणी मिळू लागले की या महानगरपालिकेने उल्हास नदीतला त्यांचा १४० एम.एल.डी. कोटा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला द्यावा असा निर्णय तत्कालीन जलसंपदा मंत्री यांनी घेतलेला होता, या नुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नवीन पाणी पुरवठा योजना आखून दोनशे कोटी रूपये खर्चून ती पूर्णदेखील करणे, मात्र अद्यापही सदर निर्णयानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला पाणीपुरवठा होत नसणे, एम.आय.डी.सी.कडून सध्या होत असलेला ११६ एम.एल.डी. पाणीपुरवठा जलसंपदा विभागाकडून थेट कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनामार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने, जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ( जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, डोंबिवली-कल्याण मधील जनतेला न्याय देण्यासाठी आपण पुढाकार घेऊन या विषयावर बैठक घेतली त्याबद्दल मी सर्व प्रथम आपले आणि माननीय सभापतींचे आभार मानतो. मला या ठिकाणी मूळ प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री सुदैवाने आज सभागृहात एकत्र उपस्थित आहेत. आज महाराष्ट्राचे उदाहरण देशामध्ये दिले जाते की, महाराष्ट्राच्या प्रशासनाबद्दल एक आदर्श स्थापित झालेला आहे. आज असा प्रसंग निर्माण झाला आहे की, या राज्यामध्ये उच्चस्तरीय समितीने जो निर्णय घेतला आहे. त्या उच्चस्तरीय समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी कल्याण-डोंबिवलीकरांसाठी होत नाही या गोष्टीकडे मी माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांचे लक्ष आकर्षित करु इच्छितो. या विषयाच्या दोन घटनांकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त... लक्षवेधी सूचना क्रमांक 11....

उच्चाधिकार समितीने दोन निर्णय घेतले होते. 117 एमएलडी पाणी एमआयडीसी मार्फत कल्याण डोंबिवली महापालिकेला पुरविले जाते, त्याऐवजी ते पाणी थेट जलसंपदा विभागाने उपलब्ध करुन द्यावे आणि मोरबे धरण पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबईला जे पाणी दिले जात आहे ते पाणी सुध्दा कल्याण-डोंबिवली महापालिकेला देण्यात यावे. या निर्णयाची प्रत मी सर्व संबंधितांना दिलेली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी आतापर्यंत झालेली नाही. शासन या निर्णयाची अंमलबजावणी किती दिवसात करणार आहे? कल्याण-डोंबिवली महापालिकेवरील अन्याय केव्हा दूर होणार आहे?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे या प्रश्नावर खूप भावनाप्रधान झालेले दिसतात. ही वस्तुस्थिती आहे की, कल्याण-डोंबिवली महापालिकेला बारवी धरणातून प्रतीदिन 140 दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय त्यावेळी झालेला होता. दिनांक 16.11.2005 रोजी झालेल्या बैठकीमध्ये नवी मुंबईकरिता मोरबे धरणातून आवश्यकतेप्रमाणे पाणीपुरवठा झाला तर त्यांच्यासाठी उपलब्ध असलेले पाणी कल्याण-डोंबिवली महापालिकेला देण्याचा निर्णय झाला. उच्चाधिकार समितीची दिनांक 13.8.2009 रोजी बैठक झाली. त्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सुध्दा कल्याण-डोंबिवली महापालिकेला आज एमआयडीसी मार्फत पाणी उपलब्ध करुन दिले जाते त्याऐवजी थेटपणे पाणी उचलण्यास मान्यता देण्यात आली. ही वस्तुस्थिती आहे की, त्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. याचे कारण असे की, कल्याण-डोंबिवली महापालिकेने स्वतःचे ट्रिटमेंट प्लँट उभे करण्यासाठी निधी घेतला होता, काही प्रमाणात कर्ज घेतले होते. त्या प्लँटची उभारणी व्हायची होती. दरम्यानच्या काळात एमआयडीसी बरोबर पुढील करार झाला.

सभापती महोदय, काल याबाबत आपण बैठक बोलावली होती. त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे एमआयडीसी बरोबर जो करारनामा झाला तो रद्द करुन जलसंपदा विभागाकडून उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कल्याण-डोंबिवली महापालिकेला थेटपणे पाणी देण्याचा निर्णय येत्या महिन्याभरात कार्यान्वित केला जाईल.

श्री.संजय दत्त : आभारी आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मराठीमध्ये 'तळे राखी तो पाणी चाखी' अशी म्हण आहे. त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे कल्याण-डोंबिवली महापालिकेचे पाणी प्रकरण आहे. नवी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

मुंबई महापालिकेबाबत पालकमंत्र्यांचा इंटरेस्ट आहे. कधीतरी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी संबंधितांबरोबर एकत्र बसून सामोपचाराने हा विषय समजून घेतला पाहिजे. 350 कोटी रुपये खर्चून कल्याण-डोंबिवली महापालिकेने स्वत:चे ट्रिटमेंट प्लँट उभे केले आहेत. शासनाकडून पाणी मिळणार नसते तर त्या महापालिकेने एवढी रक्कम खर्च केली नसती. केवळ व्यक्तीच्या माध्यमातून प्रकरण अडले आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेऊन संबंधितांना समजावले तर हा विषय निकाली निघेल. 350 कोटी रुपये खर्च करुनही कल्याण-डोंबिवली महापालिकेची अडवणूक होत आहे. सरकारने यामध्ये हस्तक्षेप करुन हा विषय मार्गी लावला पाहिजे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा मांडला तो गैरवाजवी आहे. नवी मुंबई महापालिकेचा किंवा पालकमंत्री महोदयांचा यामध्ये कोणताही हस्तक्षेप नाही. त्यांची भूमिका सकारात्मक आहे. त्यांचा आग्रह आहे की, एमआयडीसी मार्फत पाणी दिले जाते ते थेटपणे जलसंपदा विभागाने द्यावे. ती मागणी मी मान्य केली आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिका किंवा ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री यांनी आक्षेप घेतला असे काही नाही. उलट ठाणे जिल्हयाच्या पालकमंत्र्यांची सहकार्याची भूमिका निश्चितपणे आहे. मी मघाशी उत्तर दिल्याप्रमाणे महिन्याभरात त्याची अंमलबजावणी केली जाईल.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करुन ट्रिटमेंट प्लँटची उभारणी केलेली आहे. त्यांनी एमआयडीसी बरोबर जो करार केला आहे तो रद्द करुन थेट जलसंपदा विभागाकडून पाणी पुरवठा केला जावा अशी मागणी केली आहे. या संदर्भात उच्चस्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केव्हा होईल?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या संदर्भात सांगू इच्छितो की, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे येत्या महिन्याभरात त्या संदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी होईल.

नंतर यू.1....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ MMP/ KTG/ D/ प्रथम श्री. भोगले....... 11:55

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकवस्ती 15 लक्ष असून त्या ठिकाणी पाण्याची अतिशय कमतरता आहे. ठाणे महानगरपालिकेची लोकवस्ती 25 लाख असून 600 एमएलडी पाणी पुरवठा होत असतो व प्रती व्यक्ती 250 लिटर या प्रमाणे पाणी पुरवठा केला जात असतो. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकवस्ती 15 लक्ष असून त्या ठिकाणी 264 एमएलडी पाणी पुरवठा होत असतो व प्रती व्यक्ती 160 प्रती लिटर प्रमाणे पाणी पुरवठा केला जातो. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील लोकवस्ती 20 लक्ष असून त्या ठिकाणी 400 एमएलडी पाणी पुरवठा होत असतो व प्रती व्यक्ती 200 प्रती लिटर प्रमाणे पाणी पुरवठा केला जातो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेची लोकवस्ती 9 लक्ष असून त्या ठिकाणी 110 एमएलडी पाणी पुरवठा होत असतो व प्रती व्यक्ती 120 प्रती लिटर प्रमाणे पाणी पुरवठा केला जातो. एमआयडीसीचे 140 एमएलडी पाणी नवी मुंबईला जाते परंतु मोरबे धरण पूर्ण झाल्यानंतर त्यातील पाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला देऊ अशी पालक मंत्र्यांनी तसेच महानगरपालिकेने तसेच उद्योगमंत्र्यांच्या दालनातील बैठकीमध्ये उल्लेख करण्यात आला होता. 140 एमएलडी पाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेला देण्यात येणार आहे. त्यामुळे एमआयडीसीचे 140 एमएलडी पाणी नवी मुंबईला शिल्लक पडलेले असून ते पाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला उपलब्ध करुन दिले जाणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी जो प्रश्न विचारला आहे ती वस्तुस्थिती आहे. उपलब्ध असलेल्या पाणी साठयातून वेगवेगळया महानगरपालिकेला पाणी साठा मंजूर केलेला आहे. मंजूर केलेल्या पाणी साठयापेक्षा अधिकतर पाणी जवळच्या ज्या महानगरपालिका आहेत त्यांच्याकडून वापरले जाते. त्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला त्या पध्दतीने पाणी पुरवठा होत नाही ही वस्तुस्थिती आहे. ज्या ज्या महानगरपालिकेला जेवढा पाणी साठा मंजूर आहे,पाणी आरक्षण मंजूर आहे तेवढयाच मर्यादेमध्ये राहून त्यांनी पाणी पुरवठा करावा असे आदेश माझ्याकडे झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. परंतु काही वेळेला थोडेसे अतिक्रमण करुन पाणी घेतले जाते. त्यामुळे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना तशा प्रकारची सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. या लाईनवर मिरा-भाईंदरही शेवटची महानगरपालिका आहे. म्हणून मिरा-भाईंदर महानगरपालिकेला मंजूर असलेला पाणी साठा उपलब्ध करुन देण्याची खबरदारी पुढील कालावधीत निश्चितपणे घेतली जाईल.

----------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :जि.ठाणे,ता.वसई, येथील सोपारा गावातील बौध्दस्तुपाच्या समोरील तलावाचे खोदकाम करणे

**मु. शी.** :जि.ठाणे,ता.वसई, येथील सोपारा गावातील बौध्दस्तुपाच्या समोरील तलावाचे खोदकाम करणे यासंबंधी सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, विनोद तावडे, ॲड आशिष शेलार ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाई गिरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भगवान गौतम बुध्दांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या जि.ठाणे, ता.वसई येथील सोपारा गावातील बोध्दस्तुपाच्या १०० मीटर परिघाच्या परिसरात कोणतेही बांधकाम, खोदकाम करण्यास पुरातत्व विभागाने मज्जाव केला असणे, त्यामुळे गेल्या कित्येक वर्षापासून या परिघ क्षेत्रातील खाजगी जमीन मालकांनीही बांधकाम किंवा खोदकाम केले नसणे, मात्र काही दिवसांपासून स्तुपाच्या समोर असलेल्या तलावातून मातीचा दररोज जेसीबीच्या उजेडात रात्रभर अवैधरित्या होत असलेला उपसा, या प्रकरणी महापलिकेशी संपर्क साधला असता सदर तलाव खाजगी असल्याचे सांगण्यात येणे, माती उपसा करण्यासाठी आवश्यक असलेली पुरातत्व विभाग तसेच गौण खनिज विभागाची परवानगी आणि महापालिकेची ना-हरकत दाखला घेण्यात आलेला नसणे, परिणामी तेथील स्थानिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, बौध्द गया येथे काही दिवसापूर्वीच बॉम्ब हल्ला झालेला असतांना भगवान गौतम बुध्दांच्या पदस्पर्शाने जि.ठाणे,ता.वसई येथील सोपारा या गावात बौध्दस्तुपाच्या 100 मीटर परिघामध्ये उत्खनन झालेले आहे. या ठिकाणी एखादा कार्यक्रम करावयाचा म्हटला तरी पुरातत्व विभाग विरोध करीत असते. जि.ठाणे,ता.वसई येथील सोपारा येथे 2500 वर्षापूर्वी गौतम बुध्द आले होते यासंदर्भात तेथील शिलालेखात उल्लेख आहे. या ठिकाणी अनधिकृत खोदकाम झालेले आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. परंतु आपण म्हणता की, यासंदर्भात पोलीस तक्रार झालेली नाही. या ठिकाणी तक्रार झाल्यानंतर आपण कारवाई करणार आहात काय ? ही जागा जागतिक कीर्तिची असतांना या जागेचे आपण साधे संरक्षण सुध्दा करु शकत नाही. त्यामुळे यासंदर्भातील पुरातत्व खात्याचे अधिकारी, महसूल विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांच्यावर आपण कठोर कारवाई करणार आहात काय ? तसेच या जागेचे संरक्षण केले जाणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जि.ठाणे,ता.वसई येथील सोपारा येथे ऐतिहासिक प्रकारचे बौध्द स्तूप आहे. या स्तुपापासून 100 मीटरवर खाजगी जमीन असून त्या ठिकाणी एक तलाव आहे. एका शेतकऱ्याने या तलावातील 50x 50x 2 आकाराची माती काढली. ही बाब निदर्शनास आल्यानंतर तेथील तहसीलदारांनी यासंदर्भातील जबाबदारी तलाठयावर टाकली व त्या प्रमाणे पंचनामा करण्यात आला असून त्यासंदर्भातील अहवालही सादर करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

असे उत्खनन करू नये अशी सूचना देऊन समज देण्यात आली आहे. तेथील उत्खनन थांबलेले आहे. बौद्ध स्तूपा पासून 100 मीटर पर्यंत उत्खनन किंवा बांधकाम करू नये असे पुरातत्व विभागाचे निर्बंध आहेत. शेतकरी स्वत:च्या मालकीच्या तलावातील माती काढून शेतामध्ये टाकत होता. यासाठी परवानगी आवश्यक होती काय हे पहावे लागेल. तो तलावातील गाळ काढून स्वत:च्या शेतामध्ये टाकत होता. यामध्ये 2-3 गोष्टी दिसत आहेत. आपण तलावातील गाळ काढण्याची परवानगी सर्वांना दिलेली आहे. यासाठी पुरातत्व विभागाची परवानगी घेणे आवश्यक होते की नाही हे देखील आम्ही तपासून घेतो. तसेच या बौद्ध स्तूपाला या पुढील काळात कोणताही धोका पोहोचणार नाही यादृष्टीने काळजी घेतली जाईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, सरकारचा हेतू चांगला आहे. बौद्ध स्तूपाला धोका पोहोचणार नाही असे निवेदन माननीय मंत्र्यांनी केलेले आहे. आपण सर्वजण काळजी घेत असतो. गेल्या महिन्यामध्ये ज्या काही घटना घडल्या आहेत. त्यामुळे आणखी काळजी घेणे आवश्यक आहे. मी त्यांच्या हेतू बद्दल काही शंका घेत नाही. हेरिटेज वास्तूच्या आजूबाजूचा परिसर हा हेरिटेज प्रिसिंक्ट म्हणून घोषित केला जातो. तो आपण घोषित करणार आहोत काय व त्यासंबंधी आपण कारवाई करणार आहात काय ? आपण निवेदनात नमूद केले आहे की, नालासोपारा पोलीस ठाण्यामध्ये कोणत्याही स्वरूपाची तक्रार प्राप्त झालेली नाही. एआयएसच्या नॉर्म्स प्रमाणे हेरिटेज वास्तूच्या परिसरातील, 100 मीटर पर्यंत कोणतीही वास्तू कोणीच वापरू शकत नाही. त्यामुळे तशा प्रकारची तक्रार आपण पोलीस ठाण्यामध्ये करणार आहात काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही खाजगी जमीन असून त्यामध्ये तलाव आहे. 100 मीटर पर्यंत उत्खनन करू नये असा नियम आहे. याला वेगळे स्वरूप देण्यापेक्षा हा प्रश्न पुढच्या काळात योग्य कसा होईल हे पाहणे आवश्यक आहे. पुरातत्व खात्याने त्याला मान्यता दिलेली आहे. आपण अंतर पाहिले तर ते साधारणत: शंभर मीटर पर्यंत येते. ही खाजगी जागा असून त्या शेतकऱ्याचाच तलाव आहे. पुढच्या काळात यासंबंधी आम्ही अभ्यास करू. शेवटी यात शेतकऱ्याचा हेतू देखील पाहिला पाहिजे. मी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांकडे जबाबदारी सोपवितो. या

..2

श्री.बाळासाहेब थोरात...

विषयाबाबत पुरातत्व आणि महसूल विभाग एकत्रितपणे बसतील व मार्ग काढतील. यात शेतकऱ्याला देखील सामावून घेण्यात येईल व त्याची बाजू ऐकली जाईल. ही पुरातत्व वास्तू आहे ती जपली पाहिजे हा आपला हेतू आहे. त्याचे पावित्र्य जपले पाहिजे. या वास्तूला धोका होता कामा नये याची पूर्णपणाने काळजी राज्य शासनातर्फे घेण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या राज्यात जेथे अशा प्रकारची महत्त्वाची ठिकाणी आहेत ती जतन करणे आवश्यक आहे. ज्या भूमीवर भगवान गौतम बुद्धाचे प्राचीन स्तूप आहे ती भूमी संरक्षित करून त्याच्या आजूबाजूच्या परिसराचे सौंदर्यीकरण आपल्याकडून अपेक्षित आहे. फक्त सुरक्षितता एवढ्या पुरत्या समाजमन न ओळखण्या इतकी संवेदनाहीन राज्य यंत्रणा असू नये. हा ठेवा अभिमानाचा भाग म्हणून जपला पाहिजे. ही शेतकऱ्याची खाजगी जमीन आहे, शेतकऱ्याचा हेतू वाईट नाही असे आपण सांगितले आहे. ते सर्व आम्हाला मान्य आहे.शासनाने त्याच्याशी वाटाघाटी करून त्याला पर्यायी जागा उपलब्ध करून 100 मीटरच्या बाहेरच्या परिसरात देखील एक चांगले स्थळ विकसित करण्याचा उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन विचार करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापत महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती अत्यंत चांगली असून सकारात्मक आहे. सदर सूचना तपासून पहावी असे देखील जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात येईल. हा परिसर वाढून त्याचे सौंदर्यीकरण करता येईल काय, या दृष्टीने कारवाई करण्यासंबंधीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ऐतिहासिक ठिकाणांचा पुरातत्व विभागाशी संबंध असतो. त्यांचे कायदे सुस्पष्ट आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

खरे म्हण्जे यामध्ये राज्याच्या कायद्याचा काही प्रश्न येत नाही. त्याठिकाणी राज्य शासनाला डिमार्केशन करावे लागते. संबधितांचा हेतू चांगला आहे आणि शासनाची भूमिका सकारात्मक आहे. तरी सुध्दा अशा घटना वारंवार होऊ नयेत. तेथे एक वेगळ्या प्रकारची जातीय तेढ निर्माण होत आहे, ती होऊ नये म्हणून तेथील परिसराचे पूर्ण मेजरमेंट घेऊन, तो भाग संरक्षित करुन, संरक्षित भिंत घालून तेथील परिसर सुशोभिकरण करुन तो सर्वांसाठी खुला करणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा जातीय तेढचा विषय नाही. ते सर्वांचे श्रध्दास्थान आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे सुशोभिकरण झाले पाहिजे, तेथील सीमा निश्चित झाल्या पाहिजेत. या सर्व बाबी केल्या जातील.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी रोज मोर्चे निघत आहेत. तेथे बौध्दभिक्षू बसत आहेत. बुध्दगयेमध्ये जे झाले तसे येथे होऊ नये यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे. जर त्या ठिकाणी काही झाले आणि त्यास कोणी राजकीय रंग दिला तर तेढ निर्माण झाल्यावर उपाय योजना करणार आहात काय ? तेव्हा शासनाने वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे. दिनांक 5 ऑगस्ट रोजी आझाद मैदानावर बौध्दभिक्षू आणि सर्व समाजाचा मोर्चा आहे. तेथील सर्व समाज एकत्र झालेला आहे. बौध्दगयेच्या संदर्भात सर्व राजकीय पक्षांचे नेते आणि कायकर्ते एकत्र झाले आहेत. त्या ठिकाणी तेढ निर्माण होऊ नये यासाठी शासन काळजी घेणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे पूर्णपणे काळजी घेण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात नरेगा योजनेत उद्‌भवणाऱ्या समस्या व अडचणी दूर करण्यासाठी परिणामकारक उपाय योजना राबविणे

**मु. शी.** : राज्यात नरेगा योजनेत उद्‌भवणाऱ्या समस्या व अडचणी दूर करण्यासाठी परिणामकारक उपाय योजना राबविणे या संबंधी श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत वेळोवेळी आढळून येणारी अनियमितता, अनेकवेळा कामामध्ये होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ यामुळे योजनेचे लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी वारंवार येत असलेल्या अडचणी, या योजनेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संगणकीकरणाचा वापर करुन शासकीय पातळीवर एकसूत्रता व पारदर्शकता निर्माण करण्याची आवश्यकता, राज्यात नरेगा योजनेत सध्या वारंवार उद्‌भवणाऱ्या समस्या व अडचणी दूर होऊन सदर योजना परिणामकारक रित्या राबवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संगणकीकरणाचा वापर करण्याची असलेली नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनायक राऊत (रोजगार हमी योजना मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत यांनी रोजगार हमी योजना विभागाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर त्या विभागामध्ये आमुलाग्र असे बदल केलेले आहेत त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, वि.स.पागे हे या योजनेचे जनक आहेत. महात्मा गांधी रोजगार हमी योजना ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय क्रांतिकारी योजना आहे. या योजनेच्या धर्तीवर केंद्र सरकारने देशपातळीवर ही योजना राबविण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. त्यास संदर्भात निवेदनामध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी बऱ्याच उपाय योजना राबविलेल्या आहेत. परंतु या योजनेमध्ये अजून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होत आहे. या योजनेवर जे मजूर काम करतात त्यांना वेळेवर मजुरी मिळत नाही. मजुरांची संख्या वाढली आहे. माझा प्रश्न आहे की, या योजनेतील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी शासनाने नवीन प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न केला काय ? मजुरांसाठी थम इम्प्रेशन मशीन अशा प्रकारच्या उपाय योजना राबविणार आहात काय ? तसेच भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणार आहात काय ? आंध्र प्रदेश राज्याने मजुरांची संख्या वाढविण्यासाठी एचएचआयडी ( हॅन्ड हेल्ड डिव्हाईस ) प्रणाली वापरली आहे. तशी प्रणाली आपल्या राज्यात कार्यान्वित करणार आहात काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी राज्य शासन "नरेगा" मध्ये चांगल्या प्रकारे काम करीत आहे असे सांगितले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी रोहयोवरील मजुरांच्या बँकेच्या व पोस्टाच्या खात्यावर वेळेत मजुरी जमा व्हावी यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उपाय योजना करणार आहात काय असा प्रश्न विचारलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:10

डॉ.नितीन राऊत.....

महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, शासनाने राज्यात अनेक प्रकारच्या योजना सुरु केल्या आहेत. या शिवाय अनेक नवीन नवीन कार्यक्रम लागू करुन, या योजनेचा खर्च जवळपास 5 पटीने वाढविला आहे. मजुरांना वेळेवर मजुरी मिळावी यासाठी, एमआयएस संगणक प्रणालीमध्ये अद्ययावत माहिती नोंदविण्याची व्यवस्था केली आहे. त्याच बरोबर महा-ऑनलाईनचा वापर करुन कार्यक्रम राबविण्याचे काम हाती घेतले आहे. त्यानुसार कॉम्प्युटर ऑपरेटर, डेटा एंट्री ऑपरेटर, एमआयएस को-ऑर्डीनेटर यांना नियमित प्रशिक्षण देऊन त्यांच्या या कामी नेमणुका केल्या आहेत. मजुरांना वेळेवर मजुरी प्रदान करण्यासाठी मजुरांचे पोस्टातील खाते बँकेमध्ये स्थलांतरित करण्यात आलेले आहेत. या शिवाय मस्टर ट्रॅकर पध्दती वापरली आहे. ई-मस्टर पध्दतीचा वापर राज्यात मोठ्या प्रमाणावर होत असताना ईएफएमएस प्रणालीचे काम राज्यातील 11 जिल्ह्यात सुरु करण्यात आलेले आहे. राज्यात सर्वत्र सप्टेंबर-2013 पर्यंत ईएफएमएस प्रणाली लागू होईल. या माध्यमातून मजुरांच्या मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या हातात देणार आहोत.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, आंध्र प्रदेश राज्यात ज्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे तशा प्रकारचा वापर आपल्या राज्यात केला जाणार आहे की नाही ? मी त्यांना सांगू इच्छितो की, रोजगार हमी योजना विभागाच्या उप सचिव श्रीमती विमला, त्यांचे सहकारी आणि आयुक्त, नरेगा यांच्या कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांनी नुकतीच आंध्र प्रदेश राज्याला भेट दिली. त्यांनी त्या राज्यातील हँड हेल्ड डिव्हाईस पध्दतीचा अभ्यास करुन, किंबहुना तेथील तंत्रज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. नरेगा आयुक्त सध्या त्या राज्याच्या दौऱ्यावर आहेत. रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या मजुरीबाबत प्रश्न निर्माण होत असतील तर त्यासाठी हेल्प लाईन सुरु केली आहे. त्या माध्यमातून कामाची माहिती, कामाची मागणी आणि तक्रारींची नोंद घेऊन त्या बाबत पडताळणी केली जाते. राज्यात लवकरच आंध्र प्रदेश राज्यातील हँड हेल्ड डिव्हाईसचा सुध्दा वापर केला जाईल. आंध्र प्रदेश राज्याने संपूर्ण राज्यात नव्हे तर सध्या केवळ निजामाबाद या एकाच जिल्ह्यात हा प्रयोग केला आहे. निजामाबाद जिल्ह्यात हा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात येत असल्यामुळे, आपल्या राज्यात सुध्दा दिवाळीपूर्वी आयसीटी प्रणालीचा कार्यक्रम निश्चितपणे आमचा विभाग हाती घेऊन यासंबंधीचा मार्ग प्रशस्त करेल.

---------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीतील भाडेकरुंच्या समस्यांकडे होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीतील भाडेकरुंच्या समस्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, यासंबंधी श्री.किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या सुमारे 13,500 उपकर प्राप्त इमारती ह्या अत्यंत धोकादायक असणे, ह्यामधील भाडेकरुंच्या समस्येबाबत दुरुस्ती मंडळाचे उदासीन धोरण, त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात हे भाडेकरु जीव मुठीत धरुन जगत असणे, दुरूस्ती कामास होणारा विलंब, संक्रमण शिबीराची दुरवस्था, बृहत सूचीवरील भाडेकरुंना हक्काचे घर मिळण्यास वर्षानुवर्षे होणारा विलंब, पुनर्विकासातील 33(7), 33(9) अंतर्गत भाडेकरुंना विश्वासात न घेता ना-हरकत प्रमाणपत्रे रद्द करणे, स्थगिती देणे, यामध्ये झालेली अनियमितता, यासर्वांमुळे भाडेकरु/रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व भीतीचे वातावरण, यामध्ये शासनाने तातडीने हस्तक्षेप करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर ( गृह निर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनानंतर</u>

श्री.किरण पावसकर : महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "मुंबई शहर जिल्ह्यात सद्य:स्थितीत 14910 उपकरप्राप्त इमारती असून सदर इमारतींपैकी बहुतांश इमारतींची आयुमर्यादा संपल्याने त्यापैकी काही इमारती दुरुस्ती पलीकडे गेलेल्या आहेत." तसेच पुढे असेही नमूद केले आहे की, "धोकादायक आढळलेल्या इमारतींची मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्तरित्या पाहणी केली जात आहे." तसेच पुढे असेही नमूद केले आहे की, "मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून एकूण 1623 मालमत्तांसाठी विकासकांना पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे." याचाच अर्थ मुंबईत आयुमर्यादा संपलेल्या इमारती 14910 आहेत आणि पुनर्विकासासाठी 1623 इमारतींना ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. म्हणजेच केवळ 11 ते 12 टक्के इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासकांना ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. निवेदनात पुढे असेही नमूद केले आहे की, लोकांच्या जीविताला धोका असूनही पुनर्विकासाचे काम सुरु न केल्यामुळे 18 मालमत्तांच्या पुनर्विकासास देण्यात आलेली ना हरकत प्रमाणपत्रे रद्द केलेली आहेत. महोदय, एका बाजूला पुनर्विकास व्हावा म्हणून ना हरकत प्रमाणपत्रे दिली जातात आणि दुसऱ्या बाजूला प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे दिलेली ना हरकत प्रमाणपत्रे रद्द केली जातात. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, केवळ 18 इमारतींची ना हरकत प्रमाणपत्रे रद्द केली आहेत की त्या पेक्षा जास्त इमारतींची ना हरकत प्रमाणपत्रे रद्द केली आहेत ? तसेच रद्द केलेल्या इमारतींना किती दिवसात ना हरकत प्रमाणपत्र देणार आहात ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

कारण आपल्या उत्तरामध्ये दहा दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेलेल्यांची एनओसी आपण रद्द केलेली आहे. आता जर त्यांची पुन्हा सुरुवात केली तर आणखी 10 वर्षाचा कालावधी जाईल. इमारतीची आयुर्मयादा संपली असे उत्तरात नमूद करीत असाल तर या एनओसी रद्द केलेल्या इमारतींना किती दिवसात स्थगिती मिळेल आणि त्यांना किती दिवसात पूर्ववत एनओसी मिळेल ? काही विकासकांनी म्हाडाचे पैसे थकविलेले आहेत. वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली सर्व आकडेवारी आणि फॅक्ट बघितल्या तर ज्या विकासकांनी पैसे थकविले आहेत त्यांची एनओसी कधी रद्द केल्याचे आम्ही पाहिलेले नाही. आजपर्यंत पैसे थकविलेल्यांची जी यादी वर्तमानपत्रामध्ये आलेली आहे त्यांची एनओसी आपण कधीही रद्द करीत नाही. हे जे 18 किंवा 19 लोक असतील त्यांना ताबडतोब किती दिवसात पूर्ववत पुन्हा एनओसी मिळणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, यामध्ये एकूण 18 लोक आहेत आणि एकाच्या बाबतीत उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्याबद्दलचा निर्णय घ्यावा. अशा 19 लोकांची एनओसी आपण रद्द केली. एनओसी रद्द करण्याचे प्रमाण किती आहे ? अनेक वेळा भाडेकरुंच्या तक्रारी येतात की, पुनर्बांधणी होत नाही. विकासक एनओसी घेतात आणि दहा दहा वर्षे ते विकास करत नाहीत. अशा वेळी आपल्याला हा निर्णय घ्यावा लागतो. अनेक वेळा असेही निदर्शनास येते की, एनओसी घेतल्यानंतर विकासक तीन वर्षाने आपल्याकडे येतात आणि एक्स्टेंशन घेतात. परत तीन-तीन वर्षाचे एक्स्टेंशन दिले जाते आणि ते कोणत्याही प्रकारे पुनर्बांधणीचे काम करत नाही. आपण एकंदरीत संख्या पाहिली तर 1623 पैकी 18 किंवा 19 लोकांची एनओसी या कारणासाठी रद्द केली. काही एनओसी 1997 साली दिलेल्या आहेत. परंतु 1997 मध्ये एनओसी घेतल्यानंतरही आजपर्यंत त्यांची पुनर्बांधणी होत नाही. अशा वेगवेगळ्या कारणस्तव या एनओसी रद्द करण्याचे काम केलेले आहे. मात्र तिकडच्या रहिवाशांनी जर मागणी केली आणि जे घरमालक आहेत किंवा ज्यांना एनओसी दिलेली आहे ते परत चांगले काम करण्यास तयार असतील तर अशांच्या बाबतीत निर्णय घेऊ शकतो. परंतु सरसकट जर असा निर्णय घेतला आणि हे चुकीचे आहे असे जर म्हटले तर जे योग्य निर्णय मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाने घेतलेले आहेत त्यावर एकप्रकारे अन्याय होईल, मला असे वाटते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, इमारत पुनर्विकासासाठी घेतली, लोकांना संक्रमण शिबिरात शिफ्ट केले आणि अजूनही वर्षानुवर्षे ते संक्रमण शिबिरात आहेत आणि त्या इमारतीचे काम अर्धवट पडलेले आहे अशा इमारतींची संख्या किती आहे आणि संक्रमण शिबिरात वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या किती आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या संदर्भातील आकडेवारी आता माझ्याकडे नाही. ती आकडेवारी पटलावर ठेवण्यात येईल. परंतु सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे त्यामध्ये ही गोष्ट खरी आहे की, गेल्या अनेक वर्षापासून हे लोक ट्रान्झीट कॅम्पमध्ये राहतात आणि त्यांना घर मिळत नाही. अनेक वेळा मी असेही सांगतो की, प्रतिक्षानगर मधील ट्रान्झीट कॅम्पमध्ये पाठविल्यानंतर एकदा माणूस त्या ठिकाणी गेला की, त्याने आयुष्यभर प्रतिक्षा करावयाची असते. ही एक प्रकारे शिक्षाच आहे. त्या वसाहतीचे नाव प्रतिक्षानगर का ठेवले आहे हे कळत नाही. आता आपण नवीन निर्णय घेतलेला आहे की, मास्टर लिस्टवर जेवढे लोक आहेत त्यांची आता आपण यादी जाहीर केलेली आहे. ती यादी ऑनलाईन जाहीर केलेली आहे. अनेक वेळा फक्त चेहरे बघून किंवा कोणाच्या तरी शिफारशीनुसार होत होते. गेल्या महिन्यातील शेवटचा आकडा माझ्याकडे आहे त्यानुसार 1017 लोकांची मास्टर लिस्ट तयार केलेली आहे. 339 गाळे त्यांच्यासाठी वितरित करण्याचे काम केलेले आहे. त्यामध्ये 1352 लोकांचे अर्ज आले होते. मी विचारले की, जर 1100 लोकांची यादी केली असेल तर 1300 लोकांचे अर्ज कसे आले ? यामध्ये पात्र आणि अपात्र अशा सर्व लोकांनी अर्ज केल्यामुळे त्याची छाननी केलेली आहे. आम्ही बोर्डाला सूचना दिलेल्या आहेत की, या पुढच्या काळामध्ये आपल्याकडे किती गाळे उपलब्ध आहेत आणि किती गाळे मास्टर लिस्टमध्ये जाणार आहेत याचे तुम्ही प्लानिंग करावयास पाहिजे. त्याचा कालावधी सुध्दा ठरवावा लागणार आहे. आपण त्यांना 20-20 वर्षे घरे देत नाही हे बरोबर होणार नाही. म्हणून दोन महत्वाचे निर्णय घेतलेले आहे. ट्रान्झीटचा कालावधी याची व्याख्या कोठे तरी स्पष्ट झाली पाहिजे. तीन वर्षे किंवा कोर्ट केस असेल तर जास्तीत जास्त पाच वर्षे असा कालावधी असला पाहिजे. अशी काही तरी कालमर्यादा यामध्ये घातली पाहिजे. दुसरा महत्वपूर्ण असा घेतला की, ज्या ज्या ठिकाणी ट्रान्झ ीट कॅम्पची पुनर्बांधणी होणार आहे आणि ट्रान्झीट कॅम्पमध्ये पुनर्बांधणी झाल्यानंतर म्हाडा ते

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ....

गाळे बाजारात विकणार आहेत आणि ज्यांच्याकडे धर नाही त्यांना देणार आहे. पण तेथील जे मूळ रहिवाशी आहे त्याना सुध्दा आधी न्याय देणे हे म्हाडाचे कर्तव्य आहे. ज्या ज्या ठिकाणी अशी मागणी होईल त्या पुनर्रचित झालेल्या नवीन ट्रान्झीट कॅम्पमध्ये सुध्दा त्यांना 300 चौरस फुटाची घरे देण्याचा निर्णय शासनाच्या वतीने घेण्याचे विचाराधीन आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की, मुंबई शहर जिल्ह्यात सद्यस्थितीत 14,910 उपकरप्राप्त इमारती जीर्ण झालेल्या आहेत. या इमारतींची संरचनात्मक दुरस्तीची 27,178 कामे पूर्ण झाली आहेत. याचा अर्थ सरासरी एका इमारतीची दोन वेळा दुरुस्ती झाल्याचे दिसून येते. मुंबई शहरामध्ये दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या इमारती पडल्या आहेत अशा किती इमारती आहेत, त्या इमारती चुकीच्या दुरुस्तीमुळे पडल्या आहेत काय ? दुरुस्तीचे काम करणारे अनेक कंत्राटदार शिकलेले नाहीत, ते इंजिनिअर्स नाहीत. चुकीच्या पध्दतीने दुरुस्तीचे काम केल्यामुळे इमारती पडतात. अशा इमारतींची संख्या किती आहे ? निवेदनात असे नमूद केले आहे की, 1,623 मालमत्तांसाठी विकासकांना पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. यापैकी किती मालमत्तांचे पुनर्विकासाचे प्रकल्प पूर्ण होऊन त्यांनी सी.सी.घेतली आहे ? तसेच किती विकासकांनी म्हाडाला 33 (7) अंतर्गत अतिरिक्त क्षेत्रफळ दिलेले नाही, त्यांच्याविरुध्द शासनाने काय कारवाई केली आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, इमारतीची पूर्ण दुरुस्ती झाल्यानंतर 10 वर्षाचा कालावधी दिलेला जातो. त्याची पूर्ण आकडेवारी आता माझ्याजवळ नाही. ती माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. ओ.सी.दिलेल्या लोकांची संख्याही मी पटलावर ठेवतो. ही लक्षवेधी पुनर्विकासातील 33(7) व 33(9) च्या संदर्भात उपस्थित करण्यात आली होती. तरी देखील मी याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे. अतिरिक्त क्षेत्रफळ न दिलेल्या 33 विकासकांवर शासनाने कारवाई केलेली आहे. त्यापैकी काही विकासकांनी अतिरिक्त क्षेत्रफळ देण्याचे मान्य केलेले आहे, ज्यांनी मान्य केलेले नाही त्यांची एनओसी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, 33(7) व 33(9) अंतर्गत एनओसी मिळविण्यासाठी जास्त कालावधी लागतो हे या उत्तरावरुन दिसून येते. 10 ते 12 टक्के इमारतींना एनओसी दिलेली आहे. ज्यांच्या एनओसी रद्द केल्या आहेत व तेथील भाडेकरुंच्या तक्रारी नसतील तर त्यांना किती दिवसात एनओसी दिली जाणार आहे ? विकासक एनओसी मिळविण्यासाठी म्हाडाकडे गेल्यानंतर म्हाडाचे अधिकारी त्यांना वर्ष-दोन वर्षे चकरा मारावयास लावतात. या सिस्टिममध्ये शासनाकडून काही फरक घडवून आणला जाणार आहे काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.किरण पावसकर....

इमारती जीर्ण झाल्याचे शासनानेच कबूल केले असल्यामुळे त्यांना ठराविक कालावधीत एनओसी दिली जाणार आहे काय, 18-19 एनओसी रद्द केल्या आहेत त्यांना पुन्हा एनओसी केव्हा दिली जाणार आहे ?

श्री.सचिन अहिर : विकासकांकडून एनओसी घेऊन ठेवल्या जातात, पुनर्विकास केला जात नाही. काही रहिवासी बाहेरच्या ठिकाणी गेलेले असतात. एनओसी रद्द होण्याला वेगवेगळी कारणे आहेत. विकासक काम करण्यास तयार आहे असे वाटले तर त्याचा निश्चितपणे फेरविचार केला जाईल.

**उप सभापती** : मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाला शासनाने स्थगिती द्यावी व या प्रकरणांची फेरतपासणी करावी, असे मी मंत्री महोदयांना निर्देश देत आहे.

सभागृहाची विशेष बैठक स्थगित होऊन नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.24 ते 12.30 पर्यंत स्थगित झाली. )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**नाशिक येथे इंडिया बुल्स या कंपनीसाठी पाण्याचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(१) * ४१८८७ डॉ. अपूर्व हिरे :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे इंडिया बुल्स या कंपनीला पुरेशा प्रमाणात सांडपाणी उपलब्ध व्हावे, यासाठी नाशिक शहराला गरज व सरकारी निकषापेक्षा अधिक प्रमाणात पाणी पुरवठा करण्यात येऊन पाण्याचा गैरवापर करण्यात येत असल्याची बाब दिनांक १५ मे, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकषानुसार शहरात दररोज प्रत्येक माणसामागे १४० लीटर पाण्याची मर्यादा सरकारने ठरवली असताना येथे मात्र इंडिया बुल्सला २०० ते २२५ लीटर पाणी दररोज पुरविले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात गत वर्षात सातत्याने सार्वत्रिक दुष्काळस्थिती असताना तसेच पाण्यावाचून जनता व गुरांचे अतोनात हाल होत असताना फक्त एका विशिष्ट उद्योगास त्याचे प्रकल्पासाठी जादा सांडपाणी मिळावे म्हणून अशा पद्धतीने पाण्याचा गैरवापर होत असल्याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच, भविष्यात अशा पद्धतीचा पाण्याचा गैरवापर होण्यापासून थांबविणेबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.सुनिल तटकरे** : (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. निरंजन डावखरे : निकषानुसार शहरात दररोज प्रत्येक माणसामागे १४० लिटर पाण्याची मर्यादा सरकारने ठरवली असताना इंडिया बुल्सला २०० ते २२५ लिटर पाणी दररोज पुरविले जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे असा प्रश्न विचारण्यात आलेला असून त्यास "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. मग माणसामागे १४० लिटर पाण्याची मर्यादा ठरविलेली नाही की इंडिया बुल्सला दररोज २०० ते २२५ लिटर पाणी पुरविले जात नाही ?

==२==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४१८८७...

श्री. राजेंद्र मुळक : इंडिया बुल्स प्रकल्पाला पाणी देण्यास सुरुवात झालेली नाही. कारण अद्याप तो प्रकल्प सुरु झालेला नाही. हे नियोजन आहे. टप्पा १ मध्ये १३०० मे.वॉ. वीज निर्मिती होणार आहे त्यासाठी १३.८० द.ल.घ.मी पाण्याचे आरक्षण आहे. पुनर्स्थापित करण्याची रक्कम २६ कोटी रुपये आहे. टप्पा-२मध्ये १२०० मे.वॉ. वीज निर्मिती होणार आहे. त्यासाठी ३६.३५ द.ल.घ.मी. पाणी द्यावे लागणार आहे. पुनर्स्थापित रक्कम ४६ कोटी रु. आहे. एकूण ७२ कोटी रु. पुनर्स्थापित रक्कम आहे. पाण्याचे आरक्षण एसटीपीच्या माध्यमातून झालेले आहे. त्यांना डॅममधून पाणी दिले जाणार नाही. डॅममधून पाणी नाशिक महानगरपालिकेला देण्यात येईल. नाशिक महानगरपालिका सांडपाणी एसटीपीच्या माध्यमातून नदीमध्ये सोडेल आणि ते पाणी ही बुल्स इंडिया कंपनी घेणार आहे. अशा प्रकारे पाणी घेणे सुरु झालेले नाही.

डॉ. सुधीर तांबे : आपल्या राज्यामध्ये प्रथम पिण्यासाठी, त्यानंतर शेतीसाठी आणि शेवटी उद्योगासाठी या प्रमाणे पाण्याचा प्राधान्यक्रम निश्चित केलेला आहे. इंडिया बुल्स कंपनीने पुनर्वापराचे पाणी वापरावे असे नियोजन आहे. त्या तत्वाशी शासन बांधील आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : होय.

---

..२...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कळवणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील रुग्णालयामध्ये ट्रामा केअर व आय.सी.यु. युनिट सुरु करण्याबाबत

**(२) * ४३१४१ श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील रुग्णालयामध्ये ट्रामा केअर व आय.सी.यु. युनिट सुरु झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच आरोग्य राज्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये कोकणातील बृहत आराखड्यानुसार मंजुर झालेली ट्रामा केअर सेंटर ८ दिवसांत सुरु होतील असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंजुर झालेली ट्रामा केअर सेंटर सुरु झाली आहेत काय,
(४) नसल्यास, ट्रामा केअर सेंटर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहु ट्रामा केअर सेंटर केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी** : (१) होय.
(२) मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांनी सन २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ट्रामा केअर युनिट सुरु करण्याबाबतचे आश्वासन दिले आहे.
(३) व (४) दिनांक १७.१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या बृहतआराखड्यात समाविष्ट सावंतवाडी व तरळा येथील ट्रामा केअर युनिटच्या अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री. रामदास कदम : मागील 5-6 वर्षापासून कळवणी येथे रुग्णालय सुरु आहे. या रुग्णालयासंबंधी मी प्रश्न विचारला नाही असे एकही अधिवेशन गेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी आश्वासने दिलेली आहेत परंतु त्यांची पूर्तता होत नाही. या रुग्णालयामध्ये कोणकोणत्या त्रुटी आहेत, डॉक्टर्स किती आहेत यासंबंधी व ट्रामा केअर व आय.सी. युनिट सुरु करण्यासंबंधी मी माननीय मंत्री महोदयांना पत्र देखील दिलेले आहे. त्या रुग्णालयासाठी केवळ 45 जणांचा स्टाफ दिलेला आहे. तेव्हा या रुग्णालयातील ट्रामा केअर व आय.सी. युनिट केव्हा सुरु करण्यात येईल व उर्वरित स्टाफ किती दिवसात देण्यात येईल ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी मूळ प्रश्न ट्रामा केअर व आय.सी. युनिट संबंधी विचारला. त्या रुग्णालयामध्ये युनिट चालू झालेले आहेत. 2 ऑर्थोपेडिक सर्जन आणि फिझिशियन याची नेमणूक झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, कोकणातील तीन जिल्ह्यासाठी स्पेशल जी.आर. काढलेला आहे. त्या भागामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होत नाहीत म्हणून तक्रारी येतात आणि त्यामुळे लोक रुग्णालयामध्ये जात नाहीत.

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आदिवासी जिल्ह्यामध्ये 60 हजार रुपयावर स्पेशालिस्ट डॉक्टरची नेमणूक केली जाते. तोच जी.आर. कोकणातील तीन जिल्ह्यासाठी लागू केलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:35

ता.प्र.क्र.43141...

श्री.सुरेश शेट्टी...

या तीन जिल्हयात काम करणाऱ्या स्पेशालिस्ट डॉक्टरांना दरमहा 60 हजार रुपये पगार देण्यात येणार आहे. दोन स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या प्रत्यक्षात नेमणुका झालेल्या आहेत. ऑर्थोपेडीक सर्जन बाबत सांगू इच्छितो की, बाँडेड उमेदवार उपलब्ध झाला तर ऑर्थोपेडीक सर्जनची नेमणूक तातडीने करण्यात येईल. या रुग्णालयासाठी आवश्यक असणारी सर्व उपकरणे एका महिन्यात उपलब्ध करुन दिल्या जातील.

श्री.रामदास कदम : या रुग्णालयातील आयसीयू कधी चालू करण्यात येणार आहे? या रुग्णालयासाठी 93 कर्मचारी वर्ग मंजूर आहे, त्यातील फक्त 45 कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त अपघात कशेळी घाटात होतात, ही गोष्ट आपण तपासून बघा. अपघाताची संख्या लक्षात घेऊन कळवणी येथे 100 खाटांचे रुग्णालय सुरु केलेले आहे. या रुग्णालयाचे माजी विधानसभा अध्यक्ष स्व.बाबासाहेब कुपेकर यांनी उदघाटन केलेले आहे. या रुग्णालयामध्ये ट्रामा केअर व आय.सी.यू. गेल्या सहा वर्षापासून बंद आहे. ट्रामा केअर तातडीने सुरु करण्यात येईल अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिली आहे. या रुग्णालयातील आय.सी.यू. कधी चालू करण्यात येणार आहे? या रुग्णालयात 93 कर्मचाऱ्यांपैकी 45 कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित 48 कर्मचारी कधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 1सप्टेंबर, 2013 पर्यंत या रुग्णालयातील आय.सी.यू. सुरु करण्यात येईल. मेडीकल ऑफिसरची बरीच रिक्त पदे आहेत ही वस्तुस्थिती आहे. कोकणातील या तिन्ही जिल्हयासंबंधी सभागृहात वारंवार चर्चा करतो. या जिल्हयांमध्ये अनेक पदे भरली आहेत, त्यासंबंधीची माझ्याकडे आकडेवारी सुध्दा उपलब्ध आहे. 2012 मध्ये रत्नागिरी जिल्हयासाठी 120 मेडीकल ऑफिसरची एकत्रपणे ऑर्डर काढली आहे. परंतु त्यातील फक्त 70 मेडीकल ऑफिसर तेथे हजर झाले आहेत. 2013 मध्ये 17 मेडीकल ऑफिसरच्या नवीन ऑर्डर काढल्या. त्यापैकी 8 मेडीकल ऑफिसर हजर झाले. सन्माननीय सदस्यांनी आमची देखील अडचण समजून घ्यावी. आम्ही सदरहू रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न करीत आहोत. आम्ही 1090 मेडीकल ऑफिसरांची नव्याने भरती करणार आहोत. त्यात प्रथम प्राधान्य रत्नागिरी आणि सिधुदुर्ग जिल्हयास देणार आहोत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43141...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गेल्या वर्षाच्या पावसाळी अधिवेशनात जगबुडी नदीमध्ये बस उलटून मोठा अपघात झाला. अधिवेशन सुरु होते, ते थांबवून आपण घटनास्थळी गेलो. या अपघाताच्या बाबतीत सभागृहात चर्चा झाली, त्यावेळी आपण आश्वासन दिले होते की, मुंबई-गोवा महामार्गावरील सर्व रुग्णालयामध्ये पुरेसे कर्मचारी, आवश्यक असणारी उपकरणे उपलब्ध करुन देऊ. सदर आश्वासन सभागृहात शासनाच्या वतीने दिले गेले त्यावेळी आपणही उपस्थित होतात. मुंबई-गोवा महामार्गाची अजून तशीच परिस्थिती आहे. या महामार्गावर गेल्या एका वर्षामध्ये 3500 अपघात झाले. या अपघातामध्ये जवळ जवळ 2000 लोक मृत्युमुखी पडले आहेत. या गोष्टीची गंभीर दखल घेऊन मुंबई-गोवा महामार्गावरील सर्व रुग्णालयातील उणिवा भरुन काढण्यासंदर्भात काही उपाययोजना करण्यात येतील काय?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या गोष्टींचा बृहत आराखडयामध्ये ऑलरेडी समावेश केलेला आहे. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तिन्ही जिल्हयात 8 नवीन ट्रामा केअर सेंटर्स सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. काही ट्रामा केअर सेंटर्सच्या संदर्भात प्रशासकीय आदेश काढलेले आहेत, काही ट्रामा केअर सेंटर्सच्या संदर्भात बजेटची देखील प्रोव्हीजन केलेली आहे. कणकवली आणि सिंधुदुर्गमध्ये जागा उपलब्ध नाही. मनोर, मुरबाड येथे जमीन उपलब्ध नाही म्हणून सदर सेंटर्सचे कामे थांबलेली आहेत. इतर ट्रामा केअर सेंटर्सची कामे लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कोकणात डॉक्टर्स जाण्यास तयार नाहीत आणि म्हणून आपण काही पावले उचलून स्पेशालिस्ट डॉक्टरांना दरमहा 60 हजार रुपये वेतन देण्याची घोषणा या ठिकाणी केली. या बाबतीत माझा मूलभूत प्रश्न असा आहे की, कोकणात डॉक्टर्स का जात नाहीत, त्याच्या कारणामध्ये जाण्याचा आपण प्रयत्न केला आहे काय, केवळ पैसे कमी मिळतात म्हणून तेथे जात नाहीत अशातला भाग असू शकत नाही. त्या गोष्टीस इतरही काही कारणे असतील, त्या कारणांचा अभ्यास करुन ती कारणे दूर करण्याचा आपण प्रयत्न केला आहे काय, केला असेल तर काय प्रयत्न केला गेला आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी जो प्रश्न उपस्थित केला ती वस्तुस्थिती आहे. गेल्या तीन वर्षाची माझ्याकडे आकडेवारी आहे. आम्ही पोस्टींग

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43141...

श्री.सुरेश शेट्टी....

करतो, परंतु उमेदवार तेथे हजर होत नाहीत. याबाबतचे मूलभूत कारण मी देखील शोधण्याचा प्रयत्न केला. या बाबतीत दोन्ही सभागृहांच्या सदस्यांशी चर्चा केलेली आहे आणि त्यामागचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला. या बाबतचा स्पेसिफिक प्रॉब्लेम समोर येत नाही. सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, कोकण विभागातील जेवढे आमदार आहेत, त्यांच्याच या बाबतचा अभ्यास करण्यासाठी एक गट नेमा आणि त्यांना सांगा की, या बाबतचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करा. अभ्यास गट ज्या शिफारशी करील, त्या शिफारशींची आम्ही अंमलबजावणी करु.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43141.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागील वेळी सभागृहात उत्तर देताना याची कारणे अशी सांगितली होती की, आरोग्य केंद्राच्या ठिकाणी स्टाफ क्वार्टर्सची व्यवस्था नसल्यामुळे डॉक्टर जात नाहीत. स्टाफ क्वार्टर बांधण्याच्या कामाला अग्रक्रम देऊन तातडीने काम पूर्ण केल्यानंतर डॉक्टरांची भरती केली जाईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, स्टाफ क्वार्टरचा मुद्दा होता. संपूर्ण राज्यात एनआरएचएम अंतर्गत स्टाफ क्वार्टर बांधण्याची मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की डॉक्टर भरती होत असताना उमेदवारांचे अर्ज येतात, मुलाखती होतात, नेमणुका झाल्यानंतर रिपोर्टिंग करतात. त्यानंतर आठ दिवसात, महिन्याभरात डॉक्टर पळून जातात. बेसिक प्रश्न असा आहे की, आज कोकणात आरोग्य केंद्राच्या ठिकाणी आरएमओ रुमची पाहणी केली तर पहिल्यांदा पाण्याची गळती दिसून येते. रुममध्ये एक-एक फूट पाणी साचल्याचे दिसून येते. चांगल्या प्रकारची टॉयलेट नसतात. ही व्यवस्था उपलब्ध असेल तर डॉक्टर तेथे काम करण्यास तयार होतील.

सभापती महोदय, कोकणामध्ये सरपटणारे प्राणी मोठया प्रमाणात आहेत. आजपर्यंत रायगड ते सिंधुदुर्ग जिल्हयात जवळपास 30 डॉक्टरांना विषबाधा झालेली आहे. त्यांना वेळेवर उपचार मिळाल्यामुळे त्यांचे प्राण वाचले. दोन दिवसापूर्वी महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वृत्तपत्रात शासनाच्या डोळ्यात अंजन घालणारे कोकणात स्टाफ क्वार्टरची अवस्था काय आहे हे दाखविणारे फोटो प्रसिध्द झाले होते. कालबध्द कार्यक्रम आखून स्टाफ क्वार्टरची सुधारणा केली जाईल का?

सभापती महोदय, पॅरा मेडिकल स्टाफ उपलब्ध होण्यास कोणतीही अडचण येत नाही. कोकणातील पॅरा मेडिकल स्टाफ आणि डॉक्टरांची पदे तातडीने भरली जातील काय? आरोग्य केंद्राच्या ठिकाणी शुध्द पाणी आणि निवासाची चांगली व्यवस्था केली जाईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेल्या मुद्याबाबत मी सांगू इच्छितो की, संपूर्ण राज्यात स्टाफ क्वार्टर बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाले असून काही ठिकाणी काम सुरु आहे. आता शासनाने एक नवीन निर्णय घेतला आहे. यापुढे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी स्टाफ क्वार्टर बांधण्याचा खर्च प्रकल्पाच्या एस्टीमेटमध्ये अंतर्भूत केला जाणार आहे.

....2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 12:40

श्री.सुरेश शेट्टी....... ता.प्र.क्र.43141......

सभापती महोदय, रविवारच्या महाराष्ट्र टाईम्स या दैनिकामध्ये जी बातमी प्रसिध्द झाली होती त्या संदर्भात सांगू इच्छितो की, प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम जिल्हा परिषदेमार्फत केले जाते. आरोग्य विभागामार्फत कोणतेही बांधकाम केले जात नाही. इतर रुग्णालयांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून बांधकामासाठी जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध करुन दिला जातो. या संदर्भात आता आम्हाला सखोल विचार करावा लागेल. इमारतीचे बांधकाम योग्य प्रकारे झालेले नाही यासंदर्भात जास्तीत जास्त तक्रारी तेथून येतात. जिल्हा परिषदेमध्ये काय होते हे आपल्या सर्वांना चांगले माहिती आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जिल्हा परिषदेला आरोग्य केंद्रांचे बांधकाम करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीच्या माध्यमातून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. नाबार्डकडून यावर्षी 110 कोटी रुपये दिले जाणार आहेत. या संदर्भातील क्वालिटी कंट्रोल आरोग्य विभागाच्या हातात नाही. त्याकरिता मेकॅनिझम उभे करण्याबाबत माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांच्यासोबत बसून आम्हाला काहीतरी भूमिका घ्यावी लागेल. बांधकाम दुसऱ्या विभागाकडून होत असले तरी बदनामी आरोग्य विभागाची होते.

सभापती महोदय, वर्ग 3 च्या पदाबाबत मुद्दा मांडण्यात आला आहे. आरोग्य विभागांतर्गत वर्ग 3 ची 5000 पदे रिक्त होती. शासनाचे धोरण आहे की, फक्त 3 टक्के पदे भरण्यात यावी. हा इश्यू आम्ही कॅबिनेटमध्ये उपस्थित करुन त्यावर चर्चा केली. पहिल्यांदा माननीय मुख्यमंत्र्यांनी 5000 पैकी 4645 पदे भरण्यास अनुमती दिली आहे. 15 ऑगस्ट रोजी पहिली जाहिरात प्रसिध्द होईल आणि 31 ऑगस्ट पर्यंत वर्ग 3 मधील पॅरा मेडिकलची सर्व तांत्रिक पदे आम्ही भरणार आहोत.

नंतर 2डी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :43141** ......

श्री. सुरेश शेट्टी .....

शिपाई या संवर्गाची पदे भरण्याची परवानगी आम्हाला नाही.परंतु टेक्नीकल स्टॉफ, नर्सेस पॅरामेडीकल अशी 4645 पदे 31 ऑक्टोबर पर्यंत भरली जाणार आहेत एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, चौथ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की,"सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली, सावंतवाडी व तरळा येथील ट्रामा केअर युनिटच्या अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे." प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल धन्यवाद परंतु आपण ट्रामा केअर युनिटच्या संदर्भात निधी कधी पर्यंत उपलब्ध करुन दिला जाणार आहे, व हे ट्रामा युनीट केव्हा पर्यंत सुरु होणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 8 ट्रामाकेअर युनिट सिंधुदुर्ग, रत्नागिरी,रायगड आणि रत्नागिरीसाठी बृहत आराखडयात घेतला असून व्हाईट बूक मध्ये सुध्दा एंट्री करण्यात आलेली आहे. दोन महिन्यात यासंदर्भात बजेट एस्टीमेट करणार आहोत. यामध्ये जागा उपलब्ध आहे की, नाही हे पहिल्यांदा बघावयाचे आहे. तारला येथे अद्यापपावेता जमीन उपलब्ध झालेली नाही तसेच मनोअर आणि मुरबाड येथे जमीन उपलब्ध झाली नाही. त्यामुळे या 3 ठीकाणी जमीन उपलब्ध झाल्यानंतर पुरवणी मागण्यांमध्ये आठही ट्रामा केअर युनिटची प्रोव्हीजन करुन घेतली जाईल.

श्री. प्रवीण पोटे : सभापती महोदय, वैद्यकीय सेवा उपलब्ध होणे हा संपूर्ण राज्याचा महत्वाचा प्रश्न आहे. दुर्गम भागामध्येच नाही तर प्रत्येक ठिकाणी डॉक्टरांना राहण्याची व्यवस्था नाही. एवढेच नव्हेतर टॉयलेटचीही व्यवस्था नाही. परंतु आपण प्रत्येक वेळेस सांगता की, डॉक्टरांची जाहिरात दिली आहे, डॉक्टरची भरती होणार आहे. डॉक्टर होण्यासाठी 8/10 वर्षे लागत असतात व असे असतांना आपण डॉक्टरांना 30/40 हजार रुपये पगारात नोकरी करा असे आपण सांगता. डॉक्टरांची राहण्याची व्यवस्था केली जात नाही की, कशाचीही व्यवस्था केली जात नाही. आपण सांगत राहतो की, आम्ही पीएचसीसाठी पैसे दिले, याला पैसे दिले, त्याला पैसे दिले. आम्ही जेव्हा ग्रामीण भागामध्ये जातो तेव्हा त्या भागातील जनतेला औषधे मिळत नाहीत, डॉक्टर्स मिळत

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :43141** ......

श्री. प्रवीण पोटे ...

नाही, त्यामुळे यासंदर्भात विशेष निधी तयार करा किंवा यासंदर्भात एखादी कमिटी तयार करा जेणे करुन हा प्रश्न एकदाचा मार्गी लागेल. जनतेला वैद्यकीय सेवा मिळण्याच्या संदर्भात आपण नेमके काय करणार आहत याची माहिती कृपया आपण द्यावी अशी विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, आम्ही रेसीडेन्शीअल क्वार्टरसाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच ग्रामीण भागातील हॉस्पीटल आणि पीएचसीचे अपग्रेडेशन तसेच दुरुस्ती करण्यासाठी या वर्षी बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रविण पोटे यांना मी सांगू इच्छितो की, गेल्या 3 वर्षात 3000 डॉक्टरांची नेमणूक केली गेली आहे. डॉक्टरांचा प्रश्न हा केवळ 2/3 जिल्हयापुरताच आहे. अजूनसुध्दा 1094 डॉक्टरांची पदे रिक्त असून ही पदे सुध्दा पुढील महिन्यात भरण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील १४० सिंचन प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणेबाबत**

**(३) * ४३०६०** **श्री.विनायक राऊत :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दोन वर्षात पूर्ण होणाऱ्या १४० सिंचन प्रकल्पांसाठी राज्य शासनाने सुमारे ५५१ कोटी रुपयांचा प्रस्ताव दिनांक १५ मे, २०१३ रोजी वा त्यासुमारास केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावानुसार केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आहे,

(३) असल्यास, प्राप्त झालेला निधी कोणकोणत्या प्रकल्पांसाठी वापरला जाणार आहे ?

**श्री. राजेंद्र मुळक,श्री.सुनिल तटकरे यांच्या करिता** : (१) नाही, केंद्र शासनाला असा प्रस्ताव सादर केलेला नाही. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात बांधकामाधीन असलेल्या ५८९ प्रकल्पांपैकी १४० प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य शासनाने रुपये ५७४ कोटीची तरतूद केली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुनील राऊत : सभापती महोदय, उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, "589 प्रकल्पांपैकी 140 प्रकल्प पूर्ण करण्याचे शासनाने ठरवले आहे व त्यासाठी 574 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे." माझा प्रश्न असा आहे की, हे जे 140 प्रकल्प आहेत त्यामध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, पश्चिम महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ या पाच महामंडळाचे प्रत्येकी किती आणि कोणते प्रकल्प समाविष्ट करण्यात आलेले आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कोकण पाटबंधारे विकास महामंडळातील पन्हाळे आणि आंबई, तापी विकास महामंडळ मधील 12, पश्चिम महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांची 24,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे 48 आणि विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे 54 प्रकल्प यामध्ये घेण्यात आलेली आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता माननीय राज्यमंत्री महोदयांनी प्रकल्पाची संख्या वाचून दाखविली आहे. शासन प्रत्येक महामंडळ निहाय किती प्रकल्प देणार आहे ? माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, विदर्भ, गोदावरी, तापी, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या महामंडळांना 575 कोटी रूपयांपैकी अनुक्रमे किती निधी देण्यात येणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कृष्णा खोरे विकास महामंडळ, उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळामध्ये 19 प्रकल्प आहेत. त्यासाठी 85 कोटी 38 लाख रूपयाची तरतूद करण्यात आली आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळातील मराठवाडा भागातील 5 प्रकल्प असून त्यासाठी 13 कोटी 64 लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. तापी विकास मंडळामध्ये 12 प्रकल्प असून 77 कोटी 65 लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. उर्वरित महाराष्ट्रातील 42 प्रकल्प असून त्यासाठी 233 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. गोदावरी मराठवाडा विकास मंडळातील 39 प्रकल्प असून त्यासाठी 129 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली असून उर्वरित महाराष्ट्र गोदावरी विकास मंडळातील 9 प्रकल्पांसाठी 58 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. मराठवाड्यातील एकूण 44 प्रकल्प असून त्यासाठी 143 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. विदर्भातील 54 प्रकल्प असून त्यासाठी 197 असे मिळून 140 प्रकल्पांसाठी रूपये 574 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, एकूण 589 प्रकल्प आहेत. त्यापैकी 140 प्रकल्पांवर आपण 574 कोटी रूपये खर्च करणार आहोत. या 140 प्रकल्पांना एकूण किती निधी लागणार आहे ? 449 प्रकल्प असे आहेत की, त्याचे नियोजन आपण केलेले नाही. त्याबद्दल शासनाची भूमिका काय आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनायक राऊत,पांडुरंग फुंडकर व प्रा.सुरेश नवले यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याला माननीय राज्यमंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. आपल्याला सन 2013-14 या आर्थिक वर्षात 140 प्रकल्प पूर्ण करावयाचे आहेत. या वर्षात आपल्याला 589 प्रकल्पांसाठी 7249 कोटी रूपये इतका नियतव्यय मिळालेला आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या विभाग निहाय निधीच्या अधीन राहून या निधीचे वाटप आपण सर्व महामंडळांना केलेले आहे. जे 140 प्रकल्प बांधून पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत त्या प्रकल्पाची येथे माहिती सांगण्यात आली आहे. उरलेले प्रकल्प हे सन 2014-2015, 2015-2016 या वर्षात टप्प्याटपप्याने पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सिंचनाच्या चर्चेच्या वेळी जाहीर केले आहे की, जे प्रकल्प पूर्ण होणार आहेत त्यासाठी जास्त तरतूद करून ते प्रकल्प पूर्ण करण्यात येतील. त्यानुसार सन 2013-14 या वर्षामध्ये असे किती प्रकल्प पूर्ण होणार आहेत व त्यासाठी आपण किती तरतूद केली आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी जे उत्तर दिले तेच पुन्हा देतो. सन 2013-14 मध्ये 140 प्रकल्प पूर्ण होणार आहेत. सन 2014-15 या आर्थिक वर्षात या प्रकल्पांसाठी आर्थिक तरतूद करण्यात येणार नाही. ते प्रकल्प सन 2013-14 या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी लागणारी रक्कम ही रूपये 574 कोटी इतकी आहे. त्यातून 146.238 द.ल.घ.मी.पाणी साठा होईल. त्यातून 36117 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचे नियोजित आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या 24 प्रकल्पांवर निधी खर्च करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले आहे. कृष्णा खोरे महामंडळाच्या अंतर्गत सांगली जिल्ह्यामध्ये म्हैसाळा आणि टेंभू योजना कार्यान्वित आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 43060....

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या 24 प्रकल्पांवर निधी खर्च करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले आहे. कृष्णा खोरे महामंडळाच्या अंतर्गत सांगली जिल्ह्यामध्ये म्हैसाळा आणि टेंभू योजना कार्यान्वित आहेत.त्यांची कामे सुरु आहेत. हा कायम दुष्काळी भाग आहे. आज देखील तेथे चारा छावण्या सुरु आहेत. सांगली जिल्ह्यामध्ये जवळपास चार हजार लोकांना तर कवठेमहाकांळ व तासगाव येथे जवळपास 1 लाख लोकांना टॅकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. तेथे जनावरांसाठी चारा छावण्या सुरु आहेत. कवठेमहाकांळ, आटपाडी, खानापूर हे कायम स्वरुपी दुष्काळी भाग आहेत. तेव्हा त्या भागातील म्हैसाळ आणि टेंभू योजनांवर अग्रक्रमाने खर्च करण्यात येईल काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. त्यांनी सांगितलेल्या योजनांसाठी वेगळ्या तऱ्हेने तरतूद करण्यासाठी किंवा भारत सरकारच्या एआयबीपी योजनेंतर्गत निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करीत आहोत. कृष्णाखारे महामंडळाच्या अंतर्गत एकूण 24 प्रकल्प पूर्णत्वास नेत आहोत. त्यासाठी किती निधी देणार आहात या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या संदर्भातील पाठपुरावा केंद्र सरकारकडे करीत आहोत.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, शासनाने सिंचनाची श्वेतपत्रिका काढली त्यामध्ये ज्या प्रकल्पांची 25 टक्केपेक्षा जास्त कामे झालेली नाहीत असे प्रकल्प रद्द करण्याची शिफारस करण्यात आली होती. कोकणात 25 टक्केपेक्षा जास्त काम न झालेले किती प्रकल्प आहेत,ते प्रकल्प रद्द करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोकणातील प्रकल्पासंदर्भातील प्रश्न विचारलेला आहे. परंतु तो मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, प्रकल्प रद्द करावा असे म्हटलेले नाही. उपलब्ध निधी विचारात घेऊन कोणत्या पध्दतीने कामास अग्रक्रम द्यावा हा विषय आहे. आपल्याकडे जे प्रकल्प आहेत त्याची रक्कम खूप मोठ्या प्रमाणावर आहे. तेव्हा शासनाने असे ठरविले की, 75 ते 100 टक्के काम पूर्ण् असलेल्या प्रकल्पांना अधिक निधी उपलब्ध करुन द्यावा. त्याप्रमाणे अग्रक्रम ठरविण्यात यावा. तेव्हा कोणताही प्रकल्प रद्द होणार नाही. विभागाला मिळणाऱ्या नियतव्ययाच्या अधीन राहून काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

------- ..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**आंबेजोगाई (जि.बीड) येथे वृध्दांच्या आरोग्यासाठी उभालेल्या रुग्णालयातील पदनिर्मितीबाबत**

**(4) * 41921 श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण, श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक 37714 ला दिनांक 12 मार्च, 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आंबेजोगाई (जि.बीड) येथे वृध्दांच्या आरोग्यासाठी 200 खाटांचे रुग्णालय उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रुग्णालयातील पदांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर रुग्णालयातील पद निर्मितीबाबतच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(4) असल्यास, आंबेजोगाई येथील सदरचे रुग्णालय केंव्हा सुरु होणार आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी** : (1) हे खरे आहे.

तथापि, ही इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आरोग्य विभागास हस्तांतरित झालेली नाही.

(2) व (3) हे खरे आहे,

या रुग्णालयाच्या पदनिर्मितीच्या प्रस्तावातील वित्त विभागाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन सदर प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे.

(4) पदनिर्मिती होऊन पदभरती झाल्यावर व यंत्र/ साधनसामुग्री उपलब्ध करुन दिल्यावर सदरचे रुग्णालय पूर्णपणे कार्यान्वित होईल.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आंबेजोगाई येथे वृध्दांच्या आरोग्यासाठी 200 खाटांचे रुग्णालय उभारण्यात आले आहे काय, या प्रश्नाचे उत्तर "हे खरे आहे" असे दिलेले आहे. पुढे असे नमूद केलेले आहे की, "तथापि, इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आरोग्य विभागास हस्तांतरित झालेली नाही." जेथे इमारत हस्तांतर झालेली नाही तेथे रुग्णालय सुरु

..3..



AJIT/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री.भारवि. 12:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41921..

श्री.अमरसिंह पंडित....

होण्याचा प्रश्न येत नाही. सुमारे आठ कोटी रुपये खर्च करुन ही इमारत उभारण्यात आली आहे. रुग्णालयातील पदे मंजूर न झाल्यामुळे तेथे रुग्णालय सुरु झालेले नाही. रुग्णालयास आवश्यक असणारी 902 पदांची निर्मिती व मान्यतेचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे मागील एक वर्षापासून प्रलंबित आहे. त्याठिकाणी यंत्रसामुग्री आली असून ती धूळ खात पडून आहे. माझे तीन प्रश्न आहेत. वृध्दत्व निवारण व मनोरुग्णालयातील 209 पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावास विलंब होण्याची कारणे काय आहेत, रुग्णालयातील पदांच्या निमिर्तीस शासन केव्हा मंजुरी देणार आहे, हे रुग्णालय प्रत्यक्षात केव्हा सुरु होणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे सांगितले त्यामध्ये मी थोडे स्पष्टीकरण करतो. हा प्रकल्प आठ कोटी रुपयांचा नाही. सन 2011 मध्ये या रुग्णालयाचे काम सुरु केले. पहिल्या टप्प्यामध्ये रु. 20.4 कोटीस मान्यता मिळाली. त्याप्रमाणे बजेटमध्ये तरतूद केली. मार्च महिन्यामध्ये 19.2 कोटी रुपये खर्च करण्यात येऊन पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला. आता दुसऱ्या टप्प्यासाठी 10 कोटी रुपयांचे एस्टीमेट आहे आणि त्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या बजेटमध्ये 3 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कामाच्या संदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम सप्टेंबर 2014 मध्ये पूर्ण होणार आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यामुळे तेथे ओपीडी सुरु करावी अशी लोकप्रतिनिधींची विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.41921....

श्री.सुरेश शेट्टी.....

तसेच आयपीडी सुरु करा, अशी सुध्दा मागणी केली आहे. वास्तविक पाहता इमारतीच्या पहिल्या मजल्यावर काम सुरु असताना आयपीडी इन पेशंट घेऊ शकत नाही. पाहिजे तर तेथे लगेच ओपीडी सुरु करु शकतो.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न पदांबाबतचा विचारला आहे. या निमित्ताने सांगू इच्छितो की, आमच्या विभागाने वित्त विभागाकडे 209 पदांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला होता. वित्त विभागाने त्यात काही किरकोळ त्रुटी काढून तो परत पाठविला होता. त्या त्रुटींची पूर्तता करुन आम्ही तो प्रस्ताव पुन्हा वित्त विभागाकडे पाठविला असून, वित्त विभागाकडून येत्या 15-20 दिवसात त्या प्रस्तावाला मान्यता मिळेल. सप्टेंबर महिन्याची डेडलाईन गृहीत धरुन ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करणार आहोत. तसेच या रुग्णालयासाठी जी उपकरणे लागणार आहेत त्यांची सुध्दा सप्टेंबर अखेरपर्यंत खरेदी करुन, सप्टेंबर महिन्यात या रुग्णालयाचे उद्‌घाटन करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : महोदय, अंबेजोगाई येथे वृध्दांसाठी सप्टेंबर महिन्यामध्ये 200 खाटांचे स्पेशलाईज हॉस्पीटल सुरु होईल असे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. ही खरोखरच चांगली आणि समाधानाची गोष्ट आहे. वृध्दांच्या आजारांवर उपचार करण्यासाठी हे रुग्णालय सुरु केले जात असले तरी विशिष्ट वयाच्या गटांमध्ये स्पेसिफिक आजार होतात. उदा.जॉईंट रिप्लेसमेंट वृध्दांच्या दृष्टीने हा मोठा भाग असतो. या रुग्णालयात बीड जिल्ह्यातील, मराठवाड्यातील किंवा आसपासच्या परिसरातील वृध्द नागरिक उपचारासाठी येतील. मी स्पेसिफिक विचारतो की, वृध्दांच्या आरोग्याच्या समस्या लक्षात घेऊन त्या नुसार त्या स्पेशालिटीची सोय प्राधान्याने या रुग्णालयात करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : महोदय, वृध्दांवर उपचार करण्यासाठी कार्यक्रम हाती घेतला आहे. या रुग्णालयात ऑर्थोपेडीक सेक्शन, फिजिओथेरेपिस्ट, काऊन्सीलींग यांना जास्त महत्त्व देणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी वृध्दांना मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या गुडघ्यांच्या रिप्लेसमेंटबाबतचा मुद्दा मांडला. त्या बाबत सांगू इच्छितो की, सजेशन फॉर ॲक्शन.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, वृध्दांच्या आरोग्याचा विचार करुन त्यांना वैद्यकीय सुविधा देण्याचे मान्य करण्यात आले आहे. हे खरे असले तरी वृध्द ज्यावेळी रुग्णालयात येतात त्यावेळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.41921....

डॉ.नीलम गोऱ्हे.....

त्यांना पायी चालण्यात किंवा जीने चढण्यात अनेक अडचणी येतात. या बाबत काय सुविधा करण्यात आली आहे, त्यासाठी काही विशिष्ट पॅटर्न ठरविला आहे काय, असल्यास कोणता ? तसेच महाराष्ट्रात अन्य ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी विशिष्ट रुग्णालय करण्याचे ठरविले आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : महोदय, राज्यात वृध्दांवर मोफत उपचार करण्यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व आरोग्य विभागाने 5 वर्षांपूर्वी ऑलरेडी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्या शासन निर्णयानुसार वृध्दांना विनामूल्य वैद्यकीय सेवा दिली जाते. ज्येष्ठ नागरिक आणि फिजीकली डिसेबल नागरिकांसोबत फ्रेंडली वागण्यासाठी नवीन हॉस्पीटलमध्ये रॅम्पची बाब अंतर्भूत केली आहे. आता जुन्या रुग्णालयात सुध्दा हे बदल करीत आहोत. या निमित्ताने मी महत्वाची माहिती देऊ इच्छितो की, संपूर्ण देशात आपल्या राज्यात प्रथम पॅलिटीव्ह केअरचा इनिशिएटीव्ह घेतला आहे. अमरावतीमध्ये हा कार्यक्रम सुरु केला आहे. राज्यातील नर्सेस वेल्लोर आणि टाटा हॉस्पीटलमध्ये पाठवून प्रशिक्षण दिले आहे. संपूर्ण राज्यात जे टर्मीनली इल ज्येष्ठ नागरिक असतील, त्यामध्ये मग ती एचआयव्हीची केस असो, कॅन्सरची केस असो अशा टर्मीनली इल वृध्दांच्या घरी जाऊन विभागाच्या ए.एन.एम. त्यांच्या रुम क्लीन करणे आणि त्यांना मॉर्फीन पेन कीलर देणे इत्यादी सेवा देतील. अशा प्रकाराचा नवीन कार्यक्रम राज्याने हाती घेतला आहे. संपूर्ण राज्यात सहा महिन्यात त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणार आहोत.

श्री.प्रकाश बिनसाळे : महोदय, एखाद्या रुग्णालयाचा प्रकल्प कन्सीव्ह करतो त्याच वेळी त्या रुग्णालयाला लागणारी उपकरणे आणि स्टाफचे नियोजन करुन त्याचे सँक्शन, ॲप्रूव्हल घेऊन रुग्णालयाचे काम सुरु केले तर बरे होईल. अनेक वेळा रुग्णालयाची इमारत बांधून तयार असते. परंतु त्या ठिकाणी फर्निचर आणि स्टाफ नसतो. दोन-तीन वर्षे ती इमारत तशीच उभी असते. त्यामुळे बंद इमारतीतील काचा फोडणे, नळ वा अन्य सामान चोरुन नेले जाते. या बाबी टाळण्यासाठी दवाखान्याची इमारत तयार झाल्यानंतर एक महिन्याच्या आत त्या ठिकाणी दवाखाना सुरु करण्याचे नियोजन विभागामार्फत करणार काय ?

नंतर श्री.बरवड....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41921 .....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी जे सांगितले त्या बाबत आधीच निर्णय घेतलेला आहे. आता आपण जी नवीन इन्स्टिट्यूट स्थापन करण्याचा निर्णय घेतो त्याबरोबरच स्टाफ आणि इक्विपमेंट या दोन्हीची प्रोसेस एकत्रच सुरु करतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अंबेजोगाईला वृध्दांसाठी जेनेऑट्रीक हॉस्पिटल सुरु केले ही चांगली बाब आहे. त्यासाठी अंबेजोगाईच का निवडले हे माहीत नाही. पण कोठे तरी याची सुरुवात झाली हे योग्य झाले. अशा प्रकारे जेनेऑट्रीक केअर फार महत्वाचे आहे. कारण आता आयुष्यमान वाढलेले आहे. प्रत्येक जण आता 60-70 वर्षाच्या पलीकडे जगतो. त्यामुळे त्यांचे आजार सुध्दा वाढलेले आहेत. अशा प्रकारे धोरणात्मक निर्णय घेऊन महाराष्ट्र शासन वृध्दांसाठी स्पेशलाईज हॉस्पिटल्स महाराष्ट्रात काही ठिकाणी सुरु करणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अंबेजोगाई येथेच हे हॉस्पिटल का उभारण्यात आले या बाबतीत मी सांगू इच्छितो की, हा निर्णय मी मंत्री होण्याच्या अगोदर झाला होता. तत्कालीन मंत्र्यांनी जो निर्णय दिला होता ते काम आम्ही पूर्ण करीत आहोत. दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, नवीन हॉस्पिटल उभारण्यासाठी वेळ लागेल त्यामुळे प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये आणि ग्रामीण रुग्णालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी आम्ही स्वतंत्र वॉर्ड क्रिएट करणार आहोत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, ही इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आरोग्य विभागास हस्तांतरित झालेली नाही. आधीच्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुध्दा असेच उत्तर आले होते. शासनाच्या या दोन खात्यांमध्ये काही दुरावा आहे का ? या दोन खात्यांमध्ये कोऑर्डिनेशन नाही म्हणून हा विलंब होतो आणि ज्या व्यवस्था आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्या त्या देण्यासाठी विलंब होतो. त्यामुळे हा दुरावा दूर करुन आपण एकत्रितपणे काम करणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41921 .....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यामध्ये आरोग्य विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोऑर्डिनेशनचा संबंधच नाही. मी आधीच सांगितले की, हे काम दोन टप्प्यांमध्ये होणार होते. 20 कोटी रुपयांचा पहिला टप्पा पूर्ण झालेला आहे. 10 कोटी रुपयांच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सप्टेंबर पर्यंत पूर्ण होणार आहे. ते काम प्रगतिपथावर आहे. त्यामुळे ते हस्तांतरित करण्याचा प्रश्न येत नाही. संपूर्ण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच हस्तांतरित होणार आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**तामसोली (ता.रोहा,जि.रायगड) येथे वीज प्रवाह सुरळीत व्हावा म्हणून झाडे तोडलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(५) * ४१५७९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीच्या २२० के.व्ही. आपटा-महाड वाहिनीच्या लोकेशन क्र.३७-३८ व ३८-३९ मध्ये मौजे तामसोली (ता.रोहा, जि.रायगड) येथील शेत गट क्र.१६० व/ ११ व गट क्र.२४९ मधील वीज वाहिनीस अडचण निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज प्रवाह सुरळीत व्हावा म्हणून उमाजी लक्ष्मण चव्हाण व नारायण देवजी चव्हाण रा.तामसोली (ता.रोहा,जि.रायगड) या शेतकऱ्यांचा गट क्र.१६० व/ ११ व गट क्र.२४९ मधील झाडे शेतकऱ्यांना कळवून तोडण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झाडांची तोड होण्यापूर्वी नुकसानीचे पंचनामे महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीने केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंचनाम्यानुसार अद्यापही शेतकऱ्यांनी वेळोवेळी मागणी करुनही त्यांना नुकसानीची रक्कम अदा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना पंचनाम्यानुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे

(२) हे खरे नाही

सदर वाहिनीचे काम दिनांक ०८.०५.२००४ रोजी पुर्ण करण्यात आले. तत्पूर्वी वाहिनीचे काम सुरु असताना संबंधित शेतकऱ्यांची काही झाडे वाहिनी मार्गात येत होती व अशी झाडे तोडणे आवश्यक होते. या दृष्टीने नियमाप्रमाणे पंचनामा करण्याचे काम हाती घेण्यात आले, परंतु संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे तसेच स्वत:च्या व पंचाच्या सहयांची कागदपत्रे सादर न केल्याने पंचनामा पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे सदर झाडे तोडता आली नाहीत. परंतू काही झाडांच्या फांद्या वाहिनीपासून सुरुक्षित अंतर ठेवण्याच्या दृष्टीने छाटण्यात आल्या.

(३) पंचनाम्याचे काम हाती घेण्यात आले होते. परंतु, पंचनाम्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्याने पंचनामा पूर्ण होऊ शकला नाही.

(४) पंचनामा पूर्ण होऊ न शकल्यामुळे झाडांची तोड झाली नाही त्यामुळे नुकसान भरपाई देण्यात आली नाही.

(५) आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबद्दल संबंधित शेतकऱ्यांना वारंवार कळवूनही पूर्तता न झाल्याने पंचनामा झाला नाही. कागदपत्राची पूर्तता झाल्यावर पंचनामा करुन नुकसान भरपाई देऊन झाडे तोडण्यात येतील.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41579 .....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, पंचनामे झालेले नाहीत. पंचनाम्याची प्रत माझ्याकडे आहे. याचा क्रमांक 19547 असून 11.6.2004 रोजी हा पंचनामा करण्यात आला आहे. मंत्री महोदयांकडे मी या पंचनाम्याची प्रत देतो. यामध्ये फक्त 20 हजार रुपये एवढी छोटी रक्कम आहे. संबंधित शेतकऱ्याला त्यांच्या झाडांची किंमत दिली जाईल का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, यामध्ये पंचनामे झालेलेच नाहीत अशा प्रकारची माहिती मिळालेली आहे. परंतु जर सन्माननीय सदस्यांकडे ते पंचनामे झाल्याची माहिती असेल तर त्याची खातरजमा करुन घेण्यात येईल. साधारणतः जेव्हा या दोन्ही शेतकऱ्यांचा 7/12 पाहिला त्यावर वारसदारांची आणि हक्कदारांची नोंद होती. या दोन्ही वारसदार आणि हक्कदारांची जो पर्यंत नाहरकत मिळत नाही तोपर्यंत आपण संबंधित शेतकऱ्याला निधी देत नाही. त्या सर्व गोष्टींची खातरजमा करुन घेण्यात येईल. जर तशा तऱ्हेचे पंचनामे झाले असतील तर तातडीने वारसदारांसोबत हा निर्णय घेण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा शेतकऱ्यांचा फार महत्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य जी माहिती गोळा करतात ती वस्तुस्थिती असते. आम्ही फिल्डवर काम करतो. सन्माननीय सदस्यांकडे पंचनामे आहेत. त्यांनी ते दाखविले आहेत. तरीही मंत्री महोदय असे म्हणतात की, पंचनामे आलेले नाहीत. आपल्याला ज्यांनी चुकीचे उत्तर दिले त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ? या शेतकऱ्यांना हा महिना संपण्याच्या आत पैसे देणार का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41579.....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आता असे म्हटले आहे की, सभासद फिल्डवर काम करुन माहिती घेत असतात. त्यांचे म्हणणे खरे आहे परंतु बाकीचे लोक झाडलोटाचे काम करीत नाहीत. वास्तविक फिल्डवर जे लोक चांगले काम करतात ते सभागृहात पहिल्या रांगेत बसतात. ज्यांचे काम चांगले नाही ते जरा मागे बसतात. त्यामुळे त्यांनी फिल्डवर आणखी चांगले काम करावे.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी व माननीय राज्यमंत्र्यांनी ब्रिफिंग घेतले असताना शेतकरी पंचनामे करण्यासाठी पुढे येत नाहीत अशी आम्हाला माहिती देण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी माझ्याकडे पंचनाम्याची प्रत पाठविली आहे त्यावर संबंधित शेतकऱ्याची स्वाक्षरी दिसत नाही. सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, संबंधित शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिल्यानंतर पंचनामा केला जाईल. पंचनामा करण्याची एक पध्दत असते. पंचनाम्याच्या वेळी कृषि विभागाचे व अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित असतात. त्यांच्या उपस्थितीत पंचनामा होईल. जोपर्यंत हा पंचनामा होणार नाही तोपर्यंत झाडे तोडली जाणार नाहीत. सध्या विभागाने फक्त फांद्या तोडलेल्या आहेत. ही वस्तुस्थिती आहे. परंतु झाडे तोडल्यानंतर मात्र त्यांचे नुकसान होईल. त्यामुळे पंचनाम्याप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई देण्याची शासनाची तयारी आहे.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**धारणी (ता.धारणी, जि.अमरावती) येथील कावरा बंधारा क्षेत्रातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(6) * 42663 डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार, श्री.प्रवीण पोटे-पाटील** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) धारणी (ता.धारणी, जि.अमरावती) येथील कावरा बंधारा क्षेत्रातील 200 शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अद्यापपर्यंत मिळाली नसल्याचे दिनांक 17 मे, 2013 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शेतकऱ्यांना सिंचनासाठी कालव्याचा फायदा होत नाही व अनेक ठिकाणी कालवा नादुरुस्त असून कालव्याला मोठ्या प्रमाणात भेगा जाऊन शेतीचे व पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनिल तटकरे यांच्याकरिता** : (1) होय.
(2) वितरण प्रणालीचे काम अपुर्ण असल्याने कालव्यांचा शेतकऱ्यांना पूर्णपणे फायदा होत नाही तथापि, कालवे नादुरुस्त असल्याने शेतीचे व पिकांचे नुकसान झाले नाही.
(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, कोट्यवधी रुपये खर्च करुन अमरावती जिल्ह्यातील धारणी येथील कावरा बंधारा बांधण्यात आला. हा बंधारा बांधण्यासाठी तिटंबा, मोगरदा, गुट्टी, मांडू, प्रबांग, धाराकोट व धोतरा येथील सुमारे 200 शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. त्या शेतकऱ्यांना आजपर्यंत जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही. 200 शेतकऱ्यांना किती दिवसात मोबदला दिला जाईल ? या बंधाऱ्याच्या कामात गैरव्यवहार झाल्यामुळे कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लाभ मिळालेलाच नाही. उलट त्यांच्या पिकांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे या शेतक-यांना पिकाचा मोबदला दिला जाणार आहे काय आणि कालव्याचे बांधकाम तत्काल केले जाणार आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या बंधाऱ्याचे संपादित एकूण क्षेत्र 206 हेक्टर आहे. भूधारकांची संख्या 349 होती. ज्यांना पूर्ण मोबदला देण्यात आला आहे त्यामध्ये ओगरा गावातील 34, सावरा गावातील 28, कासमार येथील 46, खेडकीतील 4 आणि सावऱ्यातील कालव्यासाठी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एका व्यक्तीचा समावेश आहे.  उर्वरित गावांपैकी आकी गावातील 22 जणांना रक्कम देण्याचा प्राथमिक स्तरावर निर्णय झालेला आहे.  उर्वरित लोकांबाबत कलम 4-5 ची कार्यवाही सुरु आहे. ती पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यात येईल.  तसेच त्या कालव्याच्या दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, प्रश्न व लेखी उत्तरामध्ये खूप विसंगती दिसून येते.  माझा प्रश्न असा आहे की, या पाटचाऱ्यां ऐवजी शेतकऱ्यांना पाईप लाईनने पाणी पुरवठा करता येईल काय ? अमरावती जिल्ह्यातील अनुभव असा आहे की, पाटचाऱ्यातून पाणी बाहेर जाते. त्यामुळे जमिनींचे नुकसान होते. ती जमीन उपयुक्त राहत नाही.  त्यामुळे शेतकऱ्यांना पाईप लाईनद्वारे पाणी दिले जाईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : या प्रश्नाशी हा विषय वेगळा आहे.  पाटचाऱ्याची देखभाल दुरुस्ती केली जाते.  या प्रश्नाच्या निमित्ताने त्या भागात पाटचाऱ्याऐवजी पाईप लाईन करण्यात यावी अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केली आहे.  त्याबाबत सखोल माहिती घेऊन सभागृहाला अवगत केले जाईल.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील कायम अवर्षणप्रवण असलेल्या दुष्काळी विभागातील कायमचा दुष्काळ संपविण्याबाबत**

**(७) * ४३०६४ डॉ.दिपक सावंत :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम अवर्षणप्रवण असलेल्या दुष्काळी विभागातील दुष्काळ संपविण्यासाठी २० हजार कोटींचे प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे मे, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणते प्रस्ताव सादर केले आहेत व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदयांनी मंजूरी दिली आहे काय, असल्यास, तद्नंतर यासंदर्भात तातडीने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) अद्यापही या प्रस्तावास मंजूरी मिळाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.सुनिल तटकरे यांच्याकरिता** : (१) व (२) राज्यातील अवर्षणप्रवण भागातील बांधकामाधीन प्रकल्प / प्रकल्प घटक पुर्ण करुन टंचाईवर कायमस्वरुपाची उपाययोजना करण्यासाठी तसेच विदर्भातील खारपाणपट्टा व आपदग्रस्त जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प / प्रकल्प घटक यासाठी प्राथमिक स्वरुपात रुपये २१२५० कोटींचा प्रस्ताव तयार करुन मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे मे, २०१३ मध्ये सादर केला आहे.
(३) व (४) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

डॉ. दीपक सावंत : राज्याच्या विविध जिल्हयामध्ये अवर्षणग्रस्त भाग आहे. त्या भागामध्ये सातत्याने दुष्काळ पडत असतो. उदा. मराठवाड्यातील काही भाग, कोल्हापूर जिल्हयातील काही भाग, सांगली जिल्हयातील काही भाग या भागामध्ये सतत दुष्काळ पडत असतो. या भागातील अवर्षणग्रस्त परिस्थिती कमी होईल, सिंचन कसे वाढेल यासाठी शासनाने काही प्रणाली नियुक्त केली आहे काय ? ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणामध्ये होणा-या बदलांचा अभ्यास करण्यासाठी ई-वॉटर प्रणाली विकसित करण्याच्या दृष्टीने अभ्यास केलेला आहे काय ? ऑस्ट्रेलियन पॅटर्न राबविणारे डॉ. कार हे आपल्याकडे येऊन गेलेले आहेत. या डॉ. कार यांनी आपल्या राज्यातील दुष्काळी भागाचा अभ्यास केलेला आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : महाराष्ट्रातील काही तालुके हे अवर्षणप्रवण आहेत हे खरे आहे. या भागातील अवर्षण कमी करण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलले आहेत. गेल्या वर्षी भीषण दुष्काळी परिस्थितीला आपणास सामोरे जावे लागले. गेल्या वर्षी पर्जन्यमान खूप कमी होते. पर्जन्यमान कमी असलेल्या भागामध्ये अवर्षणग्रस्त परिस्थिती निमार्ण झाली. या भागामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कायमस्वरुपी उपाययययोजना करण्याचा प्रयत्न केन्द्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांनी सातत्याने केला. त्यांनी माननीय पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीमध्ये बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीला केन्द्रीय कृषी मंत्री, वित्त मंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, जल संधारण मंत्री आणि महाराष्ट्र राज्याचा जलसंपदा मंत्री म्हणून मी त्या बैठकीस हजर होतो. या अवर्षणप्रवण भागातील प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्राथमिक प्रस्ताव करण्यात करण्यात आला. माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून निधीची उपलब्धता करताना अशा प्रकारचे प्रस्ताव कसे करता येतील याचे सविस्तर विवेचन केलेले आहे. एकूण 29866 कोटींचा हा प्रस्ताव दिला होता. त्यामध्ये जलसंपदा विभागामार्फत 21225 कोटी रुपयाचे प्रस्ताव दिले होते. सिमेंट नाला बंडीगचे 1150 कोटी रुपयाचे होते प्रस्ताव, शेततळी बांधण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर हाती घेण्यासाठी 2000 कोटी रुपयाचे प्रस्ताव होते. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पाणी खूप वाया जात आहे. त्या संदर्भात ठिबक आणि तुषार सिंचन पध्दती वापरण्यासाठी 4500 कोटी रुपयाचे प्रस्ताव होते. धरणे आणि तलाव जुनी असल्यामुळे ट्रीपल आरसाठी 560 कोटीचे प्रस्ताव दिलेले होते. तसेच दुष्काळी भागातील फळबागा मोठया प्रमाणावर जळाल्या होत्या त्या पुनर्जीवित करण्यासाठी 406 कोटी रुपयाचे प्रस्ताव दिलेले होते. एकूण 29866 कोटीचा प्रस्ताव होता. त्या प्रस्तावाबाबत तपशीलवार चर्चा झाली होती. हा प्रस्ताव केन्द्र सरकारकडून मंजूर करुन घेण्याचे प्रयत्न आदरणीय कृषी मंत्री श्री. शरद पवार करीत आहेत.

डॉ. नीलम गो-हे : या सभागृहामध्ये आपण दुष्काळाबाबत अनेक वर्षे चर्चा करीत आहोत. परंतु शासनाने या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. महाराष्ट्रामध्ये जे दुष्काळग्रस्त तालुके आहेत त्यांच्यासाठी एखादे महामंडळ असावे यासाठी सभागृहामध्ये चर्चा केलेली आहे. हे महामंडळ का स्थापन केले जात नाही ? अशा प्रकारचे महामंडळ शासन करील काय ? पूर्वी सिंचनाचे वेगवेगळे प्रयोग करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता भारतीय विकास लोक कार्यक्रम होता. त्यासंबंधी एक समिती होती आणि ती छोटया छोटया संस्थांना प्रोत्साहन देत होती.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 13:20

ता.प्र.क्र.43064...

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, नंतरच्या काळामध्ये कपार्ट हे केंद्र सरकारशी संबंधित विभागाच्या अखत्यारीत आले. याचे मुख्य कार्यालय अहमदाबाद येथे हलविण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये भारतीय लोक विकास कार्यक्रमाचे पुनरुज्जीवन करणे, दुष्काळग्रस्तांसाठी राज्य स्तरावर महामंडळ निर्माण करणे असे धोरणात्मक निर्णय घेण्याचा सरकार विचार करील काय?

श्री.अजित पवार : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दुष्काळी महामंडळ निर्माण करण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. पीएडीआर आणि कपार्ट संदर्भातही काही सुतोवाच त्यांनी केला. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी सभागृहाला आणि राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, पूर्वीचे डी.पी.ए.पी.मध्ये असणारे तालुके आहेत, त्या तालुक्यांच्या संख्येत नंतर वाढ होत गेलेली आहे. तो प्रश्न वेगळा आहे. परंतु सुरुवातीच्या काळामध्ये डी.पी.ए.पी. मध्ये मोडणाऱ्या तालुक्यांसाठी स्वतंत्र दुष्काळी महामंडळ स्थापन करावे. यासाठी त्यावेळचे तत्कालीन उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील आग्रही होते. या बाबतीत आम्ही सगळे आग्रही होतो. या संदर्भात चर्चा झाल्या नंतर एक गोष्ट लक्षात आली की, दुष्काळी महामंडळ स्थापन केले आणि तेथील काही प्रश्न सोडवावयाचे म्हटले तर त्याला निधी देत असताना अडचणी निर्माण झाल्या असत्या. आपल्याला माहिती आहे की, माननीय राज्यपाल महोदयांना अनुशेष भरुन काढण्यासंबंधीचे अधिकार घटनेने दिलेला आहे. सरकारला वाटले की, दुष्काळी महामंडळाला 1 हजार कोटी रुपये द्यावेत आणि ते पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी खर्च करावेत. मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र त्यांना एक रुपयाचे वाटप सुध्दा माननीय राज्यपाल महोदयांच्या सूचनेनुसारच करावे लागते. पूर्वी असे नव्हते. एखादे महामंडळ स्थापन केल्यानंतर सरकारला आणि सभागृहाला वाटले तर महामंडळाला निधी उपलब्ध करुन दिला जात होता. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ, विदर्भ वैधानिक विकास महामंडळ, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळांच्या बाबतीत मधल्या काळात माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितले की, या महामंडळांना सध्या निधी देणे बंद झालेले आहे. या महामंडळांना निधी उपलब्ध करुन देण्याची सुरुवात कशी करता येईल यादृष्टीने आमचा प्रयत्न चाललेला आहे. ज्या उद्देशाने आम्ही दुष्काळी महामंडळ स्थापन करु इच्छित होतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43064....

श्री.अजित पवार...

तो उद्देश सफल होत नव्हता म्हणून दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याचा विषय थोडा मागे पडलेला आहे ही गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पीएडीआर आणि कपार्ट संदर्भात उल्लेख केला आहे. ही गोष्ट खरी आहे की, यासंबंधीचे एक कार्यालय अहमदाबाद येथे गेले आहे. हा प्रश्न केंद्र सरकारच्या अखत्यारितील आहे. राज्य सरकारच्या काही महत्वाच्या विषया संदर्भात राज्यातील प्रमुख या नात्याने माननीय मुख्यमंत्री महोदय जातात. मला देखील उप मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या समवेत जाण्याची संधी मिळते. या महिन्यात केंद्रात अधिवेशन सुरु होणार असल्यामुळे बहुतेक प्रमुख मान्यवर अधिवेशनासाठी उपस्थित असतात. आदरणीय श्री. शरद पवार साहेब, आदरणीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांची मदत घेऊन आपल्या राज्याच्या भल्याच्या दृष्टीकोनातून किंवा त्या संस्थांच्या मदतीच्या दृष्टीने निर्णय घेता येईल, तशा प्रकारचा प्रयत्न राज्य सरकारकडून केला जाईल.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, अवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये कायमचा दुष्काळ हटविण्यासाठी अनेक उपाययोजनांबाबत सन्माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली. परंतु या बाबतीत पाणलोट क्षेत्र विकासाचा एक शाश्वत असा उपाय आहे. पाणलोट क्षेत्र विकास कामासाठी 90 टक्के अनुदान केंद्र सरकारकडून मिळते आणि 10 टक्के अनुदानामध्ये राज्य शासनाचा वाटा असतो. राज्यामध्ये पाणलोट क्षेत्र विकासाचा धडक कार्यक्रम हाती घेण्याबाबत शासन काही विचार करील काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यात पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम आपण हाती घेत आहोतच. गतीमान पाणलोट क्षेत्र विकास आणि इतर पाणलोट क्षेत्र विकास हे कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्याचे काम सुरु आहे. काही ठिकाणच्या कार्यक्रमासाठी नाबार्ड कडून निधी प्राप्त करुन घेतलेला आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारकडून देखील निधी मिळवून घेतला आहे. पाणलोट क्षेत्र विकासाचे काम राज्यामध्ये सुरु आहे.

डॉ.दीपक सावंत : दुष्काळ निवारण करण्यासाठी आस्ट्रेलियन पॅटर्न राबविण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे काय, तो पॅटर्न राबविला गेला तर या राज्यातील दुष्काळ बऱ्याच मोठया

3...





ता.प्र.क्र.43064....

श्री.दीपक सावंत....

प्रमाणात कमी होईल असे माझे मत आहे. विदर्भातील खारपाणपट्टा व आपदग्रस्त जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्प, प्रकल्प घटक यासाठी प्राथमिक स्वरुपामध्ये 21250 कोटीचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिलेला आहे..

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43064..... डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, विदर्भाव्यतिरिक्त आणखी कोणत्या महसुली विभागामध्ये हा निधी वळविणार आहात काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याबाबत सरकार निश्चितपणे प्रयत्न करेल. एकंदरीत ग्लोबल वॉर्मिंगमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. यावर्षी पाऊस चांगला झाला असल्यामुळे धरणातील पाण्याचा साठा चांगला दिसून येत आहे. काही भागात अतिवृष्टीचा तडाखा बसला आहे. गेल्या वर्षी त्या भागात दुष्काळी परिस्थिती होती. अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन राज्यामध्ये तसा प्रयोग राबविण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे विदर्भातील कार्यक्रम आहे तसे कायम दुष्काळी भागातील प्रकल्प यामध्ये आहेत. त्यामधून गेल्या वर्षी ज्या ज्या ठिकाणी अवर्षणग्रस्त परिस्थिती निर्माण झाली त्या सर्व परिसरातील प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन केले आहे. विदर्भासहित सोलापूर, पुणे, सातारा, सांगली, उस्मानाबाद, बीड, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव अशा महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्हयातील प्रकल्पांचा अंतर्भाव त्यामध्ये आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळ कायमचा संपुष्टात आणण्यासाठी 60 हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला असून हा प्रस्ताव मंजूर झाला तर राज्यातील दुष्काळ कायमचा मिटेल असे मध्यंतरी वाचनात आले होते. त्या प्रस्तावाचे काय झाले? 60 हजार कोटी रुपये केंद्र सरकारकडून उपलब्ध होणार आहेत की राज्य सरकार स्वत: ही रक्कम उभी करणार आहे? एआयबीपी अंतर्गत म्हैसाळ आणि टेंभू योजना पूर्ण होणार आहे. त्या योजनेतून निधी केव्हा उपलब्ध होणार आहे आणि खर्चाला केव्हा सुरुवात होणार आहे?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी मी तपशीलवार माहिती दिली आहे. पंतप्रधान महोदयांकडे जी बैठक झाली त्या बैठकीच्या अनुषंगाने सर्वच प्रस्ताव अंतर्भूत आहेत. 60 हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव असताना 30 हजार कोटी रुपये केंद्र सरकारने द्यावेत आणि 30 हजार कोटी रुपये राज्याने उभे करावेत अशा प्रकारची चर्चा झालेली आहे. त्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव त्यात आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने केंद्रीय पातळीवर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43064..... श्री.सुनील तटकरे.....

माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार स्वत: प्रयत्न करीत आहेत. काही मंजुऱ्या निश्चितपणे मिळविणार आहोत. हा जो प्रस्ताव आहे त्याची सखोलपणे त्या ठिकाणी चर्चा झाली. या संदर्भात पुढचा जो प्रस्ताव पाठवावयाचा आहे त्याचे नियोजन या स्तरावर सुरु आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भंडारा जिल्ह्यात प्रकल्पांतील पाण्याची पातळी कमी होत असल्याबाबत**

**(८) * ४१९६४ श्री.राजेंद्र जैन, श्री.सतीश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात ४ मध्यम प्रकल्प, ३१ लघु प्रकल्प आणि २८ मामा तलाव असे एकुण ६३ प्रकल्प असून या प्रकल्पातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३१ लघु प्रकल्पांपैकी आंबागड, पवनारखारी, परसवाडा, नागठाणा व कुंभली असे ५ प्रकल्प आणि २८ मामा तलावांपैकी चान्ना, एकोडी, सानगडी, केसलवाडा व रेंगेपार कोहली असे ५ प्रकल्प हे एकूण १० प्रकल्प जवळपास कोरडे पडले असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाण्याची पातळी कमी होऊन सिंचनासाठी उपयोगी नसलेल्या अशा तलावांच्या खोलीकरणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता** : (१) नाही
(२) नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

श्री.राजेंद्र जैन : सभापती महोदय, भंडारा जिल्हयातील ४ मध्यम प्रकल्प, ३१ लघु प्रकल्प आणि २८ मामा तलावातील पाण्याची पातळी कमी झाल्याबाबतचा हा प्रश्न आहे. उत्तरामध्ये शासनाने मान्य केलेले नाही. आमच्या भागात एप्रिल-मे महिन्यात जे पाणी उपलब्ध होते त्याची आकडेवारी मी देतो. मध्यम आणि लघु प्रकल्पाची कामे थोड्याफार प्रमाणात प्रलंबित आहेत. राज्य शासनाकडून दीर्घ काळापासून सुधारित प्रशासकीय मान्यता दिली जात नाही. हा प्रश्न केव्हा मार्गी लागणार आहे? मामा तलावांचा स्तर कमी होत आहे. काही तलावांमध्ये उन्हाळ्यात ५ टक्क्यापेक्षा कमी पाणी असते. त्या तलावांच्या दुरुस्तीसाठी आणि खोलीकरणासाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे का? विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे या कामासाठी किती निधी उपलब्ध आहे? सुप्रमाचा विषय प्रलंबित राहिला आहे तो केव्हा निकाली काढण्यात येईल आणि तलावांच्या खोलीकरणासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय?

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४१९६४....

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, भंडारा जिल्हयात २८ राज्यस्तरीय मामा तलाव आहेत. २० मामा तलावांच्या खोलीकरणाचे काम जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागाकडून पूर्ण करण्यात आले. त्यात आंबागड, पवनारखारी, परसवाडा, नागठाणा, कुंभली, चान्ना, एकोंडी, सानगडी, केसलवाडा आदी प्रकल्पांचा समावेश आहे.

नंतर २एम.१...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 41964......

श्री. राजेंद्र मुळक ....

तसेच केसलवाडा तलावाच्या खोलीकरणाचे काम 2013 मध्ये प्रस्तावित असून ते काम आता पूर्ण करण्यात येणार आहे. दुरुस्तीच्या कामांना विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रशासकीय मान्यतेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली असून दुरुस्तीची कामे सन 2013-2014 च्या हंगामात घेतले जाणार आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जागतिक स्पर्धामध्ये पहिल्या तीन क्रमांकामध्ये स्थान मिळालेल्या खेळाडूला नोकरीत प्रथम श्रेणीची बढती देण्याबाबत**

**(९) * ४३२५६ श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय, आशियाई, जागतिक स्तरावर नेत्रदीपक कामगिरी केल्यावर खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य सरकारकडून खेळाडूंना रोख पारितोषिके आणि शासकीय प्रथम श्रेणीची नोकरी देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शरीरसौष्ठवपटू सुहास खामकर यांनी जागतिक स्पर्धेमध्ये पहिल्या तीन क्रमांकांमध्ये स्थान मिळवूनही त्यांना महसूल खात्यामध्ये द्वितीय श्रेणीची नोकरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या कारभाराचा फटका खेळाडूंना बसून त्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शरीरसौष्ठवपटू सुहास खामकर यांना प्रथम श्रेणीची बढती देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पद्‌माकर वळवी** : (१) अधिकृत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये उज्वल कामगिरी केलेल्या खेळाडूंना राज्य शासनाकडून रोख पारितोषिक तसेच त्यांच्या कामगिरीनुसार शासन सेवेत नियुक्ती देण्यात येते.

(२) व (३) नाही. श्री.सुहास खामकर यांनी दिनांक १७ ते २० ऑक्टोबर, २०१० या कालावधीत मनामा-बहरीन येथे झालेल्या ४४ व्या एशियन गेम्स बॉडीबिल्डींग चॅम्पियनशीप स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला असून ही स्पर्धा गट-ब मधील थेट नियुक्तीसाठी पात्र असल्यामुळे त्युांना गट ब नायब तहसीलदार या पदावर थेट नियुक्ती देण्यात आलेली आहे.

(४) व (५) श्री.सुहास खामकर यांची गट-अ मधील पदावर नियुक्ती देण्याची मागणी तपासण्यात येत आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, क्रीडा प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करण्याची संधी कमी वेळा मिळत असते परंतु आज मला क्रीडा प्रश्नाचा विषय उपस्थित करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. उत्तरामध्ये म्हटले आहे की, "गट-ब मध्ये नियुक्तीस पात्र असल्यामुळे त्यांना गट ब मधील नायब तहसीलदार या पदावर थेट नियुक्ती देण्यात आलेली आहे". जागतीक स्पर्धेमध्ये त्यांनी स्थान मिळवले आहे. त्यामुळे तांत्रिक बाबीमध्ये न अडता विशेष बाब म्हणून त्यांना गट-अ मध्ये स्थान दिले जाणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, छोटे राज्य खेळासाठी मोठया प्रमाणात वाव देत असते. पंजाब आणि हरियाणा सारखे जे छोटे राज्य आहेत ते क्रीडाला फार महत्व देतात. आपले माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री क्रीडा प्रेमी आहेत. क्रीडा क्षेत्राला जास्त प्रोत्साहन देण्यासाठी शासन ठोस पाऊल उचलणार आहे काय ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 43256......

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, श्री.सुभाष खामकर यांच्याविषयी हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विचारलेला आहे. श्री. सुभाष खामकर यांनी सन 2010 मध्ये कामगिरी केली होती त्या अनुषंगाने त्यांना गट-ब मध्ये नायब तहसीलदार पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यांना गट-अ मध्ये नियुक्ती देण्याचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. परंतु गट-अ मध्ये नियुक्ती देण्याचा निर्णय हा धोरणात्मक निर्णय असून हा निर्णय शासनामार्फत घ्यावा लागणार आहे. यासंदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, इतर राज्यांमध्ये खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाते तसेच त्या ठिकाणी वर्ग 1 व वर्ग 2 ची नोकरी दिली जाते, अशी त्यांनी माहिती दिली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, इतर राज्याप्रमाणे आपल्या राज्याचेही धोरण आहे. आतापर्यंत आपण वर्ग 1 मध्ये 9 खेळाडूंना नियुक्ती दिली असून वर्ग-2 मध्ये 4 खेळाडूंना नियुक्ती दिली आहे. राज्य शासनाने क्रीडा धोरणातच खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे धोरण घेतलेले आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांना जे अपेक्षित आहे त्या प्रमाणे क्रीडा धोरणात शासन तशा प्रकारचे धोरण निश्चितपणे घेईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. चंद्रकांत पाटील :सभापती महोदय, कोल्हापूर तसेच संपूर्ण देशाचे नाव जागतिक स्तरावर नेणाऱ्या तसेच नुकतेच विश्वचषक जिंकलेल्या राही सरनोबतच्या नोकरीचा विषय सुध्दा बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहे. राही सरनोबत यांना शासनामध्ये गट-अ मध्ये नोकरी दिली जाणार आहे काय, तसेच ती केव्हा दिली जाणार आहे ? 3 वर्षापूर्वी विश्वविजेती झाल्यानंतर तेजस्वींनी सावंतला प्रमोशन दिले जाईल अशी घोषणा होऊन 3 वर्षे झाली आहेत. त्यामुळे यामध्ये नेमकी काय अडचण आहे? कोल्हापुर येथे समुद्र किनारा नसतांना तारामती मतेवडे समुद्राच्या नोकास्पर्धेत आशियामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. तारामतीला 25 लाखाची बोट दिली जाईल अशी दोन वर्षापूर्वी घोषणा करण्यात आली होती त्यामुळे 25 लाखाची बोट कधी पर्यंत दिली जाणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 43256......

श्री. पद्माकर वळवी :सभापती महोदय, शुटींगच्या जागतिक स्पर्धेमध्ये राही सरनोबत यांनी चांगली कामगिरी केल्याबद्दल शासनाने एक कोटी रुपये देऊन त्यांचा गौरव केलेला आहे. राही सरनोबत यांना शासनाच्या सेवेत वर्ग-अ मध्ये घेण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. राही सरनोबत यांना वर्ग-अ मध्ये नियुक्ती देण्याची प्रोसेस पूर्ण झालेली असून फक्त आदेश देण्याचे काम बाकी आहे.

सभापती महोदय, तेजस्वीनी सावंतच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. तेजस्वीनी सावंत ऑलरेडी ओएसडी या पदावर बालेवाडी क्रीडा संकुलात कार्यरत आहेत. तेजस्वीनी सावंत यांचा राज्य शासनाने सन्मान केलेलाच आहे.

सभापती महोदय, याटींग खेळामध्ये तारामती यांनी फार चांगल्या प्रकारे कामगिरी केलेली आहे. तारामतीसाठी याटींग खेळासाठी बोटींची मागणी केली आहे. खेळाची सामुग्री खरेदी करुन देणे, अनुदान उपलब्ध करुन देणे हे शासनाचे धोरण असल्यामुळे यासंदर्भात शासन निश्चितपणे धोरणात्मक निर्णय घेईल व यासंदर्भात माझे पॉझिटीव्ह मत व्यक्त करतो एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43256...

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, क्रीडा विभागाला खिलाडूवृत्तीचे मंत्री लाभले आहेत. ते क्रीडा प्रेमी आहेत. त्यामुळेच त्यांना काँग्रेस पक्षाने न्याय दिलेला आहे. राज्यातील खेळाडूंना न्याय देण्याचा ते प्रामाणिकपणे प्रयत्न करतात. श्रीमती राही सरनोबत आणि खामकर या दोन खेळाडूंना गट-3 मध्ये नियुक्ती देण्याचे शासनाचे धोरण आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. सदर काम लवकर व्हावे म्हणून आम्ही प्रश्न उपस्थित करीत असतो. यासंबंधी माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, निर्णय झाला असेल तर माननीय मंत्र्यांनी आज ऑर्डर घेऊन यायला पाहिजे होती. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. तत्पूर्वी श्रीमती राही सरनोबत यांच्या नियुक्तीचा आदेश शासन काढणार आहे काय, तसेच श्रीमती खामकार यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासंबंधीचा निर्णय एका आठवड्यात घेण्यात येणार आहे काय ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, श्रीमती राही सरनोबत यांच्या संबंधी शासनाने निर्णय घेतलेला असून तो लवकरात लवकर अंमलात आणला जाईल. श्रीमती सुहास खामकर यांची गट-ब मधील पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना गट-अ पदावर नियुक्ती देण्यासंबंधी नवीन धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यास थोडासा विलंब होईल. तथापि, त्याचा देखील आम्ही विचार करू.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांचे मी स्वागत करतो आणि त्यांच्या प्रती आभार व्यक्त करतो. कबड्डीसाठी एक कोटी रूपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्यानुसार त्याचे वितरण झालेले आहे. महाराष्ट्रामध्ये तीन सुवर्णकन्या आहेत. त्यांनी विश्वचषक स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. त्यात श्रीमती सुवर्णा बारटक्के, पुण्याची जोसेफ, नवी मुंबईची श्रीमती अभिलाषा म्हात्रे होती. त्यापैकी श्रीमती जोसेफ या खेळाडूची गट-अ या पदावर नियमानुसार नियुक्ती झाली आहे. या दोघींना नियुक्ती मिळावी म्हणून मागच्या अधिवेशनामध्ये आम्ही प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी शासनातर्फे सांगण्यात आले होते की, त्यांची नियुक्ती लवकरात लवकर करण्यात येईल. तेव्हा श्रीमती सुवर्णा बारटक्के आणि श्रीमती अभिलाषा म्हात्रे यांना तात्काळ नियुक्ती देण्यात येणार आहे काय किंवा त्यांची नियुक्ती किती कालावधीत करण्यात येणार आहे ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43256...

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, श्रीमती दीपिका जोसेफ यांची नवी मुंबई महानगर पालिकेमध्ये नियुक्ती झालेली आहे. श्रीमती बारटक्के आणि श्रीमती म्हात्रे या दोन्ही कबड्डीच्या खेळाडू आहेत. त्यांना नियुक्ती देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. यास विलंब लागण्याचे कारण असे आहे की, खेळाडुंनी क्रीडा विभागामध्ये नियुक्ती देण्याची मागणी केली तर ती लवकर होते. अन्य विभागामध्ये मागणी केली तर त्या विभागाची सहमती घ्यावी लागते. त्या प्रोसेसला विलंब लागतो. तरी देखील ही प्रोसेस लवकरात लवकर केली जाईल व त्यांना नियुक्ती देण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, श्रीमती सुवर्णा बारटक्के यांची डीएसओ म्हणून नियुक्ती करण्यात येईल असे आपण स्वत: सांगितले होते. त्यास त्यांनी होकार दिलेला आहे. तेव्हा श्रीमती सुवर्णा बारटक्के यांना डीएसओ म्हणून नियुक्ती देण्यामध्ये कोणती अडचण आहे ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, संबंधित खेळाडूंनी संमती दिली की, मला या विभागामध्ये हजर व्हावयाचे आहे तर मग त्यांच्या सूचनेचा विचार केला जातो. श्रीमती बारटक्के यांनी संमती दिली असेल तर त्यांची निश्चितपणाने ताबडतोब नियुक्ती केली जाईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्यासंबंधी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आघाडी सरकारने जास्तीत जास्त खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून धोरण अवलंबिले आहे. श्री.विलासराव देशमुख हे राज्याचे प्रमुख असताना त्यांनी अंतिम मान्यता दिलेली आहे. मी एक गोष्ट बघितली आहे की, क्लास-1 अधिकारी बनविले पाहिजे ही मागणी करण्यात येते ती मला मान्य आहे. खेळाडूंचे क्वालिफिकेशन लक्षात घेता त्यांना आम्हाला सेल्स टॅक्समध्ये घेता येत नाही. पण त्यांचा आग्रह असतो की, आम्हाला सेल्स टॅक्स विभागच पाहिजे. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे काही खेळाडूंना बोलावून सांगितले होते की, राज्य सरकार आपल्याकरिता एवढे रेड कार्पेट टाकत आहेत. आपण जगाच्या पातळीवर देशाचे,राज्याचे नाव उज्ज्वल करण्याचा प्रयत्न केला आहे. देशासाठी गोल्ड मेडल मिळविले आहे. आपण त्यांना थेट क्लास-1 ची नोकरी देतो. ते आर्टस, कॉमर्स, सायन्सचे पदवीधर असतील आणि त्यानुसार त्यांनी क्लास-1ची नोकरी मागितली तरी ती देण्यास आमची तयारी आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43256...

श्री.अजित पवार...

परंतु पदवीधर नसतील तर ती खरी अडचण आहे. खेळाडुंचा अवमान करण्याचा आमची अजिबात इच्छा नाही. आता देखील काही खेळाडू अशाप्रकारच्या नोकऱ्या मागत आहेत. खेळाडुंच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे. खेळाडुने कोणत्या विभागामध्ये शिक्षण घेतले आहे त्याचा विचार करुन त्यांना कोणत्या विभागामध्ये तात्काळ नोकरी देता येईल यादृष्टीने सरकारकडून प्रयत्न करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सांगितले की, या मध्ये काही तांत्रिक बाबी आहेत. या ठिकाणी सांगू इच्छितो की, तेजस्विनी सावंत आणि राही सरनोबत यांच्या संदर्भात येथे आश्वासन देण्यात आले होते. तेजस्विनी सावंत हिला ज्या पदावर नियुक्ती दिली आहे त्या पदावर तिला पुढे कोणतीही पदोन्नती मिळू शकत नाही. तिची तेथून बदली करण्यात येईल असे सांगण्यात आले, परंतु मागील तीन वर्षापासून काहीही कार्यवाही झालेली नाही. सभागृहामध्ये दोनवेळा हा विषय चर्चेला आला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांना डेप्युटी डायरेक्टरकडे शिफ्ट करण्यात येईल. असे असताना हे काम कुठे अडले आहे ? सभागृहामध्ये आश्वासन दिल्यानंतरही त्याची पूर्तता होत नसेल तर ते योग्य नाही. खेळाडुंच्या संदर्भात काही तांत्रिक अडचणी असतील तर तसे स्पष्ट केले पाहिजे. जर ते खेळाडू क्वालिफिकेशनमध्ये बसत असतील तर सभागृहात सांगितल्याप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे. असे असताना सहा-सहा महिने कार्यवाही होत नसेल तर सरकारला खेळांडुबद्दल काही आस्था नाही असे वाटेल आणि तसे होऊ नये म्हणून सभागृहात घोषणा केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तेजस्विनी सावंत आणि राही सरनोबत यांच्या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली आहे. सरकारने देखील सकारात्मक उत्तर दिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात कार्यवाही झालेली नाही. आता देखील तसेच सांगण्यात आले आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या संदर्भात शासन कोणत्या तारखेपर्यंत निर्णय घेणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43256...

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ऑगस्ट महिना सुरु आहे. 31 ऑगस्टच्या आत माझ्या स्तरावर क्रीडा मंत्री, मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव यांची एकत्रित बैठक घेऊन नेमक्या काय अडचणी आहेत याची माहिती घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या दोन खेळाडुंचा उल्लेख केलेला आहे त्या संदर्भात "येस" किंवा "नो" असा अंतिम निर्णय घेण्यात येईल.

**सभापती** : आपण क्रीडा क्षेत्राच्या अनुषंगाने येथे चर्चा केली. आपले खेळाडू देशपातळीवर पहिले कसे येतील या उद्देशाने आपण येथे अनेक उपक्रमांची चर्चा केली. क्रीडा विभागाचे मंत्री त्यामध्ये चांगले लक्ष घालत आहेत. परवा मी त्यांच्या एका मिटींग गेलो होतो त्यावेळी ही बाब माझ्या लक्षात आली. ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत आणि त्याकरिता माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री त्यांना संपूर्णपणे सहकार्य करीत आहेत.

आपण मागील तीन-चार वर्षापासून खेळाडुंना प्रोत्साहन देत आहोत. परंतु हरियाणा, पंजाब, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांमध्ये खेळांडुकरिता कोणत्या प्रकारच्या सुविधा दिल्या जातात याची आपण माहिती घ्यावी.

मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, एका खेळाडुची तहसीलदार म्हणून नियुक्ती केलेली आहे. जर त्याला ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये भाग घ्यायचा असेल तर त्याला सरावाकरिता इथे किंवा परदेशात किमान दोन-तीन महिन्यांचा कालखंड मिळाला पाहिजे.

आपण पदक मिळविलेल्या खेळाडुंचा सन्मान केलेला आहे. या अनुषंगाने आपण त्यांना वर्ग-1 पदावर सामावून घेतले आहे. त्याकरिता महाराष्ट्रातील सर्व लोक व सन्माननीय सदस्य धन्यवाद देतील. परंतु त्या खेळाडूने आलिम्पिक स्पर्धेत पदक मिळवावे अशी आपली अपेक्षा असेल तर त्या खेळाडुंना खेळाकडे लक्ष देता यावे करिता कामामध्ये मोकळीक दिली पाहिजे. रेल्वेमध्ये खेळाडुंना दोन-तीन वर्षाकरिता कामामध्ये मोकळीक दिली जाते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43256....

**सभापती**.....

इंडियन एयर लाईन्स किंवा अन्य असे अनेक विभाग आहेत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांनी या बाबत विचार केला पाहिजे. कारण राज्यातून जागतिक खेळाडू तयार करीत असताना त्यांना देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भाग घेण्यासाठी किंबहुना सरावासाळी वेळ मिळाला पाहिजे, अशी माझी सूचना आहे.

मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, खाशाबा जाधव यांनी हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये पदक मिळविण्याची कामगिरी केली होती. ते तिसऱ्या क्रमांकावर आले होते. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुले यांना मी आमदार असताना विनंती केली होती की, खाशाबा जाधव हे सध्या पोलीस इन्स्पेक्टर म्हणून काम करीत आहेत. ते एक महिन्यानंतर निवृत्त होणार आहेत. त्यांनी हेलसिंकी येथील स्पर्धेत पदक मिळवून देशाची मान उंचावली आहे. त्यांना ऑनररी एक महिन्यासाठी डेप्युटी कमिशनर करु या. एकप्रकारे ही रँक लावून त्यांचा सत्कार करु या. परंतु मी त्यावेळी केलेले माझे प्रयत्न थिटे पडले. आपल्यासारखी मंडळी असती तर माझे ते प्रयत्न पूर्ण झाले असते. माझी त्या वेळी जी व्यथा होती ती आजही आहे. माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांची खेळाडूंकडे बघण्याची दृष्टी निकोप आहे. त्यामुळे या सर्व बाबतीत सुधारणा होणे आवश्यक असून, त्या बाबत कार्यवाही केली पाहिजे.

तसेच दुसरी बाब अशी की, मिल्खा सिंग हे जागतिक ऑलिम्पिकमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आले. त्यांनी जागतिक रेकॉर्ड केला. मिल्खा सिंग हे लष्करामध्ये कूक पदावर काम करीत होते. एकप्रकारे ते कमी दर्जाच्या नोकरीवर होते. पदक मिळाल्यानंतर मिल्खा सिंग तत्कालीन मुख्यमंत्री श्री.प्रतापसिंह कैंरो यांना भेटायला गेले. त्यावेळी पंजाबच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मिल्खा सिंगला विचारले की, मी तुमच्यासाठी काय करु ? मिल्खा सिंगने त्यावर एवढेच सांगितले की, मला कारकून बनवा. सांगण्यामागील उद्देश एवढाच की, मिल्खा सिंगला भीती होती की, मी कूक आहे. त्यामुळे मागून मागून काय मागणार ? परंतु तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मिल्खा सिंगला सांगितले की, आपण एवढे मोठे काम केले. त्यामुळे मी तुम्हाला स्पोर्ट विभागाचा डायरेक्टर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43256....

**सभापती**....

करतो. माझी माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांकडून हीच अपेक्षा आहे की, आपल्या प्रयत्नांतून महाराष्ट्रात वाघ तयार झाले पाहिजेत.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----------

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना पी.एचडी. प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन**

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी "मॅनेजमेंट ऑफ हौसिंग पॉलिसी इन मुंबई" या विषयी सादर केलेला प्रबंध मुंबई विद्यापीठाने स्वीकृत करुन त्यांना पी.एचडी पदवी प्रदान केली आहे. या निमित्त सभागृहाने त्यांचे अभिनंदन करावे, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : सभागृहाच्या वतीने सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी</u>

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री विनोद तावडे, रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, डॉ.दीपक सावंत, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड.अनिल परब, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.विनायक राऊत, ॲड.आशिष शेलार यांनी "राज्यातील डान्स बार बंदी उठविण्याचा निर्णय दिनांक 16 जुलै, 2013 रोजी लागूनही अद्यापही फेर याचिकेच्या संदर्भात सरकारकडून माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये कोणतीही कार्यवाही न करणे, दिनांक 31 जुलै, 2013 रोजी लोणावळ्या जवळील पवनानगर विभागात असणाऱ्या आपटी गेव्हेंडे येथील एका बंगल्यात पहाटेच्या सुमारास पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात दारु आणि अंमली पदार्थाच्या नशेत असलेल्या 12 बारबाला आणि 35 तरुणांना जेरबंद करण्यात येणे" या विषयावर नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी या विषयी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, काल रात्री पुणे जिल्ह्यातील लोणावळा जवळ असलेल्या पवनानगर विभागातील आपटी गेव्हेंडे भागात रेव्ह पार्टी सुरु असल्याची शंका आल्यामुळे पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. त्या पार्टीमध्ये जे लोक सापडले त्यामध्ये 35 तरुण आणि 12 बारबालांचा समोवश होता. मुंबईतील आणि महाराष्ट्रातील डान्सबार बंदीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. त्या बाबत पुढचे पाऊल काय उचलावे या बाबत विधिमंडळ आणि सरकारचा निर्णय अपेक्षित आहे. अधिवेशनाचा उद्या शेवटचा दिवस आहे.

महोदय, डान्सबार पुन्हा सुरु होणार असल्यामुळे पश्चिम बंगाल आणि बांगलादेश मधून दोन ते अडीच लाख अल्पवयीन मुली मुंबई, पुणे, ठाणे, नागपूरमध्ये येण्याची शक्यता आहे. मी नियम 289 अन्वये सूचना यासाठी दिली की, डान्सबारमुळे अनेक संसार देशोधडीला लागले आहेत. दिनांक 25 जुलै, 2013 रोजी आम्ही सर्वपक्षीय महिला आमदारांनी माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि गृह मंत्र्यांची भेट घेतली. डान्सबार आणि पुणे जिल्ह्यात होणाऱ्या रेव्ह पार्ट्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार आहे, या बाबतची माहिती सरकारने द्यावी आणि या विषयावर चर्चा होऊन योग्य तो निर्णय घ्यावा.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये उपस्थित केलेल्या विषयाबाबत आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या बाबीसंदर्भातील प्रस्ताव समाविष्ट नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेस मी अनुमती नाकारतो. परंतु या विषयी शासनाने उद्यापर्यंत निवेदन करावे.

श्री.शिवाजीराव मोघे : होय.

---------

नंतर श्री.बरवड....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक ( नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत" या विषयावरील श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स. यांच्या दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 34699 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक ( नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत" या विषयावरील श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स. यांच्या दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 34699 च्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. राणा जगजितसिंह पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. डी.पी.सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील मागासवर्गीय रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत" या विषयावरील श्री. विनोद तावडे, वि.प.स. सर्वश्री संजय केळकर, सय्यद पाशा पटेल व केशवराव मानकर, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 15 डिसेंबर, 2010 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 9282 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र गावित ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील सर्व क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री किरण पावसकर, दीपकराव साळुंखे, अनिल भोसले, नरेंद्र पाटील, संदिप बाजोरिया, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सतीश चव्हाण, रमेश शेंडगे, डॉ. दीपक सावंत, श्री. विनायक राऊत, वि. प. स. यांच्या दिनांक 15 जुलै, 2013 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 42271 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

"महाराष्ट्र मोटार वाहन (दुसरी सुधारणा) नियम, 2013 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर 0110/प्र.क्र.114/पु.बां.क्र. 29/परि-2, दिनांकित 9 मे, 2013"

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

श्री. सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2010-2011 या वर्षाचा सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन 2006-2007, 2007-2008 व 2008-2009 या वर्षाचे वार्षिक अहवाल व सदर अहवालातील आयोगाचा सल्ला डावलल्याप्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागांची आयोगाचा सल्ला न स्वीकारण्याबाबतची कारणमिमांसा दर्शविणारी स्पष्टीकरणात्मक निवेदने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल व स्पष्टीकरणात्मक निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

---

श्री. सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री.बरवड 13:55

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "कोकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 या वर्षाचा पस्तिसावा वार्षिक अहवाल व लेखे" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री.रणजित कांबळे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2006-2007, 2007-2008 व 2008-2009 या वर्षांचा अनुक्रमे बत्तिसावा, तेहतिसावा व चौतिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2010-2011 या वर्षाचा अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूरच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन 2009-2010 या वर्षाचा अलग लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विद्यापीठ, मुंबई यांचे सन 2010-2011 या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

प्रा.फौजिया खान (महिला व बाल विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.मधुकर चव्हाण (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004, 2004-2005, 2005-2006 व 2006-2007 या वर्षांचा अनुक्रमे बत्तिसावा, तेहतिसावा, चौतिसावा व पस्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता सन 2003-04 चा अहवाल सादर केलेला आहे. 10 वर्षानंतर हा अहवाल सभागृहाला सादर केला जात आहे. ही कोणती पध्दत आहे ?

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, ऑडिट झाल्यानंतर किंवा ते आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर अहवाल किमान दुसऱ्या वर्षात तरी सादर झाले पाहिजेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या पुढील काळात याबाबत काळजी घेतली जाईल.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यानंतर सन 2010-2011 या सालातील अहवाल सादर होत आहेत. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. पर्यटन व पशुसंवर्धन विभागाची महामंडळे आहेत त्यांना आपण यासंबंधी पुन्हा एकदा निर्देश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

-----

3....



NTK/ MMP/ D/ KTG/ D/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4....

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.पांडुरंग फुंडकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 14:00

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री. अमरसिंह पंडित (समिती सदस्य) : मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा एकतिसावा व बत्तिसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : अंदाज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री. रमेश शेंडगे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा (सन 2012-2013) सातवा अहवाल सादर करतो.

सभापती महोदय, हा अहवाल सादर करीत असताना या अहवालातील एक महत्वाची शिफारस मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अधिकारी/कर्मचा-याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्या नंतर जात पडताळणी समितीच्या निर्णयाला उच्च न्यायालया व्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात दाद मागता येत नाही. परंतु जात पडताळणी समितीच्या निर्णयाला स्थगनादेश देण्याची बाब कामगार न्यायालयाच्या कक्षेत येत नसताना देखील कामगार न्यायालय स्थगनादेश देत असल्यामुळे राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशा व्यतिरिक्त अन्य न्यायालयांनी दिलेला आदेश ग्राह्य धरु नये असे सामान्य प्रशासन विभागामार्फत, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महामंडळे इत्यादी कार्यरत असलेल्या शासकीय यंत्रणांच्या अधिका-यांना परिपत्रक/शासन निर्णयाव्दारे अवगत करावे अशी मी शिफारस करतो.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 14:00

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाला सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा सव्विसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा सव्विसावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

**---**

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: उपविधान समितीचा अहवाल सादर करणे

ॲड. जयदेव गायकवाड (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : उपविधान समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री. मोहन जोशी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, विधानपरिषद आश्वासन समितीचा सन 2012च्या पहिल्या सत्रातील आश्वासनांचा 178 वा कारवाई दर्शक अहवाल आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करीत आहे.

आश्वासन समितीचा प्रमुख म्हणून मला या ठिकाणी नमूद करण्यास आनंद वाटतो की, मागील 17-18 वर्षातील प्रलंबित आश्वासनांचा समितीने तिच्या कार्यकाळात पाठपुरावा करुन आश्वासनांचा मागील अनुशेष भरुन काढण्यात समितीला यश आलेले आहे. विद्यमान सत्रात या सभागृहात पूर्तता झालेल्या एकूण 1238 आश्वासनांच्या विवरणपत्राची यादी माननीय संसदीय कार्यमंत्री महोदयाकडून सादर करण्यात आली हे या समितीचे यश आहे. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या माध्यमातून प्रलंबित आश्वासनांचा समितीने पाठपुरावा केल्यामुळे मागील अनुशेष भरुन काढण्यात समितीला यश आले असून त्या योगे 17 विभागांची सन 2000 पर्यंतची आणि 4 विभागांची सन 2012 पर्यंतची आश्वासने झिरो पेण्डन्सीवर आणण्यात समितीला यश आलेले आहे. वर्षभरात समितीने केलेल्या कार्यक्षम व गतिमान कार्याची ही पावती आहे. अशा प्रकारे प्रशासन व कार्यकारी संस्थेच्या सहकार्यातून यापुढील काळात अल्पावधीतच सर्व मंत्रालयीन विभागाच्या प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करुन सर्वच विभागाकडील प्रलंबित आश्वासनांची सूची अद्यावत करण्यात समितीला यश मिळेल अशी मी आशा करतो. धन्यवाद.

--

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर

करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 2 ऑगस्ट 2013 रोजी कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय कामकाजाच्या संदर्भात गुरुवार, दिनांक 1 ऑगस्ट 2013 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे.त्यानुसार खालील प्रमाणे अशासकीय ठरावांना वेळ देण्यात यावी अशी शिफारस समितीने केली आहे.

गतसत्रातील प्रलंबित अशासकीय ठराव.

श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 67 - 50 मिनिटा पेक्षा जास्त नाही.

डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 114 - 50 मिनिटापेक्षा जास्त नाही.

श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 137 - 50 मिनिटापेक्षा जास्त नाही.

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. विनोद तावडे : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल या ठिकाणी संमत केला जातो. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांचा महत्वाचा ठराव आहे. परंतु तो महिनोनमहिने पुढे जात आहे. मी राईट टू एज्युकेशनच्या संदर्भात अशासकीय ठराव दिलेला होता. परंतु तो देऊन अडीच तीन वर्षे झाल्यामुळे त्याचे संदर्भ देखील बदलायला लागले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 14:05

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, उद्या अशासकीय ठरावांचा दिवस आहे. मी सरोगसी मातासंबंधी एक अशासकीय विधेयक दिलेले आहे. तो विषय अतिशय महत्वाचा आहे. शाहरुख खान प्रकरणापासून सरोगसी बाबत कॅम्पेन झाला आहे. या विषयाच्या बाबतीत तातडीने कायदा  करण्यात येणे अत्यावश्यक आहे. उद्या अशासकीय ठरावाचा दिवस असला तरी सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांचा एक अशासकीय ठराव घ्यावा आणि माझे हे अशासकीय विधेयक घेण्यात यावे अशा पध्दतीचे कामकाज उद्याच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये दाखवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. नंतर बघू.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचा मुद्दा

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल माननीय श्री.हेमंत टकले यांनी चिराग नगर येथे अण्णाभाऊ साठे यांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे असा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी जी मागणी केली आहे, त्या मागणीस माझा पाठिंबा आहे. आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती आहे. वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानामध्ये अनेक वर्षापासून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाटयगृह होते. ते नाट्यगृह आता बंद आहे. या अनुषंगाने मी औचित्याचा मुद्दा आपल्या अनुमतीने उपस्थित करीत आहे.

"सभापती महोदय, मुंबईतील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानातील नियोजित अण्णाभाऊ साठे नाटयगृहाचे बांधकाम 1 ऑक्टोबरपासून सुरु करावे अशी मागणी स्थायी समिती अध्यक्ष यांनी आयुक्तांकडे करणे, सदर नाटयगृह पुन्हा सुरु करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री यांच्या समवेत 31 जुलै रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात येणे तसेच नाट्यगृहाच्या नवनिर्मितीसाठी राज्य शासनाकडून निम्मा निधी देण्यात यावा परंतु अद्यापि निधी प्राप्त न होणे, ऑगस्ट 2012 रोजी तत्कालीन आयुक्तांनी नाट्यगृहासाठी नव्याने आराखडे आणि अंदाजपत्रक तयार करण्याची मंजुरी प्रदान करणे, त्यानुसार 780 आसनव्यवस्था असलेले आराखडे आणि 10.80 कोटी रुपयांचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर करुन त्याबाबतचा आराखडा आणि प्राथमिक अंदाजपत्रकांची छाननी करुन प्रशासकीय मान्यता घेवून नव्याने मुंबई संस्कृती वारसा जतन समितीच्या मान्यतेसाठी पाठविणे तसेच प्रशासकीय मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणे, सदर सर्व प्रक्रिया लक्षात घेता 1 ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त नाट्यगृहाचे बांधकाम 1 ऑक्टोबरपासून सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका या करिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. हेमंत टकले ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव प्रस्तुत करतो की,

"विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तींमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(१) सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री.निखिल वागळे, संपादक, आय.बी.एन. लोकमत व श्री.राजीव खांडेकर, संपादक, ए.बी.पी. माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम १७८ (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

यानंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधानसभेत पोलीस निरीक्षकाला झालेल्या मारहाण प्रकरणावरुन विधानसभेतील माननीय सदस्यांचे निलंबन करण्यात आले होते, ते निलंबन मागे घेतल्यामुळे प्रकरण मिटले आहे. त्यामुळे सर्वश्री निखिल वागळे आणि राजीव खांडेकर यांच्याविरुध्दचे विशेषाधिकार भंगाचे प्रकरण थांबविण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी दरवर्षी शासनातर्फे मंत्रालयात आणि विधानभवनामध्ये व राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये साजरी करण्यात येते. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत सर्व संबंधितांना पत्रक पाठविण्यात येत असते. यावर्षी सामान्य प्रशासन विभागाने जे पत्रक काढले आहे त्याचा क्र.जपुति/2212/प्र.क्र.331, दिनांक 21 जानेवारी, 2013 असा आहे. राष्ट्रपुरुषांची जयंती साजरी करण्याबाबत जी यादी तयार केली जाते त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव नाही. ऑगस्ट महिन्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात येत असते. त्यांचे नाव या यादीमध्ये नसल्यामुळे महिला वर्ग, धनगर समाजाची मंडळी यांच्यात असंतोषाची भावना आहे. आदरणीय श्री.शरद पवार साहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मंत्रालयामध्ये आणि विधानभवनामध्ये पुण्यतिथी साजरी करण्याची ही प्रथा सुरु केलेली आहे. त्यामुळे आपण शासनाला निर्देश द्यावेत की, ज्याप्रमाणे प्रत्येक वर्षी पुण्यतिथी साजरी केली जाते त्याप्रमाणे यावर्षी सुध्दा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना शासनाने विचारात घ्यावी.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.: राज्यात पडलेला ओला व कोरडा दुष्काळ

**मु.शी**.: राज्यात पडलेला ओला व कोरडा दुष्काळ या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम जयंत प्र.पाटील, सुमंतराव गायकवाड,चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस,डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजीत पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार,भगवान साळुंखे, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु....

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, विदर्भामध्ये आणि महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये झालेली अतिवृष्टी, आलेला महापूर याबद्दल सभागृहामध्ये काल विस्तृत चर्चा झालेली आहे. एकूण 14 सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला आणि चर्चेला सुरुवात माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी केली होती.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने अतिशय चांगल्या सूचना करण्यात आल्या आहेत, काही स्थानिक परिस्थितीची माहिती सभागृहाला दिलेली आहे. त्या सर्व सूचना ऐकल्यानंतर त्यांची नोंद घेण्यात आली. त्यापूर्वी म्हणजे गेल्या आठवड्यात मी, उप मुख्यमंत्री, मदत कार्य व पुनर्वसन मंत्री मिळून अमरावती विभागातील एका जिल्हयाचा आणि नागपूर विभागातील एका जिल्हयाचा दौरा केला. तेथील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर नागपूरला जाऊन आम्ही सर्व अधिकाऱ्यांशी, लोकप्रतिनिधींशी चर्चा केली.

सभापती महोदय, महाराष्ट्र एक मोठे राज्य आहे. येथील नैसर्गिक विविधता, भौगोलिक विविधता अतिशय सुस्पष्ट आहे. एका बाजूला राज्याच्या पश्चिम भागामध्ये जरी चांगला पाऊस पडला असला तरी काही भागातून आजही टँकरची मागणी यावयास लागली आहे. सुदैवाने प्रत्येक जिल्हयांमध्ये आजच्या तारखेपर्यंत पडणारा पाऊस सरासरी 100 टक्क्यापेक्षा जास्त आहे, काही ठिकाणी 200 टक्क्यापेक्षा जास्त पाऊस झालेला आहे. धरणातील पाण्याची स्थिती चांगली आहे. काही अपवाद सोडले तर सर्वच ठिकाणी मागील वर्षापेक्षा खूपच चांगला पाणीसाठा झालेला आहे.

नंतर 2व्ही.1..

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

परंतु त्याच बरोबर, राज्याच्या एका बाजूला दुष्काळ तर राज्याच्या पूर्वेला विदर्भामध्ये अतिवृष्टीची परिस्थिती, महापुराची परिस्थिती अशा दोन वेगवेगळया परिस्थिती आपल्या राज्यात होतात हे राज्याच्या भौगोलिक विविधतेचेच द्योतक आहे. परंतु कोणत्याही प्रकारची आपत्ती आली तरी राज्याची परंपरा आहे की, कोणत्या विभागात, कोणत्या जिल्हयात आपत्ती आली आहे हे न पाहता राज्य सर्व ताकदीनिशी आपत्ती आलेल्या भागामध्ये, तेथील नागरिकांच्या मागे, तेथील शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहत असते. दुष्काळात आपण तसे केलेले आहे आणि आता त्याच जिद्दीने आणि त्याच ताकदीने विदर्भातील अतिवृष्टीमुळे, महापुरामुळे झालेल्या नुकसानीकरिता, शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याकरिता त्यांचे संसार उभे करण्याकरिता, त्यांना आपल्या पायावर उभे राहण्याकरिता निश्चित प्रयत्न करणार असून त्याची माहिती मी सभागृहाला देण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, हवामानाचा बदल आपल्या सर्वांच्या समोर आहे. अतिवृष्टी होत आहे, ढग फुटीचे प्रकार आता वाढावयास लागले आहेत. उत्तराखंडमध्ये काही दिवसापूर्वी घडलेली घटना आपल्याला माहिती आहे. आता आपल्याकडे चक्रीवादळाच्या घटना वाढत आहेत. विदर्भातील काही भागात आजही सतत पाऊस पडत आहे. काल काही आणखी माणसे मृत्युमुखी पडल्याची माहिती आली आहे. हवामानात बदल होत आहेत, क्लायमेटचा हा परिणाम आहे की, अजून कशामुळे हे होत आहे याची माहिती शास्त्रज्ञ आपल्याला देतील. परंतु निश्चितच आपल्याकडे सलग दोन वर्षे दुष्काळ पडण्याची परिस्थिती असेल किंवा विदर्भातील अतिवृष्टीचा परिणाम असेल, हा हवामानातील बदल आहे आणि या पुढील काळामध्ये अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा पुन्हा उद्भवेल याकरिता आपल्याला तयार रहावे लागणार आहे. एका बाजूला तत्काळ मदत करणे, शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे, त्यांचे संसार उभे करण्याची शासनाची जितकी जबाबदारी आहे तितकीच जबाबदारी या परिस्थितीला कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची आपल्या सर्वांची आहे असे मी मानतो. पुढच्या वेळेस जरी अशी अतिवृष्टी झाली तरी इतके नुकसान होता कामा नये किंवा इतक्या मोठया प्रमाणात पूर येता कामा नये याकरिता आपल्याला उपचार करावे लागणार आहेत. मला वाटते हे उपचार करणे आपल्याला शक्य आहे व ते करण्याचे शासनाचे धोरण आहे. दुष्काळी परिस्थितीत आपण अशाच प्रकारचा प्रयत्न केलेला आहे व त्याला यशही आलेले आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

दुष्काळी परिस्थितीला शासन सामोरे गेले असून त्यामध्ये छावण्या असतील किंवा टँकरने पाणी पुरवठा करणे अशा गोष्टी केलेल्या आहेत. परंतु त्याच बरोबर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी सिमेंट नाला बंधारे असतील, गाळ काढण्याचे काम असेल, अशी कामे करावी लागतील.

सभापती महोदय, मला अभिंनदन करावयाचे आहे की, मराठवाडा असेल, उत्तर महाराष्ट्र असेल किंवा पुणे विभाग असेल या सर्व ठिकाणी खूप मोठया प्रमाणात लोक सहभागातून कामे झालेली आहेत. माझी अशी अपेक्षा आहे की, या ठिकाणी जे काम झालेले आहे तशाच प्रकारचे काम विदर्भामध्ये देखील लोकसहभागातून होईल आणि त्यामुळे आपण कायमस्वरुपी या प्रश्नाला सामोरे जाण्यासाठी प्रयत्न करु.

सभापती महोदय, मला या ठिकाणी मुद्दाम आवर्जून सांगावयाचे आहे की, आपले राज्य हे मोठे राज्य आहे, आपले राज्य श्रीमंत राज्य आहे. संबंध देशाच्या तुलनेमध्ये आपल्या राज्याचे उत्पन्न इतर कोणत्याही राज्यापेक्षा जास्त आहे. आपल्या पेक्षा दुसऱ्या क्रमांकाचे राज्य हे उत्तर प्रदेश असून त्या राज्यापेक्षाही आपल्या राज्याचे उत्पन्न 40 टक्क्याने जास्त आहे. आपल्या राज्याचे उत्पन्न जास्त असल्यामुळे आपल्या राज्याची आर्थिक ताकद जास्त आहे. नैसर्गिक आपत्ती आली तर त्या आपत्तीचा मुकाबला करण्याची ताकद आपल्या राज्यामध्ये आहे. ही ताकद एखाद्या छोटया राज्यामध्ये येऊ शकत नाही. म्हणून आज आपल्या राज्यातील कोणत्याही भागात कोणत्याही प्रकारची आपत्ती आली तर राज्य सरकार, राज्यातील जनता सर्व ताकदीनिशी, आपल्या निर्धारानिशी, इच्छाशक्तीच्या माध्यमातून उभी राहते व यावेळीही राहील हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, ही जी आपत्ती आपल्या समोर आली त्या आपत्तीमध्ये किती नुकसान झाले याची माहिती मी सुरुवातीला देऊ इच्छितो.

सभापती महोदय, विदर्भामध्ये 107 व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. मृत्यूची आकडेवारी वाढत चालली आहे. मला कालच नागपूरचे माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले आहे की,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

काल त्यांच्या विभागामध्ये 3 व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. परंतु माझ्याकडे जी आकडेवारी आहे त्या नुसार 107 व्यक्ती विदर्भात मृत्यू पावल्या असून राज्यामध्ये एकंदर 237 लोकांचा मृत्यू झ ालेला आहे. विदर्भामध्ये 260मोठी जनावरे मृत्यू पावली असून 987 लहान जनावरे वाहून गेलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्याच बरोबर 3800 पक्क्या व काही कच्च्या घरांचे नुकसान झालेले आहे. ही घरे पूर्णपणे पडलेली आहेत. अशंत: नुकसान झालेल्या घरांची संख्या 36 हजार पेक्षा जास्त आहे. शेती पिकांमुळे नुकसान झालेले क्षेत्र 50 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. त्याचा आकडा 4 लाख हेक्टर पेक्षा अधिक आहे. त्याच बरोबर 25500 हेक्टर जमीन खरडून गेलेली आहे. 1200 हेक्टर जमीन ही वाहून गेली. मी मुद्दामहून वाहून गेलेली व खरडून गेलेल्या जमिनीची माहिती दिलेली आहे. खरडून गेलेली जमीन ही दुरूस्त करता येते. तसेच, रस्त्यांचे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. जवळ जवळ 5677 कि.मी.रस्त्याचे नुकसान झालेले आहे. 502 पुलांचे नुकसान झालेले आहे. 36 शासकीय इमारतींचे नुकसान झालेले आहे. 64 पाणी पुरवठा योजना खराब झालेल्या आहेत.

त्याच बरोबर विजेचे अनेक खांब, डीपीज आणि ट्रान्सफॉर्मर वाहून गेलेले आहेत. वीज व्यवस्थेसंबंधी सांगावयाचे झाले तर नागपूर विभागामध्ये 263 एचटी खांब, 660 एलटी खांब, 48 ट्रान्सफॉर्मर आणि 57 डिस्ट्रीब्युशन बॉक्स खराब झालेले आहेत. अमरावती मध्ये देखील अशाच प्रकारचे 3 ते 4 कोटी रूपयांचे नुकसान झालेले आहे. सदर नुकसान तातडीने दुरूस्त करण्यासंबंधीचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार याचे दुरूस्तीचे काम सुरू झालेले आहे. वीज वितरण कंपनीने काही शेती पंपाच्या दुरूस्तीचे काम केलेले आहे. 1920 ग्राहकांचा वीज पुरवठा तुटलेला आहे. तो लवकरच पूर्ववत करण्यात येणार आहे.

या अतिवृष्टीमध्ये 5677 कि.मी.रस्त्यांचे आणि 502 पुलांचे नुकसान झाले आहे हे मी सांगितले आहे. यासाठी 141 कोटी रूपये खर्च येणार आहे. नागपूर जिल्ह्यात 5, भंडारा जिल्ह्यात 1, चंद्रपूर जिल्ह्यात 14 अशा एकूण 20 शासकीय इमारतींचे नुकसान झाले आहे. या इमारतींची दुरूस्ती करण्यासंबंधी देखील आदेश देण्यात आले आहेत. यासाठी 6 ते 7 कोटी रूपयांची आवश्यकता आहे. 64 पाणी पुरवठा योजनांच्या दुरूस्तीसाठी 3 कोटी रूपये खर्च येणार आहे. ही सर्व दुरूस्ती करण्यासंबंधी आदेश देण्यात आले आहेत.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

आपण कायम स्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. तात्काळ मदत करणे गरजेचे आहे हे मी सुरूवातीला सांगितले आहे. कायमस्वरूपी उपाय योजना करणे हे देखील महत्त्वाचे आहे. पुराचे पाणी मोठ्या प्रमाणावर येते ते शोषून घेण्याची क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने मोठा निर्णय घेतला होता. गोसीखुर्द धरण पूर्ण करून त्यामध्ये पाण्याचा साठा अडविला असता तर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले असते. तसे केले असते तर आज एवढी मोठी आपत्ती आली नसती. गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने 1200 कोटी रूपयांचे पॅकेज दिलेले आहे. पुनर्वसन झाल्यानंतर त्यात लगेच पाणी साठविता येईल. ते पाणी साठविण्याकरिता प्रयत्न करावे लागतील. विदर्भात अनेक प्रकल्प आहेत. विदर्भातील एका गावाचे पुनर्वसन होणे बाकी आहे. सदर पुनर्वसनाचे काम पूर्ण करून तेथे पाणी साठविले जाईल. त्यामुळे पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करता येईल.

जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून 15 टक्के रक्कम पूर परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या दुरूस्तीच्या कामावर खर्च करण्याचे आदेश उप मुख्यमंत्री तथा नियोजन मंत्री यांनी दिले आहेत. त्याचा जी.आर. देखील आपण पाठविला आहे.

त्याच बरोबर पूर संरक्षण भिंत बांधणे व गावांचे पुनर्वसन करणे हे महत्त्वाचे आहे. पूर परिस्थिती दरवर्षी उद्भवते. नीळ्या व पूर रेषेच्या खाली राहणाऱ्या लोकांना कितीही सांगितले तरी ते पुन्हा तेथे राहण्यास जातात. त्यामुळे पूर संरक्षण भिंती बांधून त्यांचे कायमस्वरूपी स्थलांतर करून त्यांचे पुनर्वसन करण्याकरिता मोठ्या प्रमाणावर मदत करावी लागणार आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील औष्णिक प्रकल्पातील राख तेथील नद्या आणि नाल्यांमध्ये जात असल्यामुळे नदी-नाले उथळ होत आहेत. पाणी बाहेर पसरत आहे. तशीच परिस्थिती खदाणांच्या बाबतीत आहे. खदाणांमधून जी माती बाहेर काढली जाते ती नदी पात्राच्या शेजारी साठवली तर पावसामुळे ती माती पुन्हा नदीत जाते, अशी परिस्थिती चंद्रपूर जिल्ह्यामध्ये निदर्शनास आलेली आहे.

सभापती महोदय, आपणास कायम स्वरुपी उपाय योजना आणि तत्कालीन उपाय योजना अशा दोन्ही उपाय योजनांवर काम करायचे आहे. त्या संदर्भात शासनाने ज्या उपाय योजना केलेल्या आहेत त्या संदर्भातील माहिती मी सभागृहाला देऊ इच्छितो.

सभापती महोदय, आपण तीन प्रकारच्या तरतुदी केलेल्या आहेत. एक कायम स्वरुपी योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देणे. दुसरी सार्वजनिक मालमत्तेचे जे नुकसान झालेले आहे त्यामध्ये रस्ते, पूल, शासकीय इमारती, पिण्याच्या पाण्याच्या योजना, शहरातील रस्ते, विजेचे ट्रान्सफॉर्मर्स इत्यादींचे झालेल्या नुकसानापोटी निधी उपलब्ध करुन देणे. तिसरा विषय हा अतिवृष्टीमध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे आणि व्यक्तींचे नुकसान झाले आहे त्यांना मदत करणे. या तिन्ही गोष्टींसाठी शासनाने पॅकेज केलेले आहे.

सभापती महोदय, अतिवृष्टीमध्ये बाधित झालेल्या व्यक्तींना शासकीय नियमाप्रमाणे प्रतिव्यक्ती दीड लाख रुपये मदत करण्यात येते. परंतु आपण अतिरिक्त एक लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देत आहोत अशी एकूण अडीच लाख रुपयांची मदत करणार आहोत. जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल आल्यानंतर तातडीने त्यांना मदत देण्यात येईल.

सभापती महोदय, आतापर्यंतच्या अहवालाप्रमाणे 960 मोठी जनावरे वाहून गेली आहेत. प्रती जनावरांकरिता 25 हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे. 987 लहान जनावरे वाहून गेली आहेत. लहान जनावरांकरिता 5 हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे. व्यक्तींकरिता आणि जनावरांकरिता एकूण 11 कोटी रुपये खर्च होणार आहेत.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सभापती महोदय, आतापर्यंत 3800 घरांचे नुकसान झाले. ज्यामध्ये कच्च्या आणि पक्क्या घरांचा समावेश आहे. पक्क्या घरांकरिता प्रत्येकी 70 हजार रुपये आणि कच्च्या घरांकरिता प्रत्येकी 25 हजार रुपये या प्रमाणे मदत मिळणार आहे. 36 हजार घरांचे अंशत: नुकसान झालेले आहे. त्या घरांना प्रत्येकी 15 हजार रुपयांची मदत मिळणार आहे.

सभापती महोदय, 25 हजार 500 हेक्टर जमिनीचे क्षेत्र खरडून गेले आहे. खरडून गेलेल्या जमिनीला प्रति हेक्टरी 20 हजार रुपयांची मदत केली जाईल. 1200 हेक्टर जमीन संपूर्णपणे वाहून गेली आहे. वाहून गेलेल्या जमिनीला प्रति हेक्टरी 25 हजार रुपये मदत मिळणार आहे. हा संपूर्णपणे वैयक्तिक स्वरुपाचा अहवाल आहे. शेतपिकांसंदर्भातील माहिती नंतर देणार आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे त्यामध्ये 5 हजार कि.मी. रस्त्यांचे आणि 500 पुलांचे नुकसान झाले आहे त्यासाठी 141 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु फार मोठ्या प्रमाणावर रस्ते वाहून गेले आहेत. त्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता एकूण 600 कोटी रुपयांचे पॅकेज आहे त्यामध्ये वरील 141 कोटी रुपयांचा समावेश आहे. एमडीआर आणि राज्य मार्गाच्या दुरुस्तीकरिता खर्च होणार आहे.

सभापती महोदय, एकूण 36 इमारतींचे नुकसान झालेले आहे. त्याकरिता 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 64 पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीकरिता 5 कोटी रुपयांची मदत मिळणार आहे.

सभापती महोदय, नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर या जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे नुकसान झाले आहे. त्याकरिता 100 कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल. सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीपोटी रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता 600 कोटी रुपये आणि इतर कामांसाठी असे एकूण 720 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये कायम स्वरुपी उपाय योजना प्रस्तावित आहेत त्यामध्ये मालगुजारी तलाव, शिवकालीन तलाव आणि 250 हेक्टरपेक्षा कमी क्षमतेचे तलाव आहेत. या तलावांच्या विशेष दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. त्याकरिता 50 कोटी रुपये प्रस्तावित केले जातील.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सभापती महोदय, योजना आयोगाने सिमेंट नाला बंधाऱ्यासाठी 500 कोटी रुपयांची वेगळी तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. 500 कोटी रुपयांतील तरतुदीपैकी 170 कोटी रुपये विदर्भातील सिमेंट नाला बंधाऱ्याकरिता खर्च करण्यात येतील.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

अे.आय.बी.पी. च्या कार्यक्रमाची तरतूद वेगळी आहे. तो कार्यक्रम 3200 कोटी रुपयांचा आहे. त्यातून सिमेंट नाले बंधारे किंवा इतर कार्यक्रम हाती घेतला जाईल. परंतु त्या कार्यक्रमाच्या रकमेचा या कामामध्ये समावेश केलेला नाही.

महोदय, महत्मा फुले जल अभियानांतर्गत नाल्याचे खोलीकरण हा कार्यक्रम घेतला जाईल. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची यांत्रिक मशिनरी वापरली जाईल. विदर्भातील दोन विभागासाठी 20 कोटी रुपयांचे दोन ड्रेझर घेऊन, त्या विभागांना या कामासाठी दिले जातील. गाळ काढण्यासाठी 100 कोटी रुपयांची वेगळी तरतूद केली आहे. कारण गाळ काढल्याशिवाय आणि नदी पात्र मोकळे केल्याशिवाय पूर परिस्थितीत बदल होणार नाही. गाळ काढला नाही किंवा नदीचे पात्र मोकळे केले नाही तर ही परिस्थिती पुन्हा पुन्हा येत राहील.

महोदय, पूर संरक्षक भिंत बांधणे आणि गावांचे पुनर्वसन करणे सुध्दा आवश्यक आहे. आपल्याला माहीत आहे की, 2003 आणि 2007-2008 मध्ये पूर आला होता. त्या वेळी राज्य सरकारकडून काही घोषणा करण्यात आल्या होत्या. परंतु त्या पूर्ण होऊ शकल्या नाही. पूर नियंत्रण रेषेखाली राहणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी नवीन गावठाण निर्माण करुन तेथे मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ठोस तरतूद केली पाहिजे, या बाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी 500 कोटी रुपयांचा वेगळा निधी दिला जाईल. ही सर्व कामे एकाच टप्प्यात होतील असे नाही. ही कामे टप्प्याटप्प्याने केली जातील. अशा प्रकारे विदर्भात 500 कोटी रुपयांचा निधी पूर संरक्षक भिंती आणि गावांच्या पुनर्वसनासाठी दिला जाईल.

महोदय, 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले क्षेत्रफळ 4 लाख हेक्टर पेक्षा अधिक आहे असा सध्याचा अंदाजित आकडा आहे. तो वाढण्याची शक्यता आहे. त्या भागात अजूनही पंचनामे सुरु आहेत. 15 ऑगस्टपर्यंत पंचनामे करुन आकडा निश्चित करावा लागणार आहे.

महोदय, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना धान पिकासाठी प्रती हेक्टरी 7500/- रुपये आणि इतर सर्व पिकांसाठी प्रती हेक्टरी 5,000/- रुपये देण्यात येतील. वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांसाठी 375 कोटी रुपये, सार्वजनिक रस्त्यांसाठी 720 कोटी रुपये आणि कायमस्वरुपी योजनांसाठी 840 कोटी रुपये अशा प्रकारे 1935 कोटी रुपये विदर्भातील एकंदरीत नुकसान

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

झालेल्या भागाच्या विकासासाठी प्रस्तावित केले आहेत. आवश्यकता पडली तर या पेक्षा जास्त निधीची तरतूद निश्चितपणे केली जाईल. ही कामे एकाच वेळी होणार नाहीत, याची मला जाणीव आहे. म्हणून ही कामे टप्प्याटप्प्याने करावी लागतील.

महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, शासनाने आजच एक शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना 10 किलो ज्वारी, 10 किलो तांदूळ आणि 10 लीटर केरोसीन मोफत देण्यात येणार आहे.

महोदय, या सर्व बाबी हवामान बदलामुळे घडत आहेत. त्या भागात अजूनही पाऊस पडत आहे. अजूनही त्या भागात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेला निश्चित आकडा आला नाही. या परिस्थितीत मदत करण्याबाबत केंद्र सरकारचे काही नियम आहेत. त्या नियमानुसार अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या लोकांना मदत मिळत नाही. केवळ पुरामध्ये नुकसान झालेल्या लोकांना मदत मिळते. त्यामुळे या नियमांमध्ये बदल करण्याची विनंती केंद्र सरकारकडे करावी लागणार आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना ही नुकसान भरपाई देण्यात येत नसून मदत करण्यात येत आहे. शेतकऱ्यांचे संसार उभे करण्यासाठी आणि त्यांचे अश्रू पुसण्यासाठी सरकारने मदत केली आहे. या भागात कायमस्वरुपी मदत झाली तर पुन्हा अशी आपत्ती येणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावे लागणार आहेत.

महोदय, मी पुन्हा सांगू इच्छितो की, राज्यातील कोणत्याही भागात आपत्ती आली तर शासन, राज्यातील जनता आणि लोकप्रतिनिधी खंबीरपणे उभे राहून, मग ती आपत्ती राज्यातील कोणत्या विभागात आली याचा विचार न करता राज्य म्हणून आणि राज्याची ताकद व क्षमता म्हणून पूरग्रस्त जनतेच्या मागे उभे राहील असे आपल्याला आश्वासन देतो आणि आपली रजा घेतो.

---------------

नंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, ही जी मदत घोषित केली आहे ती किती तारखेपर्यंत जाईल ? कारण मागे अशीच जी मदत घोषित केली होती ती सहा ते आठ महिने पुरवणी मागण्यांमध्ये चालूच राहिली होती. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण असे म्हणाले की, बाके वाजवा. ज्या दिवशी ते लोक घराच्या बाहेर होते त्या दिवशी त्यांच्याकडे रॉकेल नव्हते, धान्य नव्हते. मग कशाला बाके वाजवावयाची ? आता जी मदत घोषित केली आहे त्यातील काही मदत 15 ऑगस्ट पर्यंत तरी पोहोचणार आहे का ? पिकांचे जे नुकसान झाले आहे त्याकरिता शासनाने हेक्टरी 15 हजार रुपये मदत करावी अशी मागणी आम्ही केली होती. त्या विषयाच्या संदर्भात शासनाने काय विचार केला आहे आणि त्याबाबत कधी घोषित करणार ? 1983 जे परिपत्रक आहे त्यानुसार 65 मि.मी.पेक्षा जास्त पाऊस पडल्यास पिकांसाठी जाहीर केलेली मदत शासन सर्व ठिकाणी देणार आहे का ? आपण विदर्भाच्या बाबतीत सांगितले पण याच पध्दतीने रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात किंवा ज्या ज्या भागात 65 मि.मी.पेक्षा जास्त पाऊस झालेला आहे अशा महाराष्ट्रातील सर्व भागासाठी हे लागू असणार आहे का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, यामध्ये काही निधी कायमस्वरुपी योजनांकरिता दिलेला आहे आणि काही तात्कालीन निधी दिलेला आहे. मृत व्यक्तींकरिता जी तात्कालीन मदत दिली जाते त्यासाठी वेगळा निधी आयुक्तांकडे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे ठेवलेला आहे. दीड लाख रुपये दिले जातात. अर्थात त्यासाठी शवविच्छेदन करावे लागते आणि त्यानंतर ते पैसे दिले जातात. जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश आला की, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून लगेच ते पैसे दिले जातील. त्यामध्ये वेळ लागणार नाही. धान्याच्या बाबतीत आज जी.आर काढलेला आहे. जी.आर. प्रमाणे धान्य देखील वितरित केले जाईल. घरांच्या बाबतीत किंवा खावटी कर्जाच्या ज्या मदती आहेत त्या ताबडतोब वितरित करण्याचा प्रयत्न चालू आहे. रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जेव्हा करता येईल तेव्हाच ते काम सुरु करता येईल. इतर गोष्टींची जी मदत आहे ती देखील जितक्या लवकर देता येईल तितक्या लवकर देण्याचा प्रयत्न शासनातर्फे केला जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

सभापती महोदय, 65 मि.मी. पेक्षा जास्त पाऊस आणि 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या सर्व भागाला आणि विशेषत: कोकणामध्ये देखील ही मदत दिली जाईल. संपूर्ण राज्याकरिता हा निर्णय आहे. या ठिकाणी विदर्भाची चर्चा चालू होती म्हणून विदर्भाचे आकडे आलेले आहेत. इतर भागातील आकडे येत आहेत. त्या सर्वांना निश्चितपणे मदत देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मदतीचे आकडे जाहीर केले त्यामध्ये पिकांच्या नुकसानीबाबत त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना हेक्टरी 5 हजार रुपये दिले जातील. ही मदत किती हेक्टरपर्यंत दिली जाईल याचा खुलासा अजून झालेला नाही. हेक्टरी 5 हजार रुपयांचा जी.आर. वर्षानुवर्षे महाराष्ट्रामध्ये चालू आहे. बी.टी.बियाणाची एक थैली घ्यावयाची झाली तर त्यासाठी शेतकऱ्यांना दोन हजार रुपये मोजावे लागतात. एक एकराच्या बियाणासाठी 2 हजार रुपये लागतात. आपण त्या शेतकऱ्याला जर दोन हजार रुपयेच देणार असाल तर तो शेतकरी कसा उभा राहील ? त्याला खत लागेल, बियाणे लागेल तसेच बाकीचा खर्च लागेल. म्हणून माझी अशी मागणी आहे की, अनेक वर्षापासून हेक्टरी 5 हजार रुपये जी मदत चालू आहे त्यामध्ये वाढ करुन किमान हेक्टरी 15 हजार रुपये मदत दिली पाहिजे. त्याचबरोबर आपण खरडून गेलेल्या जमिनीच्या संदर्भात 20 हजार रुपये जाहीर केलेले आहेत त्यामध्ये सुध्दा वाढ केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. ताबडतोबीने पंचनामे करुन जर ही मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली तरच त्याला खरिपाचे किंवा रब्बीचे पीक घेता येईल. परंतु ही हेक्टरी मदत वाढविणे गरजेचे आहे. आपण ही मदत किती हेक्टरपर्यंत देणार याचा खुलासा होणे आवश्यक आहे. जे जुने जी.आर. आहेत ते बदलण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना विनंती करतो की, मोठी जनावरे आणि लहान जनावरे यांची व्याख्या आपण कशी करणार आहात ? कोणते जनावर मोठे आणि कोणते जनावर लहान, गाय, म्हैस, बैल यांना आपण मोठे जनावर म्हणणार आहात का, बकरीला, बोकडाला कोणते जनावर म्हणणार आहात, कोंबडीला कोणते जनावर म्हणणार आहात, याचा खुलासा केला पाहिजे. मागच्या वेळी आपण कोंबडीला मदत जाहीर केली. आज आपण मटण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मार्केटमध्ये गेलात तर कोंबडीचा भाव 200 रुपये आहे. आमच्या भागात कोंबडीला 2 रुपये मदत दिली होती. त्यानंतर त्यामध्ये दुरुस्ती केली. हे जी.आर. दुरुस्त झाले पाहिजेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी पिकांच्या मदतीबाबत खुलासा करावा. किती हेक्टरपर्यंत मदत देणार आणि 5 हजार रुपये जो आकडा आहे त्यामध्ये वाढ करणार की नाही ?

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आता उत्तर दिलेले आहे. दुर्दैवाने या वेळेला कोकणामध्ये अतिवृष्टी झालेली आहे. खासकरुन सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झालेली आहे. त्यामध्ये समुद्र किनारी असलेली गावे उद्ध्वस्त झालेली आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत..........

मालवण, देवबाग, हर्णे, तारकर्ली, दाभोळ या ठिकाणचा समुद्र जवळजवळ गावामध्ये घुसलेला आहे. ही जी भयानक अवस्था निर्माण झालेली आहे, त्याबाबतच्या नुकसानीचा किंवा त्यावरील कार्यवाहीचा उल्लेख दुर्दैवाने माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरात झालेला नाही. सह्याद्रीच्या पट्टयातील लांजा तालुक्यातील माचळ गावामधील 34 मोठी जनावरे एका रात्रीत मेली आहेत. त्या ठिकाणी कोणतेही शासकीय अधिकारी पोहोचलेले नाहीत. सह्याद्रीच्या पट्टयातील अधिकारी कोकणातील गावामध्ये पाहणी करण्यासाठी किंवा लोकांना आधार देण्यासाठी जात नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी विदर्भाबाबत केलेल्या उपाययोजनांचा उल्लेख केला आहे. परंतु दिनांक 6 जून रोजी कोकणात पाऊस सुरु झाल्यापासून तेथे भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. कदाचित माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत त्या ठिकाणची माहिती अधिकाऱ्यांनी दिली नसावी. कोकणातील परिस्थितीचे गांभीर्य शासनाने लक्षात घ्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पुढील महिन्यामध्ये गणेशोत्सव सुरु होणार आहे. कोकणातील रस्ते वाहून गेल्यामुळे मागील 2 दिवसामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खेडेगावातील 101 एस.टी.च्या फेऱ्या महामंडळाने बंद केल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील 140 फेऱ्या बंद केल्या आहेत. एस.टी.फेऱ्या बंद करण्याबाबत महामंडळाने संबंधित ग्रामपंचायतींना नोटिसा दिलेल्या आहेत. एस.टी.बंद झाल्यामुळे शाळकरी मुले शाळेत जाऊ शकत नाहीत. अतिवृष्टीमुळे कोकणातील रस्ते गणेशोत्सवापूर्वी दुरुस्त करणे आणि एस.टी.च्या फेऱ्या ताबडतोब सुरु करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश द्यावेत.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याबाबत मी स्पष्टीकरण देऊ इच्छितो. शासनाकडून दिली जाणारी मदत 2 हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. सध्याच्या प्रचलित नियमानुसार अतिवृष्टीसाठी, दुष्काळासाठी ही मदत दिली जात आहे. ही नुकसान भरपाई नाही, ही मदत आहे. त्यांना पायावर उभे राहण्यासाठी ही मदत दिली जाते. याबाबत कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी आपण भर दिला पाहिजे. जेणे करुन भविष्यात अशा परिस्थितीला सामोरे जावे लागणार नाही. यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

कोकणासंबंधीची माहिती शासनाकडे येत आहे. आता मी जे निकष सांगितले आहेत ते संपूर्ण राज्यासाठी लागू आहेत. माझ्या उत्तरात विदर्भाचा उल्लेख आला असला तरी ज्या ज्या ठिकाणी अतिवृष्टी झालेली आहे, पुरासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, 65 मि.मी.पेक्षा जास्त पाऊस पडलेला आहे. अशी अनेक ठिकाणची परिस्थिती आहे. मला कोकणातील रस्त्यांच्या नुकसानीची माहिती मिळालेली आहे. प्राथमिक माहितीनुसार तेथे 70 कोटीचे नुकसान झालेले आहे. नुकसानीचे अंतिम आकडे समोर येतील. दुष्काळाप्रमाणे अतिवृष्टीसंबंधी मंत्रिमंडळाच्या उपसमितीकडे दर आठवड्याला जी माहिती येईल ती संकलित करुन त्याबाबतचा वेगळा जी.आर.निर्गमित केला जाईल. धन्यवाद.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन्हा भरेल.

( दुपारी 2.44 ते 3.30 पर्यंत मध्यंतर )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

पृ.शी.: सिंचनातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत एस.आय.टी.ची स्थापना करण्याची मागणी

पृ.शी. :सिंचनातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत एस.आय.टी.ची स्थापना करण्याची मागणी या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर,रामदास कदम, जयंत प्र.पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे यांनी उपस्थित केलेली केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"गत दीड वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाची विविध प्रकरणे सभागृहात मांडण्यात येणे, तथापि त्यात झालेला गैरव्यवहार मान्य न करता इतर बाबीबाबतच श्वेतपत्रिका शासनाकडून काढण्यात येणे, श्वेतपत्रिका वस्तुस्थितीवर आधारित नसल्याने, हिवाळी अधिवेशन, २०१२ मध्ये विरोधी पक्षाने सभागृहात घेतलेली आक्रमक भूमिका, त्यानुसार, या संपूर्ण गैरव्यवहाराची एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याचे मान्य करण्यात येणे, तथापि एस.आय.टी. कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत स्थापना करण्याची व तिची कार्यकक्षा तातडीने वाढविण्याची आवश्यकता, शासनाच्या संदिग्ध भूमिकेबाबत जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, सिंचन गैरव्यवहाराचा योग्यरितीने तपास होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

सभापती महोदय, सिंचनाच्या विषयावरील चर्चा ही नवसाची झालेली आहे. होणार की नाही, होणार की नाही, एकदा उद्योग मंत्र्यांनी आक्षेप घेतला, शेवटी माननीय पाणीपुरवठा मंत्री श्री.दिलीप सोपल सभागृहात आले आणि चर्चा सुरु झाली.

सभापती महोदय, विरोधी पक्षाला प्रामाणिकपणे काही मुद्यांवर चर्चा करावयाची आहे, जे मुद्दे वारंवार आम्ही सभागृहात मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. वारंवार आग्रहाने आम्ही सिंचन विभागातील भ्रष्टाचाराचे पुरावे सादर केले आहेत. मला आठवते, मागील वर्षीच्या पावसाळी अधिवेशनात कोणाला किती टक्के मिळतात हे ऑन रेकॉर्ड मी सांगितले होते. त्यानंतर आमची अपेक्षा होती की, या बाबतीत शासनाकडून चौकशी केली जाईल, श्वेतपत्रिका काढण्यात येईल. ज्या गोष्टी आम्ही पुराव्यानिशी मांडल्या आहेत, त्याबाबत आमची शासनाकडून कारवाईची अपेक्षा होती. आम्ही मांडलेले मुद्दे असत्य असतील तर तसे बाहेर येईल, सत्य असेल तर त्याची कारणे बाहेर यावीत. जे कोणी दोषी अधिकारी असतील, राजकीय नेतृत्व असेल किंवा सिस्टीम चुकीची असेल तर तसे सभागृहाला अवगत करावे.

सभापती महोदय, श्वेतपत्रिका म्हणजे ज्या विषयावर चर्चा उपस्थित केली जाणार आहे त्या विषयातील वास्तव समोर आणणे. वास्तव आहे त्यावर लिपापोती करुन कागद पुढे आणायचा, या लिपापोतीला श्वेतपत्रिका म्हणता येणार नाही. 1999 मध्ये युती सरकार सत्तेवरुन बाजूला झाल्यानंतर आघाडी सरकारने श्वेतपत्रिका काढली होती. त्यात कर्जाविषयी आणि इतर मुद्यांबाबत ऊहापोह करण्यात आला होता. आघाडी सरकारच्या काळात सातत्याने चुका झाकण्याचे काम सुरु आहे. श्वेतपत्रिकेबाबत बोलायचे झाले तर, खोटे बोला पण रेटून बोला एवढेच म्हणता येईल.

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

रेटून बोल पण खोट् बोल हा श्वेत पत्रिकेचा नवीन शब्द, पर्यायी शब्द आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपण शिक्षकांना सांगा की, श्वेतपत्रिका म्हणजे काय, तर रेटून बोल पण खोट् बोल.

सभापती महोदय, श्वेतपत्रिका काढली त्या श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून सिंचनाच्या संदर्भातील सर्व घोटाळे, भ्रष्टाचार खालच्या सभागृहात आणि या सभागृहात आपण सर्वांनी मांडलेले आहेत. परंतु या भ्रष्टाचाराची रंग सफेदी कशी करण्यात आलेली आहे ती मी या माध्यमातून सांगणार आहे. श्वेतपत्रिका काढत असतांना त्यामध्ये म्हटले आहे की,

"हे पाणी अतिशय पवित्र आहे,
पाणी सर्वांचे संवर्धक आहे,
हे पाणी राष्ट्राची भरभराट आहे."

सभापती महोदय, मला असे वाटते की, बहुदा ही प्रिंटिंग मिस्टेक असावी. "हे पाणी अत्यंत पवित्र आहे, हे कॉन्ट्रक्टरांचे संवर्धक आहे आणि मंत्र्यांची भरभराट करणारे आहे." हे म्हणणे माझे नाही तर सेंट्रल हॉलमध्ये श्री.राजेंद्र सिंह यांनी जे भाषण केले आहे त्यांचे आहे.

सभापती महोदय, गेल्या 10 वर्षात जलसंपदा विभागामुळे महाराष्ट्राची भरभराट न होता अधिकारी, ठेकेदार व संबंधित खात्याचे राजकीय नेतृत्वाची भरभराट झालेली दिसते. स्व.यशवंतराव चव्हाणाच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विधानसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव खडसे, गणपतराव देशमुख बोलले त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांना त्यासंदर्भातील जाणीव झाली. खरे म्हणजे यांसदर्भातील आकडेवारी आर्थिक सर्वेक्षण आल्यानंतर या सभागृहात पहिल्यांदा मांडली गेली होती. इतका निधी खर्च होऊन त्या प्रमाणात सिंचन का वाढले नाही आणि त्याचा उहापोह करुन काही चुका झाल्या असतील तर धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब आम्हाला यामध्ये अपेक्षित होती. चितळे समितीचा अहवाल आल्यानंतर हे धोरणात्मक निर्णय घेतले जाणार आहेत. आता कामांची काय अवस्था आहे हे आपण बघत आहात. 10 वर्षातील जलसंपदा विभागात झालेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे आम्ही पुराव्यानिशी मांडली आहेत. एक एक नाव घेऊन, ठेकेदारांची कागदपत्रे घेऊन,टक्केवारी, आकडेवारी या सभागृहात मांडली होती परंतु ते सरकारने ऐकले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

नाही. परंतु यासंदर्भात जे याचिका कर्ते होते त्यांनी कोर्टात माहिती दिली व त्यावर पॉझिटीव्ह रिमार्क्स आलेले आहेत. 10 वर्षात यासंदर्भात ज्या समित्या नेमल्या त्या समित्यांनी जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालावर आपण काय कारवाई केली ? वडेनेरे,कुलकर्णी, मेंढेगिरी समितीने स्पष्टपणे म्हटलेले असतांनाही त्यावर कारवाई झालेली नाही. शासन फक्त समित्यावर समिती करीत आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाची स्थापना होऊन 7 वर्षे होऊन देखील, अद्यापपर्यंत त्यातील तरतुदींची अंमलबजावणी झालेली नाही, त्यामुळे आज जिल्हाजिल्हयात पाण्याच्या संदर्भात वाद सुरु झाले आहे. त्यामुळे यासंदर्भात निश्चित धोरण अपेक्षित आहे. आज जिल्हयाजिल्हयामध्ये पाण्याच्या सदंर्भात वाद नाही तर खालच्या सभागृहात एकाच पक्षाच्या आमदारांनी, त्याच पक्षाच्या मंत्र्यांच्या समोर, सभागृहाच्या नेत्यांसमोर मराठवाडा विरुध्द नाशिक-नगर विभागातील आमदार हातघाईवर आले होते. समन्यायी पाणी वाटपात मराठवाडयावर जर अन्याय होत असेल तर आमदार भांडणारच. आपण योग्यवेळी योग्य ते निर्णय घेत नाही त्यामुळे जनतेचे सोडा परंतु सभागृहामध्ये, आमदारांमध्ये प्रत्यक्ष हातघाई होतांना पाहिले आहे. सिंचनाचा भ्रष्टाचार उघड करण्याची इच्छा नसल्याने हे घडलेले आहे. सिंचनाच्या संदर्भात श्वेतपत्रिकेमध्ये जी आकडेवारी दिलेली आहे त्या आकडेवारीचे विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे. गेल्या 10 वर्षात जलसंपदा विभागात 11 लक्ष 19 हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे असा क्लेम श्वेतपत्रिकेमध्ये केलेला आहे. सिंचन क्षेत्रामध्ये झालेली वाढ तसेच पाटबंधारे विभागाचे स्थानिकस्थर, लघु,मध्यम व मोठे प्रकल्प, जलसंधारण व कृषी विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विहिरी, शेततळी तसेच जागोजागी बांधलेले सिमेंट बांध, कोल्हापुरी बंधारे इ. मुळे सिंचन होत असते. 0 ते 1000 हेक्टर पर्यंतचे प्रकल्प जिल्हा परिषद राबवित असते त्यामुळे हा विषय जलसंपदा विभागाकडे येत नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

100 ते 250 हेक्टर पर्यंतचे प्रकल्प जलसंधारण खात्या मार्फत राबविले जातात. 250 ते 2000, हेक्टर पर्यंतचे लघु प्रकल्प, 2000 ते 10000 हेक्टर पर्यंतचे मध्यम आणि 10000 हेक्टर पेक्षा अधिक क्षमतेचे मोठे प्रकल्प पाटबंधारे विभागांकडे येतात. याव्यतिरिक्त कोल्हापूर बंधारे, विहिरी, शेततळे, सिमेंट बांध यांच्या द्वारे देखील सिंचन क्षेत्रात वाढ होते. नुकत्याच प्रकाशित झालेल्या महाराष्ट्र आर्थिक पाहणीतील आकडेवारीप्रमाणे सन 2002-2003 पासूनची विहिरींची आकडेवारी उपलब्ध नाही. वास्तविक 1960 पासून विहिरींची संख्या 5 लाख 42 हजार वरून 13 लाख 31 हजारा पर्यंत गेली आहे. 2002-2003 मधील विहिरींची आकडवारी गृहीत धरली तर विहिरीद्वारे निर्माण झालेले सिंचित क्षेत्र 21 लक्ष 45 हजार हेक्टर एवढे येते. ही आकडेवारी माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी दिलेल्या आर्थिक पाहणीतील सर्वेक्षणामध्ये आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या श्वेतपत्रिकेत महाराष्ट्रातील एकूण सिंचित क्षेत्राचे प्रमाण 29 लक्ष 55 हजार हेक्टर असल्याचे दर्शविण्यात आले आहे. याचाच अर्थ गेल्या 10वर्षात 8 लक्ष 10 हजार हेक्टर एवढेच क्षेत्र जलसंपदा विभागाने सिंचना खाली आणले आहे. परंतु, श्वेतपत्रिकेमध्ये मात्र जलसंपदा विभाग केवळ 11.47 लाख हेक्टर क्षेत्र सिंचना खाली निर्माण केल्याचा दावा करीत आहे. यातील,महसूल,कृषी,जलसंपदा या विभागांपैकी खरी आकडेवारी कोणत्या विभागाची आहे ?

सभागृहामध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी स्वत: आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाला सादर केला आहे. या आकडेवारी प्रमाणे जल सिंचनाच्या सर्व साधानांद्वारे निर्माण झालेले एकूण सिंचित क्षेत्र 40 लक्ष 50 हजार हेक्टर एवढे आहे. यापैकी विहिरींद्वारे निर्माण झालेले सिंचित क्षेत्र 21 लक्ष 59 हजार हेक्टर एवढे आहे. याचाच अर्थ केवळ 18.91 लक्ष हेक्टर एवढेच क्षेत्र धरणांद्वारे सिंचनाखाली आलेले आहे असे नियोजन खात्याचे आर्थिक सर्वेक्षण सांगत आहे. श्वेतपत्रिकेत मात्र 29 लक्ष 55 हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आल्याचा दावा करण्यात आलेला आहे. वेगवेगळ्या विभागामार्फत आकडेवारी गोळा होत असल्यामुळे या आकडेवारीमध्ये काही प्रमाणात फरक असू शकतो. परंतु, 7 लक्ष 96 हजार हेक्टरचा फरक हा खूप मोठा आहे. हा फरक कशामुळे पडत आहे. त्याची सद्य:स्थिती समोर आली पाहिजे. याबाबत श्री.सुनील तटकरे खरे बोलत असतील तर श्री.अजित पवार यांच्याविरूद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना आणली पाहिजे. श्री.अजित पवार खरे बोलत

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतील तर श्री.सुनील तटकरे हे असत्य बोलत आहेत म्हणून सन्माननीय सदस्य श्री.जयंतभाई पाटील हे त्यांच्या विरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना आणतील. आमच्याकडे दोन वेगवेगळ्या विभागांच्या मंत्र्यांनी दिलेली आकडेवारी आहे. त्यामुळे यातील कोणाची आकडेवारी खरी मानायची हा प्रश्न आहे.   दोघे मिळून खरे-खोटे कोण हेच आम्हाला माहीत नाही.

**उप सभापती** : येथे फक्त डावखरे.

श्री.विनोद तावडे : येथे फक्त डावखरे, पण सत्तेचे डाव होणार नाहीत खरे, कारण आमच्याकडे विरोधी पक्ष जागरूक आहे बरे.  सिंचित क्षेत्र मोजण्याची मुळी जलसंपदा विभागाकडे यंत्रणाच उपलब्ध नाही. सिंचनावर सदनामध्ये गदारोळ झाल्यानंतर माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे आपल्या टीमसह सगळे काही मोजायला बाहेर पडले असतील असे मला वाटले म्हणून मी त्यांना पत्र दिले. मी जलसंपदा सचिवांना 20 ऑक्टोबर 2012 रोजी पत्र दिले की, नेमक्या किती हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा मिळाली आहे. आर्थिक सर्वेक्षण पाहणीमध्ये अद्याप अहवाल यायचा आहे असे लिहून आले होते. त्यामुळे ते मोजण्यासाठी बाहेर पडले असतील असे मला वाटले होते. त्यांच्या विभागाच्या सचिवांनी मला असे उत्तर दिले आहे की, तालुका निहाय सिंचन क्षेत्र मोजण्याची यंत्रणाच आमच्याकडे उपलब्ध नाही.  असे मला जलसंपदा विभाग सांगत आहे. आज पर्यंत सिंचित क्षेत्राची मोजणी तलाठी, तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत, कृषी आयुक्तालयांकडून होत असे व तीच खरी मोजणी आहे. सिंचन विभागात गाव पातळीवर दैनंदिन काम करणारे पुरेसे कर्मचारी नसल्याने व त्यांनी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक या दैनंदिन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सिंचित क्षेत्र मोजताना मदत न घेतल्याने श्वेतपत्रिकेत दर्शविलेली सिंचित क्षेत्राच्या वाढीची आकडेवारी निराधार आहे. मंत्रिमंडळामध्ये काय चर्चा झाल्या त्या बाहेर आलेल्याच आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.किरण पावसकर )**

श्री.विनोद तावडे....

मंत्रिमंडळामध्ये झालेल्या चर्चा बाहेर आल्या आहेत. कृषी विभागाचे काय म्हणणे आहे, पाटबंधारे विभागाचे काय म्हणणे आहे हे सर्व बाहेर आले आहे. नेमकी कोणती आकडेवारी खरी हे समजण्याकरिता मी विभागाला पत्र पाठविले. विभागाकडून मला पत्र आले. पत्रात नमूद केले आहे की, आमच्याकडे अशी मोजण्याची यंत्रणा नाही.

सभापती महोदय, 8.38 लक्ष हेक्टर सिंचित क्षेत्राच्या तुलनेत आपण मागचा विचार केला तर युतीच्या काळात किती सिंचन झाले, युती शासनाच्या अगोदर किती होते, नंतर किती होते हे पाहिले पाहिजे. 1960 मध्ये महाराष्ट्रात सिंचनाचे क्षेत्र 2.36 होते. 1995 मध्ये 10.64 झाले. 1995 पर्यंत 8.38 लक्ष हेक्टर होते. या 8.38 लक्ष हेक्टर सिंचित क्षेत्राच्या तुलनेत युती शासनाच्या पाच वर्षाच्या कालावधीत सिंचित क्षेत्राचे प्रमाण 8.06 लक्ष हेक्टर एवढे झाले. याचा अर्थ युतीच्या काळात 96.18 टक्के एवढे सिंचित क्षेत्र वाढले. आघाडी शासनाने 35 वर्षात जे क्षेत्र वाढवले तेवढे क्षेत्र युती शासनाच्या पाच वर्षाच्या कालावधीत वाढले. एवढे काम करुनही त्यावर आम्हाला काही बोलता आले नाही. आम्ही सतत काम करीत राहिल्यामुळे लोकांना त्या पध्दतीने पटविणे आम्हाला जमले नाही.

सभापती महोदय, दिनांक 30 नोव्हेंबर रोजी जाहीर केलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये 10 वर्षात केवळ 42 हजार 435 कोटी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे नमूद केले असले तरी प्रत्यक्षात 85 हजार 817 कोटी रुपये खर्च झाला अश्ी आमची आकडेवारी आहे.

सभापती महोदय, नियोजित योजनेतील खर्च रुपये 48 हजार 414 हजार कोटी आणि योजनेत्तर खर्च रुपये 17 हजार 403 हजार कोटी इतका आहे. सन 2000-2001 मध्ये योजनेतर खर्च 629 कोटी रुपये होता तर योजनांतर्गत खर्च 3 हजार 525 कोटी रुपये होता. सन 2001-2002 मध्ये योजनेतर खर्च 1 हजार 032 कोटी रुपये होता तर योजनांतर्गत खर्च 2 हजार 008 कोटी होता. सन 2010-2011 मध्ये 420 कोटी रुपये योजनेतर खर्च होता तर 8 हजार 046 कोटी रुपये योजनांतर्गत खर्च होता. असा एकूण योजनेतर खर्च 17 हजार 403 कोटी रुपये होता तर योजनांतर्गत खर्च 48हजार 414 कोटी रुपये होता. म्हणजे योजनेतर खर्च आणि योजनांतर्गत खर्च मिळून एकूण 65 हजार 817 कोटी रुपये मागील दहा वर्षात पाटबंधारे महामंडळावर खर्च झाले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, या खर्चा व्यतिरिक्त कृषी, रोजगार हमी व जलसंधारण विभागामार्फत विहिरी, शेततळी, छोटे प्रकल्प व पाणलोट विकास क्षेत्र यावर एकूण 20 हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. म्हणजे एकूण 85 हजार 817 कोटी रुपयांचा निधी विविध विभागमार्फत खर्च झालेला आहे.

सभापती महोदय, आकडेवारीमध्ये गोलमाल करण्याचे ठरविले की त्यामध्ये माणूस कुठेतरी सापडतो. श्वेतपत्रिकेच्या पृष्ठ क्रमांक 90 वरील तक्त्याप्रमाणे सन 2000-2001 ते 2010-2011 या कालावधीत 42 हजार 435 कोटी रुपये खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे. परंतु मी बेरीज केली असता ती 45 हजार 960 कोटी इतकी आली. मी बारा-तेरा वेळा ही बेरीज केली परंतु ती बेरीज 45 हजार 960 कोटी इतकीच आली.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.किरण पावसकर)**

श्री.विनोद तावडे.....

अधिकृत श्वेतपत्रिकेतील खंड-1, पृष्ठ क्रमांक-90 वर जी आकडेवारी दिलेली आहे त्याचा मी अभ्यास केला. महोदय, आकड्यांची ॲडजस्टमेंट करायचे ठरविल्यानंतर लपवाछपवी कशी उघड पडते हे त्यावरुन दिसून येते.

महोदय, राज्य सरकारने श्वेतपत्रिकेच्या बाबतीत दिलेली माहिती मी जलसंपदा विभागाच्या संबंधित डेस्ककडून गोळा केली. 2004-05 मध्ये जलसंपदा विभागामार्फत जे पत्र मिळाले आहे त्यानुसार 3,344 कोटी रुपयांचा निधी वितरित झाला होता. श्वेतपत्रिकेमध्ये 2,422 कोटी रुपये खर्च झाल्याचे नमूद केले आहे. 2009-10 मध्ये 7,578 कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिलेला असताना श्वेतपत्रिकेत 6,713 कोटी रुपये नमूद केले आहेत. सन 2010-11 मध्ये 8,046 कोटी रुपये निधी दिलेला असताना, श्वेतपत्रिकेत 7,380 कोटी रुपये नमूद केले आहेत. श्वेतपत्रिकेत दिलेली माहिती आणि जलसंपदा विभागाकडून प्राप्त झालेली माहिती या बाबतची आकडेवारी बघितली तर आपण कशी ॲडजस्टमेंट केली हे ऐकायला मला नक्की आवडेल.

महोदय, सार्वजनिक उपक्रमांची माहिती मी घेतली आहे. कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, गोदावरी मराठवाडा विकास महामंडळ यात राज्य सरकारची एकूण गुंतवणूक आणि राज्य सरकारने या महामंडळांना दिलेल्या हमीची रक्कम टॅली केली तर ती 75,189.22 कोटी रुपये आहे. थोडक्यात महामंडळांची निर्मिती झाल्यापासून महाराष्ट्र शासनाने या महामंडळावर 75,189.22 कोटी रुपयांची गुंतवणूक केली वा हमी दिली आहे. युती सरकारच्या काळातील 10 हजार कोटी रुपयांची हमी सोडली तर, उर्वरित 65 हजार कोटी रुपये येतात. पंरतु जलसंपदा विभागाने 42 हजार कोटी रुपयांचा आकडा काढला आहे. परंतु हा दावा फोल ठरतो आहे.

महोदय, जलसंपदा विभागाच्या मंत्र्यांकडून सांगितले जाते की, आम्ही कोठेही ठेकेदारांना मदत केली नाही. जलसंपदा मंत्र्यांवर आरोप झाल्यानंतर ते सांगतात की, इतर विभागांच्या तुलनेत आमच्या विभागाचे डीएसआर कमी आहेत. महोदय, सकाळी जीगांव प्रकल्पाच्या बाबतीत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

चर्चा झाली त्यावेळी माननीय जलसंपदा राज्यमंत्री बोलताना पूर्णत: एक्स्पोज झाले. जलसंपदा विभागावर डीएसआरच्या बाबतीत आरोप झाल्यानंतर माननीय मंत्र्यांकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एमआयडीसी, सिडको, मुंबई महानगरपालिका यांच्या डीएसआर पेक्षा जलसंपदा विभागाचे डीएसआर कसे कमी आहेत हे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. हे तर उसकी कमीज मेरी कमीज से ज्यादा सफेद क्यों ? असा प्रकार आहे. त्यांच्याकडून वारंवार हेच सांगितले जाते की, इतर विभागातील डीएसआरचा रेट आमच्या विभागाच्या डीएसआर रेटच्या तुलनेत जास्त असताना वारंवार जलसंपदा विभागाच्या बाबतीत आरोप का केले जातात ? त्यामुळे मी डिटेल स्वरुपात अभ्यास केला.

महोदय, जलसंपदा विभागात मातीचे खोदकाम करण्याचा दर 26.55 रुपये आहे. हाच दर सार्वजनिक बांधकाम विभागाचा 80, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा 125, एमआयडीसी चा 140, सिडकोचा 180 आणि मुंबई महानगरपालिकेचा 167 रुपये आहे. यावरुन मला वाटले की, आम्ही जलसंपदा विभागावर आरोप करताना किती अन्याय करतो आहोत. आकड्यांवरुन जलसंपदा विभागाच्या तुलनेत इतर विभागांचे दर किती जास्त आहेत हे दिसून येईल. महोदय, जलसंपदा विभागात काय सुरु आहे त्या बाबत मी बोलत आहे. मातीमध्ये खोदकाम करणे या कामाचा दर जलसंपदा विभागात कमी असल्यामुळे त्या विभागाचा दर जास्त असल्याचा आरोप करणे योग्य नाही. त्यामुळे मी या सर्व दराचा अभ्यास केला.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .....

कठीण खडकामध्ये सुरुंग खोदाई, उदग्रहण क्षेत्रातून गाभा क्षेत्राचे माती भराव म्हणजेच हार्टीन्ग तसेच कॉक्रिटीकरणाचे यांच्या विभागाचे रेट कमी आहेत आणि बाकीच्या विभागांचा रेट जास्त आहेत असे दाखविले आहे. मी त्याची माहिती घेतली. यांच्या खोदकामाच्या दरामध्ये 15 मीटर वहन अंतर व 1.5 मीटर उंचीपर्यंत उचल अंतर्भूत आहे. माती भरावाच्या दरात 15 मीटर वहन अंतर व 1.5 मीटर उंचीपर्यंत उचल अंतर्भूत आहे आणि कॉन्क्रीटच्या दरात 50 मीटर वहन अंतर व 1.5 मीटर उंचीपर्यंत उचल अंतर्भूत आहे. यांच्या विभागाचे वहन अंतर 15 मीटर आहे तर बांधकाम विभागाचे वहन अंतर 50 मीटर आहे. त्यामुळे त्यांचा दर जास्तच असणार. जीवन प्राधिकरणामध्ये वहन अंतर 50 मीटर आहे आणि 1.5 मीटर उंची आहे. एमआयडीसीमध्ये वहन अंतर 50 मीटर आणि उंची 1.5 मीटर आहे. म्हणजे तुम्ही किती काम किती पैशात करता हे यावरुन दिसून येते. आमचे दर कसे कमी आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला आहे. Statistics is a big lie, which can be interpreted in any way we want. सिडकोमध्ये वहन अंतर 50 मीटर आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये वहन अंतर 150 मीटर आहे. जलसंपदा विभागामध्ये वहन अंतर 15 मीटर ते 150 मीटर आहे. या पध्दतीने रेट कमी आहेत हे श्वेत पत्रिकेमध्ये दाखविण्याचा जो प्रयत्न केला तो धादांत खोटारडेपणा आहे. खोटे बोल पण रेटून बोल अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, या विभागाने इतर राज्यांच्या जलसंपदा विभागाच्या दरसूचीची गृहीतके घेतलेली आहेत ती मी सांगतो. त्यांनी कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात या राज्यांची माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रात 15 मीटरच्या वहनावळीचा रेट आहे तर आंध्र प्रदेशमध्ये 1 किलोमीटरचा रेट आहे. यामध्ये आंध्र प्रदेशचा दर जास्त दाखविलेला आहे परंतु आपले वहन अंतर 15 मीटर आणि त्यांचे वहन अंतर 1 किलोमीटर आहे हे दाखविले नाही. कर्नाटकमध्ये वहन अंतर 1 किलोमीटर आहे, गोव्यामध्ये वहन अंतर 50 मीटर आहे. अशा वेगवेगळ्या राज्यांच्या आकडेवारीशी तुलना करीत असताना आपल्या राज्यात रेट कमी आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. रेट कमी आहे पण काम किती आहे आणि त्या तुलनेत आपला रेट किती असावयास पाहिजे होता ? आंध्र प्रदेशमध्ये वाय.एस.रेड्डी चांगले काम करीत होते. आंध्र प्रदेशला कशाला बदनाम करता ? आमचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ MMP/

श्री. विनोद तावडे ....

चांगले आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण हे सर्व यातील वास्तव आहे.

सभापती महोदय, डीएसआर दराच्या बाबतीत विनोद तावडे बोलतात, जयंत प्र. पाटील बोलतात, रामदास कदम बोलतात, भाऊसाहेब फुंडकर बोलतात ते सोडा पण वडनेरे समितीने याबाबत काय सांगितले आहे ते आपण कधी ऐकले का ? वडनेरे समितीने आपल्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, मूळ अंदाजपत्रकातील दर दरसूचीवर पूर्णत्वाने आधारित नसून डिराईव्ह केलेले दिसतात व वाजवीपेक्षा जादा दिसून येतात. या वडनेरे समितीचा अहवाल कधी आला आणि त्या संदर्भात काय कार्यवाही केली ? वडनेरे समितीने असे म्हटले आहे की, बऱ्याच प्रकरणात अंदाजपत्रके तयार करताना मूळ दरसूचीत समाविष्ट नसलेले दर वापरण्याची आवश्यकता भासली आहे. दरसूची व्यतिरिक्त दर शासन नियमाप्रमाणे अधीक्षक अभियंता स्तरावरुन पूर्वमंजुरी घेऊन कार्यकारी अभियंत्यांनी अंदाजपत्रकात समाविष्ट करणेविषयक तरतूद आहे. प्रत्यक्षात तशी कार्यवाही झालेली नसून सदरील दरसूची व्यतिरिक्त दराचा वापर पूर्वपरवानगी न घेता सरळ अंदाजपत्रके बनविताना केला असून मंजुरीस्तव अंदाजपत्रके वरिष्ठ कार्यालयास सादर केली आहेत. ही बाब खचितच अयोग्य आहे असे समितीने आपले मत व्यक्त केले आहे.

सभापती महोदय, डीएसआरचे दर न वापरल्यामुळे सचिव पाटबंधारे विभाग यांनी पत्र दिलेले आहे. 25 एप्रिल, 2008 च्या पत्रात सचिव, पाटबंधारे यांनी असे म्हटले आहे की, डीएसआर मध्ये नमूद केल्यापेक्षा अधिक दराने निविदेमध्ये वाढ केली जाते. ही वाढ असमर्थनीय आहे. निविदा किंमतीची तुलना करुन निविदा स्वीकृती या किंमतीच्या आधारे केली जाते. त्यामुळे अधिक दराच्या निविदा प्राप्त झाल्यास ती वरच्या अधिकाऱ्याकडे मान्यतेकरिता पाठवावी व असे न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी असे देखील त्या परिपत्रकात नमूद केले आहे. परंतु तत्कालीन मंत्री महोदयांनी या परिपत्रकाची अंमलबजावणी करु नये असे निर्देश दिले. माननीय मंत्री यांच्या कार्यालयातून त्यांचे स्वीय सहायक यांनी तसे परिपत्रक दिले. सरकारमध्ये कक्ष अधिकाऱ्याने परिपत्रक काढले पाहिजे पण यामध्ये मंत्र्यांचे स्वीय सहायक असे परिपत्रक काढतात. त्या पत्राच्या प्रती उघड झालेल्या आहेत. मंत्री महोदयांचे स्वीय सहायक श्री. सुरेश जाधव यांची त्यावर सही आहे.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

दरसूचीमध्ये दाखविलेले दर एकाच गृहितकावर आधारित नसल्याने इतर राज्यांपेक्षा कमी आहेत असे दिसत नाही. या राज्यातील ज्येष्ठ अधिकारी हे करता कामा नये असे शासनाला सांगत आहेत. त्यांचे म्हणणे तुम्ही ऐकू नका असे मंत्री महोदय आणि त्यांचे खाजगी सचिव सांगत असतील तर त्यांचा यामध्ये इंटरेस्ट काय होता, कोणाला मदत करावयाची होती हे आम्हाला जनतेपर्यंत पोहोचवावयाचे आहे आणि त्यासाठी चितळे समितीची कार्यकक्षा वाढविली पाहिजे असे आमचे मत आहे.

गेल्या वर्षी आदरणीय यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी केली आहे. त्यांचा कागदपत्रांपेक्षा रिझल्टवर भर होता. त्यांचे जे अनुयायी आहेत, त्यांच्या विचाराने महाराष्ट्र पुढे चालला आहे असा अधिकृतपणे ते दावा करतात. मग त्यांचे विचार, त्यांचे आदर्श आपल्या व्यवहारात आणले आहेत का ? आज महाराष्ट्रातील जलसंपदा विभागाचे दरसूचीचे दर कमी आहेत असा कांगावा जलसंपदा विभागामार्फत केला जात असला तरी प्रत्यक्षात प्रती हेक्टर सिंचित क्षेत्र निर्मितीचा महाराष्ट्रातील खर्च शेजारील कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यांपेक्षा तुलनेने बराच जास्त आहे, हे खरे आहे की नाही, आपल्या राज्याचा प्रती हेक्टर सिंचनाचा दर किती आहे ? याचाच परिणाम राज्याच्या कृषि क्षेत्राच्या उत्पन्नात नकारात्मक स्वरुपात दिसून येत आहे. विदर्भात सिंचन क्षमता कमी असल्यामुळे तेथील शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

गत 10 वर्षात महाराष्ट्रात प्रती हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी जलसंधारण विभागाचा खर्च पकडून झालेला खर्च किती आहे त्याची आकडेवारी मी सांगू इच्छितो. 85 हजार 817 कोटी रुपये खर्च करुन केवळ 11 लाख 19 हजार 940 हेक्टर एवढी अतिरिक्त जमीन गत 10 वर्षात सिंचनाखाली आलेली आहे. हा खर्च काढताना प्रत्यक्ष प्रती हेक्टर खर्च 7 लाख 66 हजार 264 इतका आहे. केंद्रीय नियोजन आयोगाने प्रती हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी 1 लाख 70 हजार खर्च अपेक्षित धरला आहे, परंतु राज्य सरकारकडून त्याच्या सातपट खर्च केला जात आहे. यावरुन आपल्या राज्यात कंत्राटदारांना जास्त दर मिळतो हे सिध्द होते. त्यामुळे 4

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.विनोद तावडे.......

लक्ष 17 हजार 683 रुपये प्रती हेक्टर एवढा पैसा भ्रष्टाचारात गेला, वाटण्यात गेला, चुकून गेला, देणगीसाठी गेला, भेट म्हणून गेला, गेला आणि आला, नेमके काय आहे ? हे जाणून घेणे सर्वात महत्वाचे आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागामार्फत केलेली कामे सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील तरतुदीनुसार पार पडली असे नमूद केलेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहिता परिच्छेद क्र.313 च्या तरतुदीनुसार अपडेटेड अंदाजपत्रकांना सुधारित तांत्रिक मान्यता न देणे व निविदा मंजूर करणे, संहितेमधील परिच्छेद क्र.194 व 217 चे उल्लंघन झाल्याचाही मुद्दा त्यात आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिच्छेद 313 व 315 च्या एकत्रित तरतुदीचा विचार केल्यास बव्हंशी प्रकल्पांवरील अद्ययावत खर्च सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीच्या आत आहे असे लक्षात येते. क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी निविदेपूर्वी सुधारित अंदाजपत्रके केलेली नसून निविदेतील आधिक्य मंजूर केल्याशिवाय निविदा मंजूर केल्या जात नाहीत, असा युक्तिवाद पूर्णतः पटणारा नाही. अगोदर असे होत होते की, टेंडर काढून एखाद्याला द्यावयाचे व त्यानंतर त्या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावयाची. हा कोडवर्ड प्रसिध्द आहे. सुप्रमाबाबत इशारा दिला की, काम झाले. जोपर्यंत हा सुप्रमा थांबत नाही, तोपर्यंत हा गैरव्यवहार थांबणार नाही. सुप्रमाच्या माध्यमातून ही लूट चालू आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिच्छेद क्र.194 मूळ निविदा (ब-1) मंजूर झाल्यावरच तात्पुरत्या स्वरुपाची कामे ए-2 करारनाम्यावर करण्याची मंजुरी सक्षम अधिकाऱ्यास देता येते. तथापि, ह्या प्रकरणांमध्ये अशा परवानग्या ब-1 निविदा मंजुरीपूर्वी मोठ्या प्रमाणात दिलेल्या असून शासन नियमबाह्य कार्यवाही झालेली आहे. शिस्तीचे पालन केलेले नाही, असे त्या समितीचे अभिप्राय आहेत. हे विनोद तावडे म्हणत नाही.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, परिच्छेद 217 च्या तरतुदींचे पालन बव्हंशी प्रकरणात झालेले नाही, असा एक सदस्यीय समितीचा स्पष्ट अभिप्राय आहे. यांनी श्वेतपत्रिकेत क्लेम केले आहेत, ते कसे खोटे आहे हे मी पॉईंट टू पॉईंट दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, घरगुती वापर व औद्योगिक कारणांसाठी 67 अब्ज घनफुट पाणी दिल्याने एवढा निधी खर्च होऊनही सिंचित क्षेत्र वाढले नाही. सद्य:स्थितीमध्ये शहरांमध्ये मोठया प्रमाणात नागरीकरण झालेले आहे, त्यामुळे शौचालयांमध्ये मोठया प्रमाणात पाणी फ्लश होते, पर्यायाने पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे अशा प्रकारची माहिती या ठिकाणी शासनाकडून दिली गेली. या बाबतीत सत्य परिस्थिती अशी आहे की, औद्योगिक कारणांसाठी पाणी देताना जलसंपदा खात्यामार्फत संबंधित उद्योजकांसमवेत करारनामा करण्यात येतो. या करारनाम्याप्रमाणे संबंधित उद्योजकाला 75 टक्के पाणी परत देणे अपेक्षित आहे. तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांनी अशी माहिती दिली की,फ्लश टँकचे प्रमाण वाढल्यामुळे घरगुती पाण्याच्या वापरात वाढ झाली आहे. या गोष्टीचा मी मघाशी उल्ले्ख केलेला आहे. प्रत्यक्षात फ्लश टँकमध्ये पाण्याचा वापर अतिरिक्त होत असला तरी ते पाणी जमिनीत न मुरता सेप्टीक टँकव्दारे गटाराच्या पाण्यात मिसळून नाल्यामध्ये जाते व शेवटी हेच पाणी नदीमध्ये परत येते. आंधोळीचे तसेच कपडे धुण्याकरिता वापरलेले पाणी सुध्दा अशाच रीतीने नदीमध्ये परत येते असा पर्यावरणवाद्यांचा अहवाल आहे. अशाप्रकारे पिण्याच्या पाण्यासाठी जे काही पाणी देण्यात येते त्यापैकी 80 टक्के पाणी पुनर्वापरासाठी वापरण्यात येते. असे असताना शासनाकडून मात्र 68 टीएमसी पाणी विविध उद्योग व पिण्याच्या पाण्याकरिता गत 10 वर्षात दिल्याचे सांगितले आहे. प्रत्यक्षात या पाण्यापैकी 53.6 टीएमसी पाणी पुनर्वापराकरिता उपलब्ध होते. म्हणजे प्रत्यक्षात 13.4 टीएमसी एवढेच पाणी उद्योग व पिण्याच्या पाण्याकरिता प्रत्यक्षात दिले जाते. जलसंपदा विभागाने 67 टीएमसीचा आकडा दिलेला आहे, तो संशयास्पद आहे असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ होण्याचे प्रमुख कारण दरसूचीतील वाढ आहे. दरसूचीतील वाढीमुळे प्रकल्प रखडल्यामुळे अंदाजपत्रक तयार करताना नजीकच्या काळातील दर सूचीमुळे वाढ झाल्याचा दावा, श्वेपत्रिकेत करण्यात आला आहे. तसेच गौण खनिजांच्या स्वामित्व शुल्कातील वाढीमुळे प्रकल्पाच्या किंमती वाढल्या असे देखील श्वेतपत्रिकेमध्ये नमूद केले

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आहे. परंतु या बाबतीत सत्य परिस्थिती अशी आहे की, विदर्भातील कामांची दरवाढ तपासण्यासाठी नेमलेल्या वडनेरे समितीने ही कारणमीमांसा योग्य नाही असा स्पष्ट अभिप्राय दिलेला आहे. एआयबीपी अंतर्गत प्रकल्पांवरील 153 निविदांपैकी 96 निविदांच्या अद्ययावत किंमती काढताना शासन नियमांचे पालन झालेले नाही असाही अभिप्राय समितीने दिलेला आहे. एआयबीपी प्रकल्पा व्यतिरिक्त 112 निविदांपैकी उर्वरित 60 निविदांच्या अद्ययावत किंमती काढताना शासन नियमांचे पालन झालेले नाही, याचाच अर्थ 265 निविदांपैकी 156 निविदा प्रकरणात निविदांच्या अद्ययावत किंमती काढताना शासनाच्या नियमांचे पालन झालेले नाही. बव्हंशी प्रकरणांमध्ये संबंधित तत्कालीन विभागीय कार्यालये, मंडळ कार्यालये, मुख्य अभियंताची प्रादेशिक कार्यालये व महामंडळ कार्यालयांचे स्तरावर संदिग्धता दिसून येते व एकसूत्रीपणाचा अभाव दिसून येतो. एकाच पायावर अद्ययावतीकरण झालेले नसून एकूणच शासन निर्देशांचे, नियमांचे यथायोग्य पालन झालेले दिसून येत नाही अशा प्रकारचे अभिप्राय समितीने दिलेले आहेत.

**तालिका सभापती (श्री.किरण पावसकर ):** आपले भाषण सुरु होऊन जवळपास 40 मिनिटे झालेली आहेत. इतरही सदस्यांना या चर्चेला वेळ द्यावयाचा आहे.

श्री.विनोद तावडे : शासनाने सिंचनामध्ये एवढे घोटाळे करुन ठेवलेले आहेत, ते सभागृहात सांगताना मला दम लागतो. मला बोलण्यासाठी एवढा दम लागतो तर घोटाळे करण्यामध्ये शासनाचा स्टॅमिना किती असेल हे आपणच मला सांगावे.

**तालिका सभापती** : ही अल्पकालीन चर्चा आपल्याला उत्तरासह दोन तासात संपवावयाची आहे.

श्री.विनोद तावडे : प्रकल्पाच्या किंमतीमध्ये संकल्पनातील बदलामुळे दरवाढ झाली. या बाबतीत महालेखा नियंत्रकांनी दिलेल्या अहवालामध्ये संकल्पनेमध्ये बदल करताना तो याग्य रितीने न केल्यामुळे शासनावर कोटयावधी रुपयांचा भुर्दंड पडला असे स्पष्ट नमूद केले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

मी हे माझ्या मनाचे सांगत नसून महालेखा नियंत्रक यांचे हे म्हणणे आहे. तरी ते तुम्हाला पटत नाही. सभापती महोदय, विदर्भातील बेंबळा प्रकल्प हे याचे उत्तम उदाहरण आहे. सुरुवातीला मातीचा कालवा करण्याचा निर्णय झाला. नंतर मातीऐवजी सिमेंट लाईनचा कालवा करण्याचे ठरले. पुन्हा मातीचा कालवा करण्याचे ठरविण्यात आले. संकल्पनेच्या या बदलामुळे कालव्याची लांबी व रुंदी बदलली. परिणामी शासनाला 58 कोटी रुपये अतिरिक्त खर्च करावा लागला. श्री. उज्ज्वल पगारिया व श्री.प्रदीप जाधव या कंत्राटदारांचा फायदा व्हावा म्हणून हे बदल करण्यात आले होते का याची सखोल चौकशी व्हावी. बेंबळा प्रकल्पातील भ्रष्टाचारामुळे, संकल्पनेतील बदलामुळे दरवाढ झाली हा श्वेतपत्रिकेतील दावा पूर्णपणे असत्य असून प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे दरवाढ झाली आहे. पाणी उपलब्ध नसताना व्याप्ती वाढविल्यामुळे खर्चात वाढ झाली. पाणीच उपलब्ध नाही.

गोदावरी बॅरेजेस अंतर्गत सुरुवातीला 8 बंधारे असताना नंतर 11 बंधाऱ्यांना मान्यता देण्यात आली. मान्यता देत असताना महामंडळाचे प्रधान सचिव व अध्यक्ष यांची मान्यता घेतलेली नाही. हिरडपुरी, जोगलादेवी व आपेगाव या बंधाऱ्यांना कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या संकल्पनेमुळे सुरु होऊन देखील या बंधाऱ्यांचे निम्नपातळी व उच्च पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्यात आले. प्रती द.ल.घ.मी.पाणी साठविण्याकरिता 1.56 कोटी रुपये खर्च झालेला होता. परंतु आपेगाव बंधाऱ्यासाठी हा खर्च 14.38 कोटी प्रती द.ल.घ.मी.एवढा झाला. हिरडपुरी बंधा-यासाठी हा खर्च 9.32 कोटी प्रती द.ल.घ.मी.एवढा झाला असून जोगलादेवी बंधाऱ्यासाठी हा खर्च 11.46 कोटी रुपये प्रती द.ल.घ.मी.एवढा झाला आहे. एवढ्या प्रचंड प्रमाणात खर्च होत असताना विष्णुपुरी बंधाऱ्यातून या प्रकल्पांना 206 द.ल.घ.मी.पाणी उपलब्ध असताना 11 बंधाऱ्यांद्वारे 22.78 द.ल.घ.मी.म्हणजेच 15 अतिरिक्त द.ल.घ.मी.चे नियोजन करण्यात आले. तसेच आंतरराज्य लवादाच्या तरतुदी कृष्णा खोऱ्यापुरत्याच मर्यादित असतील तर 12.72 द.ल.घ.मी.च्या जास्त पाणी वापराच्या योजना प्रस्तावित केल्या असे देखील कुलकर्णी समितीने स्पष्ट केले आहे.

सभापती महोदय, हे सर्व करीत असताना 11 बंधाऱ्यांच्या निविदांना जाणीवपूर्वक राज्य व विभागीय पातळीवर प्रसिध्दी देण्यात आली नाही. बऱ्याच वेळेला जायकवाडी धरण भरत नाही. आजपर्यंत केवळ 3 वेळा सदर धरण भरले आहे. असे असताना 11 बंधाऱ्यांवर शेकडो कोटी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

रुपये अक्षरश: उडविण्यात आले आहेत. कठीण खडक पातळीत जेवढी खोदाई संकल्पनेत धरली आहे त्यापेक्षा सर्रासपणे 1.5 ते 2.0 मीटर अधिक खोदाई करण्यात आली आहे. यावरुन प्रत्यक्षात पाणीच उपलब्ध नसताना व्याप्ती वाढविल्यामुळे जलसंपदा विभागास 100 कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागला हेच सिध्द होते.

ज्या कंत्राटदारांना लाभ देण्यासाठी गोदावरी बॅरेजेसचे बजेट वाढविण्यात आले त्या कंत्राटदारांमध्ये कोण होते? मंगरुळ उच्च पातळी बंधारा, ता.घनसावंगी हे काम 71.85 कोटी रुपयांचे असून मे.मनिषा इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व एस.एस.फॅब्रिकेटर्स, औरंगाबाद यांना देण्यात आले. राजाटाकळी उच्च पातळी बंधारा, ता.घनसावंगी हे काम 63.13 कोटी रुपयाचे असून ते मे.श्रध्दा कन्स्ट्रक्शन आणि पावर जनरेशन प्रा.लि.पुणे यांना देण्यात आले. लोणी सावंगी उच्च पातळी बंधारा, ता.परतूर हे काम 74.14 कोटी रुपयांचे असून मे.मुळे ब्रदर्स आणि श्रीहरी असोसिएटस, औरंगाबाद यांना देण्यात आले. आपेगाव निम्न पातळी बंधारा, ता.पैठण हे काम 49.13 कोटी रुपयांचे असून मे.पियुष एंटरप्रायझेस, औरंगाबाद यांना देण्यात आले. हिरडपुरी निम्न पातळी बंधारा, ता.पैठण हे काम 40.39 कोटी रुपयांचे असून ते मे.पियुष एंटरप्रायझेस, औरंगाबाद यांना देण्यात आले. या सर्व कामांची आकडेवारी मी मागील वेळी सभागृहात मांडली होती.

सभापती महोदय, व्याप्ती कमी होऊन देखील खर्चात वाढ झाली आहे. व्याप्तीत वाढ झाल्यामुळे असा दावा करण्यात आला असला तरी व्याप्ती कमी होऊन देखील जलसंपदा विभागाच्या खर्चात वाढच झाली आहे. त्याची उदाहरणे द्यायची झाली तर वारणा प्रकल्पाची 1975-76 मध्ये प्रकल्प किंमत 81.97 कोटी रुपये असताना सिंचनाखालील क्षेत्र 95676 हेक्टर एवढे होते. 1985-86 मध्ये प्रकल्पाची किंमत 288.47 कोटी रुपये होऊनही सिंचनाखालील क्षेत्र 91350 हेक्टर म्हणजे पूर्वीपेक्षा कमी झाले. 2009-10 मध्ये प्रकल्पाची किंमत 2149.95 कोटी रुपयांपर्यंत वाढली आणि सिंचन क्षेत्र मात्र 91350 हेक्टर एवढेच राहिले.

सभापती महोदय, कृष्णा प्रकल्पामध्येही तसेच झाले आहे. प्रकल्पाची किंमत 1975-76 मध्ये 71.31 कोटी रुपये एवढी असताना 2011-12 मध्ये 991.22 कोटी रुपये एवढी वाढली परंतु सिंचनाखालील क्षेत्र 1,06,286 हेक्टरवरुन 74,000 हेक्टरपर्यंत खाली आले. यावरुन प्रकल्पाची

..3..





श्री.विनोद तावडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्याप्ती म्हणजेच सिंचन क्षमता 32,286 हेक्टरने कमी होऊन देखील प्रकल्पाची किंमत 721.59 कोटी रुपयांनी वाढली असल्याचे दिसून येते. त्यामुळे व्याप्तीत कोणताही बदल न होता खर्चात वाढ झाली आहे. दूधगंगा प्रकल्पाची 1974-75 मध्ये किंमत 58.83 कोटी रुपये असताना ती 2008-09 मध्ये 1712.80 कोटी रुपयांवर पोहोचली. मी या सगळ्या ठिकाणी जाऊन आलो आहे.

नंतर 3एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

जे कमिटमेंट केले होते त्या प्रमाणे रस्ते आहेत काय, वीज दिली आहे काय हे प्रत्यक्ष जाऊन मी बघितले आहे परंतु प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. पुनर्वसनामुळे खर्च वाढला आहे का हे प्रत्यक्ष जाऊन पाहिल्यानंतर प्रत्यक्षात तो झाल्याचे जानवत नाही. लोकप्रतिनिधींनी प्रकल्पाची व्याप्ती वाढविण्याचा आग्रह केला त्यामुळे खर्चात वाढ झाली असे सांगण्यात आले आहे. लोकप्रतिनिधींच्या नावाने बिल फाडावयास आपण आता मोकळे झाला आहात. लोक प्रतिनिधी पत्र देत असतात ही वस्तुस्थिती आहे परंतु त्याचा फायदा घेऊन खर्चात वाढ झाली असे म्हणणे बरोबर नाही. यासंदर्भातही समितीने याबाबत उल्लेख केलेला आहे. गेल्या वर्षात महाराष्ट्रातील सर्व आमदारांनी केवळ जलसंपदा विभागाचीच कामे सुचवली का ? सार्वजनिक बांधकाम आणि इतर कोणत्याही विभागाच्या कामांचा खर्च वाढला नाही परंतु जलसंपदा विभागामध्येच हा खर्च का वाढलेला आहे ?

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात या विषयातील प्रत्यक्ष आकडेवारी दिली होती. आज सकाळी जीगाव प्रकल्पाची माहिती दिली होती. जीगाव प्रकल्पाच्या किमती कशा कशा वाढल्या या सर्वाची माहिती दिलेली आहे. जलसंपदा विभागाच्या सचिवांची यावर टीका झाली होती. त्यासंदर्भात पत्र देऊन तो विषय या सभागृहात मांडलेला आहे. हे प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेतून कशा पध्दतीने केले जाते, यासंदर्भात पाटबंधारे विभागाच्या सचिवांनी घेतलेला आक्षेप व त्यावरील मंत्र्यांचे रुलींग यासंदर्भातील सर्व माहिती आम्ही दिलेली आहे. सिंचनाच्या संदर्भातील घोटाळे, भ्रष्टाचार आम्ही सर्व माध्यमातून मांडलेला आहे. आमची अपेक्षा अशी आहे की, सिंचनाचे घोटाळे वारंवार विरोधी पक्ष मांडतो आहे, एनजीओ मांडत आहे, मीडियामध्ये मांडतो आहे. सिंचनामध्ये काहीही भ्रष्टाचार झालेला नाही असे आपले म्हणणे असेल तर ते योग्य नाही. यासंदर्भात चौकशी करण्यासाठी आपण एक समिती तयार केलेली आहे परंतु त्या समितीला आपण कोणते अधिकार दिले आहेत ? शासकीय अधिकारी जी कागदपत्र देतील तीच कागदपत्र तपासावयाची. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी भ्रष्टाचाराची कागदपत्र दिली तर ती तपासली जात नाहीत. शासनाचे अधिकारी जे काही कागदपत्र देतील ते तपासले जातील व त्यावरुन ही समिती काय निष्कर्ष काढणार आहे ? आमच्याकडे भ्रष्टाचाराचे पुरावे आहेत, आमची कागदपत्र घेण्याचे अधिकार जर तुम्ही चितळे समितीला देणार नसाल तर कसे चालेल ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सिंचनाच्या भ्रष्टाचाराची चौकशी प्रामाणिकपणे केली जाण्याची आवश्यकता आहे. होऊन जाऊ दे. दूध का दूध नी पानी का पानी असे असले पाहिजे. त्यामुळे आम्ही म्हणतो त्या प्रमाणे चितळे समितीचे अधिकार वाढवा, अधिकार वाढविल्यानंतर त्या चितळे समितीकडे भ्रष्टाचाराचे कागदपत्र आम्हाला देऊ द्या. सिंचनाच्या संदर्भातील घोटाळा जनतेच्या समोर आल्यानंतर ज्यांनी ज्यांनी सिंचनामध्ये घोटाळे केलेले आहेत त्यांना सत्तेवरुन पायउतार व्हावे लागेल एवढे मी या निमित्ताने ठामपणे सांगतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मराठीमध्ये बोलत असतांना भाषा वापरली जाते की, घोडा का अडला,भाकरी का करपली आणि पाणी का शिळं झाल, तर ते बदलले नाही म्हणून. सिंचनामध्ये घोटाळा झाला की, झाला नाही यावर दोन्ही बाजूने चर्चा सुरु आहे. जलसिंचनाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्यामध्ये एक वेगळया प्रकारचे दिशा दर्शक काम कोणी केले असेल, आणि त्याची मुहूर्तमेढ कोणी रोवली असेल तर ती शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या कार्यकाळात सन्माननीय मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी जलसंपत्तीच्या संदर्भात संपूर्ण नद्या खोरे वाटपाच्या संदर्भात आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ आणि ज्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाला निवडून येण्याची संधी मिळाली नाही तरी सुध्दा पश्चिम महाराष्ट्र असो, मराठवाडा असो प्रत्येक ठिकाणी असणाऱ्या पाण्याचे वाटप कशा प्रकारे झाले पाहिजे याबद्दल मूलभूत काम शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या काळामध्येच झालेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

त्यावेळी युती शासनाला काही कळत नाही, त्यांनी कृष्णा खोरे प्रकल्प हा पांढरा हत्ती पोसण्यासाठी केला आहे अशा प्रकारची टीका होत होती. आता त्याचे काय झाले असा देखील प्रश्न मला विचारायला पाहिजे.

1999 मध्ये चितळे समितीचा अहवाल सादर झाला. या जलसिंचन आयोगाने जलनीती संबंधी 329 शिफारशी राज्य शासनाला केल्या. मी प्रत्येक शिफारशीमध्ये जाणार नाही. सन 1999 पासून 2013 पर्यंत म्हणजे गेल्या 14 वर्षामध्ये या 329 शिफारशीबाबत किती अंमलबजावणी झाली, यातील किती शिफारशी जमिनीत गाडल्या, हवेत किती उडून गेल्या, कागदोपत्री किती राहिल्या आहेत हे विचारण्याचा अधिकार महाराष्ट्रातील जनतेला आणि आमदारांना आहे. तेव्हा याचा अहवाल आपण सादर केला पाहिजे.

सन 2003 नंतर जलनीती झाली. मी या सदनामध्ये सन 2002 पासून आहे. त्यावेळी आपल्या पैकी अनेक जण या सदनामध्ये होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस विधान सभेमध्ये होते. जलनीती संबंधी काय नियम असावेत यासंबंधी दोन्ही सभागृहामध्ये पारदर्शक पद्धतीने चर्चा का झाली नाही ? आपण कायदे मंजूर केले आहेत. पाण्यासाठी अग्रक्रम कसा असावा याबाबत देखील याच विधान मंडळामध्ये इतिहास घडला आहे. मला सांगावयाचे आहे की, 2003 च्या जलनीतीनंतर आपण 2006 मध्ये विधेयक आणले. आज आपण 2013 मध्ये आहोत. प्रत्येक तालुक्यामध्ये पाण्याचे वाटप कसे असणार आहे यावरून संघर्ष सुरू आहे. सन 1999 मध्ये शिफारशी करण्यात आल्या आहेत. तसेच पाण्याचे वाटप कसे होणार आहे यासंबंधी या सभागृहात चर्चा का होत नाही ? यावर चर्चा झाली पाहिजे. कोणते नियम लावले आहेत हे समजले पाहिजे. कशा प्रकारे निर्णय घेतले हे समजले पाहिजे. उद्योगाला आणि शेतीला पाणी कसे दिले हे समजले पाहिजे. हा अग्रक्रम कसा बदलला हे समजले पाहिजे. पुण्यातील नांदेड सिटी सारख्या प्रकल्पाला पाणी उपलब्ध करून दिले आहे. ते नियम आपण कशाच्या आधारावर केले आहेत. मुळात माझा प्रश्न आहे की,सभागृहात आपण जलनीती का मांडली नाही ? मला आपल्याला विचारावयाचे आहे की, सिंचनाचे प्रकल्प आज



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

अपूर्ण का राहिले आहेत ? आज मी आपणाला आव्हान देते. सन 1994 मध्ये श्रीमती मृणालताई गोरे यांनी भूखंडाच्या विषयावर अविश्वासाचा ठराव आणला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी प्रत्येक भूखंडाचे काय झाले याचा एक अहवाल सभागृहाला सादर केला होता. माझे आपल्याला आव्हान आहे की, या 329 शिफारशींचे काय झाले आहे, जलनीती संबंधी पुढील अधिवेशनात शासन चर्चा घडवून आणणार आहे की नाही, दोन्ही सभागृहाच्या आमदारांना विश्वासात घेऊन सिंचनाच्या प्रकल्पाचे निर्णय कशा प्रकारे घेण्यात आले, लोकांना ठिकठिकाणी का सहभागी करून घेतले नाही, याचा खुलासा करावा.

येथे वाल्मीचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याची आज काय स्थिती आहे. याबाबत येथील अधिकाऱ्याचे काय म्हणणे आहे याबाबत पारदर्शकपणे चर्चा होत नाही. मला असे वाटते की, जलनीती संबंधात घेतलेली अनास्थेची भूमिका दुष्काळाला कारणीभूत आहे. फक्त मोठे प्रकल्प उभे करण्याची घोषणा करतो. पण आधीचे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करत नाही. मला कुठल्याही अधिकाऱ्यावर वैयक्तिक टीका करावयाची नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

परंतु श्री.देवेंद्र शिर्के या अधिकाऱ्या संदर्भात नेमकी कोणती भूमिका असणार आहे हे आम्हाला समजले पाहिजे. शेवटी मी एवढेच सांगते की, भगिरथाने प्रयत्न करुन पृथ्वीवर पाणी आणले परंतु सरकार मात्र भागिरथाच्या भूमिकेत आहे. युती शासनाने खोरे वाटप संदर्भात जो अहवाल आणला होता त्याची कशाप्रकारे अंमलबजावणी केली हे येथे शासनाने स्पष्ट करावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सिंचनाच्या प्रश्ना संदर्भात नियम 97 अन्वये का होईना आपण आम्हाला चर्चेसाठी परवागनी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, गत दीड वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाची विविध प्रकरणे सभागृहात मांडण्यात येणे, तथापि त्यात झालेल्या गैरव्यवहार मान्य न करता इतर बाबी बाबतच श्वेतपत्रिका काढण्यात येणे या विषयावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी आपली मते मांडली. यापूर्वी देखील त्यांनी मते मांडलेली आहेत. त्या संदर्भातील कागदपत्रे देखील दिलेली आहेत.

सभापती महोदय, सिंचना संदर्भातील चौकशी करण्यासाठी एस.आय.टी.नेमण्यात आली. त्या समितीला भ्रष्टाचाराची प्रकरणे वगळून चौकशी करण्याचे अधिकार दिले असे आमचे म्हणणे आहे आणि तेवढ्या विषयापुरती आपण त्यावर चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाण्याच्या संदर्भात, विकास व व्यवस्थापनेच्या संदर्भात काही विसंगती निर्माण झाल्या त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले त्यातील एक प्रश्न येथे चर्चेला आलेला आहे.

सभापती महोदय, सर्वांना पाण्याचे समन्यायी वाटप झाले पाहिजे असे माननीय राज्यपालांचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे राज्यात समन्यायी पध्दतीने पाण्याचे वाटप होते काय याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे आमच्या कोकणातील आहेत. ते खेडवासियांचे जावई आहेत. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे पाण्याचे वाटप झाले किंवा नाही हे त्यांनी सांगावे.(अडथळा) ढवळ्याच्या बाजूला पवळा बांधला वाण नाही पण गुण लागला. तशी अवस्था आमच्या जावयाची झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्राचा वाण आणि गुण लागल्यामुळे जावई बिघडले.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

महोदय, माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार सिंचनाच्या बाबतीत समन्यायी वाटपाची भूमिका घेऊन त्याची अंमलबजावणी केली असती तर आज कोकणाची ही अवस्था झाली नसती. माननीय मंत्री महोदय, आपल्या सासऱ्याच्या घरासमोर कोयना धरण आहे. युतीचे सरकार असताना कोयना प्रकल्पाचे काम करण्यात आले. युतीचे सरकार गेल्यानंतर त्या प्रकल्पाची जी अवस्था होती तशीच आज अवस्था आहे. माननीय मंत्री महोदय, आपण कोकणात जाऊन सासऱ्याच्या घरी पाहुणचार घेत असाल. मी एवढेच विचारु इच्छितो की, आमच्या कोकणावर अन्याय का केला जातो ? आमचे दुर्दैव एकच आहे की, कोकणातील आमदार मंडळी एकत्र येत नाहीत. कारण आमची खेकड्यासारखी वृत्ती आहे. काल बघितले, एका प्रश्नाच्या बाबतीत मराठवाडा भागातील सर्व आमदार एकत्र आले होते. परंतु आमच्या बाबतीत तसे होत नाही. या निमित्ताने मी सांगतो की, या सरकारच्या 14 वर्षानंतर राजवटीनंतर म्हणजेच 2014 च्या निवडणुकीत या सरकारची काय अवस्था होईल ते पहावे. राज्यातील जनता या सरकारची गळचेपी करणार आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, गेल्या 14 वर्षाच्या कालखंडात राज्य सरकारने कोकणाची ही अवस्था का केली, कोकणाला न्याय का दिला नाही, आम्ही काय घोडे मारले, या बाबतचा उल्लेख उत्तराच्या भाषणात करावा. राज्य सरकार समान निधी वाटपाच्या गप्पा मारत असताना कोकणाचा पैसा उर्वरित वा पश्चिम महाराष्ट्रात नेला जात आहे. त्यामुळे कोकणाला पैसा मिळत नाही. कोकणात एकूण 93 पाटबंधारे प्रकल्प आहेत. त्यातील केवळ 14 प्रकल्पांचे काम पूर्ण झाले आहे. सबंध राज्यात 17 मोठे सिंचन प्रकल्प आहेत. ते पूर्ण करण्यासाठी 41 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तसेच मध्यम प्रकल्प 54 असून असून ते पूर्ण करण्यासाठी 4950 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. याशिवाय 143 लघु प्रकल्प असून ते पूर्ण करण्यासाठी 2708 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आजच्या घडीला महाराष्ट्रावर 2 लाख 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. अपूर्ण असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणखी 80 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, हा पैसा शासन कोठून आणणार आहे ? माननीय मंत्री महोदय, आपण पैसे सासऱ्यांकडे नेऊन ठेवले आहेत काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

महोदय, माननीय राज्यपालांनी मागे स्पष्ट आदेश दिले होते की, जेवढे पैसे उपलब्ध आहेत तेवढीच कामे हाती घ्यावीत. पैसा नसताना ही कामे का हाती घेतली, त्याचे प्रथम उत्तर द्यावे. सिंचनावरील श्वेतपत्रिका हा दिशाभूल करणारा प्रयत्न आहे. सिंचनाची चौकशी करण्यासाठी श्री.माधवराव चितळे यांची समिती नेमली. मुळात माधवराव चितळे समितीने या पूर्वी देखील सिंचनाच्या बाबतीत राज्य सरकारला अहवाल सादर केलेला आहे. परंतु राज्य सरकारने तो अहवाल बासनात गुंडाळून ठेवला. राज्य सरकार माधवराव चितळे समितीचा अहवाल लालफितीतून बाहेर का काढत नाही ? एका बाजूला त्यांचा अहवाल जाहीर केला जात नाही आणि दुसऱ्या बाजूला पुन्हा याच विषयाच्या बाबतीत त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाते. माधवराव चितळे यांनी यापूर्वी सादर केलेल्या अहवालात काय नमूद केले आहे, हे माननीय मंत्र्यांनी सांगितले पाहिजे. माझ्या माहितीनुसार त्या अहवालात त्यांनी नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील 90 टक्के पाणी पश्चिम महाराष्ट्रातील ऊस पितो. म्हणून ऊसाची लागवड किंवा ऊसाला पाणी देणे जो पर्यंत बंद होत नाही तो पर्यंत महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. परंतु त्यांनी अहवालात केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने या शासनाने अंमलबजावणी केली नाही. माधवराव चितळे समितीच्या अगोदरच्या अहवालाची अंमलबजावणी केली नसताना, पुन्हा त्यांच्याच अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यामागचे कारण काय आहे ? आपण या बाबत काहीच सांगू शकणार नाही.

महोदय, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता श्री.विजय पांढरे यांनी जी मागणी केली होती त्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली, हे या चर्चेच्या निमित्ताने सांगितले पाहिजे.

महोदय, कॅगच्या अहवालाच्या बाबत राज्य सरकारने काय निर्णय घेतले ते सांगितले पाहिजे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, यामध्ये सिंचनाचा घोटाळा आहे हे आम्ही म्हटलेले नाही. श्री. पांढरे यांच्या अहवालानंतर महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी असे विधान केले की, महाराष्ट्रामध्ये 70 हजार कोटी रुपये खर्च झाले आणि फक्त 0.1 टक्का सिंचन झाले, मग हे पैसे कोठे गेले ? हे मी म्हटलेले नाही. विरोधकांनी हे म्हटलेले नाही. आपण तपासून बघा. माननीय मुख्यमंत्र्यांचे आज समाधान झाले आहे काय ? आमचे समाधान झाले आहे असे त्यांनी सांगावे. 70 हजार कोटी रुपये व्यवस्थितपणे खर्च झालेले आहेत, कोठेही काही झालेले नाही, कॅग खोटे बोलत आहे, पांढरे खोटे बोलत आहेत असे त्यांनी सांगावे म्हणजे आम्ही खाली बसतो. त्या अनुषंगाने काय झाले ते मंत्री महोदयांनी सांगावे. वडनेरे समितीच्या अहवालाच्या बाबतीत काय अंमलबजावणी केली हे आपण सांगावे. सिंचन घोटाळा प्रकरणामध्ये 45 अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते त्याचे काय झाले ते सांगावे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे. या समितीच्या माध्यमातून भ्रष्टाचाराची चौकशी होणार नाही ही बाब आता स्पष्ट झालेली आहे. श्री. तटकरे साहेब, आपल्यालाही लोकांना सांगावे लागेल, श्री. अजितदादा पवार, आपल्यालाही जनतेला सांगावे लागेल की, होय, मी प्रामाणिकपणे चौकशी केली. माझे सरकार असताना, मी राज्याचा उप मुख्यमंत्री असताना, मी विधान परिषद सभागृहाचा नेता असताना, मी कधी तरी या खात्याचा मंत्री असताना, आज माझा मंत्री त्या खात्यामध्ये असताना मी प्रामाणिकपणे चौकशी लावली आणि या चौकशीमध्ये कोणीही काही खाल्लेले नाही हे आपण दाखवावे. ते महाराष्ट्राच्या जनतेसमोर येऊ द्या. आपण चौकशीला कशासाठी घाबरता ? आपण ऊठून सांगितले पाहिजे की, या संदर्भात सीबीआय चौकशीला आमची तयारी आहे. असे जर आपण सांगितले तर आम्ही खाली बसतो. आम्ही अजिबात वेळ मागणार नाही.

सभापती महोदय, आमची एसआयटीची मागणी होती पण मी मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यामध्ये भ्रष्टाचाराला बगल देऊन तुम्ही बाकी सर्व गोष्टी त्यामध्ये अंतर्भूत केल्या. सन्माननीय श्री. शशिकांत शिंदे यांना सांगू इच्छितो की, आपण आता मंत्री झालेला आहात. त्यावेळी आपण मंत्री नव्हता. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री. शशिकांत शिंदे हे पश्चिम

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

महाराष्ट्रातील आहेत. त्यांना सर्व माहीत आहे. त्यांनी पुस्तिका काढलेली आहे. दादांचे पुष्कळसे काम त्यांनी हलके केले आहे. ते माझे जवळचे मित्र आहेत. श्री. शिर्के यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होते त्यांच्या बाबतीत काय केले, श्री. शिर्के आता कोठे आहेत, त्यांना प्रमोशन दिले का, हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगावे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार तसेच माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी, हा जो भ्रष्टाचार आहे त्याबाबत आम्ही बोलतो, मुख्यमंत्री बोलत आहेत, कॅग बोलतो, श्री. पांढरे बोलत आहेत, जनहित याचिका झालेल्या आहेत, या सर्वांना उत्तर देण्यासाठी आपण नेमका काय निर्णय घेणार ते या महाराष्ट्राच्या जनतेसमोर सांगावे. माझ्याकडे खूप फाईल्स आहेत त्या मी आपल्याकडे आणून देईन. त्याची चौकशी होऊ द्या. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुध्दा प्रकरणे दिलेली आहेत. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. या ठिकाणी आरोप होतात आणि विरोधी पक्ष म्हणून आमचे ते कामच आहे. समजा उद्या तुम्ही जर विरोधी पक्षात बसलात तर तुम्ही चांगले बोलणार आहात का ? शिवसेना-भाजपचे सरकार चांगले आहे, चांगले काम करीत आहे, त्यांना शुभेच्छा देतो, असे आपण म्हणणार आहात का ?

सभापती महोदय, मेंढेगिरी समितीचा अहवाल आहे, केंद्रीय जल आयोगाचा अहवाल आहे. अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे झालेली आहेत त्या कामांची चौकशी झाली पाहिजे. ज्या ज्या ठेकदारांनी चुकीचे काम केले आहे त्या ठेकेदारांवर कारवाई झाली पाहिजे. या सर्व गोष्टी या चौकशीमध्ये आल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे. कोट्यवधी रुपये खर्च करुन देखील आज कोकणातील धरणांची कामे बंद पडलेली आहेत. माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे यांच्याकडून मला अपेक्षा आहेत. आम्ही या सर्व सिंचन घोटाळ्याची चौकशी करु असे सांगावे आणि येत्या दोन वर्षामध्ये, तीन वर्षामध्ये, पाच वर्षामध्ये कोकणातील धरणांची कामे पूर्ण होण्यासाठी आज आम्ही तुम्हाला इतका निधी देतो असे सांगावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला असे मी म्हणणार नाही. आमच्या हातामध्ये भोपळा न देता एक ठोस रक्कम कोकणासाठी द्यावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी विदर्भासाठी 50 कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. त्याबद्दल मला आनंद वाटला. मी विधानसभेचा विरोधी पक्ष नेता असताना मी कोकणापेक्षा विदर्भावर अनेकदा बोलत होतो. विदर्भाला न्याय दिला पाहिजे याबद्दल दुमत नाही. कोकणामध्ये केवळ दीड टक्के सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो, सर्वात जास्त दुष्काळ कोकणात पडतो, सर्वात कमी सिंचन क्षमता कोकणात आहे. पश्चिम महाराष्ट्राबरोबर कोकणाची तुलना कधीच होऊ शकणार नाही. उद्या आमची सत्ता आली तरी आम्ही त्यांच्यासोबत जाऊ शकणार नाही. आमच्या हातून ते पाप होणार नाही. फावडा आपल्याकडे माती ओढतो हे ऐकले होते, जिसकी लाठी उसकी भैंस हे ऐकले होते. ज्याच्या हातात ससा तो पारधी हेही ऐकले होते. परंतु कोकणावर इतक्या मोठ्या प्रमाणात अन्याय होईल असे आम्हाला कधीच वाटले नव्हते.

सभापती महोदय, कोकणातील धरणांच्या कामांसाठी शासन भरीव मदत देऊ शकेल काय, सिंचन प्रकल्पांच्या कामांची सीबीआय मार्फत चौकशी केली जाईल काय, त्या चौकशीच्या माध्यमातून दूध का दूध, पानी का पानी हे महाराष्ट्राच्या जनतेला दाखवून दिले जाईल काय, अशी या निमित्ताने मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

-------

2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सिंचनाच्या संदर्भात या सभागृहात नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या विषयावर बोलत असताना आकडेवारीसह आपले मत मांडलेले आहे. या विषयावर अनेकदा चर्चा झालेली असल्यामुळे मी त्याचा पुनरुच्चार करणार नाही. या चर्चेचा आम्ही आग्रह का केला ? नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये दिनांक 17 डिसेंबर, 2012 रोजी शासनाने चितळे समिती नेमण्याची घोषणा केली होती. त्यामुळे मी मुंबईला मोठ्या आनंदाने आलो. माझे पी.ए.श्री.देशमुख यांना असे म्हटले होते की, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार आणि माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांचा चेहरा चांगला दिसतो. त्यावेळी सरकारला चितळे समितीचे गांभीर्य व भीती वाटली नाही. या विषयावर चर्चा उपस्थित केल्यानंतर ती वेडीवाकडी केली जाते. विरोधी पक्ष नेते व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार एकत्र बसून चितळे समिती ठरविण्यात आली. श्री.चंद्रकांत पाटील यांनी विद्यार्थी परिषदेमध्ये व संघामध्ये आपले आयुष्य घालविले आहे. श्री.चंद्रकांत पाटील आपले घरदार सोडून 13 वर्षे आपल्या विचारासाठी उत्तर प्रदेश व हिंदुस्थानामध्ये फिरले आहेत. त्यामुळे त्यांना कोणीही मॅनेज करु शकत नाही. आम्ही आणि मंत्री महोदयांनी एकत्र बसून ही चितळे समिती ठरविली आहे अशी खोटी चर्चा पसरविली जाते. हे चुकीचे आहे, हे कधीच होऊ शकत नाही. त्यावेळी आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. या महाराष्ट्रातील जनतेच्या चितळे समितीबाबत खूप अपेक्षा होत्या. जलसंपदा विभागाबाबत आरोप केले जातात, जलसंपदा विभागामार्फत जे सिंचन प्रकल्पाची कामे केली जातात त्याबाबतची प्रकरणे बाहेर काढली जात आहेत. त्या प्रकल्पांच्या कामाची चौकशी होत आहे असे आम्हाला वाटले होते. आम्ही त्याच अपेक्षेने नागपूर सोडले होते. श्री.चितळेही असे म्हणाले होते की, मी सर्व चौकशी करणार आहे. श्री.चितळे हे जलतज्ज्ञ आहेत, मी सर्व चौकशी करणार आहे असे त्यांनी नागपूरला स्टेटमेण्ट केले होते. पण तीन महिन्यांनी श्री.चितळे बदलले. आता ते असे म्हणत आहेत की, या चौकशीला मर्यादा आहे. पाण्याचे स्त्रोत किती आहे, किती ठिकाणी धरणे बांधली जाणार आहेत,

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील....

धरणे लवकर कशी बांधली जातील याची मी चौकशी करणार आहे. हे सर्व ऐकून आम्हाला धक्काच बसला. ही सर्व माहिती मिळविण्यासाठी ही चौकशी समिती नेमली नव्हती. ही माहिती आम्ही वेगळ्या मार्गाने मिळविण्यासाठी आम्ही केव्हाही पुन्हा मागणी केली असती. सिंचनाच्या कामामध्ये भ्रष्टाचार झाला असा आरोप केला जात आहे, माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी तो केला नसेल असे आम्हाला ते वाटते. ते माझे चांगले मित्र आहेत. मला ते परममित्र म्हणतात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

त्याच्यातून ते सुटले पाहिजेत असे वाटते. ज्याप्रमाणे माजी मुख्यमंत्री श्री.अंतुले साहेब अशा प्रकरणातून सुटले होते. मी या ठिकाणी सर्व रेकॉर्ड आणलेले आहे. या आरोपांमुळे आमच्या जिल्हयाचे नाव कमी झाले आहे, आम्हाला मान खाली घालावी लागते. हे खोटे आरोप आहेत, हे खोटे आरोप आहेत असे सिध्द झाले तर माननीय श्री.सुनील तटकरे यांच्यापेक्षा मला जास्त आनंद होईल. या ठिकाणी वेगवेगळया पध्दतीचे आरोप करण्यात आले, कामांचे एस्टीमेट वाढविले गेले, कामांची उंची वाढविली गेली, दगड नसताना तेथे दगड लागले असे दाखविले गेले, बोअर केले असतानाही त्या ठिकाणी परत बोअर केल्याचे दाखविले गेले. म्हणून 400-400 कोटी रुपयांनी कामांचे एस्टीमेट वाढले या संबंधी चौकशी झाली पाहिजे अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने अपेक्षा आहे. सिंचन विभागात करोडो रुपयांचे घोटाळे झालेले आहेत. जवळ जवळ 30 ते 40 टक्के बजेट जलसंपदा विभागावर खर्ची पडत आहे. महाराष्ट्रातील तमाम जनतेला कळले पाहिजे की, सिंचनासाठी पैशांचे वाटप कशा पध्दतीने करण्यात आलेले आहे. या ठिकाणी मी अनेक उदाहरणे देऊ शकतो. राज्यातील एकाही सिंचन प्रकल्पाला केंद्र शासनाकडून निधी मिळणार नाही. ही बातमी "नवाकाळ" या वृत्तपत्रात छापून आलेली आहे. "जलसंपदा खात्यांचा भोंगळ कारभार" असे शीर्षक त्या बातमीचे आहे. राज्यातील सिंचन प्रकल्पांना केंद्राकडून अधिक निधी मिळावा यासाठी राज्य सरकारने श्री.कृष्णानंद भट या ज्येष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. सिंचन प्रकल्पांसाठी अटी व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी जबाबदारी जलसंपदा विभागाची होती. श्री. भट यांनी जलसंपदा विभागाकडे वारंवार विचारणा केल्यावरही राज्याचा जलसंपदा विभाग ठिम्म होते. त्यामुळे सिंचन प्रकल्पांना केंद्रीय जल आयोगाकडून निधी मिळणे शक्य नाही असे दिसून येताच निराश झालेल्या श्री. भट यांनी राज्य सरकारचा फुकट पगार घेण्यापेक्षा राजीनामा दिलेला बरा असा विचार करुन त्यांनी राजीनामा दिला. राज्य शासनाकडून प्रकल्पांबाबत जी कागदपत्रे द्यावयास पाहिजे ती उपलब्ध करुन दिली जात नाहीत म्हणून केंद्राकडून पैसे मिळणार नाहीत. म्हणून राज्यातील एका अधिकाऱ्याने राजीनामा दिलेला आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाकडून आमची जी अपेक्षा आहे, ती अपेक्षा आजही पूर्ण होत नाही या बाबतचे मला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर हवे आहे. श्री. भट यांना शासनानेच

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

नेमणूक दिली होती. ते काही चुकीचे मार्गदर्शन करीत होते काय ? ते चुकीचे मार्गदर्शन करीत होते तर तसे या ठिकाणी सांगा. त्या बाबतीत माझे काहीही म्हणणे नाही. जर ते चुकीचे मार्गदर्शन करीत असतील तर अशा अधिकाऱ्याची आपण नेमणूक का केली याचा देखील खुलासा झाला पाहिजे. जे राज्याच्या विरोधात बोलतात. त्यामुळे राज्याची प्रतिष्ठा जाते. आपल्या विभागाचा एक अधिकारी आपल्या मंत्र्यांचा विरोधात बोलतो हे योग्य नाही. तो अधिकारी देखील श्री.पांढरे सारखा वेडा झाला होता काय ? श्री.पांढरे वेडे झाले म्हणून आपण मागे बोललो होतो. त्यांना मी मागे एकदा फोन लावला होता. तेवढाच माझा त्यांच्याशी संबंध आलेला आहे. सभागृहात एका प्रश्नाच्या अनुषंगाने मी विचारले की, केंद्र शासनाकडून सिंचन प्रकल्पांसाठी निधी आपल्याला मिळणार आहे काय ? यापुढे केंद्र शासनाकडून राज्य शासनास निधी मिळणार नाही. मी या ठिकाणी आकडेवारी सांगणार नाही. जी वस्तुस्थिती आहे तीच या ठिकाणी नमूद करणार आहे. या सभागृहात सिंचनाचा विषय प्रथम मी काढलेला आहे. माझे आणि माननीय श्री.सुनील तटकरे यांच्यामध्ये व्यक्तिगत भांडण नाही. ते माझे मित्र आहेत. सभापती महोदय, दिनांक 24 जुलै, 2013 रोजी महाराष्ट्र विधानमंडळातर्फे " पाणी समस्या आणि पाण्याचे व्यवस्थापन" या विषयी परिसंवाद आयोजित केला होता. जल तज्ज्ञ येणार आणि ते सरकारच्या बाजूने बोलणार असे वाटले होते म्हणून मी त्या परिसंवादाला उपस्थित राहिलो नाही. त्या परिसंवादाला अनुपस्थित राहिलो ही माझी चूक झाली....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

श्री.राजेंद्र सिंह यांना शासनाने विधिमंडळामध्ये बोलावले. ते शासनाविरुध्द बोलून गेले. त्यांच्या व्याख्यानाकरिता सभागृहाचे कामकाज बंद करण्यात आले. मध्यवर्ती सभागृहात त्यांनी शासनाच्या विरोधात विचार मांडले. राज्यातील आघाडी सरकारवर घणाघात करताना त्यांनी म्हटले की, राज्याच्या पाण्याची गरज वाढत असताना नियोजन होत असल्याचे दिसत नाही याचे कारण दूरदृष्टीचा अभाव असलेले राज्यकर्ते. असे खडे बोल सुनावताना राज्याची पाण्याची गरज त्यामुळे पूर्ण होत नाही, ही गंभीर बाब आहे. यामुळे राज्याचा शेतकरी भिकारी झाला आहे असे त्यांनी सुनावले. राज्यात सिंचनांचे तीन तेरा वाजून कंत्राटदार गब्बर झाले आहेत असेही म्हटले. राज्याच्या सिंचनाची व जलसंपदाची शोचनीय अवस्था कठोर शब्दात त्यांनी लोकप्रतिनिधींसमोर व्यक्त केली.

सभापती महोदय, आम्हाला शासनाकडून एवढीच माहिती हवी आहे की, या देशातील एक जलतज्ज्ञ विधिमंडळात येतो. ज्यांनी राजस्थानसारख्या वाळवंटी प्रदेशामध्ये शेती पिकवली. पंजाबातून राजस्थानमध्ये पाणी आणले. आपल्याकडे उपलब्ध असलेले पाणी आपण समुद्रामध्ये सोडून देत आहोत. यासभागृहात माननीय जलसंपदा मंत्री बोलले आहेत. दोन वर्षात कोयनेचे पाणी आम्ही मुंबईत आणू. मी लगेच फोन करुन त्यांचे अभिनंदन केले होते. संपूर्ण कोकणाला यामुळे पाणी मिळेल ही आमची आशा होती.

सभापती महोदय, या घोषणेचे काय झाले हे सभागृहाला कळले पाहिजे. खाजगीकरणातून हा प्रस्ताव राबविण्याचे सांगितले होते. कोकणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. जे आरोप कोर्टात होत आहेत त्या अनुषंगाने कोर्टाकडून वेगवेगळे आदेश दिले जात आहेत. हा विषय कुठे तरी थांबला पाहिजे. श्री.राजेंद्र सिंह असे म्हणाले की, जलसंपदा वाढली नाही, धनसंपत्ती वाढली. ठराविक लोकांची धनसंपत्ती वाढली आहे. अशा प्रकारचे आरोप थांबले पाहिजेत. आम्ही मागणी केलेल्या चर्चेबद्दल विरोध का होतो? मी आकडेवारी सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही. जी चौकशी सुरु आहे त्याकडे व्यवस्थित लक्ष देऊन कोर्टाने ज्या पध्दतीने आदेश दिलेले आहेत त्यानुसार सर्व अधिकार वापरुन पारदर्शकपणे सर्व माहिती दिली गेली पाहिजे. या प्रकरणाची चौकशी करणारे अधिकारी तीन चार वेळा बदलले आहेत. एसीबी विभागाकडून चौकशी करण्यात येत आहे. श्री.भारती नावाचे अधिकारी रुजू झाले आणि त्यांची दोनच दिवसात बदली करण्यात आली. हा प्रकार थांबला पाहिजे, अन्यथा चौकशी कशी पूर्ण होईल?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या चर्चेवर बोलण्यासाठी वेळेची मर्यादा घालून दिलेली आहे. याच सभागृहात लक्षवेधी सूचनेवर 40-40 मिनिटे चर्चा होते आणि नियमाचे बोट दाखवून अल्पकालीन चर्चेला वेळेचे बंधन घातले जाते याचीही चौकशी झाली पाहिजे. वेगवेगळे आरोप झालेले आहेत. मी बोललो तर या ठिकाणी त्याची चर्चा होईल.

नंतर 3टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

सभापती महोदय, कोर्टाचा अवमान करावयाचा नाही असे आपण म्हणता. परंतु हायकोर्टानेच माननीय सुनील तटकरे यांची चौकशी करण्याबाबत आदेश दिलेले आहेत व हा अहवाल 14 ऑगस्ट पर्यंत देण्यात यावा असे कोर्टच म्हणत आहे. कोर्टाने असेही म्हटले आहे की, तटकरेंचा तपास करतांना डोके वापरा. मी पुढचे वाचत नाही. नाही तर तुम्ही बेल वाजवून मला खाली बसवाल. राज्यातील एकाही सिंचन प्रकल्पाला केंद्राचा पैसा मिळणार नाही असे कोर्ट म्हणत आहे. शासन ज्या पध्दतीने सिंचन प्रकल्पांची चौकशी करीत आहे त्यामध्ये आपण महाराष्ट्रातील 11.5 कोटी जनतेची फसवणूक करीत आहात असे मला वाटते. या चर्चेच्या निमित्ताने सरकारकडून एवढेच अपेक्षित आहे की, यासंदर्भातील चौकशी पारदर्शक करु, नामदार हायकोर्ट जे जे आदेश देईल ते आम्ही पाळू. हायकोर्टाचे आदेश पाळतांना अडचणी येतात. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी दोन न्यायाधिशांच्या आणि एक जल तज्ज्ञांच्या अशा त्रिसदस्य समितीकडे द्या. त्यांना लागणारी सर्व कागदपत्र या त्रिसदस्य समितीला देण्यात यावी अशी मागणी मी या चर्चेच्या निमित्ताने करीत आहे. सिंचनाच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात माझ्याकडे अनेक पुरावे आहेत. यासंदर्भात मी कोणताही वाद घालत नाही. गेल्या आठ दिवसापासून या सभागृहाचे कामकाज या ना त्या कारणाने थांबले होते. हायकोर्टाने सिंचनाच्या संदर्भात जे ताशेरे मारलेले आहेत, सिंचनाच्या संदर्भात हायकोर्टाचा मूड पाहिला तर दूध का दूध नी पानी का पानी हे आज नाही तर उद्या झाल्या शिवाय राहणार नाही. आज ना उद्या सिंचनामध्ये कसा भ्रष्टाचार झाला, कोणी केला हे कळणार आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे माननीय श्री. शरद पवारांची भाषणे आहेत. मी पत्रकार म्हणून काम केलेले आहे. वरच्या गॅलरीत बसून त्यांच्या प्रश्नांना मी उत्तरे दिली होती. माननीय शरद पवारांवर टीका केलेली असतांनाही माननीय पवार साहेबांनी उत्कृष्ट भाषण केले म्हणून मी अभिनंदनही केलेले होते.

सभापती महोदय, माननीय श्री. अंतुले साहेबांवर आरोप होते. त्यामुळे माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे अपेक्षा आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात माझे मत वेगळे आहे. या राज्यातील कोणत्याही मंत्र्यांवर किंवा मुख्यमंत्र्यांवर कोर्टामध्ये केस दाखल झाली तर ते राजीनामा

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

देत होते. माननीय अंतुले साहेबांची केस 12 वर्षे चालली. 12 वर्षानंतर ते निर्दोष सुटल्यानंतर पुन्हा सभागृहात आले. आमचे तटकरे साहेब तशा प्रकारे पुन्हा येऊ शकतात. ते निर्दोष झाले तर बिनविरोध निवडणूक करु, लोकसभेत पाठवून देऊ. या राज्याची तसेच या विधिमंडळाची परंपरा आहे की, कोर्टाने आक्षेप घेतले, कोर्टाने केस दाखल करुन घेतली तर मंत्री महोदय पदावर राहत नव्हते त्यामुळे तशीच परंपरा माननीय मंत्री महोदयांनी पाळावी अशी अपेक्षा करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, घोटाळ्यांची आणि चौकशीची चर्चा कशी होते ते मी सांगणार आहे. सभागृहा बाहेर असलेल्या जनतेला असे वाटते की, सगळेच खोटे आहे. त्यामुळे लोकांचा व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. घोटाळे फक्त मंत्रालयात होतात अशातला भाग नाही. परवा मी नांदेडला होतो. लोहा कंधारचे काम होते. अधिकारी बीडचा होता. या कामाचे बिल निघाले जालन्याला. अशा पद्धतीने या खात्याचा कारभार चालत असेल तर लोकांचा संशय वाढणार हे स्वाभाविकच आहे. ज्या घोटाळ्यांची आम्ही चर्चा करतो त्या चर्चेच्या महापुरात सिंचन ज्याच्यासाठी आहे त्याकडे मात्र दुर्लक्ष होते. तो प्रश्न वाहून जातो याचे मला दु:ख होते. परवा आपण याच सभागृहामध्ये नाशिक विरूद्ध मराठवाडा असा संघर्ष पाहिला. माझा प्रश्न असा आहे की, आपण या सदनामध्ये अनेकवेळा सिंचनावर चर्चा केली आहे. पण मराठवाड्याला आम्ही पाणी का देत नाही, या प्रश्नाचे उत्तर या सदनामध्ये आजतागायत मिळालेले नाही, याचे दु:ख होते. गोदावरीचे पाणी जायकवाडीमध्ये सोडायला हवे होते. त्यावेळी नगर जिल्हा आडवा येतो. नगर जिल्हा आडवा येतो म्हणून मराठवाड्यामध्ये संघर्ष पेटतो. यात सत्ताधारी हस्तक्षेप करू पहात नाही. त्यांना कोण आडवे आले आहे ? घोटाळ्यांची चर्चा करायला आपल्याकडे वेळ आहे. पण मराठवाड्याला पाणी देण्यासाठी वेळ का नाही, हा माझ्या पुढे प्रश्न आहे. मला वेळ कमी दिल्या असल्यामुळे मी मुद्दे मांडणार आहे. या प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नावर ज्या पद्धतीने राजकारण केले जात आहे ते जलवंचितांच्या बाजूने होताना दिसत नाही. दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य कंत्राटदार आणि मोठ्या शेतकऱ्यांसाठी भांडत आहेत. जे खरे वंचित आहेत त्यांना प्यादी म्हणून वापरले जात आहे हे अधिक क्लेशदायक आहे.

गोदावरी खोऱ्याचे पाणी समन्यायी पद्धतीने वाटले पाहिजे. यासाठी लोकसमिती स्थापन करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. दुष्काळ प्रवण भाग कायमचा पाचवीला पुजलेला आहे. त्यामुळे सर्व भागांना समन्याय पद्धतीने पाणी कसे मिळेल या दृष्टीने शासनाने आपला कार्यक्रम जाहीर केला पाहिजे. लोकसहभागातून समिती नेमली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, परवा विधान मंडळामध्ये श्री.राजेंद्र सिंह येऊन गेले. दुष्काळ पडल्यावर कोणी तरी चांगला प्रयोग केल्यानंतर आपण त्याला ंडोक्यावर घेतो. मी शिरपूर पॅटर्न पाहिलेला आहे. तो अप्रतिम आहे. त्याबद्दल वाद नाही. शिरपूर पॅटर्न हा सर्व राज्याला लागू होऊच शकत नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अन्यथा जेथे वाळू आहे तेथे आपण उपसा करू आणि कातळ उघडे करू. त्यामुळे पाणी वाहून जाईल. म्हणून सगळीकडे एकच प्रयोग करणे हे अतिशय धोकादाय ठरेल. यासंबंधी जलतज्ज्ञ वेगवेगळ्या पद्धतीने प्रयोग करीत आहेत. मराठवाड्यामध्ये आंबेजोगाई येथे प्रयोग चालतो. त्याची पाहणी केली पाहिजे. हा प्रयोग कसा राबविण्यात येत आहे हे पाहिले पाहिजे. बळीराजा धरणाचा प्रयोग झाला. तो देखील पाहिला पाहिजे. असे काहीच पाहिले जात नाही. रेन वॉटर हार्वेस्टींग हे छप्परावरच्या पाण्याचेच असते असे नाही. जमिनीवर देखील ते वेगळ्या पद्धतीने करता येते. त्याद्वारे देखील अधिक पाणी मुरवता येते. पण त्यासाठी काहीही प्रयत्न करताना दिसून येत नाही. त्याला लोकही जबाबदार असतात. लोकांना पाणी दिसले की, पाणी आले असे वाटते. पाणी दिसले नाही की, पैसे फुकट गेले असे म्हणतात. यासंबंधी गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. तशी चर्चा कधी होत नाही. माझी माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे की, या चर्चेला आणि सिंचनाच्या प्रयोगाला आपण संयमाचे बंधारे बांधले पाहिजेत. ते जर आपण बांधले तर जे जलवंचित आहेत त्यांना त्याचा फायदा होईल. पश्चिम महाराष्ट्रातील माण, खानापूर, आटपाटी येथील जो जलवंचित आहे किंवा मराठवाडा जो भाग त्यांना आजही पाण्याची गरज आहे त्या दृष्टीने आपण आज कार्यक्रम जाहीर करावा. तो कार्यक्रम आपण अजूनही करीत नाही याचे दु:ख आहे. तो कार्यक्रम जाहीर करावा अशी मागणी करतो आणि थांबतो. धन्यवाद.

.............

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोणताही प्रस्ताव चर्चेसाठी असो. सत्ताधारी पक्षाकडील एका सदस्याचे भाषण झाल्यानंतर विरोधी पक्षाकडील सदस्याचे भाषण होते. ही अनुक्रमणिका आहे. परंतु आज विरोधी बाकावरील सदस्यांची भाषणे होत आहेत. सत्ताधारी बाकावरील एकाही सदस्याचे भाषण झालेले नाही. हा आमच्यावर एकप्रकारे अन्याय आहे. आपण आमच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी समर्थ आहात. तेव्हा आपण आमच्यावरील अन्याय दूर करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनामध्ये एसआयटीची मागणी केली होती. परंतु शासनाने समिती नेमली. ती समिती कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट अंतर्गत स्थापन करण्याची व तिच्या कार्यकक्षा वाढवाव्यात असा अल्पकालीन चर्चेचा विषय आहे.

सभापती महोदय, आम्ही जी मागणी केली होती ती न देता श्री.माधव चितळे यांची समिती नेमण्यात आली. राज्यात सिंचन क्षेत्रातील भ्रष्टाचाराची प्रकरणे गाजत असताना आर्थिक पाहणी, शासकीय कागदपत्रे किंवा शासनाने नेमलेल्या समित्यांच्या अहवालांच्या आधारे विरोधी पक्षांनी सिंचन क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा मुद्दा वारंवार उचलला होता. या आरोपांचे उत्तर म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी श्वेतपत्रिकेचे आश्वासन दिले. सिंचनावरील श्वेतपत्रिका म्हणजे केवळ सिंचन स्थिती दर्शक अहवाल नको अशी मागणी विधानसभेतील विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव खडसे पाटील यांनी आणि विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी व्यक्त करुन श्वेतपत्रिकेत कोणत्या बाबींचा समावेश असावा हे माननीय मुख्यमंत्री महोदयांना लेखी कळविले होते. परंतु विरोधी पक्ष नेत्यांच्या सूचना लक्षात न घेता शासनाने ही समिती नेमली.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने जी श्वेतपत्रिका काढलेली आहे ती श्वेतपत्रिकेच्या संकल्पनेला तिलांजली देणारी आहे. श्वेतपत्रिकेचा उद्देश हा केवळ राजकीय आहे. भ्रष्टाचाराचे आरोप झालेल्यांना क्लीन चीट देण्याचा आहे. जलसंपदा विभागाचे कामाचे दर शेजारील राज्यांपेक्षा कमी आहेत, हे अर्धसत्य सांगताना या राज्यांतील सिंचित क्षेत्राचे पिकाखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण महाराष्ट्रापेक्षा कसे जास्त आहे याचा सोयीस्कर विसर सरकारला पडला आहे.

सभापती महोदय, विविध प्रकल्पांवरील कामाची चौकशी करण्यासाठी शासनाने वडनेरे समिती, मेंढेगिरी समिती, उपासे समिती, कुलकर्णी समिती अशा विविध समित्या नेमल्या. त्याच बरोबर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी ओढलेल्या ताशेऱ्यांबद्दल श्वेतपत्रिकेत अवाक्षरही काढलेले नाही. कालबाह्य कायद्यांमध्ये करायच्या सुधारणा, नियमांचा अभाव याबद्दल श्वेतपत्रिकेत चकार शब्दही नाही.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, एखाद्या कामाबाबत भ्रष्टाचाराचे आरोप होतात त्यावेळी चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त केली जाते. चौकशीचा अहवाल आल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येते.

सभापती महोदय, "आर्दश"संबधी घोटाळा झाला म्हणून त्या संदर्भात समिती नेमण्यात आली. त्या समितीने सरकारला अहवाल दिलेला आहे. तो अहवाल या सभागृहात अजून सादर झालेला नाही.

सभापती महोदय, पाटबंधारे विभागात झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात मेंढेगिरी समिती, वडनेरे समिती, उपासे समिती, कुलकर्णी समिती अशा वेगवेगळ्या समित्या नेमल्या गेल्या.

सभापती महोदय, विदर्भातील सिंचन प्रकल्पाची किंमत वाढवून तब्बल 20 हजार कोटी रुपयांचा सिंचन घोटाळा झाल्याचे महालेखापाल यांच्या अहवालातून उघड झाले आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ते घटनात्मक पद आहे. महालेखापालांनी ऑडिट केल्यानंतर अशा प्रकारचा आरोप होतो. महोदय, प्रकल्पाच्या किंमती वाढविण्यासाठी विदर्भ पाटबंधारे महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी 15 ऑगस्ट या सार्वजनिक सुटीच्या दिवशी काम केल्याचे कॅगच्या अहवालातून समोर आले आहे.

महोदय, सिंचन घोटाळ्याची चोकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या चितळे समितीला कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत. त्यामुळे चितळे समिती या भ्रष्टाचाराची चौकशी करु शकत नाही. विदर्भातील जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, विदर्भातील सिंचन प्रकल्पात 20 हजार कोटी रुपयांचा जो घोटाळा झाला आहे त्या बाबत थातूरमातूर चौकशी केल्याचे दाखवून सरकार हा घोटाळा दाबण्याचा प्रयत्न करीत आहे की काय ?

महोदय, मी या ठिकाणी विशेषत: विदर्भाची स्थिती मांडणार आहे. कॅगने आपल्या अहवालामध्ये विदर्भातील सिंचन प्रकल्पांमध्ये 20 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे सविस्तर नमूद केले आहे. कॅगच्या अहवालातील प्रत्येक बाबी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु ज्या वेळी विदर्भातील सिंचन प्रकल्पांमध्ये 20 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे विदर्भातील जनतेला समजले त्या वेळी त्यांना धक्का बसला. विदर्भातील लाखो हेक्टर सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी सिंचन प्रकल्प उभे राहत असताना त्यात हजारो कोटी रुपयांचा घोटाळा होत असेल तर विदर्भाच्या पदरात आपण न्याय देऊ शकणार नाही.

महोदय, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री.देवेंद्र शिर्के यांनी दि.15 जानेवारी, 2009 ते दिनांक 18 ऑगस्ट, 2009 या 7 महिन्यांच्या काळात 38 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वी 38 प्रकल्पांची किंमत 6672 कोटी रुपये होती. परंतु दि.18 ऑगस्ट, 2009 मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर या प्रकल्पाची किंमत 26727 कोटी रुपये झाली. म्हणजेच पूर्वीच्या किंमतीच्या तुलनेत तब्बल 20 हजार कोटी रुपयांची वाढ झाली. हा चमत्कार कसा झाला याचे उत्तर या चर्चेच्या माध्यमातून मिळाले पाहिजे. लोखंड, सिमेंट, वाहतूक यांचे असे किती टक्के दर वाढले होते की, ज्यामुळे या प्रकल्पाच्या किंमतीत 20 हजार कोटी रुपयांची वाढ झाली ? महोदय, मी तर म्हणेन की, विदर्भातील आर्थिक अनुशेष संपविण्याचा हा कट आहे. आपण असे करुन विदर्भातील





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आर्थिक अनुशेष संपवू शकता, परंतु भौतिक अनुशेष संपवू शकत नाही. या निमित्ताने मी विचारतो की, महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री.देवेंद्र शिर्के यांनी प्रकल्पाच्या किंमती वाढविण्यासाठी शासनाची मान्यता घेतली होती काय, या बाबी समोर आल्या पाहिजेत.

महोदय, या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये 7 महिन्यात 300 टक्क्यांची वाढ केली आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वी हेक्टरी सिंचन खर्च 1 लाख 38 हजार रुपये होता. परंतु सुधारित मान्यता मिळाल्यानंतर तो खर्च 3 लाख 20 हजार रुपयांवर पोहोचला. इतका मोठ्या प्रमाणात खर्च वाढल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता नेमकी कोणत्या निकषांवर दिली गेली, हे समजले पाहिजे. प्रकल्पांच्या किंमतीत वाढ झालेले 20 हजार कोटी रुपये कोठे गेले आहेत ? विदर्भातील सिंचन प्रकल्पात 20 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला असला तरी, संपूर्ण राज्यात 70 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे कॅगने अहवालात नमूद केले आहे. हे 70 हजार कोटी रुपये पाण्यात गेले आणि त्यातून केवळ 1 टक्के सिंचन झाले. प्रत्यक्षात किती टक्के सिंचन झाले हा प्रश्न अनुत्तरीत आहे. या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.

महोदय, 38 प्रकल्पांपैकी 32 प्रकल्पांना जून-2009 ते ऑगस्ट-2009 या काळात म्हणजेच विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या काही दिवसांपूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. 32 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे त्यांची किंमत 19456 कोटी रुपये झाली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव वित्त वा नियोजन विभागाकडे गेला नाही. महामंडळाच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या शिफारशींचाही प्रस्तावात उल्लेख नाही. केवळ कार्यकारी संचालकांच्या शिफारशींवर थेट तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांनी या प्रस्तावांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेला मंजुरी दिली.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, अशा पध्दतीने कंत्राटदारांवर ही मेहरबानी कशासाठी झाली ? आता चितळे समिती याची चौकशी करु शकत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मागणी केली त्याप्रमाणे 2 न्यायमूर्तींची समिती नेमावी व त्या समितीमध्ये एक जलतज्ज्ञ नेमून या भ्रष्टाचाराच्या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. किंमती कशा वाढल्या, सुधारित प्रशासकीय मान्यता कशी दिली गेली, कोणत्या निकषावर दिली गेली, 7 महिन्यात विदर्भातील 38 प्रकल्पांची किंमत 20 हजार कोटी रुपयांनी कशी वाढली या सर्व प्रश्नांची उत्तरे या सभागृहाला मिळाली पाहिजे अशा प्रकारची मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. किरण पावसकर)** : यानंतर माननीय मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, मला पाच मिनिटे बोलू द्यावे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी परवानगी मागतात)

**तालिका सभापती** : आतापर्यंत विरोधी पक्षातील सदस्यच बोलले आहेत. सत्ताधारी पक्षातील एकही सदस्य बोललेले नाहीत. आता सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली तर त्यामध्ये आणखी एक तास जाईल. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये सर्वश्री विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. रणजित पाटील...

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, मला पाच मिनिटे बोलू द्यावे. माननीय मंत्री सुध्दा तयार आहेत. आपण बोलण्याची संधी देतो म्हणून आम्हाला सभागृहात थांबण्यास सांगितले.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, आम्ही आमचा वेळ सन्माननीय सदस्यांना देतो.

**तालिका सभापती** : आपला वेळ संपलेला आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सदस्य पावणेदोन तास बोलले आहेत. आता जर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली तर आम्हालाही बोलण्याची संधी द्यावी. माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उभे राहिले आहेत. त्यांचे उत्तर सुरु झाले आहे.

( विरोधी पक्षातील काही सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सत्ताधारी पक्षातील एकही सदस्य बोललेला नाही.

श्री. अमरसिह पंडित : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य पावणेदोन तास बोलले आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ MMP

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना उत्तराचे भाषण सुरु करण्यास सांगावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी कृपया खाली बसावे. या बाजूचे सर्व ज्येष्ठ सदस्य बोलले आहेत. त्यामध्ये सर्व मुद्दे आलेले आहेत असे मला वाटते. माननीय मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्यावे. माननीय मंत्री महोदयांनी आपले भाषण सुरु करावे. सन्माननीय सदस्यांनी पुढच्या कामकाजाचा वेळ वाया घालवू नये

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना पाच मिनिटे बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : या चर्चेसाठी दोन तासाचा वेळ दिलेला होता. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर व्हावयाचे आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांना आता बोलण्याची संधी दिली तर सत्ताधारी पक्षातील सदस्यांना सुध्दा बोलण्याची संधी द्यावी लागेल. सत्ताधारी पक्षातील एकही सदस्य बोललेले नाहीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना पाच मिनिटे बोलू द्यावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.किरण पावसकर)** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या अल्पकालीन चर्चेला दुपारी 3.30 वाजता सुरुवात झाली होती. या चर्चेसाठी अडीच तासाची वेळ निश्चित केली होती. त्यापैकी दीड तास विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. सत्ताधारी पक्षाकडून एकाही सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले नाहीत.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. गेल्या वर्षाचे हिवाळी अधिवेशन आणि या वर्षातील या अधिवेशनामध्ये सिंचन घोटाळ्यावर चर्चा होऊ द्यावी, अशी मागणी केली जाते. या विषयावर चर्चा सुरु असताना विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य ही चर्चा होऊ देत नाहीत. या अल्पकालीन चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. या सर्वांनी या विषयावर चर्चा केली, परंतु खोदा पहाड़ निकला चूहा अशी वस्तुस्थिती समोर आली आहे.

**तालिका सभापती** : याबाबत मंत्री महोदय उत्तरात सांगतील.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार यांना दोन मिनिटे बोलावयाचे आहे. त्यांचे विचार मांडून झाल्यावर आपण उत्तराला सुरुवात करावी.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी सिंचनाच्या संदर्भातील महत्वाच्या विषयावर सभागृहात अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेत असताना मी केवळ मुद्दे मांडण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सिंचनाच्या संदर्भात श्वेतपत्रिकेची मागणी करीत असताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी संपूर्ण भूमिका स्पष्ट केलेली आहे. कमिशन ऑफ इक्वायरी ॲक्ट अंतर्गत एसआयटीची स्थापना करण्याची त्यांनी मागणी केलेली होती. या ॲक्टखाली शासनाने ही समिती का स्थापन केली नाही हे प्रथम या सदनाला सांगणे आवश्यक आहे. हा माझा मूलभूत प्रश्न आहे. माझ्या हातामध्ये पार्लमेण्टचे नोटिंग आहे. देशाच्या संसदेचे असे म्हणणे आहे की, "The Government order public enquiry either by Executive Notice under the Public Service Enquiry or by making adhoc legislation." ज्या ज्यावेळी ॲडव्होक लेजिस्लेशन झाले, to meet the ever growing need for ever increasing demand of public enquiries the independent law has come in to the feature. कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट असे सांगतो की, ज्या प्रकरणामध्ये "Definite matter of public importance" असेल तेथे कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गतच समिती स्थापन झाली पाहिजे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, तुम्ही "Commission of Enquiry Act" खाली समिती का नाही केली ?. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, एका प्रकल्पासंबंधीची माहिती माझ्याजवळ आहे. एका सिंचन प्रकल्पाच्या भूसंपादनाची किंमत 1 कोटी 19 लाख रुपये इतकी होती. जागा संपादित न करता टेंडर्स काढण्यात आली आहेत अशी खूप प्रकरणे आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार....

आपण शेतक-यांना 1 कोटी 19 लाख रुपये द्यायला पाहिजे होते ते दिले नाहीत. प्रकल्पाला विलंब झाला. ठेकेदाराने आयडल पेमेंट चार्जेस मागितले. तेव्हा कोणकोणत्या प्रकल्पाच्या बाबतीत कितीशे कोटी रुपये आयडल पेमेंट चार्जेस दिलेले आहेत ? आपण शेतक-यांना 1 कोटी 19 लाख रुपये दिले नाहीत. परंतु ठेकेदाराला आयडल पेमेंट चार्जेस म्हणून 26 कोटी रुपये दिलेले आहेत. तेव्हा किती प्रकरणामध्ये आयडल पेमेंट चार्जेस दिलेले आहेत हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, माननीय अर्थ मंत्र्यांनी एक परिपत्रक काढून असा संदेश दिला की 1 कोटी रुपयावरील कोणतेही बिल वित्त विभागाच्या परवानगी शिवाय देऊ नये. वित्त खात्याची परवानगी न घेता किती प्रकरणामध्ये 1 कोटी रुपयापेक्षा जास्त किंमतीची बिले देण्यात आली. कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट खाली कारवाई का केली नाही, आयडल पेमेंट चार्जेस किती प्रकरणामध्ये किती दिले आहेत आणि वित्त विभागाने परवानगी दिली नाही अशी किती प्रकरणे आहेत, या तीन मुद्यांचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. सुनील तटकरे ( जलसंपदा (कृष्णाखोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी सिंचनाच्या प्रकरणांच्या संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये या ठिकाणी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली. ही चर्चा उपस्थित केल्या बद्दल मी माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि अन्य सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, या ठिकाणी एक प्रकारचा आभास निर्माण करण्यात आला. सुरुवातीला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी खोटे बोला पण रेटून बोला या सवयीमध्ये लहानाचे मोठे झाले असल्यामुळे त्यांना अशाच पध्दतीच्या विचारसरणीची सवय लागली आहे असे वाटते...(अडथळा)..

सभापती महोदय, सिंचनाच्या चर्चेला मी मागील तीन-चार अधिवेशनामध्ये उत्तरे दिलेली आहेत. गेल्या वर्षी जे अर्थसंकल्पीय अधिवेशन झाले त्याचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी केला. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने जे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये सिंचनाचे क्षेत्र किती वाढले यासंबंधी चर्चा झाली. गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालावर चर्चा होत असताना सन्माननीय ज्येष्ठ नेते श्री. गणपतराव देशमुख यांनी देखील विधानसभेमध्ये मुद्दा मांडला होता. त्याच प्रमाणे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे(पाटील) यांनी देखील मुद्दा मांडला होता आणि त्यावेळी देखील मी चर्चेला उत्तर दिले होते.

सभापती महोदय, गेले काही वर्षे आपण सातत्याने पहात आहोत, ऐकत आहोत... असे सांगितले जाते की, 72 हजार कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. 1952 सालापासून आजपर्यंत जो खर्च झालेला आहे तो 78 हजार कोटी रुपयाचा आहे.

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, या ठिकाणी मी सांगू इच्छितो की, 1951 पासून 73 हजार कोटी रुपये सिंचन प्रकल्पांवर खर्च झालेला आहे. या खर्चात गेल्या वर्षीचा खर्च अंतर्भूत नाही. 1951 सालापासून जे जे प्रकल्प झाले. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील तुमचा उल्ले्ख श्री.जयंत पाटील यांनी खूप चांगला केला. तुम्ही पुणे पदवीधर मतदार संघातून निवडून आलेला आहात. तुम्हाला याची निश्चित माहिती असेल की, गेल्या 50 वर्षामध्ये कोणते कोणते प्रकल्प कार्यान्वित झाले ?

सभापती महोदय, या वर्षी राज्यात पाऊस अतिशय चांगला चांगला आहे. त्यामुळे गेल्या दहा-पंधरा दिवसापासून वर्तमानपत्रातून वेगवेगळया बातम्याव्दारे, वेगवेगळया चर्चेच्याव्दारे महाराष्ट्रात आज वेगवेगळी धरणे आपणाला पहावयास मिळाली आहेत. आमचे सुदैव आहे की, या वर्षी महाराष्ट्रात किती धरणे आहेत याची आपल्याला जाणीव झाली आहे. तुम्हाला धरणा बाबतची माहिती होती. परंतु आपण जो काही आभास निर्माण केला, बोलण्याची जी काही पध्दती आहे, त्याप्रमाणे आपण सातत्याने बोलत आलात. कृष्णा खोऱ्याच्या परिसरामध्ये 1951 सालापासून कोणकोणते प्रकल्प झाले. महाराष्ट्रातील अंधार दूर होऊन प्रकाशमय जीवनाची पहिली सुरुवात झाली तो कोयनाचा वीज प्रकल्प आहे. उजनी प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर तो पांडुरंगाच्या चरणी समर्पित करताना या महाराष्ट्राचे द्रष्टे नेते स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांनी भाषण केले, ते भाषण तुम्ही आम्ही अजूनही ऐकतो. त्यांच्या त्या भाषणाचे आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण वेगवेगळया स्तरावर आपण करीत असतो. आपण भाषणाच्या अखेरीस वारसदारासंबंधी बोलण्याचा प्रयत्न करीत होतात. परंतु ते बोलणे तुम्हाला जमले नाही. वारसदार या नात्याने तुम्हाला काही टीका करावयाची होती. उजनीचे धरण लोकार्पित झाले त्यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण यांनी भाषण केले ते उजनीचे धरण, चासकमान धरण असेल, कुकडी प्रकल्प समुह असेल, खडकवासला प्रकल्प समुह असेल. खडकवासला प्रकल्पाचा उल्ले्ख सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केला. वारणा, धोम, दूधगंगा, कुंभी, कासारी, तुमच्या कोल्हापूर परिसरातील चित्री, चिकोत्रा, कोळेगाव, धूमकवडी, निरा देवधर, पवना इत्यादी धरणे 1951 साली झालेली आहेत. ही 72 हजार कोटीच्या खर्चात अंतर्भूत असलेले हे प्रकल्प आहेत. हे प्रकल्प अस्तित्वात आहेत की नाही याची

2...

श्री.सुनील तटकरे...

तुम्हीच माहिती द्यावी. छातीवर हात ठेवून सांगा. रामाचे नाव घेऊन सांगा. आणखी कोणाचे नाव घेऊन सांगावयाचे असेल तर सांगा. विदर्भात पेंच, उर्ध्व वर्धा, लोअर वर्धा, खातेपूर्णा, मोरणा, गोसीखूर्द, बेंबळा, चंद्रभागा, सपन, पेनटाकळी, खडकपूर्णा, निम्न वर्धा, पूस, लोअर पूस, अरुणावती, अडाण, सोनल हे प्रकल्प देखील 72 हजार कोटी रुपयांच्या खर्चातील आहेत. जायकवाडी, माजलगाव, मांजरा, पूर्णा, मन्यार, निम्न तेरणा, उर्ध्व पेनगंगा, विष्णुपुरी, सुकना, जीवरेखा, टेकू, बिंदूसरा, चांदनी, दूधना इत्यादी प्रकल्पही 72 हजार कोटी रुपयांच्या खर्चातील आहे. श्री.रामदास भाई, कोकणात भातसा, सूर्या प्रकल्प आहेत. मुंबईकरांना या दोन प्रकल्पातून पाणी पुरवठा केला जातो आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे आणि ॲड.आशिष शेलार आपण याच धरणांमधील पाणी पिण्यासाठी वापरता आहात. हे देखील प्रकल्प 72 हजार कोटी रुपये खर्चातील आहेत हे आपण विसरु नका. हा प्रबोधनाचा तास नसून उत्तराचा तास आहे हे मी या ठिकाणी मुद्दाम सांगतो. तिलारी, हेटवडे, वैतरणा, अर्जूना, नातूवाडी, काळकुंभे, ही धरणे देखील त्याच खर्चातील आहेत. नाशिक विभागात मुळा, गंगापूर, करंजवण, चणकापूर, गिरणा, वाघूळ, प्रकाशा, सारंगखेडा, सुलवाडे, नांदूर मध्यमेश्वर, निळवंडे, वाघाडे या प्रकल्पांखेरीज 250 मध्यम प्रकल्प आहेत. 3100 राज्यस्तरीय लघु प्रकल्प आहेत. हे सर्व प्रकल्प 72 हजार कोटी रुपये खर्चातील आहेत. या प्रकल्पांमुळे 49 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. मी एवढयासाठी प्रकल्पाची नावे सांगितली की, विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून सातत्याने बोलले जात होते की, इतक्या कोटी रुपयांचा सिंचन विभागात भ्रष्टाचार झाला. सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर यांनी सांगितले की, कॅगच्या अहवालात नमूद केले आहे की, विदर्भात सिंचनात 20 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. भ्रष्टाचार झाला असे कॅगच्या अहवालात असेल तर आमच्या पैकी कोणी सत्तेवर राहणार नाही. (अडथळा) माननीय श्री. फुंडकर साहेब, तुमच्या बद्दल माझ्या मनात कमालीचा आदर आहे. तुम्हाला विरोधी पक्ष नेते पदावरुन काढले त्याचे शल्य, त्याचे दु:ख तुमच्या पेक्षा जास्त आम्हाला आहे. मला माझे उत्तराचे भाषण पूर्ण करु द्यावे.

श्री.विनोद तावडे : आपण एवढे का रागावला आहात ?

3...



ABG/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 17:35

श्री.सुनील तटकरे : मी अजिबात रागावलेलो नाही. तुम्हाला तेथे बसविल्या बद्दल आम्हाला खूप आनंद आहे. कोकणातील एक माणूस विरोधी पक्ष नेता झाला या बद्दल खरोखरच मला आनंद झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. फुडकर साहेब आपण म्हणालात की, प्रशासकीय मान्यता सहा महिन्याच्या कालावधीत देण्यात आली. मी तपशील माहिती सांगण्याच्या एवढयासाठी प्रयत्न करीत होतो. या ठिकाणी आपण श्वेतपत्रिकेच्या बाबतीत उल्ले्ख केला.....

यानंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

आपले म्हणणे होते की, प्रकल्प रेंगाळल्यामुळे किंमतीमध्ये भरमसाठ वाढ झाली, अंदाजपत्रकामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी श्वेतपत्रिकेतील खंड 1 नजरेखालून घातला. खंड 2 कडे लक्ष दिलेले दिसत नाही. कारण त्यांना शब्दच्छल करायचा होता. त्यांनी वेगवेगळ्या विषयावर टीकाटिप्पणी करण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला आहे. पण खंड 2 जर वाचला तर 1952 सालापासून जे जे प्रकल्प हाती घेण्यात आले त्यात मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्प असतील त्या प्रत्येक प्रकल्पांची माहिती, त्यांच्या मूळ प्रशासकीय मान्यतेपासून आतापर्यंतचा खर्च नमूद केलेला आहे. किंमती का वाढल्या, खर्च कशासाठी वाढला याची सविस्तरपणे माहिती खंड 2 मध्ये त्या निमित्ताने नमूद केलेली आहे. ही माहिती देण्यामागची मनोभूमिका हीच होती की, जे आरोप केले जातात त्यातील सत्यता काय आहे हे महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजे. प्रकल्पांच्या किंमती वाढत असताना कशा पध्दतीने व कोणत्या कारणांमुळे वाढल्या याची स्पष्टता यावी यासाठी सरकारच्या वतीने ते डॉक्यूमेंट दिलेले आहे. त्यातील कोणतीही गोष्टी जर का आपल्याला आरोपित करायची असेल किंवा चॅलेंज करायची असेल तर मुभा असावी त्यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु प्रकल्पांची किंमत वाढत असताना अनावश्यक कारणामुळे वाढली असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे कोकणातील आहेत, माननीय विरोधी पक्षनेते हे देखील कोकणातील आहेत. कोकणातील बहुतांश प्रकल्प का रखडले याची त्यांनाही माहिती आहे. फॉरेस्टमुळे तर रखडलेच. पण वन संज्ञा लागू झाल्यामुळे ही अडचण निर्माण झाली. वन संज्ञेचा विषयावर आपण सातत्याने सभागृहात चर्चा केली आहे. कित्येक हजार हेक्टर जमीन वन संज्ञेखाली आल्यामुळे प्रत्यक्षात सुरु झालेले प्रकल्प आज थांबविण्याची वेळ आपल्यावर आली. गेल्या 8-10 वर्षात कोकणातील वेगवेगळे प्रकल्प, विदर्भातील वेगवेगळे प्रकल्प या कारणामुळे थांबले आहेत.

चंद्रपूर जिल्हयातील हुमन प्रकल्पाच्या संदर्भात 150 कोटी रुपये एनपीएची रक्कम म्हणून जलसंपदा विभागाने जमा करुनही तो प्रकल्प सुरु करु शकत नाही. तो प्रकल्प रेंगाळल्याबद्दल जलसंपदा विभागावर जबाबदारी टाकता येणार नाही हे सत्य आहे, हे वास्तव आहे. तुम्हाला सुध्दा हे निश्चितपणे ज्ञात आहे. केवळ आवाज करणे आणि राजकीय हेतूपोटी आरोप करणे हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

योग्य नाही. राजकारणासाठी आरोप करावे लागतात हे समजू शकतो. निवडणुका येतात त्यावेळी वेगळ्या पध्दतीने बोलावे लागते. गेल्या 15-20 वर्षात आम्ही पारदर्शकपणे काम केले आहे. आपल्याला साडेचार वर्षे सत्ता मिळाली होती हे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले. 35 वर्षाची तुलना केली गेली. साडेचार वर्षात आपण जे काम केले त्यावरुन महाराष्ट्रातील जनतेला पुन्हा तुमच्या हातात सत्ता द्यावी असे वाटले नाही. याचे कारण तुमचा साडेचार वर्षाचा कारभार लोकांना कळून चुकला. माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी जोशी सरांचे कौतुक केले गेले. तुम्हाला ते आवश्यक वाटले म्हणून तुम्ही केले. माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी ते नाव घेतले नाही कारण त्यांना कळले की आता नाव घेऊन काही उपयोग होणार नाही.

सभापती महोदय, मी एवढयासाठी म्हणालो की, 72 हजार कोटी रुपयांचा खर्च हा या सगळ्या प्रकल्पांसाठी झालेला आहे. हे प्रकल्प कार्यान्वित झाल्याचे तुम्ही आम्ही सर्व पहात आहोत. मराठवाड्याच्या पाण्याचा उल्लेख केला गेला. जायकवाडी प्रकल्पाच्या खर्चाचा अंतर्भाव या 72 हजार कोटी रुपयांमध्ये आहे. इतकी रक्कम खर्च होऊन एवढे प्रकल्प झाले असल्यामुळे 72 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार कुठे झाला हे दुर्बिणीच्या सहाय्याने शोधायचा प्रयत्न केला तरी काही उपयोग होणार नाही. स्वप्नात जे आकडे तुम्हाला पहायला मिळाले असतील ते तुम्हालाच लखलाभ होवो एवढे या प्रसंगी सांगतो.

सभापती महोदय, पृष्ठ 90 वर 42 हजार कोटी रुपयांचा तपशील दिलेला आहे. त्या खालील तळटीप वाचायचे सोयीस्कर बाजूला ठेवले. तळटीप देण्यात आली आहे त्यामध्ये भूसंपादन, पुनर्वसन यावर झालेला 6300 कोटी रुपयांचा खर्च, आस्थापनेवर झालेला 5600 कोटी रुपयांचा खर्च, प्रकल्प बांधकामावर झालेला 30500 कोटी रुपयांचा खर्च आणि उर्वरित खर्च बांधकामाधीन प्रकल्पासाठीचा आहे हे सुध्दा त्यात नमूद केले आहे. नॉन प्लॅन आणि प्लॅनचा उल्लेख झाला. माननीय विरोधी पक्षनेते हे त्यातील तज्ज्ञ आहेत. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री रामदास कदम, जयंत प्र.पाटील हे तज्ज्ञ आहेत. योजनेतर खर्च कशासाठी होतो हे त्यांना निश्चितपणे माहिती आहे.

नंतर 4सी.1...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

सभापती महोदय, योजनेतर खर्च हा पगारासाठी होत असतो हे तुम्हा सर्वांना माहिती आहे. आपण जे काही बॉंड घेतले होते त्या बॉंडच्या व्याजाचा परतावा हा नॉन प्लॅनमधून होत असतो हे आपल्यालाही माहिती आहे परंतु बेरीज जुळवायची असेल तर इकडची तिकडची बेरीज केल्याशिवाय बेरीज जुळत नाही म्हणून योजनेतर खर्चाचाही समावेश यामध्ये विरोधकांकडून करण्यात आलेला आहे. आपण जे काही कर्ज घेतलेले असते त्याच्या व्याजाच्या पोटी किंवा मुद्दलाचा परतावा नॉन प्लॅनमधूनच हा खर्च दिला जात असतो. योजनेतर खर्चाची बेरीज जरी केली तरी ती 70-80 हजार कोटीच्याच घरात आहे. आपण यासंदर्भात जो काही आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामध्ये खरे काय आणि खोटे काय याची माहिती लोकांना आहे.

सभापती महोदय, आपण सांगितले आहे की, 25-26 हजार कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता त्या कालावधीतच दिली गेली. कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन झाले तेव्हा कायद्यामध्येच कृष्णा खोरे महामंडळाला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते. 1998-99 मध्ये आपले सरकार होते तेव्हा हे अधिकार इतर दोन महामंडळाला प्रदान करण्यात आले होते. त्यावेळेस विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान झालेले नव्हते. या सभागृहात माननीय जयंत पाटील जेथे बसले आहेत तेथे माननीय बी.टी.देशमुख बसायचे आणि आज माननीय तावडे साहेब ज्या ठिकाणी बसलेले आहेत त्या ठिकाणी माननीय गडकरी साहेब बसत होते. त्यांनी मागणी केली होती की, इतर महामंडळाला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आहेत तर विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार दिले गेले पाहिजे अशी आग्रही मागणी याच सभागृहात, याच आसनावरुन माननीय गडकरी साहेबांनी व माननीय बी.टी.देशमुख साहेबांनी केली होती. तसेच माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशातून सारे अधिकार विदर्भ विकास महामंडळाला देण्यात आले. माननीय फुंडकर साहेब आपण त्यावेळस उपस्थित होता परंतु आज मात्र सोयीस्कर रित्या विसरलात. त्यावेळी वित्त विभागाचे अधिकारी अडथळा निर्माण करीत आहेत, हे कोण उप सचिव आहेत असा उल्लेख त्या कालावधीत करण्यात आला होता. त्यामुळेच विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय अधिकार देण्याचा निर्णय त्या कालावधीत घेतला गेला. विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय अधिकार देण्याची मागणी विरोधी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

पक्षाकडून होती. अनुशेष निमूर्लनाच्या बाबतीतील अंश त्यामध्ये होता. त्यामुळेच विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय अधिकार दिले गेले.

विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय अधिकार होते किंवा नव्हते यासंदर्भात आपण जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यामुळे ते अधिकार विदर्भ विकास महामंडळाला प्रशासकीय अधिकार कशा प्रकारे दिले गेले याची माहिती देणे माझे कर्तव्य आहे.

सभापती महोदय, एखादा प्रकल्प सुरु व्हावयाचा असेल किंवा एखादा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासंबधीचे धोरण घेत असतो त्यावेळेला त्याची सुरुवात खूप अगोदर होत असते. तो कालखंड नेमका सहा महिन्याचा होता. 6 हजार कोटी रुपयांचे 26 हजार कोटी रुपये झाले असे सांगण्यात आले. आपण जे सांगता तसे नाही तर हे प्रकल्प खूप पूर्वीपासून प्रस्थापित होते. विदर्भाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी दांडेकर समिती नेमली गेली, अनुशेष समितीही नेमली गेली व त्यानंतर वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात आले. त्यावेळेस माननीय राज्यपाल महोदयांच्या सुत्रांची मान्यता घेतली नव्हती. सन 2000 मध्ये जेव्हा लोकशाही आघाडीचे सरकार आले त्यावेळेस नागपूरला जेव्हा मंत्रिमंडळाची बैठक झाली होती त्यावेळेस हे सूत्र शासनाने मान्य केले व त्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांच्या सुत्रांच्या आधीन राहून निधी वाटपाचे धोरण राज्य सरकारने मान्य केले. त्यामुळे गेल्या काही वर्षामध्ये विदर्भाला खूप मोठया प्रमाणात निधी मिळाला. आतापर्यंत विदर्भाला जो निधी मिळाला तो सर्वात जास्त आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. विदर्भामध्ये किती रक्कम खर्च झाली याचीही माहिती आपल्याला आहे. इतके प्रकल्प होऊनही अजून पर्यंत 20 हजार कोटी रुपये विदर्भात खर्च होऊ शकले नाही असे वाटत असेल तर 20 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार कसा काय होऊ शकतो ? खरे म्हणजे माननीय सदस्यांकडून असे बोलणे मला अपेक्षित नव्हते. कॅगने असे काहीही म्हटले नाही. प्रकल्पाच्या किंमती वाढणे, शासकीय मान्यता देणे म्हणजे खर्च झाला असे जर आपण तर्कसंगत विधान करीत असाल तर त्याचे उत्तर कधीच कोणाला देता येणार नाही. साप साप म्हणून आपण भुई थोपटण्याचा प्रकार करीत राहतो त्यामध्ये काठी मोडेपर्यंत थोपटले तरी त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. त्यामुळेच यासंदर्भात मी खुलासा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, हे सारे होत असतांना प्रकल्प रेंगाळले.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

गोसीखुर्द प्रकल्पाची व्याप्ती खूप मोठी आहे. देशातील केवळ चार प्रकल्पांना राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता मिळालेली आहे. त्यातील एकच प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहे तो म्हणजे महाराष्ट्रातील गोसीखुर्द प्रकल्प आहे. त्यात अनियमितता झाली आहे, काही कामे चुकीची झालेली आहेत. त्यासंबंधी कठोर कारवाई करण्यात येईल. पण एक प्रश्न आपण आपल्या मनाला विचारू शकता की, गेल्या 3 वर्षात 3 गावांचे पुनर्वसन झाले नाही म्हणून आज आम्ही 32 टीएमसी पाणी सोडत आहोत. महाराष्ट्रात पाण्याच्या एका थेंबासाठी संघर्ष होत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, जायकवाडी प्रकल्पासंबंधी आमच्याच पक्षातील आमदारांमध्ये मतभेद झाले. ते मी नाकारीत नाही. आम्ही 32 टीएमसी पाणी का सोडून देत आहोत याचा गांभीर्याने विचार करावा. नर्मदा खोऱ्या संबंधी आपण वेगवेगळे बोलू शकतो. तेथील धरणाची उंची वाढविण्यासंबंधी गुजरातचे माननीय मुख्यमंत्री महोदय आम्हाला सांगतात तेव्हा आम्ही सकारात्मक भूमिका घेतो. तेव्हा गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी अडविण्यासाठी सकरात्मक भूमिका आम्ही का घेत नाही हे देखील आपण समजावून घेणे आवश्यक आहे. मी आरोप करीत नाही. विदर्भ वेगळा हवा की नाही यावर आयबीएन लोकमत वाहिनीवर चर्चा सुरू होती तेव्हा माझे परम मित्र श्री.जयंत प्र.पाटील यांची सुरूवातीची वाक्ये मी येथे पुन्हा उद्‌धृत करतो. त्यांनी सर्व पक्षांसंबंधी आपले मत व्यक्त केले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रत्येक वाक्याकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष असते.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपल्या वाक्याची पुनरूक्ती करीत नाही. मी वेगळ्या ठिकाणी जात नाही. माझ्या सांगण्याचा मतितार्थ असा आहे की, आज 32 टीएमसी पाणी वाया जात आहे. आम्ही गावाचे पुनर्वसन करण्यासाठी निधी दिलेला आहे. त्यानंतर एकदा पॅकेज देण्यात आले हाते. त्यानंतर पुन्हा पॅकेज देण्यात आले. आता देखील माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांनी 1200 कोटी रूपयांचे पॅकेज दिले आहे. त्यामुळे माझी किमान अपेक्षा आहे की, या वर्षी हा प्रकल्प पूर्ण करून



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

32 टीएमसी पाणी अडवूया. या पाण्यामुळे 1 लाख 60 हजार हेक्टर सिंचन क्षेत्र या वर्षीच निर्माण करू शकतो. एवढी या पाण्यामध्ये सिंचन क्षमता आहे. आपण त्याचा विचार करूच शकत नाही. काही गोष्ट ह्या न बोलता समजायच्या असतात. जसे आपले चालत असते तसे आमचे चालत असते. आज सकाळी चर्चेच्या माध्यमातून खारपाण पट्टयांचा उल्लेख करण्यात आला.

**उप सभापती** : मी सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, दो जिस्म मगर एक जान है हम अशा प्रकारची आपली आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची युती झाली आहे असे आमचे इम्प्रेशन झाले आहे. त्यांच्याशी युती कशी झाली ते आम्हाला कळत नाही.

श्री.सुनील तटकरे : असे आपण काही बोलू नका. असे बोलल्यामुळे माझे काही तरी भलतेच व्हायचे.

सभापती महोदय, 10 लाख 56 हजार हेक्टर चा उल्लेख श्वेतपत्रिकेत करण्यात आला आहे. सिंचनामध्ये किती वाढ आहे हे देखील नमूद केले आहे. श्वेतपत्रिकेतील काही भाग आपण आपल्या सोयीनुसार वाचत आला आहात. या श्वेतपत्रिकेतील पान क्र.120 वर आपले लक्ष वेधू इच्छितो. या पानावर युती शासनाच्या कालावधीत सिंचनाच्या टक्केवारीमध्ये किती वाढ झाली हे नमूद केले आहे. या पानावर वाढ झाली नसल्याचे नमूद केले आहे. 1994-95 मध्ये सिंचनाची टक्केवारी 15.81 दाखविली आहे. 1995-96, 1996-97, 1997-98, 1998-99 या चार वर्षामध्ये आपल्या पक्षाकडे हा विभाग असताना त्यावेळी चार वर्षातील सिंचनाची टक्केवारी 15.41 होती. आपण 15.81 वरून 15.41 टक्क्यांपर्यंत आला. याचा अर्थ आपल्या युती शासनाच्या काळात दहा हजार कोटी रूपये खर्च करून सिंचन क्षेत्रात वाढ झाली नाही. ही सर्व माहिती पान क्र.102 वर देण्यात आली आहे. माझा सांगण्याचा मतितार्थ एवढाच आहे की, आर्थिक पाहणी अहवालामध्ये कृषी विभागाचे आकडे हे अस्थायी आहेत हे स्पष्ट नमूद केले आहे. आपल्याही कालावधीत तेच होते. याचा अर्थ आपण असे म्हणू शकत नाही की, दहा हजार कोटी खर्च होऊन 0.4 टक्के सिंचनाचे क्षेत्र कमी झाले.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

माझा सांगण्याचा मुद्दा तोच आहे की, गेल्यावर्षी श्वेतपत्रिका काढली त्यावेळी 5.17 होती हे निश्चितपणे खरे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी बिगर सिंचन पाणी वाटपा संदर्भातील उल्लेख झाला. आपले उद्योग प्रवण राज्य आहे. दरवर्षी आपणास 1700 ते 1800 कोटी रुपयांची पाणीपट्टी मिळते. मागील दहा वर्षात बिगर सिंचनाच्या पाण्याचा वापर खूप मोठ्या प्रमाणावर वाढला. आपण वेगवेगळ्या चर्चेच्या माध्यमातून सांगतो की, महाराष्ट्रामध्ये नागरीकरण वाढले आहे. मधाशी आपण फ्लशचा उल्लेख केला. तो संदर्भ वेगळा होता. पण आपणास काही वेळा टीका करण्याचा मोह आवरत नाही म्हणून तो उल्लेख ओढूनताणून आणण्याचा उल्ल्ेख केला. मागील दहा वर्षात आपण बिगर सिंचनासाठी 67 टीएमसी पाणी दिले. त्यातून आपणास किती पाणीपट्टी मिळते हा गौण मुद्दा आहे. शहरामध्ये वाढत असलेल्या नागरीकरणाला आवश्यक पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे. पण याठिक्‍ाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक अजब तर्कशास्त्र मांडले. या संदर्भात आपण वेगळे डिबेट करु. पण आपण जे सांगत आहात ते निखालस असत्य आहे. कारण त्यातून काही साध्य होऊ शकत नाही. आपण ज्या पाण्यावर ट्रीटमेंट करतो त्या पाण्याचा वापर इतर कारणांसाठी होत नाही. ते पाणी त्या भागातील विविध कारणांसाठी वापरले जाते. त्यामध्ये शाश्वत स्वरुपाचे पाणी कुठे कमी होते अशातला काही भाग नाही. या प्रश्नांची उत्तरे वेगवेगळ्या पातळ्यांवर देण्यात आली आहेत म्हणून आपण त्या संदर्भात ठोसपणे बोलू शकला नाहीत.

सभापती महोदय, या ठिकाणी चौकशी समितीचा उल्लेख करण्यात आला. आपण ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख केला त्या सर्व गोष्टीं त्यामध्ये अंतर्भूत आहेत. मेंढेगिरी समितीचा अहवाल आपण स्वीकारुन अेटीआर दिला. त्यावर वेगवेगळ्या आयुधांमार्फत चर्चा होऊन अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित झाली.

याठिकाणी सुधारित प्रशासकीय मान्यता असा शब्दप्रयोग वापरण्यात आला. महामंडळाने सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या किंमतीतील वाढ, त्याची कारणे, प्रचलित नियम आणि अधिकारानुसार सुसंगत असल्याची तपासणी करणे, प्रकल्पांच्या विलंबाच्या कारणांची तपासणी करणे, मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये झालेल्या बदलाची कारण मीमांसा तपासणे, किंमतीत झालेल्या वाढीची तपासणी करणे, या सर्व गोष्टी चौकशीमध्ये अंतर्भूत आहेत.

..2..

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, या ठिकाणी उपसा सिंचन योजनेचा उल्लेख करण्यात आला. खरे म्हणजे् यापूर्वी सुध्दा उपसा सिंचन योजना झाल्या. जायकवाडी परिसरामध्ये उपसा सिंचन योजना करण्यात आल्या हे आपणास ज्ञात आहे. युती शासनाच्या काळात सर्वाधिक उपसा सिंचन योजना झाल्या. त्या उपसा सिंचन योग्य होत्या किंवा नव्हत्या, आज त्याची उपयुक्तता आहे किंवा कसे हे नंतर पाहू. महाराष्ट्रातील काही परिसर असा आहे की, त्या ठिकाणी उपसा सिंचन योजना केल्याशिवाय तेथे पाणी जाऊ शकत नाही. तेव्हा आपणास उपसा सिंचन योजना करणे अपरिहार्य आहेच. पण त्याची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून त्याचा अंतर्भाव यामध्ये केलेला आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागातील प्रकल्पांच्या कामांच्या गुणवत्तावाढीची उपाययोजना करणे हा त्यातील एक भाग आहे. ठरविलेल्या मुदतीत व खर्चात प्रकल्प पूर्ण करण्याकरिता उपाय योजना सुचविणे, सिंचन क्षेत्रात वाढ होण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे सदर चौकशीत अनियमितता आढळल्यास त्या बाबत जबाबदारी निश्चित करणे आणि योग्य ती कारवाई सुचविणे.

सभापती महोदय, गेले काही दिवस आम्ही 72 हजार कोटी रुपये खर्च केले असे सतत ऐकत आहोत. श्वेतपत्रिकेच्या खंड 2 मध्ये आतापर्यंत झालेल्या प्रत्येक प्रकल्पनिहाय खर्चाची माहिती दिलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

प्रकल्पनिहाय निश्चितपणे ज्ञात आहे. त्यामुळे या संदर्भात अजून काही वेगळे मांडण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. मी या ठिकाणी माधवराव चितळे समितीच्या कार्यकक्षा काय आहेत हे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे आक्षेप नोंदविले आहेत त्याची पडताळणी ती समिती करु शकते. एखाद्या प्रकरणी अनियमितता झाल्याचे आढळून आले तर तो अनियमितपणा कोणी केला, का केला किंवा अनियमितता करणाऱ्यांवर काय कारवाई करावी हे सुचविण्याचा अधिकार माधवराव चितळे समितीला देण्यात आला आहे. त्यामुळे अजून काही वेगळ्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

महोदय, राज्यात आतापर्यंत झालेल्या सिंचन प्रकल्पांवरील खर्च किती आहे, त्या प्रकल्पाची उपलब्धी काय आहे हे या चर्चेच्या माध्यमातून राज्यातील जनतेला सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. मी मराठवाड्यातील जनतेला सांगू इच्छितो की, गेले दोन दिवस उत्तम पाऊस पडत आहे. आज जायकवाडी धरणात 4 टीएमसीच्या आसपास पाणीसाठा आहे. भंडारदरा, निळवंडे, मुळा धरणातील ओव्हरप्लोमधील पाणी आज संध्याकाळपर्यंत सोडल्यानंतर येत्या चार-पाच दिवसांत जायकवाडी धरणात 14-15 टीएमसी पाणी 100 टक्के उपलब्ध होईल अशी मी या चर्चेच्या निमित्ताने ग्वाही देतो.

महोदय, मागच्या चर्चेच्या वेळी मराठवाड्यातील 18 टीएमसी पाणी अडविण्यासाठी तसेच 600 हेक्टरच्या आतील छोटेछोटे प्रकल्प घेण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणला जाईल असे मी आश्वासन दिले होते. आज मंत्रिमंडळाची बैठक आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत छोट्याछोट्या प्रकल्पांना मान्यता देण्याबाबत माननीय राज्यपाल महोदयांना विनंती करण्याचा ठराव पारित केला जाईल. मराठवाड्यातील 18 टीएमसी पाणी अडविण्याच्या दृष्टिकोनातून आणि 600 हेक्टरच्या आतील प्रकल्प मंजूर करण्याचा निर्णय 100 टक्के घेतला जाईल.

महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, कोकणातील वेगवेगळ्या प्रकल्पांचा आढावा सरकारने घेतला आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्पांच्या बाबतीत काही अडचणी आहेत. त्या प्रकल्पांच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी आपल्याला एकत्रित बसावे लागेल. ते प्रकल्प विशेषत: भूसंपादन आणि पुनर्वसनाच्या कामामुळे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

रखडले आहेत. विशिष्ट कालावधीत ते प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील, एवढेच या निमित्ताने सांगतो.

महोदय, म.वि.प. नियम-97 अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेला राईट ऑफ रिप्लाय नसतो. परंतु सन्माननीय सदस्यांना 10 वेळा प्रश्न विचारण्याची मुभा आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना जी काही उत्तरे द्यायची आहेत ती आम्ही देऊ. या चर्चेच्या माध्यमातून विरोधी पक्षाकडून जो आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला तो वस्तुस्थितीला धरुन नाही. श्वेतपत्रिकेमध्ये प्रकल्पनिहाय, महामंडळनिहाय माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांना प्रत्येक गोष्टींची माहिती श्वेतपत्रिकेमध्ये उपलब्ध आहे.

महोदय, विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या चर्चेच्या माध्यमातून जलसंपदा विभागाने केलेली कामे लोकांच्या समोर आणण्याची मला संधी मिळाली. जसजशा निवडणुका जवळ येतील तसतसे विरोधकांना नवीन नवीन सुचेल. खोटे बोल, पण रेटून बोल, हा कार्यक्रम विरोधकांनी कितीही राबविला तरी, महाराष्ट्रात चौथ्यांदा हे लोकशाही आघाडीचे सरकारच येणार आहे या बद्दल कोणाच्याही मनात शंका नाही, एवढेच या निमित्ताने सांगतो व येथेच थांबतो.

श्री.रामदास कदम : महोदय, माननीय मंत्र्यांनी विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रकल्पांबाबत सांगितले. मी त्यांना विचारु इच्छितो की, कोकण महाराष्ट्रात नाही काय ? आपण कोकणातील सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणार काय ? कारण कोकणातील पाणी समुद्राला जाऊन मिळते.

श्री.सुनील तटकरे : महोदय, कोयनेचे वाया जाणारे 67 टीएमसी पाणी मुंबईला आणण्यासाठी एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट प्रसिध्द केले आहे. ते प्राप्त झाले असून, त्याची छाननी सुरु आहे. त्यानंतर ते पायाभूत सुविधा समितीपुढे पाठविले जाईल. कोकणातील वेगवेगळे प्रकल्प कशामुळे थांबले आहेत, त्या बाबत निश्चितपणे एखाद्या वेळी निश्चितपणे चर्चा करु या.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम : आपण चर्चा कसली करता, निधी द्या.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना काही बोलावयाचे आहे का ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या शासनाकडून कोकणावर सातत्याने अन्याय होतो. शिवशाहीचे सरकार गेल्यानंतर कोकणातील धरणांसाठी पैसे दिलेले नाहीत. कोकणावर अन्याय होणार असेल तर आम्ही सभागृहामध्ये कधीही येणार नाही. प्रत्येक वेळेला जर कोकणाला वाटाण्याच्या अक्षता मिळणार असतील तर आम्ही या सभागृहामध्ये कशासाठी यावयाचे ? आम्ही कोकणात जाऊन लोकांना काय सांगणार, आमच्या भावनांचा कधी विचार होणार आहे की नाही ? सन्माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, मी गांभीर्याने बोलत आहे. आपण कोकणातील धरणांच्या बाबतीत निधीची व्यवस्था कधी करणार आहात ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एक गोष्ट निश्चित आहे की, प्रत्येक महामंडळाला मिळणारा निधी हा माननीय राज्यपालांच्या निर्देशाच्या अनुषंगाने मिळत असतो. कोकणाला मिळणारा 540 कोटी रुपयांचा निधी दरवर्षी जेवढा नियतव्यय आहे....

श्री. रामदास कदम : कोकणाचे पैसे पश्चिम महाराष्ट्रामध्ये नेले जातात.

श्री. सुनील तटकरे : हा आपला आरोप अतिशय चुकीचा आहे. एकदा नागपूरच्या बैठकीच्या निमित्ताने श्री. किंमतकर उपस्थित होते. आमचे राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. श्री. किंमतकर यांच्या समोरच मी सांगितले की, विदर्भातील एकही रुपया पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेला असेल तर तसे दाखवा. तसेच मी जबाबदारीने सांगतो की, कोकणातील सुध्दा एकही रुपया कोठेही वळविला गेला नाही. ते प्रकल्प पूर्ण केले पाहिजेत यामध्ये कोठेही दुमत असण्याचे कारण नाही. कोकण वैधानिक विकास महामंडळ कलम 371(2) खाली नाही...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे यांचे भाषण आम्ही शांतपणे ऐकत होतो. त्यांचे भाषण नेहमीप्रमाणे चौफेर होते. त्यामध्ये त्यांनी स्पेसिफिक काही सांगितले नाही. मी अनेक भ्रष्टाचाराचे आरोप केले. श्री. तटकरे साहेब यांना मी आव्हान देतो की, आपण 4 प्रकल्प घेऊ आणि दक्षता समिती, मीडिया, तुम्ही आणि मी त्या ठिकाणी जाऊ. कोठे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

भ्रष्टाचार झालेला आहे हे मी दाखवून देतो. आपण हे आव्हान स्वीकारता का ? आपण चितळे कमिटी कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्टखाली आणता का ? आपण जर स्वच्छ आहात तर आता घोषित करा की, आम्ही चितळे समिती कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्टखाली आणतो. दूध का दूध, पानी का पानी होऊ द्या. आपण आव्हान स्वीकारावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते नेहमीप्रमाणे तावातावात बोलत आहेत.

श्री. विनोद तावडे : मी आपल्याला चार प्रकल्प सांगतो.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, चितळे समितीच्या कार्यकक्षेत सर्व प्रकल्प आहेत. त्यामध्ये कोणताही प्रकल्प नाही असे नाही. महाराष्ट्रातील मोठे, मध्यम आणि लघु अशा सर्व प्रकल्पांची चौकशी करावी असे त्यामध्ये अंतर्भूत आहे. त्यामधून कोणताही प्रकल्प स्किप होऊ शकत नाही.

**उप सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. यानंतर अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडावा.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या सकाळी 10.00 वाजता चर्चेला घ्यावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आधी दोन विधेयके घ्यावीत.

**उप सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नाही त्यामुळे मी सभागृहाची बैठक 6.15 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे. 6.15 वाजता अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6.09 ते 6.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**</u>

श्री.राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 23 - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, 2013, हे विधेयक सभागृहासमोर चर्चेकरिता दर्शविण्यात आलेले आहे. सदर विधेयक चर्चेसाठी घेण्यात यावे आणि चर्चेअंती सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : आज कामकाजपत्रिकेवर अंतिम आठवडा प्रस्ताव दर्शविलेला आहे. मंत्री महोदयांनी उल्लेख केलेल्या विधेयकावर या सभागृहात सांगोपांग चर्चा व्हावी अशी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. त्यामुळे हे विधेयक यथावकाश चर्चेसाठी घेण्यात येईल. जेणे करुन दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले विचार मांडता येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेत्यांची बैठक झाली होती. त्यानुसार सरकारकडून आज सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्याबाबतची घोषणा दुपारी 4 वाजता करण्यात येणार होती. आता सायंकाळचे 6.15 वाजलेले आहेत. त्यामुळे याबाबत काय झाले आहे ते आम्हाला समजणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : यासंबंधी विचारणा करुन आजची सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी मी आपल्याला सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

**पृ.शी.**: खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXVI OF 2013

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA KHADI AND VILLAGE INDUSTRIES ACT.)

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 26, महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 26 महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 26 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2013चे वि.स.वि.क्रमांक 26 संमत झाले आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येईल. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी तो मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, महत्वाच्या विषयावर अंतिम आठवडा प्रस्ताव असताना सभागृहामध्ये माननीय नगरविकास मंत्री उपस्थित नाहीत. ते सभागृहामध्ये हजर होईपर्यंत सभागृहाची बैठक 6.30 वाजेपर्यंत स्थगित करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक 6.30 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6.23 ते 6.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

**---**

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.किरण पावसकर )**

**पृ.शी.**: एमएमआरडीए क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**मु.शी.**: एमएमआरडीए क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना या विषयावर सर्वश्री विनोद तावडे,रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, जयंत प्र.पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री. भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे यांचा प्रस्ताव.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"सभापती महोदय एमएमआरडीए क्षेत्रातील मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, भिवंडी, वसई-विरार, मिरा-भाईंदर इत्यादी महानगरपालिकांमध्ये निधी अभावी रस्ते विकास, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व दळणवळणाच्या समस्या निर्माण होणे, या क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी नेमलेल्या मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मेट्रो रेल्वे प्रकल्प, मोनो रेल्वे प्रकल्प, कांदळवन उद्यान इत्यादी प्रकल्पांची घोषणा करणे, परंतु सर्व प्रकल्पांचे काम रखडलेले असणे, सर्व प्रकल्पाचे काम रखडल्यामुळे मुंबईत दळणवळणाच्या समस्या निर्माण होणे, ही कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याची आवश्यकता असताना एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांकडून संबंधित कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात न येणे, घनकचरा व्यवस्थापनाचे काम एमएमआरडीए मार्फत रामकी या काळ्या यादीत असलेल्या भ्रष्ट कंपनीस देण्याचा घाट शासनामार्फत घालण्यात येणे, एमएमआरडीए मध्ये भ्रष्टाचार होत असताना म्हाडा व सिडकोमध्ये भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही त्यांच्यावर कारवाई न होणे, धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना व या वर्षी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे या प्रश्नाने गंभीर स्वरुप धारण केलेले असताना शासनाकडून नागरिकांच्या सुरक्षितेबाबत कोणताही

२...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

धोरणात्मक निर्णय घेण्यात न घेणे, डिम कन्व्हेनिअन्सबाबत मा.मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक घोषणा केलेली असताना घोषणेची अमलबजावणी मात्र करण्यात न येणे, मुंबई विमानतळामुळे विस्थापित झ ाालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी नेमलेल्या एमआयएएल कंपनीने हजारो प्रकल्पग्रस्तांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन न करणे, त्याचवेळेस नवी मुंबई विमानतळाची घोषणा सन २००५ पासून करुनही अद्यापपर्यंत विमानतळासाठी आवश्यक असणारी जमिन देखील संपादित करण्यास शासनास अपयश येणे, एमएमआरडीए क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका व शासनाच्या विविध यंत्रणा यांचा समन्वय घडवून केंद्र शासनाकडून जास्तीतजास्त निधी उपलब्ध होईल याकरिता एक समन्वय समिती असण्याची आवश्यकता परंतु या सर्व समस्यांबाबत शासनाचे झ ाालेले दुर्लक्ष त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, अधिवेशनात अतिम आठवडा प्रस्ताव हा खऱ्या अर्थाने राज्यातील महत्वाच्या समस्यांवर घेण्याची प्रथा विरोधी पक्षाने पाडलेली आहे. गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेला पैसा कसा व कोठे वळविला गेला या अनुषंगाने चर्चा उपस्थित करण्यात आली होती.

सभापती महोदय, मुंबई महानगर प्राधिकरण विभाग जो आहे. एमएमआरडीए नाही. एमएमआरडीए रीजन ज्यात मुंबई येते, ठाणे, मिरा-भाईंदर, पालघर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, पनवेल, अलिबाग यांचा समावेश आहे. या विभागात ८ महानगरपालिका आणि २ नगरपालिका या क्षेत्रात येतात. या क्षेत्रात २ कोटी १० लाख लोकांचे वास्तव्य आहे. जवळ जवळ ६४ विधानसभा सदस्यांचा हा भाग या क्षेत्रात येतो. या सगळया भागात जनतेच्या मोठया समस्या निर्माण झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेब, मुंबई आणि आसपासच्या भागातल्या माणसाकडे माणूस म्हणून बघितले जात नाही. त्यांच्याकडे लोंढा म्हणून पाहिजे जाते. शेवटी या माणसाला स्वत:च्या काही गरजा आहेत, त्यासंबंधी विचार न करता एक लोंढा म्हणून एक समूह म्हणून त्याचा विचार केला जातो. या लोंढयांसाठी काय व्यवस्था करावयाची आहे. मग काही तरी त्यांच्यासाठी मास रेंटल स्कीम जाहीर करावयाची. परिवहना संबंधी एखादी योजना जाहीर करावयाची. परंतु या महानगर प्रदेशांमध्ये विविध समस्या आहेत. त्या

३...



ABG/ KTG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम १८:२०

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

समस्यांच्या बाबतीत राज्य शासनाला वेळेतच जागरुक झाले पाहिजे. आपणाकडून अनेक घोषणा केल्या जातात, अनेक योजना जाहीर केल्या जातात, परंतु त्या घोषणांची तसेच योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकांची आर्थिक स्थिती नसते. आपणाकडून प्लॅनिंगचे काम परफेक्ट केले जाते. योजनांचे चित्र अतिशय चांगले दाखविले जाते. परंतु त्या योजना प्रत्यक्षांत अंमलात येताना दिसून येत नाहीत. You cannot escape the responsibility of tomorrow by evading it today. असे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी सांगितले होते आणि त्या अनुषंगाने मला राज्य सरकारला सांगावेसे वाटते की, आपल्याला विकासाची जबाबदारी झटकता येणार नाही. विकासाची अवस्था अतिशय वाईट आहे. या प्रदेशातील निवारा असेल, वाहतूक असेल, सॉलिडवेस्ट मॅनेजमेंट असेल, पर्यावरण असेल, शिक्षण, आरोग्य, उद्योग, रोजगार या सगळया गोष्टींचा एकत्रपणे विचार राज्य शासनाने कधी केला आहे काय ? आपण येथे सांगतो की, ही महापालिका अमूक पक्षाची आहे, ती महापालिका दुसऱ्या पक्षाची आहे. एमएमआरडीएस रिजनमधून ६४ आमदार निवडून येत आहेत. या क्षेत्रात २ कोटी १० लाख लोकसंख्या आहे. तेथील लोकांच्या मुलभूत गरजा काय आहेत. मुलभूत गरजा पूर्ण करण्यासंबंधीची मागणी आहे, ती मागणी राज्य शासन पूर्ण करणार आहे की नाही हा खरा महत्वाचा प्रश्न या ठिकाणच्या जनतेसमोर आज उभा राहिलेला आहे. एमएमआरडीए रीजन क्षेत्रात ८ महानगरपालिका आणि २ नगरपालिकांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या २० टक्के लोकसंख्या या क्षेत्रात आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महाराष्ट्राची 20 टक्के लोकसंख्या या भागात रहात असेल तर या क्षेत्राच्या विकासासाठी निधी दिला पाहिजे. एमएमआरडीए, म्हाडा, सिडको या शासन संस्था विकासासाठी कार्यरत आहेत. असे असूनही महानगर क्षेत्रातील महापालिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत हे खरे आहे. त्या भागात प्रामुख्याने पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो. रस्ते, दळणवळणाची साधने, जागोजागी दिसणाऱ्या झोपडपट्टया, पाणीपुरवठा, पाण्याचा निचरा करण्यासाठी भूमिगत गटारे, त्याचे व्यवस्थापन करणारी यंत्रणा, वाढते प्रदूषण, धोकादायक इमारतींची वाढती संख्या, वाढत्या नवीन टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे पुढे येणारी आव्हाने या दृष्टिकोनातून राज्यातील 20 टक्के जनतेचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, एमएमआरडीए, सिडको आणि म्हाडा या संस्थांमध्ये एकमेकाशी समन्वय नसल्याचे आम्ही अनेकदा सभागृहात अनुभवले आहे. या महानगर भागात मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, पोर्ट, एअरपोर्ट आदी 10 ते 12 केंद्र सरकारच्या अखत्यारितील विभाग आहेत. राज्याच्या मुख्य सचिवांनी बैठक बोलावल्यानंतर रेल्वेचे अधिकारी ऐकतील याचा भरवसा नाही. परस्पर समन्वय नसल्यामुळे या भागातील जनता अनाथ झालेली आहे. या जनतेचा फुटबॉल झालेला आहे. पावसाळ्यामुळे ज्या अडचणी निर्माण होतात त्या संदर्भात टोलवाटोलवी केली जाते. या भागात राहणाऱ्या राज्याच्या 20 टक्के जनतेला स्वतःचा चेहरा आहे, स्वतःच्या भावना आहेत, इमोशन्स आहेत. जो आपल्या कुटुंबाची, मुलांची, पुढील पिढीची स्वप्ने पाहतो त्याच्या स्वप्नाचा चक्काचूर करण्याचे काम नियोजन शून्यतेमुळे होते.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात वरिष्ठ सभागृहात चर्चा करुन त्यांच्या स्वप्नाला आकार देणार का? त्यासाठी काही धोरण करणार का ही अपेक्षा या चर्चेच्या माध्यमातून अपेक्षित आहे. सभापती महोदय, मघाशी सभागृहात गृहनिर्माण राज्यमंत्री उपस्थित होते, आता ते सभागृहातून बाहेर गेले असून नगरविकास राज्यमंत्री सभागृहात आलेले आहेत. एकमेकांना खो देण्याचे काम सुरु आहे. विधानसभेत मुंबईच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली असल्यामुळे तोच विषय पुन्हा आणण्यात अर्थ नाही म्हणून मुंबईसह 8 महापालिका, 2 नगरपालिकांच्या भागातील विषयावर वेगळ्या पध्दतीने चर्चा केली आणि त्यातून सरकारला काही उपाययोजना करणे शक्य झाले तर मार्ग निघू शकतो हा दृष्टिकोन ठेवला आहे. परंतु सरकारकडून काही होताना दिसत नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

एमएमआरडीएचे ब्रीदवाक्य आहे, "Balanced and Orderly Development" आज अवस्था अशी झ ााली आहे की,"Imbalanced and Inorderly Development."

सभापती महोदय, या प्राधिकरणाचे क्षेत्र 04,350,05 कि.मी.असून त्यात 8 महापालिका, 2 नगरपालिका, ठाणे आणि रायगड जिल्हयातील हजारो खेड्यांचा समावेश आहे. एमएमआरडीएकडे मुंबईकरिता उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम अशा दिशेने चार प्रमुख रस्ते असून सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोड, जेव्हीएलआर, सायन-देवनार रस्त्यांचे जाळे आहे. वसईचा फ्रेट कॉरिडॉर आहे. लि कन्सल्टन्सीचा रिपोर्ट आलेला आहे. त्यातून किती साध्य केले, किती साध्य होणार आहे, कुठपर्यंत पोहोचणार आहोत याबाबतचा विचार केला पाहिजे. रस्त्यांचे जाळे हे दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचे ठरु शकतात. आपण कुठे आहोत, काय करीत आहोत, काय करणार आहोत हे त्यातून स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे युती सरकारच्या मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांच्या कॅबिनमध्ये आम्हाला अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष केनेडी यांचे वाक्य नेहमी वाचायला मिळत असे. ते असे आहे की, "American Roads are not good because America is rich, but America is rich because American Roads are good."

नंतर 4एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

त्या रस्त्यावरुन सर्व दळणवळण व्हायचे, त्याच्या माध्यमातून व्यापार वाढावयाचा त्यामुळे अमेरिकेची इकॉनॉमी ग्रो होत गेली. त्यामुळे अमेरिकेप्रमाणे आपण सुध्दा मानसिकता ठेवली तर या भागातील पायाभूत सुविधा चांगल्या प्रकारे जनतेला मिळू शकतील हा विषय आहे. त्यामुळे या विषयाकडे आपण पाहणार आहोत काय हा खरा महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, एमएमआरडीएच्या विविध प्रकल्पामध्ये मेट्रो रेलचेही काम आहे. मुंबईमध्ये 110 लक्ष नागरिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करतात. यामध्ये 52 टक्के लोक रेल्वेने तर 26 टक्के लोक बसने प्रवास करतात. मेट्रो फेज-1 मध्ये वर्सोवा ते घाटकोपर या 11.4 कि.मी. मार्गाचा समावेश होता. सन 2006 मध्ये फेज-1चे काम सुरु करण्यात आले. यामध्ये 11.4 कि.मी.चा एलिव्हेटेड कॅरिडोर असून वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर यासाठी 2,356 कोटी रुपयांचा खर्च सांगितला आहे. 31 ऑक्टोबर, 2012 पर्यंत 2,307 कोटी रुपये खर्च झाले असून अद्याप सदरचे काम पूर्ण झालेले नाही. हा प्रकल्प जून 2010 मध्ये पूर्ण व्हावयाचा होता. माजी माननीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख तसेच माननीय श्री. अशोक चव्हाण साहेबांनी फेज वनच्या प्रकल्पाचे थोडयाच दिवसात उद्घाटन केले जाणार आहे अशा घोषणा केल्या होत्या. आता माननीय पृथ्वीराज चव्हाण साहेब आलेले आहेत त्यांनी त्याच पध्दतीने घोषणा केलेल्या आहेत. हे लक्षात घेतले तर अजूनही हे काम पूर्ण झाले नाही. सन 2010 पर्यंत हे काम पूर्ण होणार होते. परंतु आता 2013 च्या मध्यावर आलेला असतांनाही प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या प्रकल्पाचे काम पूर्ण कधी होणार आहे ? रेल्वे काम करु देत नव्हते, महापालिका काम करु देत नव्हते त्यामुळे विलंब झाला असे सांगितले जाईल. मेट्रोच्या आसपासच्या कामाचे अधिकार एमएमआरडीएला दिलेले आहेत. एमएमआरडीच्या जवळचे काम सुरु करावयाचे असेल तर एमएमआरडीएची परवानगी घ्यावी लागते. अगोदर महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागत होती. इतके अधिकार एमएमआरडीएला दिलेले असतांना सुध्दा काम होत नाही. त्यामुळे ठेकेदाराने काम उशिरा का केले ? रिलायन्स इन्फ्राकडे काही काम आहे. एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी काम पूर्ण केले नाही की, आपले प्लॅनिंग चुकीचे होते की, जी कामे करणार होतो त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी समोर येणार आहेत याची माहिती न घेतल्यामुळे काम रेंगाळले व त्यामुळे काम पूर्ण करण्यामध्ये आपण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

कोठे तरी कमी पडलो आहोत  असे वास्तव आहे काय ?

सभापती महोदय, मोनोरेलचे संतगाडगे महाराज चौक ते वडाळा-चेंबूर स्टेशन दरम्यानचे काम एलएनटी आणि स्क्रोल इंजिनिअरिंग यांना देण्यात आले होते. सदरचे काम मार्च 2011 पर्यंत पूर्ण होणार होते. परंतु हे काम जुलै, 2013 पर्यंत सुध्दा पूर्ण झालेले नाही. या प्रकल्पाचा खर्च 2460 कोटी रुपये असून 31 ऑक्टोबर, 2012 पर्यंत 1,397 कोटी रुपये खर्च झाले आहेत. वास्तविक पाहता मेट्रो रेलचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मोनो रेले कनेक्टींग ट्रान्स्पोर्ट म्हणून जोडला जातो. परंतु मेट्रो पूर्ण होण्याच्या आधीच मोनोरेल पूर्ण झाली परंतु अद्याप सदरची सेवा नागरिकांसाठी कशी खुली करावयाची याबाबत साशंकता सुरु आहे.

सभापती महोदय, मोनो आणि मेट्रो रेलचे अपघात झाले त्यासंदर्भात सभागृहात चर्चाही झालेली आहे. परंतु अपघात झाल्यानंतर क्रेन चालविणाऱ्याला शिक्षा केली गेली. परंतु ही जबाबदारी प्रत्यक्ष त्या कंपनीची असते. त्यामुळे यासंदर्भात आपण संबंधित कंपनीवर काय कारवाई केलेली आहे ? या ठिकाणी सामान्य मजूर मरतो, त्या मजूराच्या जीवाचे या कंपनीला काहीही महत्व नाही अशा पध्दतीने विचार होत असेल तर एलएनटी, स्क्रोनी, जय कुमार या कंत्राटदारांवर कारवाई का झाली नाही ? कारवाई होत नाही याबाबत ज्यावेळी मजुरांबरोबर आणि त्या ठिकाणच्या रहिवाश्यांबरोबर चर्चा होते तेव्हा एमएमआरडीएचे अधिकारी यांचे कंपन्यांबरोबर  साटेलोटे आहे ही बाब समोर येते. यामध्ये गरिबाचा जीव गेला तरी त्या विषयात कोणतीही कारवाई सरकार किंवा अधिकारी करीत नसल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, स्काय वॉक की, मिनी वॉक ? स्कायवॉक हा पांढरा हत्ती असून यामध्ये अतिशय नियोजन शून्य काम झालेले आहे. स्कायवॉकची चर्चा या सभागृहात खूप वेळा झालेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

स्कायवॉक विषयी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी चर्चा उपस्थित केली होती. तेव्हा त्यांनी सीआयडी मार्फत या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली होती. 35 कामे करण्याचा एमएमआरडीएने निर्धार केला होता. यावर झालेल्या खर्चाचा तपशील मी काढलेला आहे. बदलापूर येथील स्कायवॉकसाठी 10 कोटी, विद्याविहार येथील स्कायवॉकसाठी 7.28 कोटी, कांजूरमार्ग येथील स्कायवॉकसाठी साडेपाच कोटी, विरार येथील स्कायवॉकसाठी सव्वा नऊ कोटी रूपये खर्च करण्यात आले आहे. एकूण 641 कोटी रूपयांचे स्कायवॉक बांधण्याचे आपल्या डोळ्या समोर होते. त्यापैकी किती स्कायवॉक आज वापरात आहेत ? मी मुद्दाम काही स्कायवॉकवर गेलो. त्याची उपयोगिता किती आहे ती पाहिली. स्कायवॉक नुसते बांधून चालत नाही त्यासाठी कल्चर डेव्हलप करावी लागते. आपल्या येथील मानसिकतेचा आपण विचार केलेला नाही. आज या स्कायवॉकचा उपयोग भिकारी, गर्दूल्ले करीत आहेत. आज तेथे त्यांच्या झोपड्या झाल्या आहेत. वांद्रे येथील स्कायवॉकच्या बाजूची झोपडी वर येत गेली. त्यामुळे झोपडीतील माणूस त्याच्या बेडरूम मधून डायरेक्ट स्कायवॉक वर जातो.

**तालिका सभापती** : मला सभागृहाला विचारावयाचे आहे की, सदर चर्चा सुरू ठेवायची आहे काय ? माननीय विरोधी पक्ष नेते सांगतील त्या प्रमाणे ठरविण्यात येईल. याबाबत सभागृहाची काय इच्छा आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दोन्ही बाजूंकडील माननीय सदस्यांचे मत विचारात घेता मी रात्रभर ऑनलेग राहण्यास तयार आहे. आपण सर्वजण मिळून एमएमआरडीएचे प्रश्न मिटवू या.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते आणि सर्व सन्माननीय सदस्यांची भावना लक्षता घेऊन सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक 2 ऑगस्ट 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह घेण्यात येईल.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 6 वाजून 48 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 2 ऑगस्ट 2013 च्या सकाळी 10.00 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही